दुसरी झुंज



बाबुराव अर्नाळकर

दुसरी झुंज

(झुंजार-कथा)

लेखक

बाबूराव अर्नाळकर

रहस्यमाला प्रकाशन, हेमराजवाडी, मुंबई २.

किंमत २ रुपये

ाक
. आर्. प्रभू
.हस्यमाला प्रकाशन
हेमराजवाडी, मुंबई २.

पत्रव्यवहाराचा पत्ता–
श्री. आर्. प्रभू
रहस्यमाला प्रकाशन,
हेमराजवाडी, मुंबई २.

मुद्रक
वि. कृ. पटवर्धन
जयभारत मुद्रणालय,
५५१ बुधवार पेठ, पुणें २.

दुसरी झुंज

१

झुंजारनें आपली करमणूक करण्यासाठीं एक अभिनव मार्ग शोधून काढला होता. ' महाभारत ' स्टोअर्समध्यें त्यानें सेल्समनची नोकरी धरली होती व तो लहान मोठीं घड्याळें विकत होता. ' महाभारत ' हा मुंबईंतला एक नव्यानेंच सुरू करण्यांत आलेला प्रचंड स्टोअर्स होता व तेथें मनुष्याला जगण्यासाठीं आवश्यक असलेली प्रत्येक वस्तु मिळत होती. सुईपासून कुऱ्हाडीपर्यंत तर साध्या लाटण्यापासून पलंगापर्यंत आणि मण्यांपासून हिऱ्यांपर्यंत सर्व कांहीं तेथें होतें. पुस्तकें, औषधें, चैनीच्या वस्तू, भांडीं, धान्य, खाद्यपेयें त्या स्टोअर्समध्यें मिळत असत. ' महाभारत' हें त्या स्टोअर्सचें नांव अगदीं सार्थ होतें.

झुंजारनें त्या स्टोअर्समध्यें नोकरी पत्करल्यानंतर त्याला घड्याळांच्या विभागांत काम देण्यांत आलें. त्यानें कांहीं आठवड्यांतच विक्रीचे सर्व उच्चांक मोडले होते व त्याचें नांव खुद्द भारद्वाज शेठजींच्या कानावरहि गेलें होतें. भारद्वाज शेठजी ' निर्वासित ' होते. व ते निर्वासित असल्यामुळेंच त्यांना इतक्या प्रचंड प्रमाणावर धंदा करतां येत होता. !

अर्थातच केवळ गंमत म्हणून झुंजारनें ती नोकरी पत्करली नव्हती. त्याला मनगटावरील, भिंतीवरील किंवा राजाबाई टॉवरसारख्या इमारतीवरीलहि घड्याळाबद्दल मुळींच आकर्षण वाटत नव्हतें. तो कांहीं सामान्य चोर नव्हता. त्याला चांगलाच हात मारायचा होता व त्यासाठीं तो आपला मार्ग साफ करीत होता. कंबोडच्या सुलतानाचें सिंहासन पळविण्याचें त्यानें ठरविलें होतें.

भारद्वाज शेठजींना जाहिरातबाजीची विद्या अवगत होती. जेव्हां कंबोडचा सुप्रसिद्ध सुलतान आपलें ऐतिहासिक सिंहासन विकण्यासाठीं मुंबईस येणार आहे असें त्यांना समजलें त्याबरोबर त्यांनीं सुलतानाच्या प्रतिनिधीबरोबर वाटाघाटी सुरू केल्या व आपल्या स्टोअर्समध्यें ते

र्शनासाठीं ठेवण्याबद्दल सुलतानाची संमति मिळविली. याबद्दल अर्थातच बरीच आगाऊ प्रसिद्धि झाली होती. व त्यामुळेंच झुंजारचें त्या सिंहासनाकडे लक्ष गेलें.

तें सिंहासन अपूर्व होतें. अगदीं महंमद पैगंबराच्या काळापासून तें कंबोडच्या सुलतानाकडे होतें आणि आतां तें सध्यांच्या पाजी सुलतानाकडे आलें होतें. तें सिंहासन केवळ रत्नांचेंच बनविण्यांत आलें होतें. हिरे, माणकें व पाचू यांनीं तें अगदीं खच्चून भरलेलें होतें. तें सबंध सिंहासन विकण्याचें सुलतानानें ठरविलें होतें व जर मुंबईंत गिऱ्हाईक मिळालें नाहींतर पुढें इंग्लंड–अमेरिकेचा दौरा काढण्याचें त्याच्या मनांत होतें. त्या सिंहासनाची किंमत पन्नास लक्षांपेक्षांहि अधिक आहे असें वर्तमानपत्रें म्हणत होतीं. पण अनेक वर्तमानपत्रांना अतिशयोक्ति करण्याची संवय असते.

त्या सुलतानाचें तें अपूर्व सिंहासन पळविणें हें जणुं काय न्यायाचें काम असून तसें करणें आपलें कर्तव्यच आहे असें झुंजार समजत होता. कारण सुलतान अत्यंत जुलमी व विषयलंपट होता. तो आपल्या रयतेला अगदीं पिळून काढीत होता. तो मलायांतील आपल्या छोटया राज्यांतील सुंदर तरुणींना जबरदस्तीनें पकडून त्यांना आफ्रिका, अरबस्थानांत गुलाम म्हणून विकत असे असाहि लोकप्रवाद होता. आणि म्हणून त्याचें तें सिंहासन पळविणें हें न्यायाचें आहे असें झुंजार समजत होता.

सुलतान चैनी, विलासी आणि विषयलंपट असल्यामुळें त्याचा खजिना आतां जवळजवळ रिकामा झाला होता व म्हणूनच त्यानें तें आपलें ऐतिहासिक व बहुमोलाचें सिंहासन विकावयास काढलें होतें. अर्थातच तें त्याचें राजदरबारांतलें सिंहासन नव्हतें. त्याच्या खजिन्यांत असलेल्या कित्येक बहुमोलाच्या वस्तूंपैकीं तें होतें.

झुंजारनें त्या हेतूनेंच भारद्वाज शेठजींच्या महाभारत स्टोअर्समध्यें नोकरी पत्करली होती, त्याची योजना अगदीं मजेदार व साधी होती. प्रदर्शनाला सुरुवात होईपर्यंत तो स्टोअर्समधील सर्व विभागाच्या व्यवस्थापकांबरोबर ओळख करून घेणार होता व नंतर संधि साधून तें सिंहासन लांबविणार होता.

अलीकडे झुंजारनें जीं कांहीं कामें पत्करलीं होतीं त्यापासून त्याचा सांपत्तिक फायदा झाला नव्हता. त्याचा खर्च अफाट होता व सारखें शिल्लकींतून खर्च करणें त्याच्या जिवावर येत होतें. त्यामुळें केवळ परोपकाराची वृत्ति न बाळगतां स्वतःचा खिसा गरम करणारी कांहीं

कामगिरी तो शोधीत होता व त्याचवेळीं त्या सिंहासनाबद्दलची माहिती त्याला मिळाली होती

महाभारत स्टोअर्समध्यें पाऊल ठेवतांच झुंजार चमकूं लागला. हिरा कुठेंहि पडला तरी त्याचें तेज थोडेंच झांकलें जातें ? एका आठवड्यांत त्यानें स्वतःचा विभाग इतका भरभराटीस आणला कीं, महाजिकच इतर सर्व खात्यांच्या प्रमुखांचें लक्ष त्याच्याकडे वेधलें गेलें. दोन आठवड्यांतच त्याला बढती देण्याबद्दल स्टोअर्सचें कार्यकारी मंडळ विचार करूं लागलें.

झुंजारची नेमणूक होतांच महाभारत स्टोअर्समधील लहानमोठीं घड्याळें चणे-फुटाण्याप्रमाणें विकलीं जाऊं लागलीं. घड्याळाचा पट्टा विकत घेण्यासाठीं आलेलें गिऱ्हाईक नवीन घड्याळ घेऊनच बाहेर पडूं लागलें. झुंजारचें व्यक्तिमत्वच तितकें प्रभावी होतें. एकदां गिऱ्हाईक त्याच्या हातांत सांपडलें कीं, तें लोण्याच्या गोळ्याप्रमाणें विरघळून जात असे आणि त्यांत जर तें स्त्री-गिऱ्हाईक असलें तर मग विचारूंच नका ! त्याच्या तडाख्यांत सांपडलेल्या कित्येक दुर्दैवी स्त्रियांनीं आपल्या घरांत प्रदर्शन भरविण्याइतकीं घड्याळें नेलीं होतीं ! ही अतिशयोक्ति मुळींच नव्हती.

भारद्वाज शेठजींना त्यानें जीं शिफारसपत्रें दाखविलीं होतीं तीं सारींच अप्रतिम होतीं. त्या शिफारसपत्रांचा शेठजींच्या मनावर ठसठशीत परिणाम होणार अशी त्याची खात्री झाली होती कारण तीं सर्व त्यानेंच तयार केलीं होतीं ! कुणी कितीहि आपल्याबद्दल चौकशी केली तरी त्याला संशय घेण्यास मुळींच जागा राहूं नये अशा प्रकारचा कडेकोट बंदोबस्त आगाऊ केल्यानंतरच तो शेठजींकडे गेला होता.

त्याच्या विभागाचा मॅनेजर त्या पंधरा दिवसांतच त्याचा परम मित्र बनला होता. कामाची वेळ वगळल्यास ते दोघे एकमेकाला 'अरे तुरे करूं लागले होते. जवाहीर विभागाचे मॅनेजर चमनलाल रोज दुपारीं झुंजारबरोबरच चहापान करीत असत. स्टोअर्समधील सर्वच कामगार व अधिकारी त्याला मान देत होते. आपण राजीनामा देऊन सेवून निघून गेल्यानंतर सुलतानाच्या सिंहासनाइतकेंच त्यांना आपल्याबद्दलहि विरहदुःख होईल व ते आपला त्या चोरीशीं कांहींच संबंध जोडणार नाहींत अशी त्याची खात्री होती.

झुंजार हा महाभारत स्टोअर जवळच एक लहानशा जागेंत रहात होता. तेथल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांचें त्याच्याबद्दल फार चांगलें मत

ती झुंजार फक्त शनिवार व रविवार हे दोन दिवस आपल्या नातेवाईकांकडे रहावयास जात असे. त्याचे नातेवाईक म्हणजे विजया, नेताजी, आणि विजयेची मावशी होती. ती मंडळी जवळच असलेल्या बादशाही झुंजार-महालांतच असते हें त्या शेजाऱ्यांना मुळींच माहीत नव्हतें.

झुंजारनें आपलें दयाळमध्यें रूपांतर करून घेतलें होतें. ती पद्धतहि साधी व त्यामुळेंच विशेष परिणामकारक होती. त्यानें वेषांतरासाठीं अगदीं कसून मेहनत घेतली नव्हती. त्यानें केंस विंचरण्याची पद्धत बदलली होती. कपाळावरील केंसांच्या मुळांना त्यानें थोडासा करडा रंग दिला होता व वर्ण किंचित काळासांवळा बनविला होता.

या क्षुल्लक फरकामुळेंच तो कितीतरी वेगळा दिसत होता. त्यानें बोलण्याची व चालण्याची पद्धत बदलली होती. पेहराव साधा करण्यास सुरुवात केली होती व सोन्याची सिगरेट-केस व लायटर घरीं ठेवून तो सिगारेटची कागदी पेटी खिशांत बाळगीत होता. त्यामुळें अगदीं परिचित माणसालाहि दयाळ हाच झुंजार आहे असें म्हणतां आलें नसतें.

अशी परिस्थिति असतांना व ते सिंहासनाच्या प्रदर्शनाचे दिवस अगदीं जवळ येऊन ठेपले असतांना एके दिवशीं संध्याकाळीं महाभारत स्टोअर्सचा मुख्य दरवाजा बंद झाला होता. तेथें काम करणारे शेंकडों नोकर ट्राम्स, बस किंवा आगगाडी गांठण्यासाठीं धांवपळ करीत बाहेर पडत होते. झुंजारहि बाहेर जाण्याच्या तयारीनें जवाहीर विभागांतून दाराकडे जात असतांना चमनलालांच्या व त्यांच्या एका मदतनीसाच्या संभाषणाचा कांहीं भाग त्याच्या कानांवर पडला व तो तेथेंच रेंगाळत राहिला.

'पण चमनशेठ, पेण हें पनवेलपेक्षांहि पुढें आहे ना? तेथून परत येईपर्यंत मध्यरात्र होईल-'

'परत यायला तुला किती वेळ लागेल त्याच्याशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं.' चमनलाल म्हणाले, 'आतां पांच वाजले आहेत, आठ वाजण्याच्या आंत हें पार्सल मुक्कामावर पोहोंचलेंच पाहिजे. काळे, तुला झालें आहे तरी काय? असली संधि सहसा मिळत नसते. एका नवकोट नारायणाबरोबर प्रत्यक्ष परिचय करून घेण्याची संधि तुला मिळणार आहे. राजबहाद्दूर तेथें रहावयास गेल्यापासून पेणला अतिशय महत्त्व प्राप्त झालें आहे.'

झुंजारनें आपले कान टवकारले. राजबहाद्दूर या नांवाचें त्यालक

विशेष कांहींच वाटलें नसतें, पण चमनलालांनीं ‘ नवकोट नारायण ’ हे शब्द उच्चारले होते. आणि त्याबरोबर त्याला बऱ्याच गोष्टी आठवल्या. राजबहाद्दूर नांवाच्या उत्तर प्रदेशांतील एका श्रीमंतानें पेणच्या वाडी-जवळ एक जुना वाडा विकत घेतला होता आणि त्यांच्याबद्दल वर्तमान-पत्रांत अनेक गोष्टी प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यामुळें या राजबहाद्दुरा-वरून नजर फिरवावी असा विचार झुंजारच्या मनांत पूर्वींहि आला होता. पण त्यानंतर ती सिंहासनाची भानगड निघाली होती.

‘होय चमनलालशेठ, राजबहाद्दूर सामान्य गिऱ्हाईक नाहीं हें मलाहि माहीत आहे.’ काळे म्हणाले, ‘एरव्हीं तुम्हीं त्याचें नांव घेतांच मी तेथें पळतच निघालों असतों पण आज – असें आहे–माझी बायको –’

झुंजारला त्या दुर्दैवी तरुणाबद्दल सहानुभूति वाटली. दुपार-पासूनच काळे अगदीं अस्वस्थ झाला होता व त्याचें कामावर मुळींच लक्ष नव्हतें.

‘तुझी बायको आजारी आहे त्याबद्दल मला वाईट वाटतें –’ चमनलाल म्हणाले,

‘माझ्या बायकोला आतां – कसें सांगूं साहेब– ती बाळंतपणासाठीं हॉस्पिटलांत गेली आहे. तेव्हां – तेथें गेलेंच पाहिजे.’

‘काळे, बायको बाळंतपणासाठीं गेल्यानंतर तुझें तेथें काय काम आहे ?’ चमनलालनें विचारलें, ‘तेथें डॉक्टर आहेत, नर्स आहेत; तिची चिंता करण्याचें कारण नाहीं. तूं तेथें जाऊन आणखी काय करणार आहेस ?’

झुंजार जलदगतीनें विचार करीत होता. तो पुढें होऊन म्हणाला, ‘काळे, मी तुझें अभिनंदन करतों, तुला मुलगाच व्हावा असें मी इच्छितों. मला आतां कांहीं महत्त्वाचें काम नाहीं. चमनलालांची परवानगी असली तर मी तुझें काम करतों.’

‘दयाळ, तूं खरेंच माझें काम करशील कारे ?’ काळेनें उत्सुकतेनें व अपेक्षेनें चमनलालकडे पाहिलें.

‘दयाळ, तूं कंपनीचें काम करण्याबद्दल इतकी तत्परता दाखवतोस याबद्दल मला आनंद होतो.’ चमनलाल म्हणाले, ‘पण तूं माझ्या खात्यांत नाहींस.’

‘खात्याबद्दल विचार करण्याची ही वेळ आहे काय ?’ झुंजारनें विचारलें, ‘बिचाऱ्या काळेला जबरदस्तीनें पाठविण्यात काय अर्थ आहे ? शिवाय एक पार्सल पोहोंचवायचें एव्हढेंच काम आहे ना ? चमनलाल, तुम्हांला किती मुलें आहेत ?’

'दोन, पण ---'

'तुमच्या पहिल्या मुलाच्या जन्माच्या वेळीं तुमची काय स्थिति झाली होती तें आठवा.' झुंजार म्हणाला, 'चमनलाल, जरा सहानुभूति दाखवा. बिचारा काळे अगदीं कासावीस झालेला आहे. जर तुमचें काय काम आहे तें तुम्हीं मला सांगितलेंत ---'

'होय दयाळ. तुझें म्हणणें बरोबर आहे.' कांहीं विचार मनांत येतांच चमनलाल म्हणाले, 'ठीक आहे. काळे, तुला घरीं जायला हरकत नाहीं. पण तूं माझे आभार मानूं नकोस, या दयाळचे मान. थांब, थांब, तुला तुझी टोपी येथेंच ठेवायची आहे काय ?'

काळेनें हंसून आपली टोपी उचलली आणि तो दयाळ व चमनलाल यांचे आभार मानीत तेथून पळाला. क्षणभर चमनलाल दयाळकडे पहात स्तब्ध राहिले. तो आपल्या खात्यांत यावा अशी त्यांची अतिशय इच्छा होती. घड्याळांमध्यें तो आपली बुद्धि आणि आयुष्य फुकट घालवीत आहे असें त्यांचें मत होतें.

त्यांनीं तशी भारद्वाज शेठजींकडे मागणीहि केली होती. पण कार्यकारी मंडळाच्या येत्या बैठकींत त्या गोष्टीचा विचार करण्यांत येईल असें त्यांनीं सांगितलें होतें. दयाळ आपल्याच खात्याला योग्य आहे हें सिद्ध करण्याची ही आयतीच संधि मिळाली आहे असें अचानक त्यांच्या मनांत आलें होतें. जर दयाळनें राजबहाद्दुरांकडून मोठी ऑर्डर मिळविली तर त्यामुळें त्यांनाच मोठेपणा मिळणार होता. दयाळचा प्रभाव राजबहाद्दुरावर पडल्याशिवाय रहाणार नाहीं अशी त्यांची पक्की खात्री होती.

'दयाळ, जें झालें तें एकार्थी ठीकच झालें.' ते त्याला आपल्या विश्वासांत घेत म्हणाले, 'मी तुला ही मोठीच संधि देत आहें आणि त्या संधीचा तूं योग्य उपयोग करशील अशी माझी पक्की खात्री आहे. तूं समजतोस तसें हें पार्सल सामान्य नाहीं. तें विश्वासू माणसाखेरीज दुसऱ्या कुणाच्याहि हातीं देण्यासारखें नाहीं. या पार्सलामध्यें सुमारें तीस हजारांचे हिरे आहेत. राजबहाद्दूर आपले नवीनच गिऱ्हाईक आहेत. त्यांना मोठी ऑर्डर देण्यास भाग पाड---'

'अरे बापरे!' झुंजार दचकून म्हणाला.

'काय झालें?' चमनलालांनीं विचारलें.

'एवढें जोखमीचें काम आहे हें मला माहीत नव्हतें.' तो म्हणाला, 'तुम्हीं माझ्यावर ही एवढी मोठी जबाबदारी सोंपविणें योग्य नाहीं.

मला जर तें पार्सल कशा प्रकारचें आहे याची कल्पना असती तर काळेला मदत करण्याच्या भानगडींत पडलों नसतों. कारण हें काम माझ्या खात्याचें काम नाहीं '

'माझें अगदीं तेंच म्हणणें आहे.' चमनलाल हंसून म्हणाले. 'तुझ्या खात्याचें तें काम नाहीं म्हणूनच तूं तें करावेंस असें मला वाटतें. त्या घड्याळांच्या खात्यापेक्षां जर तूं माझ्याकडे काम करूं लागलास तर तुला पुढें येण्याची चांगली संधि मिळेल.'

'माझ्या मनांत तोच विचार घोळत होता.' झुंजार म्हणाला, 'पण...'

झुंजारच्या मनांत कोणता विचार घोळत असावा हें चमनलालांना ओळखतां आलें नाहीं. त्याच्या प्रभावी व्यक्तिमत्वाचा त्यांच्यावर इतका परिणाम झाला होता कीं, ते आपल्या खात्यांतील सर्व माल त्याच्या स्वाधीन करण्यास कचरले नसते.

'राजबहाद्दूर कोणत्या प्रकारचे गिऱ्हाईक आहे याबद्दल मला कांहींच कल्पना नाहीं ' ते म्हणाले, 'कदाचित् ते या पार्सलांतील हिरे नाकारतील पण तूं चांगला सेल्समन आहेस. जर तूं त्यांना बोलून खूष केलेंस तर ते आपल्याकडून लाखों रुपयांचा माल घेणें अशक्य नाहीं.'

'असें तुम्हांला वाटतें ?' आश्चर्य भासवीत झुंजारनें विचारलें.

'राजबहाद्दूर सामान्य माणूस नाहीं. तो नेहमीं प्रचंड प्रमाणावर खरेदी करीत असतो.' चमनलाल म्हणाले, 'त्यांच्या घरांत नळालाहि सोन्याच्या तोटया बसविल्या आहेत असें म्हणतात. जर असें गिऱ्हाईक आपणाला मिळालें—काळे चांगला सेल्समन आहे. पण—'

'पण चमनलाल तुम्ही स्वत: कां जात नाहीं?' झुंजारनें विचारलें, 'इतकें महत्वाचें गिऱ्हाईक तुम्हीं स्वत: खात्रीनें पटवूं शकलां असतां.'

पण झुंजारइतकी चमनलालांना स्वत:बद्दल खात्री नव्हती. ते घाईघाईनें म्हणाले, 'मी स्वत:च जाणार होतों. पण त्या सिंहासनाबद्दल वाटाघाटी करण्यासाठीं सुलतानाचे दोन प्रतिनिधि थोडया वेळांतच येथें येणार आहेत. त्यामुळें मला माझ्या जागेवरून हालतां येत नाहीं. दयाळ, मला त्या सिंहासनाबद्दल अतिशय चिंता लागून राहिली आहे. मला स्वत:ला जातां येत नाहीं आणि राजबहद्दुरांनीं ही ऑर्डर आज अगदीं अचानक पाठविली आहे.'

बिचारे चमनलाल अस्वस्थ झाले होते. त्यांचा आपल्यावर इतका विश्वास आहे हें पाहून झुंजारहि अस्वस्थ झाला. चमनलालांचा भाबडा स्वभाव त्याला आवडत होता. त्यांना संकटांत लोटण्याची त्याची मुळींच

ला नव्हती. त्यानें रावबहाद्दूर आंस तें पार्सल तर नेऊन द्यावयाचेंच व आपल्या व्यक्तिमत्वानें त्याला दिपवून चमनलालांसाठीं एक बरीच मोठी ऑर्डर मिळवायची असा त्याचवेळीं निश्चय केला.

चमनलालांचें काम करतांना त्याला ज्यांच्याबद्दल कुतूहल वाटत होतें, त्या राजबहाद्दुराला अगदीं जवळून पहाण्याची संधि मिळणार होती. त्यांच्या वाड्यांत सरळ प्रवेश करण्यास तें पार्सल त्याला परवला-प्रमाणें उपयोगी पडणार होतें.

'तूं भाड्याच्या मोटारीनेंच जा.' चमनलाल म्हणाले, 'कंपनी तुझा जाण्यायेण्याचा खर्च करील. तुझें काम झालें कीं सरळ येथेंच परत ये. मी तुला येथेंच भेटेन. आज रात्रीं मला किती वाजतां घरीं जातां येईल तें एक ईश्वरास माहीत!'

आणि अशाप्रकारें झुंजार राजबहाद्दुरांकडे जावयास निघाला तेव्हां अतिशय खुषींत होता. त्याचा पिंडच प्रयत्नवादी होता. ते तीस-पस्तीस हजारांचे हिरे त्याच्याजवळ अगदीं सुरक्षित होते. दयाळ हा कोण आहे हें चमनलालांना समजतें तर मात्र ते खात्रीनें घाबरले असते पण झुंजारच्या दृष्टीनें त्या लहानशा रकमेला कांहींच महत्त्व नव्हतें. राज-बहाद्दुराला पहाणें ही त्याच्या दृष्टीनें महत्त्वाची गोष्ट होती.

राजबहाद्दुराचें कांहीतरी रहस्य असलें पाहिजे असें त्याचें स्वतःचें मत होतें. कदाचित तें मत चुकीचेंहि असण्याचा संभव होता. तो उत्तर हिंदुस्थानांतील लहरी श्रीमंतांपैकीं एक असणेंहि शक्य होतें. आज रात्रीं त्या गोष्टीचा निर्णय लागणार होता.

राजबहाद्दुराची वागणूक व त्याच्या कल्पना वैशिष्ट्यपूर्ण होत्या यांत मुळींच शंका नव्हती. तो आपली लक्षावधि रुपयांची सर्व संपत्ति बरोबर घेऊन मुंबई प्रांतांत आला होता व त्यानें जाहीरपणेंच आपल्या मातृभूमीचा, 'आपल्या प्रांताचा' त्याग केला होता. आपला प्रांत बद-माषांचा, चोरट्यांचा व चळवळ्यांचा आहे असें त्यानें सुरुवातीलाच छातीठोकपणें जाहीर केलें होत.

मुंबईंत पाऊल टेवल्यानंतर दोनच दिवसांनीं त्यानें ताजमहाल हॉटेला-मध्यें एक थाटाची मेजवानी दिली होती व मुंबईतील सर्व वर्तमानपत्रांच्या संपादकांना व वार्ताहरांना त्या मेजवानीला बोलाविलें होतें. त्यानें त्यावेळीं केलेल्या आपल्या भाषणांत आपल्या प्रांतावर सडकून टीका केली होती. मानवी लांडग्यांपासून आणि जळवांपासून आपलें रक्षण व्हावें या हेतूनेंच आपण आपला प्रांत सोडून दिला आहे असें त्यानें स्पष्ट शब्दांत सांगितलें.

सान्या हिंदुस्थानांत मुंबई प्रांतच चांगला आहे व मुंबई जरी संयुक्त महाराष्ट्राची राजधानी झाली तरी आपणांला तेथं आनंदानें रहातां येईल असें आपलें मत असल्याचें त्यांनीं प्रकट केलें व त्याच हेतूनें त्यानें पेडरच्या वाडीच्या कांठावर असलेला एक जुना वाडा पूर्वीच्या दिवाळखोर मालका-कडून विकत घेतला.

तेव्हांपासून राजबहाद्दुराची व त्याच्या त्या वाड्याचीं वर्णनें वर्त-मानपत्रांत नेहमीं प्रसिद्ध होऊं लागलीं. त्यानें पूर्वीचा तो भकास वाडा आतां एक राजवाडाच बनविला होता. प्रेक्षक त्या वाड्याकडे पहातांना आश्चर्यानें थक्क होत असत. त्या खाडीच्या कांठावर राजबहाद्दुरानें आपल्या अफाट संपत्तीचें प्रदर्शन मांडलें होतें. राजबहाद्दूर हा तऱ्हेवाईक इसम होता. पण अर्थातच तो वेडा नव्हता.

त्यानें पूर्वीच्या त्या मोडकळीस आलेल्या जुनाट वाड्याचें अरेबियन नाईटसमधील अल्लाउद्दीनाच्या राजवाड्यांत जरी रूपांतर केलें होतें तरी त्यानें तेथें स्वतःच्या संरक्षणासाठीं योग्य बंदोबस्तहि केला होता. वर्त-मानपत्रांनीं तर त्या वाड्याचें, एक मजबूत किल्ला असें वर्णन केलें होतें. त्या वाड्यांत राजबहाद्दुराची खाजगी फौज होती.

लष्करी पेहराव केलेले शिपाई रात्रंदिवस तेथें पहारा करीत होते. गव्हर्नरांच्या बंगल्यांत शिरण्यापेक्षांहि त्या वाड्यांत प्रवेश मिळविणें कठीण आहे असें मानलें जात होतें आणि त्यामुळेंच आपला आंत प्रवेश होण्याची व्यवस्था झाल्याचा झुंजारला आनंद होत होता. महाभारत स्टोअर्सचा प्रतिनिधि या नात्यानें तो त्या वाड्यांत जाणार होता.

त्यावेळीं मिळविलेली सर्व माहिती तो आपल्या मनांत सांठवून ठेवणार होता. एकदां कंबोडच्या सुलतानाच्या सिंहासनाचें प्रकरण निकालांत निघालें कीं, त्याला राजबहाद्दुराकडे नजर वळविण्यास फुरसत मिळणार होती. पण सध्यां चमनलालांना खूष करण्यासाठीं त्यांच्याकडून एक चांगली ऑर्डर मिळवायची यापलीकडे त्याचा दुसरा कोणताच उद्देश नव्हता.

ज्यावेळीं त्याची टॅक्सी त्या वाड्याजवळ पोहोंचली तेव्हां अंधार पडला होता. कांहींतरी नवीन दृष्य पहावयास मिळेल अशी झुंजारची कल्पना होती. पण त्याला जें पहावयास मिळालें तें नवीन नव्हतें तर अतिशय विलक्षण दृश्य होतें. टॅक्सीनें शेवटच्या मैलाचें अंतर एका खास तयार केलेल्या खाजगी रस्त्यावरून गांठलें होतें. शेवटीं टॅक्सी वाड्याच्या प्रवेशद्वारासमोर उभी राहिली होती.

प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला प्रेक्षणीय असे दोन उंच खांब होते.

दोन्ही खांबांच्यावर दोन मोठ्या पेटत्या मशाली होत्या व त्यांचा प्रकाश दूरवर पसरला होता. दारें सोन्याचीं दिसत होतीं पण त्यांना सोनेरी रंग देण्यांत आला असावा असा झुंजारनें तर्क केला होता. त्या दोन खांबांजवळ दोन पहारेकरी उभे होते. त्यांच्यांत आणि लष्करी शिपायांत कांहींच फरक नव्हता. फक्त त्यांच्याजवळ हत्यारें नव्हतीं. निदान असलीं तरी तीं बाहेरून दिसण्यासारखी नव्हतीं.

'छान! फारच छान!' झुंजार हंसून म्हणाला. त्यानें राजबहाद्दुराच्या खाजगी सैन्याबद्दल जें ऐकलें होतें तें सर्व खरें होतें.

'साहेब, आपलें नांव काय व आपलें काय काम आहे ?'

एका पहारेकऱ्यानें टॅक्सीचें दार उघडून त्याच्या अंगावर हातांतील टॉर्चचा प्रखर प्रकाश सोडलेला होता. झुंजार अस्वस्थ झाल्यासारखें भासवीत म्हणाला, 'हें काय ? येथें काय चाललें आहे ?'

'आम्हीं फक्त हुकमाचें पालन करीत आहों.' त्याला उत्तर मिळालें, 'आपलें नांव काय ?'

'सेनापतिसाहेब, हा प्रश्न तुम्हीं पूर्वींहि विचारला होता. माझें नांव दयाळ. मी महाभारत स्टोअर्सतर्फे राजेसाहेबांना मौल्यवान नजराणा घेऊन आलों आहें.'

'तुम्हीं येथें येणार आहांत याबद्दल आम्हांला खबर मिळाली होती.'

'हें ऐकून मला फार आनंद होतो.' झुंजार म्हणाला, 'चमनलालांनीं टेलिफोन करून माझ्याबद्दल माहिती दिली असावी या किल्ल्याच्या बाहेरूनच मला हांकलून देण्यांत आलें असतें तर माझी अतिशय निराशा झाली असती, कदाचित् मला एखाद्या भुयारांत कैद करून ठेवण्यांत आलें असतें—'

'साहेब, चेष्टा राहूंद्या,' तो पहारेकरी तोंड वेडेंवाकडें करीत म्हणाला, 'तुम्हीं आमची चेष्टा करावी यांत अर्थातच तुमचा दोष नाहीं. पण मीं माझें कर्तव्यच करीत आहें. राजबहाद्दुरांना असल्या दिखाऊपणाची हौस आहे व आम्हांलाहि पोट आहे.'

'माफ करा.' झुंजार म्हणाला, 'तुमच्या भावना दुखविण्याचा माझा हेतु नव्हता. पण आतां पुढें काय ? तुम्हीं सशस्त्र सैनिकांच्या रांगेमधून माझी मिरवणूक काढणार काय ?'

पण या वेळपावेतों तें भव्य प्रवेशद्वार उघडण्यांत आलें होतें. ड्रायव्हरनें हंसत टॅक्सी आंत नेली. त्याबरोबर चार युनिफॉर्म चढविलेले

मोटारसायकल–स्वार त्यांच्या बरोबर आपल्या मोटारसायकली चालवू लागले.

'येथेंहि बंदोबस्त आहे म्हणावयाचा !' झुंजार हंसून म्हणाला. 'या परदेशी लोकांना आपल्या श्रीमंतीचें प्रदर्शन करण्याची बरीच हौस दिसते !'

त्याला मोठीच गंमत वाटत होती व त्याचें कुतूहल जागृत झालें होतें. मुख्य प्रवेशद्वारापासून वाडा चांगला पाव मैलावर होता. वाटेंत त्या मोटारीवर वारंवार सर्चलाईट पाडण्यांत येत होता. आणि अधूनमधून पहारा करणारे शिपाई शिस्तीनें उभे असलेले दिसत होते.

जेव्हां झुंजारला वाड्याचें दुरून दर्शन झालें तेव्हां त्याचे डोळे बरोबरच दिपले. तो सर्व वाडा तेजस्वी प्रकाशानें न्हाऊन निघत होता. पहिल्या स्वातंत्र्यदिनीं दिव्यांची आरास केलेल्या बोरीबंदर स्टेशनाची झुंजारला आठवण झाली. वाड्याच्या दोन्ही बाजूला उंच मनोरे होते व तेथें प्रवेशद्वाराप्रमाणेंच प्रचंड मशाली पेटत होत्या. सर्व वाडा अगदीं स्पष्ट दिसत होता. प्रकाशाची योजना इतक्या चातुर्यानें करण्यांत आली होती कीं, तो प्रकाश कोठून सोडण्यांत आला आहे हें समजत नव्हते.

झुंजारनें खालीं उतरतांना टॅक्सीड्रायव्हरकडे पाहिलें. 'साहेब, मी या जागेबद्दल ऐकलें होतें पण मी ही प्रत्यक्ष प्रथमच पहात आहें.' ड्रायव्हर हंसून म्हणाला, 'या वाड्याच्या मालकाचें खात्रीनें डोकें फिरलें असावें.'

'मी सुद्धां थक्क झालों आहें.' झुंजार म्हणाला. 'तूं जाऊं नकोस, माझें काम आटोपून मी लवकरच परत येतों. आपणांला परत मुंबईला जावयाचें आहे.'

'ठीक आहे साहेब.' टॅक्सी ड्रायव्हर म्हणाला.

झुंजार वाड्याच्या प्रशस्त पायऱ्या चढून दाराकडे गेला. प्रत्येक पायरीवर दोन शिपाई शिस्तीनें उभे होते. त्या लष्करी सलामीचा स्वीकार करतांना झुंजारला मनांतून हंसू येत होतें. दाराजवळ पोहोंचतांच तें उघडलें गेलें. आंत भपकेबाज पोशाख केलेले कित्येक नोकर होते.

आणि तो दिवाणखाना ! दिल्लीच्या लाल किल्ल्यांतील दिवाण–ई–खास इतकाच काय पण विख्यात ताजमहाल पेक्षांहि तो विस्तीर्ण दिवाणखाना सुंदर होता. तेथली जमीन आणि भिंती गुलाबी रंगाच्या उत्कृष्ट संगमरवरी दगडाच्या होत्या. तेथील इतर सजावट शुद्ध सोन्याची होती. कोणत्याहि राजाला, कबोडच्या सुलतानालाहि, राजबहादुराची बरोबरी करतां आली नसती.

'साहेब माझ्या पाठीमागून चलावें.' झुंजारला नवीन आवाज ऐकू आला.

झुंजारनें त्या माणसाकडे पाहिलें. कोणत्याहि ऐतिहासिक नाटकांत प्रधानाला शोभेल असाच पेहराव त्या माणसानें केला होता. तो कुणीतरी बडा अधिकारी असावा हें त्याच्या आवाजावरून स्पष्ट होत होतें. एखाद्या सम्राटाच्या राजवाड्यांतहि आपलें इतक्या भव्य प्रकारें स्वागत केलें गेलें नसतें याबद्दल झुंजारची खात्री पटली होती.

'प्रधानजी, आपण सांगाल त्याप्रमाणें वागण्यास सेवक तयार आहें.' झुंजार म्हणाला.

त्या भव्य दिवाणखान्यांतून चालत ते दोघे एका दाराजवळ गेले. दार ताबडतोब उघडलें गेलें व त्या दिवाणखान्यापेक्षांहि शोभिवंत असलेल्या एका बैठकीच्या खोलींत त्यांनीं प्रवेश केला. तेथल्या मऊ गालिचावर पाऊल ठेवतांच झुंजारचे बूट दिसेनासे झाले. त्यानें तेथल्या उंची सामानाकडे पाहिलें. त्या खोलीच्या मांडणीसाठीं सोन्याचाच अधिक उपयोग करण्यांत आला होता.

'दयाळ, आपण येथें थोडा वेळ विश्रांति घ्याल तर मी महाराजांना आपली वर्दी देतों.' प्रधानजी म्हणाले.

'सावकाश आपलें काम करा. मी सध्यां स्वप्न पहात आहें. मला शुद्धीवर यायला निदान दहा मिनिटें लागतील.' झुंजार म्हणाला.

प्रधानजीच्या गंभीर मुद्रेवर अस्पष्ट हास्यरेषा प्रकटली पण ते कांहींच बोलले नाहींत. ते ज्या रस्त्यानें आले त्याच वाटेनें परत गेले. बैठकीच्या खोलींत एकटा झुंजारच बसला होता. तेथले कोच व खुर्च्या यांवर मऊ गाद्या होत्या पण झुंजार तेथें बसला नाहीं. तो त्या खोलीची आणखी तीक्ष्ण दृष्टीनें पहाणी करीत होता. चालत तो तेथें असलेल्या एका दाराजवळ गेला ... एकाएकीं तो दचकला.

दाराच्या पलीकडच्या बाजूला दोन अगदीं अस्पष्ट आवाज झाले होते. आवाजामागोमाग कुणाचें तरी मोठ्यानें बोलणेंहि त्यानें ऐकलें. कुणीतरी रागारागानें बोलत होतें. एखाद्या माणसाच्या कानांना त्या दोन आवाजांचें आश्चर्य वाटलें नसतें पण झुंजारनें तें ओळखलें होतें व त्यामुळेंच तो दचकला होता.

त्यानें दाराची मूठ पकडली व तो ऐकूं लागला. 'पाजी माणसा, तुझी शेवटची घटका भरली —' कुणीतरी कठोर स्वरांत बोलत होतें.

दरवाजा अतिशय जाड होता. सामान्य माणसाला आंतलें बोलणें ऐकूंहि आलें नसतें पण झुंजारचे कान अतिशय तिखट होते. त्यानें जें

ऐकलें त्याचा अर्थहि स्पष्ट होता, कुणीतरी दुसऱ्या कुणाला अगदीं दूरच्या प्रवासाला पाठविण्याची तयारी करीत होता. झुंजारनें तें दार हळूंच उघडलें. आंतले जें दृश्य त्यानें पाहिलें त्याबद्दल त्याला पूर्वसूचना मिळाली असल्यामुळें आश्चर्य वाटण्याचें कांहींच कारण नव्हतें.

ती खोली राजबहाद्दुराची खास खोली असावी हें स्पष्टच होतें. तेथल्या एका भव्य टेबलाच्या पलीकडे एक आकर्षक पोशाख केलेला धिप्पाड माणूस बसला होता. त्यानें आपले दोन्ही हात वर केले होते व आपल्या चष्म्यांतून समोरच उभ्या असलेल्या आपल्या मृत्यूकडे तो पहात होता.

टेबलाच्या दुसऱ्या बाजूला झुंजारकडे पाठ करून उभे असलेले दोघे इसमहि कपड्यावरून अगदीं सभ्य दिसत होते. पण त्या दोघांच्याहि हातांत पिस्तुलें होतीं व तीं त्यांनीं राजबहाद्दुराच्या छातीवर रोखलीं होतीं. तोच राजबहाद्दुर हें झुंजारनें लागलीच ओळखलें होतें. त्यानें त्या माणसाचे शेंकडों फोटो वर्तमानपत्रांतून पाहिले होते.

ते दोघे सभ्य पोषाख केलेले परदेशी बदमाष आहेत हेंहि झुंजारनें ओळखलें होतें. कांहींतरी तांतडीची उपाययोजना करणें आवश्यक होतें. त्याच्या तीक्ष्ण नजरेला टेबलावर पडलेलें तिसरें पिस्तुलहि दिसलें होतें. पहिला हल्ला राजबहाद्दुरनेंच चढविला होता. पण घाईमुळें त्याचे दोन्ही नेम चुकले होते.

'मी जर तुमच्या खेळांत भाग घेतला तर चालेल ना ?' झुंजारनें हंसून विचारलें.

राजबहाद्दुरानें आपल्या आयुष्यांत अनेक जलद हालचाली पाहिल्या होत्या पण आपल्या हातांतील पार्सल एका खुर्चीवर उडवून झुंजार त्या दोघां बदमाषांजवळ कसा पोहोंचला तें त्यांना समजलें सुद्धां नाहीं. डोळ्यांच्या पापण्या एकदां हालविण्यापूर्वींच तें घडून आलें होतें.

'पिस्तुलाचा खेळ चांगला नव्हे !' झुंजार अगदीं मृदु स्वरांत म्हणाला.

पण त्याचवेळीं त्यानें त्यांच्यापैकीं एकाला पायांत पाय अडकवून खालीं पाडलें होतें व दुसऱ्याच्या हातांतलें पिस्तुल खेंचून घेतलें होतें. पण तो खालीं आपटल्यामुळें त्याच्या पिस्तुलाची गोळी वरच्या छतांत घुसली होती. त्याच क्षणीं दुसऱ्याचें पिस्तुल झुंजारनें काबीज केलें होतें.

राजबहाद्दूर तोंड उघडें ठेवून नुसता पहातच होता. जमिनीवर पडलेल्या बदमाषानें तेथूनच राजबहाद्दुरावर गोळी झाडण्यासाठीं आपलें पिस्तुल रोखलें होतें पण त्याचवेळीं झुंजारनें उसन्या घेतलेल्या

पिस्तुलाचा आवाज झाला होता व त्या बदमाषानें किंकाळी फोडून पिस्तुल खालीं टाकलें होतें. तेथल्या एका खिडकीच्या बाहेर बरीच गडबड उडाली आहे हेंहि झुंजारच्या लक्षांत आलें होतें.

' नाहीं बाळ, तसे करणें योग्य नाहीं. ' तो म्हणाला.

दुसरा बदमाष टेबलावरील राजबहाद्दूरचे पिस्तुल उचलीत होता. पण त्या पिस्तुलाला स्पर्श करण्यापूर्वीच त्याला पोलादी हातांनीं वर उचलण्यांत आले होतें. त्याचवेळीं खिडकी उघडण्यांत आली होती व तो दुसरा बदमाष हवेंत तरंगत त्या खिडकीतून बाहेर पडून तेथें उभ्या असलेल्या राजबहाद्दुरांच्या दोघां पहारेकऱ्यांच्या अंगावर कोसळला होता.

बाहेरच्या पहारेकऱ्यांना त्या भाऊगर्दीत शत्रु कोण आणि मित्र कोण, हें समजणें शक्यच नव्हतें. एक पिस्तुलचा आवाज झाला दयाळ ऊर्फ झुंजार जमिनीवर अंथरलेल्या मौल्यवान गालिचावर कोसळला. त्याच्या कपाळाच्या एका बाजूनें रक्त वहात होतें व तो अगदीं निपचित पडला होता......

० ० ०

२

' आनंदरावसाहेब, मी तुम्हांला अगदीं खाजगी रीतीनें बोलाविलें आहे. ' भारद्वाज शेठजी म्हणाले. ते बरेच अस्वस्थ झाले होते.

त्यांच्या समोरच्या बाजला एक जाडजूड गृहस्थ बसले होते. ते चांगले जाडजूड असून त्यांचा पोषाख अव्यवस्थित होता. चेहरा गोल आणि लालबुंद होता. एखाद्या शेतकऱ्याप्रमाणे किंवा खेड्यांतील सधन दाणेवाल्याप्रमाणे त्यांची एकंदर ऐट दिसत होती. पण त्या गृहस्थाचें नांव आनंदराव असें असून ते सी. आय्. डी. खात्यांत सुपरिंटेंडेंटच्या हुद्यावर होते.

' शेठजी, तें माझ्या लक्षांत आहे. ' आनंदराव म्हणाले, ' कारणाशिवाय सी. आय्. डी. खात्यानें हात घालणें स्थानिक पोलिसांनाहि आवडणार नाहीं. इन्स्पेक्टर सौदागर तपास करीत आहेतच--'

' सौदागर माझें समाधान करूं शकत नाहींत. ' भारद्वाज म्हणाले, ' गेल्या वर्षीं तुम्हीं आमच्या फार उपयोगी पडला होतां. त्यामुळेंच मला तुमची आठवण झाली. मी तुमचा सल्ला घेत आहे. सौदागरांना काय

वाटेल त्याची मला मुळींच पर्वा नाहीं. अगदीं सरळ आणि स्पष्ट व्यवहार आहे, पण सौदागरांच्या तें लक्षांत आलेलें नाहीं.'

आनंदरावांना ती प्रस्तावना आवडली नव्हती. महाभारत स्टोअर्संचें गिऱ्हाइकांचें दार उघडल्याला अर्धा झाला नव्हता. सुमारें पस्तीस हजारांचे हिरे व दयाळ नांवाचा एक सेल्समन् नाहींसा झाला आहे असें त्यांना कळविण्यांत आले होतें. चौकशीचें काम इन्स्पेक्टर सौदागर करीत होते व त्यांचें व आनंदरावांचें फारसें सख्य नव्हतें.

'ते हिरे घेऊन दयाळ फरारी झाला आहे असें सौदागरांचें मत बनलें आहे व ते त्याला पकडण्यासाठीं वॉरंट मिळविण्याच्या खटपटींत आहेत.' भारद्वाज म्हणाले, 'पण माझें मुळींच समाधान होत नाहीं.'

'दयाळ हा तुमचा एक सेल्समन आहे हें खरें ना ?' आनंदरावांनीं विचारलें.

'होय. आणि विशेष म्हणजे तो अगदीं नवीनच नोकर असून तो घड्याळांच्या खात्यांत काम करीत असतो. हीच गोष्ट सौदागरांना संशयास्पद वाटते. आज सकाळींच मी आमच्या जवाहीर खात्याचे मॅनेजर चमनलाल यांची भेट घेतली. त्यांनीं ती गोष्ट आपल्या मनाला लावून घेतली आहे. त्यांचा कांहीं दोष आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. पण जबाबदारी त्यांचीच आहे. कोणत्याहि खात्यांत कांहीं अनुचित गोष्ट घडली तर त्याबद्दल त्या खात्याच्या मॅनेजरालाच जबाबदार धरण्यांत यावें असा आमच्या कंपनीचा नियम आहे.'

'चमनलालनें कोणती चूक केली ?' आनंदरावांनीं विचारलें.

भारद्वाज शेठजींनीं खुलासा केला. नंतर ते म्हणाले, 'पूर्वी कांहींच ठरविण्यांत आलें नव्हतें ही गोष्ट तुम्हीं लक्षांत घ्या. उदाहरणार्थ नेहमींचा सेल्समन काळे आणि दयाळ यांनीं कांहीं पूर्वींच संगनमत करणं शक्य नव्हतें. स्टोअर्स बंद होण्याची वेळ होईपर्यंत खुद्द चमनलालांनाहि राजबहादूरांच्या ऑर्डरीबद्दल कांहींच माहिती नव्हती.

'दयाळ पेणला राजबहाद्दुरांच्या वाड्यांत गेला होता याबद्दलहि आमच्याजवळ खात्रीलायक पुरावा आहे. जर त्या तरुणाला ते हिरे पळवायचे होते तर त्यानें पेण येथें जाण्याची मेहनत कां घ्यावी हा महत्त्वाचा प्रश्न आहे.'

'तो पेण येथें गेला होता असें तुम्ही कशावरून म्हणतां ?'

'सकाळीं दयाळ नाहींसा झाल्याची बातमी समजतांच मी

राजबहाद्दुरांना टेलिफोन केला होता. दयाळ येथें अगदीं ठरल्या वेळींच पोहोंचला होता. त्यानें बरोबर नेलेले हिरे रावबहाद्दूरांनीं पाहिले पण त्यांना ते पसंत पडले नाहींत. तेथें गेल्यानंतर अर्ध्या तासानेंच दयाळ परतला ज्या टॅक्सी ड्रायव्हरने त्याला तेथें नेलें त्याला तुमच्या माणसांनींहि प्रश्न विचारले आहेत. परत येतांना ते हिरे पळविण्याची इच्छा दयाळला झाली असावी असा तर्क करण्यांत येत आहे.'

'तो आपल्या घरीं परत गेलाच नाहीं ?'

'दयाळनें पुन्हां या स्टोअर्सकडेच परतण्यास आपणांला सांगितलें होतें असें ड्रायव्हर म्हणतो. आणि दयाळला चमनलालांनीं तशीच सूचना दिली होती. पण जेव्हां ती टॅक्सी येथें आली तेव्हां दयाळ आंत नाहीं हें पाहून त्या ड्रायव्हरला अतिशय आश्चर्य वाटलें.'

'तर मग सर्व प्रकार अगदीं स्पष्ट आहे.' आनंदराव म्हणाले.

'त्या ड्रायव्हरला इतर कोणतीच माहिती नव्हती.' भारद्वाज पुढें म्हणाले, 'दयाळजवळ हिऱ्याचें पार्सल आहे अशी त्याला मुळींच कल्पना नव्हती. जेव्हां दयाळ दिसला नाहीं तेव्हां आपल्याला फसविण्यासाठींच तो पसार झाला असें त्याला वाटलें. मोटारीमध्यें दयाळची हॅट व चमनलालनें दिलेली छोटी चामड्याची बॅग सांपडली. बॅग रिकामी होती.

'त्या मूर्खानें ती गोष्ट ताबडतोब पोलिसांच्या कानांवर घातली नाहीं. आज सकाळीं तो आपलें भाडें वसूल करण्यासाठीं येथें आला होता त्यावेळीं त्याची हकीकत चमनलालांना समजली व त्यांना आपली हृदय-क्रिया बंद पडेल अशी भीति वाटली. ते धांवतच माझ्याकडे आले, मी ताबडतोब पोलिसांना टेलिफोन केला व त्याप्रमाणें सौदागर तपास करण्यासाठीं येथें आले.'

'पण शेठजी, सौदागरांपेक्षां मी आणखीं कांहीं अधिक करूं शकेन असें मला वाटत नाहीं--'

'मला वाटतें तुम्हीं बरेंच करूं शकाल.' शेटजी मध्येंच म्हणाले, 'माझा तुमच्या बुद्धिमत्तेवर विश्वास आहे. मला हें प्रकरण सरळ आहे असें वाटत नाहीं. ऐका आनंदराव, दयाळ पेण येथील राजबहाद्दुरांच्या वाड्यांत गेला होता हें सिद्ध झालें आहे. त्यानें जीं शिफारसपत्रें आम्हांला दाखविलीं तीं अगदीं उत्कृष्ट होतीं. आपण एक हुशार सेल्समन आहों हें त्यानें अल्पावधींत सिद्ध केलें होतें. मला स्वतःला तो आवडत होता. तो प्रामाणिक होता याबद्दल अद्यापींहि माझी पूर्ण खात्री आहे.

'असें असतांना सौदागरांनीं लागलीच त्यानें हिरे पळविले असा र्णय दिला तो मला आवडला नाहीं. परत येतांना कांहींतरी ..मेंच डलें असावें. मी त्याची बाजू घेत नाहीं पण आपण संशयाचा फायदा याला दिला पाहिजे. त्याच्यावर हल्ला झाला नसेल कशावरून ? सर्व गोष्टींचा नीट तपास झाला पाहिजे. तोच अपराधी आहे अशी सुरवा- तीलाच समजूत करून घेणें चुकीचें आहे. सौदागर तर तीच चूक करीत आहेत.'

'सौदागर धोपटमार्गी आहेत.' आनंदराव म्हणाले, 'या तुमच्या हकीकतींत रिकाम्या टॅक्सीमध्यें दयाळची हॅट सांपडली तीच गोष्ट विशेष महत्त्वाची आहे.'

'अगदीं बरोबर.' भारद्वाज म्हणाले, 'मी तीच गोष्ट इन्स्पेक्टर सौदागरांना सांगितली. तुम्हीं त्यांच्या विचारसरणींतील दुबळा दुवा नेमकाच शोधून काढलात. जर दयाळला चोरी करायची असती तर ती तो सफाईनें करूं शकला असता. त्यानें आपली हॅट आणि चामड्याची ती बॅग मागें राहूं दिली नसती. त्यानें मुद्दामच तो पुरावा मागें राहूं दिला असें सौदागरांचें म्हणणें आहे. पण तें निदान मला तरी पटत नाहीं.'

याचवेळीं दार किंचित् ठोठावून चमनलाल इन्स्पेक्टर सौदागरां- सहित तेथें आले. सौदागरांनीं आनंदरावांना पाहून मान डोलाविली. पण त्यांना पाहून ते खूष झाले नव्हते हें त्यांच्या मुद्रेवरूनच स्पष्ट होत होतें.

'नमस्ते आनंदराव,' सौदागर म्हणाले, 'सी. आय्. डी. ऑफिसनें या प्रकरणांत लक्ष घातलें आहे हें मला माहीत नव्हतें.'

'सौदागर, आम्हीं तुमच्या अधिकारांत मुळींच ढवळाढवळ करणार नाहीं.' आनंदराव हंसून म्हणाले, 'मी भारद्वाज शेठजींना खाजगी सल्ला देण्यासाठींच येथें आलों होतों. दयाळ गुन्हेगार आहे असें त्यांना तुमच्याप्रमाणें वाटत नाहीं.'

'हें शेठजीचें मत ऐकून मलाहि आनंद होतो.' चमनलाल म्हणाले, 'दयाळला राजबहाद्दुरांकडे पाठविण्याची सर्व जबाबदारी माझीच आहे पण त्या बिचाऱ्यानें मला फसविण्याचा प्रयत्न केला असें मी कुणालाहि म्हणूं देणार नाहीं.'

'चमनलाल, तुमच्या बोलण्याचा अर्थ काय ?' भारद्वाजनें विचारलें.

'या सौदागरसाहेबांचें असें म्हणणें आहे कीं, माझें आणि काळेचें संभाषण दयाळनें ऐकलें आणि त्यानेंच मला तो कामगिरी स्वतःला

देण्यास भाग पाडलें. म्हणजे, एकप्रकारें मी दयाळचा साथीदारच होतों असाच त्यांच्या बोलण्याचा अर्थ होतो.'

'नाहीं चमनलाल, तुम्हांला रागावण्याचें कांहींच कारण नाहीं. आणि माझ्या बोलण्याला तुम्हीं पुरवणी जोडूं नका. तुमच्या खात्याशीं कांहींहि संबंध नसतांना आपण तें पार्सल पोहोंचविण्यास तयार आहों असें दयाळनेंच तुम्हांला सांगितलें हें तुम्हीं नाकारूं शकत नाहीं.'

'पण तें त्यानें काळेला मदत करण्याच्या दृष्टीनें सांगितलें होतें —'

'तें तुमचें मत आहे. दयाळला चांगला हात मारण्याची संधि मिळाली आणि ती त्यानें साधली असें माझें मत आहे.'

'तर मग पेणला जाण्यापूर्वीं त्यानें कां पळ काढला नाहीं ?' चमनलालनें विचारलें.

'त्याची त्याला भीति वाटत असावी किंवा त्याला टॅक्सींतून उडी मारण्याची संधि मिळाली नसावी.' सौदागर म्हणाले.

'सौदागर, या तुमच्या बोलण्यांत कांहींच अर्थ नाहीं.' आनंदराव म्हणाले.

'दयाळच्या जर मनांत असतें तर तो जातेवेळीं सहज फरारी होऊं शकला असता. दुसरी एक मुद्याची गोष्ट आहे. हा दयाळ फार चांगला सेलसमन आहे असें मी ऐकलें आहे. त्यानें तें हिऱ्याचें पार्सल त्या राजबहाद्दुराच्या गळ्यांत बांधलें नसेल कशावरून ?'

'ही एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे.' भारद्वाज म्हणाले, 'मुद्दाम मागणी करून हिरे मागविले असतांना राजबहाद्दुरानें ते सर्व परत पाठवावे याचें मला नवल वाटतें. दयाळ ते सर्व हिरे त्यांना विकत घेण्यास भाग पाडील इतकेंच नव्हे तर आणखी एक मोठी ऑर्डर मिळवील असें चमनलालांना वाटत होतें. बोला सौदागर, जातांना ते हिरे चोरण्याची संधि असतांना दयाळ ते घेऊन मुद्दाम इतकें पन्नास मैलांचें अंतर तोडून पेण येथें कां गेला ?'

सौदागारांना कैचींत पकडण्यांत आलें होतें. ते म्हणाले, 'कदाचित् परत येईपर्यंत हिरे चोरण्याची कल्पना त्याला सुचली नसावी.'

'तर मग हिरे चोरण्याच्या उद्देशानेंच त्यानें ती कामगिरी स्वीकारिली होती असें तुम्ही मघां कां म्हणाला ?' चमनलालांनीं विचारलें, 'त्याला ती कल्पना मागाहून सुचली असें तुम्ही आतां म्हणत आहां.'

सौदागर घामाघूम झाले होते. ते म्हणाले, 'अशाप्रकारें चर्चा करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. हिरे नाहींसे झाले आहेत आणि त्याबरोबर दयाळहि नाहींसा झाला आहे ही सत्य गोष्ट आहे. मी बरीच चौकशी

केली तेव्हां तेथल्या सर्वांचेंच दयाळबद्दल फार चांगलें मत आहे असें मला दिसून आलें आहे. जो सर्वांचा आवडता असतो अशा माणसाबद्दल मला अविश्वास वाटतो. कारण जे लबाड लोक असतात तेच सर्वांचीं मनें आपणाकडे वेधून घेण्याचा प्रयत्न करीत असतात.'

सौदागरांना कुणी उत्तर देण्यापूर्वींच टेलिफोनची घंटी वाजली आणि भारद्वाजांनीं ताबडतोब सौदागरांच्या हातीं रिसीव्हर दिला. 'तुमचा फोन आहे.' ते म्हणाले.

रिसीव्हर कानाला लावून ऐकत असतांना सौदागरांची मुद्रा बदलली. त्यांची चर्या उत्तेजित दिसूं लागली. रिसीव्हर खालीं ठेवल्यानंतर ते म्हणाले, 'सभ्य गृहस्थहो, माझ्या माणसांनीं तुमच्या त्या दयाळच्या पूर्वीच्या जागेचा आणि त्याच्या शिफारसपत्रांचा शोध केला आहे.'

'त्याच्या शिफारसपत्रांना नांवें ठेवण्यास जागाच नाहीं.' भारद्वाज रागानें म्हणाले, 'मी स्वतः त्याबद्दल माझी खात्री करून घेतली आहे.'

'मी तुम्हांला दोष देत नाहीं. तुमच्या जागीं इतर कुणीहि हुषार माणूस असता तर तोहि फसला असता.'

'तुमच्या बोलण्याचा अर्थच माझ्या लक्षांत येत नाहीं.' भारद्वाज म्हणाले, 'दयाळ आमच्याकडे नागपूरच्या खुशालचंद कंपनींतून आला. मी टेलिफोननें चौकशी केली असतां दयाळ त्या कंपनींत पांच वर्षें काम करीत होता व तो अतिशय प्रामाणिक आहे असें खुद्द खुशालचंदांनींच मला सांगितलें. ते त्याला सोडण्याला तयार नव्हते. पण दयाळनें आपण पुढें मुंबईंत राहणार असें सांगितल्यामुळें नाइलाजानें त्यांनीं त्याला सोडलें.'

'शेठजी, खुशालचंद कंपनींत काम करणारा दयाळ सध्यां आफ्रिकेत नैरोबी येथें एका कंपनींत काम करीत आहे.' सौदागर म्हणाले, 'तुमच्याकडे जो आला होता त्याचें नांव दयाळच नव्हतें. त्याला दयाळ अचानक आफ्रिकेला जात आहे हें समजलें व त्या गोष्टीचा फायदा घेऊन तो दयाळ बनला होता.'

भारद्वाज शेटजी विचारांत पडले. ते म्हणाले, 'तर मग या प्रकरणाचें सर्व स्वरूपच बदलतें. पण त्याला आम्हीं आमच्या घड्याळाच्या विभागांत काम दिलें होतें. जवाहिरांच्या खात्यामध्यें माणसाची नेमणूक करतांना आम्हीं अधिक सावधगिरी बाळगीत असतों.'

'पण घड्याळाचें खातें जवाहिरांच्या शेजारींच आहे. भारद्वाज शेठजी, या तुमच्या महाभारत स्टोअर्समध्यें चोरी करण्याच्या उद्देशानेंच तो

आंत शिरला होता त्या चामड्याच्या बॅगवर त्याच्या बोटांचे ठसे उमटले आहेत आणि सी. आय्. डी. खात्याचे तज्ञ त्या ठशांची तपासणी करीत आहेत.'

पुन्हां टेलिफोनची घंटी वाजली. या खेपेलाहि सौदागरांचाच फोन होता !

त्यांनीं रिसीव्हर कानाला लावला आणि लागलीच ते मोठ्यानें ओरडले.

'काय !' त्यांनीं रिसीव्हर खालीं ठेवला त्यावेळीं त्यांचे डोळे विजयी आनंदानें तारवटले होते. ते म्हणाले, 'शेठजी, तुमचा तो दयाळ कोण होता हें तुम्हांला माहीत आहे काय ? त्याचें खरें नांव झुंजार असें आहे.'

अरुंद खुर्चींत बसून दचकणें जाडजूड माणसाला बरोबर साधत नसतें पण तीहि अशक्य गोष्ट आनंदरावांनीं शक्य करून दाखविली ! 'झुंजार !' ते ओरडले.

'होय आनंदराव, बोटांचे ठसे झुंजारचेच आहेत असें तुमच्याच खात्याचें म्हणणें आहे. आतां सर्व अगदीं स्पष्ट झालें आहे.'

'स्पष्ट झालें आहे ?' आनंदराव म्हणाले, 'सौदागर, तुम्हांला वेड लागलें आहे.'

'मी झुंजारचें नांव ऐकलें आहे. पण तो सामान्य चोर नाहीं अशी माझी समजूत होती.'

'माझाहि या बोलण्यावर विश्वास बसत नाहीं.' चमनलाल म्हणाले, 'कांहींतरी चूक होत असावी. दयाळचा स्वभाव फारच चांगला होता.'

'झुंजारचा स्वभाव कुणालाहि आवडण्यासारखाच आहे. हे आनंदरावहि तुम्हांला तसेंच सांगतील.' सौदागर म्हणाले, 'पण तो मुद्याचा प्रश्न नाहीं. झुंजारच दयाळ होता हें आतां सिद्ध झालें आहे.'

'कांहीतरी चूक होत आहे असें मलाहि वाटतें.' आनंदराव म्हणाले. 'ज्याच्या मालकीचा वीस लाखाचा झुंजार–महाल आहे तो झुंजार तीस हजारांचे हिरे पळवून फरारी होईल ही कल्पनाच अशक्य कोटींतील आहे. शिवाय तें जर झुंजारचें काम असतें तर त्याच्या बोटांचे ठसे तुम्हांला त्या बॅगवर कधींच आढळले नसते.'

'पण आढळले आहेत ना.' सौदागर म्हणाले.

'ते ठसे त्याचे नाहींत असें मी म्हणत नाहीं.' आनंदराव रागानें

म्हणाले, 'दयाळच झुंजार होता असेंहि मी कबूल करीन. पण कानलाल-सारख्या एखाद्या साध्या माणसाला संकटांत लोटण्याचा प्रयत्न झुंजार कधींहि करणार नाहीं, हें मीच काय पण सी. आय्. डी. खात्यातील दुसरे कित्येक अधिकारी सांगतील. त्यानें तें काम चांगल्या हेतूनेंच पत्करलें असावें. फार तर राजबहाद्दुराचें निवासस्थान पहाण्याची त्याला उत्कंठा वाटत असेल पण तो कधींहि तीस हजारांची चोरी करणार नाहीं मी माझ्या इतकाच त्याला ओळखतों झुंजार ही कित्येक वर्षं माझ्या मागें लागलेली डोकेंदुखी–नव्हे–साडेसातीच आहे.'

'हें सर्व बोलणें ठीक आहे,' अधिराा स्वरांत सौदागर म्हणाले, 'पण हिरे नाहीसे झाले आहेत आणि झुंजारहि नाहींसा झाला आहे. दोन आणि दोन मिळून चारच होतात.'

'तें अगदीं सोपें अंकगणित आहे.' आनंदराव म्हणाले, 'झुंजार हा सामान्य चोर नाहीं. आपल्याविरुद्ध पुरावा एका टॅक्सींतून राहूं देण्याइतका तो मूर्खहि नाहीं आणि केवळ तीस हजारांचे हिरे पळविण्यासाठीं तो महा-भारत स्टोअर्समध्यें नोकरी करण्यांत आपल्या आयुष्याचे दोन तीन आठवडे फुकटहि घालविणें शक्य नाहीं.'

'तीस हजारांचे हिरे ही कांहीं सामान्य रक्कम नाहीं.' भारद्वाज म्हणाले.

'झुंजारच्या दृष्टीनें ते अगदीच सामान्य आहेत. वीस लाखांचा त्याचा झुंजार–महाल आहे हें मी मघा सांगितलेंच नाहीं भारद्वाज झुंजा-रचा कांहींतरी बराच मोठा डाव होता. आतां आठवलें! मघां तुम्ही त्या कंबोडच्या सुलतानाच्या सिंहासनाबद्दल बोलत होतां...'

'अरेच्चा!' सौदागर उद्गारले, 'आतां सर्वच जमून आलें. सुल-तानाचें सिंहासन पन्नास लाखापेक्षांहि अधिक किंमतीचें आहे हें खरें ना? शेठजी, त्या सिंहासनाचें तुमच्याच स्टोअर्समध्यें प्रदर्शन भरवण्यात येणार आहे ना?'

भारद्वाज शेठजीहि आतां दचकले होते. ते म्हणाले, 'होय, पुढच्याच आठवड्यांत त्या प्रदर्शनाला सुरवात होणार आहे. पण––'

'त्या सिंहासनासाठीच झुंजार येथे सेल्समन म्हणून राहिला होता.' सौदागर म्हणाले, 'प्रदर्शनाला सुरुवात झाल्यानंतर तो तें पळविणार होता.'

'आणि आतां तें प्रदर्शन सुरू होण्यापूर्वीच तो अवघे तीस हजारांचे हिरे घेऊन फरारी झाला आणि त्यानें आपल्या बोटांच्या खुणाहि मागें ठेवल्या!' आनंदराव म्हणाले, 'नाहीं सौदागर, हें बरोबर जुळून येत

नाहीं. झुंजार महाधूर्त आहे. मला आतां ऑफिसांत जाऊन ही गोष्ट कमिशनरसाहेबांच्या कानावर घातली पाहिजे.'

आनंदराव दाराजवळ जाऊन पुन्हां मागें परतले आणि म्हणाले, 'तुम्हां सर्वांना माझी एक सूचना आहे. आपल्यापैकीं कुणीहि या प्रकाराची मुळींच वाच्यता करतां कामा नये. भारद्वाज शेठजी, तुम्हीं हें माझें सांगणें मान्य कराल ना?'

'पण कां?'

'झुंजारचा या भानगडीशीं संबंध आहे असें जाहीर होतां कामा नये. बऱ्याच दिवसांत झुंजारनें कांहीं विशेष करामत केलेली नाहीं त्यामुळें वर्तमानपत्रें भलताच गाजावाजा करतील. तुमच्या घड्याळाच्या खात्यांतील एक सेल्समन हिरे घेऊन फरारी झाला आहे असें जर फक्त आपण सांगितलें तर त्या गोष्टीला कुणीहि विशेष महत्त्व देणार नाहीं.'

'आणि आपणाला शांतपणें आपलें काम करतां येईल, असेंच ना?' सौदागरांनीं विचारलें, 'आनंदराव, ही तुमची कल्पना फार चांगली आहे.'

कांहीं वेळानें सौदागर आणि आनंदराव तेथून बरोबरच बाहेर पडले, 'तुम्हीं ती बातमी गुप्त ठेवावी असें कां सांगितलेंत?' सौदागरांनीं विचारलें.

'झुंजार कांहींतरी संकटात सांपडला असावा असा माझा तर्क आहे.' आनंदराव म्हणाले.

'पण त्याबद्दल आपणांला चिंता करण्याची काय गरज आहे?'

'कारण एरव्हींच्या झुंजारपेक्षां संकटांत सांपडेला झुंजार अधिक भयंकर असतो आणि त्यामुळें तो अनेकांना संकटांत कसा लोटील याचा नेम नसतो. म्हणून दयाळ हा खरा कोण आहे हें इतरांना समजतां कामा नये.'

त्याहि खुलाशानें सौदागराचें समाधान झालें नव्हतें.

० ० ०

३

आणि आनंदरावांचेंहि समाधान झालें नव्हतें. जेव्हां ते महाभारत स्टोअर्समधून बाहेर पडले तेव्हां ते अस्वस्थच झाले होते. त्या सामान्य दिसणाऱ्या प्रकरणामध्यें झुंजारचा संबंध आहे असें उघड होतांच त्यांच्या मनांत अनेक विचार निर्माण झाले होते. एक स्पष्ट संशयहि त्यांच्या

मनांत निर्माण झाला होता. पण त्या संशयाला ते योग्य आकार देऊं शकत नव्हते.

सौदागरांना गोंधळून सोडणें अगदीं सोपें होतें. पण त्याच सौदागरांनीं जर त्यांना त्याबद्दलचें स्पष्टीकरण करावयास सांगितलें असतें तर त्यांना तें खचितच जमलें नसतें. एका गोष्टीबद्दल मात्र त्यांना मुळींच शंका नव्हती आणि ती ही कीं झुंजार कांहींतरी संकटांत सांपडला होता.

सरळ झुंजारमहालांत जावें आणि झुंजार जर तेथें आढळला नाहीं तर विजयेची कसून उलट तपासणी करावी असें प्रथम त्यांच्या मनांत आलें पण नंतर त्यांनीं आपला तो विचार बदलला आणि ते पुन्हां महाभारत स्टोअर्समध्यें शिरले.

कांहीं मिनिटांतच त्यांनीं भारद्वाजांकडून ज्या ड्रायव्हरनें झुंजारला पेण येथें नेलें होतें त्याचें नांव आणि पत्ता मिळविला. राजबहादुरानें जे हिरे मागविले होते ते घेऊन झुंजार फरारी झाला असें मानण्यास ते मुळींच तयार नव्हते. झुंजारला जर ते हिरे पळवायचे असते तर ते हिरे घेऊन तो पेणपर्यंत खचित गेला नसता. आणि झुंजार इतकी क्षुल्लक चोरी करणें त्यांच्यामतें शक्यच नव्हतें.

झुंजार पेण येथील राजबहादुराच्या वाड्यांत गेला होता याबद्दल मुळींच शंका नव्हती आणि ती कामगिरी स्वीकारून तेथें जाण्यांत झुंजारचा खरा हेतु काय असावा याबद्दल आनंदराव तर्क करूं शकत होते. राजबहाद्दुरांचें सुप्रसिद्ध निवासस्थान पहाण्यासाठींच झुंजारनें ती कामगिरी स्वेच्छेनें स्वीकारली होती हें अगदीं उघड होतें.

पण त्या लक्षाधिशाला ते हिरे पसंत न पडल्यानंतर तो परत येतांना स्वेच्छेनें नाहींसा झाला हें त्यांना मुळींच पटत नव्हतें. टॅक्सी ड्रायव्हरची मुलाखत घेतल्यास त्याबद्दल कांहीं खुलासा होऊं शकेल अशी त्यांची कल्पना होती आणि टॅक्सी ड्रायव्हरहि सुदैवानें जवळच्याच स्टॅंडवर सांपडला.

आनंदरावांनीं आपली स्वतःची ओळख पटविल्यानंतर तो म्हणाला, 'तो माणूस अचानक कसा नाहींसा झाला याचें मला अतिशय नवल वाटतें. आम्हीं फक्त एकदोन वेळांच वाटेंत थांबलों होतों. पण त्या ठिकाणीं बरीच गर्दी होती.'

'गर्दीतच फरारी होणें सोपें असतें.' आनंदराव म्हणाले, 'तुम्ही परत येतांना काय घडलें तें अगदीं सविस्तर सांग.'

'विशेष कांहीं घडलें नाहीं साहेब.' तो म्हणाला, 'पायऱ्याजवळच मी मोटार उभी केली होती. तो आंत बसला आणि महाभारत

स्टोअर्सकडे परत चल असें त्यानें मला सांगितलें नंतर मोटार सायकलींच्या पहाऱ्यांतून आम्हीं तेथून निघालों. तें थोरलें प्रवेशद्वार उघडेंच होतें——'

'जरा थांब.' आनंदराव म्हणाले, 'ही मोटारसायकलींची काय भानगड आहे ?'

'साहेब, त्या राजबहाद्दुरांचें डोकें फिरलें असावें.' तो ड्रायव्हर म्हणाला.

त्या ड्रायव्हरनें राजबहाद्दुरांच्या खाजगी फौजेची, पेटत्या मशालींची, मोटार सायकलींवरून पहारा करणाऱ्या सैनिकांची आणि प्रकाशानें न्हाऊन निघणाऱ्या त्या वाड्याची साद्यंत हकीकत आनंदरावांना सांगितली.

'त्या दयाळनें त्यांची चांगलीच गंमत केली.' ड्रायव्हर हंसून म्हणाला, 'त्याच्या सारखा चेष्टेखोर आणि हंसतमुख माणूस मला फसवील हें मला स्वप्नांतहि खरें वाटलें नसतें.'

'तुम्हीं परत येतांना तो नेहमींप्रमाणें चेष्टा करीत होता काय ?' आनंदरावांनीं विचारलें.

'नाहीं साहेब, टॅक्सींत बसल्यानंतर त्यानें एक अक्षरहि उच्चारलें नव्हतें.'

'हूंऽऽ! गिऱ्हाईक पटवितां आलें नाहीं म्हणून तो नाखूष झाला असावा.' आनंदराव म्हणाले, 'त्याची चर्या तुला कशी दिसली ? तो निराश झालेला दिसत होता काय ?'

ड्रायव्हरनें आपलें डोकें खाजविलें. तो म्हणाला, 'साहेब, मला तें बरोबर आठवत नाहीं. मी त्याचा चेहरा पाहिलाच नाहीं.'

'पण तो वाडा प्रकाशित होता आणि अगदीं दिवसाप्रमाणें तेथें प्रकाश पडला होता असें तूं आतांच मला सांगितलेंस.'

'होय. आम्हीं तेथें गेलों तेव्हां तसें होतें. पण मी त्या दयाळची वाट पहात असतांना सर्व दिवे मालविण्यांत आले होते आणि दयाळ मोटारींत बसला तेव्हां अतिशय अंधार होता. फक्त त्या वाड्याच्या दोहोंबाजूला असलेल्या बुरजांवर प्रचंड मशाली पेटत होत्या. पण त्यांचा प्रकाश माझ्या मोटारीपर्यंत पोहोंचत नव्हता. इतका अंधार असतांहि त्यांनीं मला माझ्या मोटारीचे पुढले दिवे लावण्यासहि बंदी केली होती.'

'आणि त्यानंतर तूं सरळ मुंबईकडे निघालास ?'

'होय साहेब, तो दयाळ तेथून परततांना त्या पहारेकऱ्यांची पुन्हा

चेष्टा करील असें मला वाटलें होतें. पण तो एक अक्षरहि बोलला नाहीं.'

आनंदराव त्याच्याच टॅक्सींत बसले आणि ते म्हणाले, 'मला मरीन ड्राईव्ह येथें झुंजार–महालाकडे घेऊन चल.'

झुंजार–महालाकडे जातांना आनंदरावांच्या मनांत अधिकच खळबळ उडाली होती. त्या टॅक्सी ड्रायव्हरचा पुरावा वरकरणीं तरी अगदीं सरळ होता. दयाळ आपल्या मोटारीनें राजबहाद्दुराच्या वाड्याकडे गेला असें शपथेवर सांगण्याची त्या ड्रायव्हरची तयारी होती. पण दयाळच पुन्हां आपल्या मोटारीनें मुंबईकडे परतला असें तो शपथेवर सांगू शकत नव्हता. ड्रायव्हरच्या तें लक्षांत आलें नव्हतें. पण आनंदरावांच्या मात्र तें चांगलेंच लक्षांत आलें होतें.

भव्य झुंजारमहालासमोर ती टॅक्सी उभी रहातांच आनंदराव खालीं उतरले. ती अवाढव्य इमारत झुंजारनें विजयेसाठींच बांधली होती आणि दर महिन्याला त्या इमारतीचें कित्येक हजार रुपये भाडें येत होतें. आनंदराव झुंजार–महालांत अनेकदां आले होते. ते तेथल्या छोट्या लिफ्टनें झुंजार–महालाच्या गच्चीवर गेले.

त्याच गच्चीवर झुंजारनें स्वतःला रहाण्यासाठीं एक आधुनिक धर्तीचा सुंदर बंगला तयार केला होता. इतकेंच नव्हे तर त्यानें त्या बंगल्यासमोर एक लहानशीच पण अतिशय प्रेक्षणीय अशी बागहि बनविली होती आणि त्यामुळें कोणत्यातरी उपनगरांत बांधलेल्या बंगल्याप्रमाणेंच तें झुंजारचें निवासस्थान दिसत होतें.

आनंदराव तेथें आले हें बंगल्यांतील मंडळींना समजलें असावें, कारण झुंजारचा उजवा हात नेताजी बाहेर आला आणि तो आनंदानें म्हणाला, 'नमस्ते आनंदराव.'

'झुंजार कुठें आहे ?' आनंदरावांनीं विचारलें.

'ते घरीं नाहींत साहेब —'

'आणि विजूताई ? ती येथें आहे ना ?'

'होय, त्या आहेत. मी त्यांना जाऊन सांगतों. पण आनंदराव, कांहीं भानगड तर नाहीं ना ! कारण तुम्हीं बऱ्याच दिवसांनीं येथें आला आहांत —'

'कोण आनंदरावदादा !' पाठीमागून अतिशय मंजुळ आणि मधुर आवाज निघाला.

आनंदरावांनीं आश्चर्यानें पाहिलें. कितीहि वेळां विजया त्यांच्या दृष्टीस पडली तरी प्रत्येक वेळीं तिच्याकडे पहातांना त्यांना आश्चर्य

वाटे. ती सौंदर्याची पुतळी दर खेपेला नवें सौंदर्य घेऊनच स्वर्गांतून भूलोकीं अवतरत आहे असें त्यांना वाटे आणि आज तर ती त्यांना अतिशयच सुंदर दिसली.

आनंदरावांना तिच्याकडे पहातांना नेहमीं नवलहि वाटे. ती दिसण्यांत इतकी नाजुक असलेली तरुणी अत्यंत साहसी होती. तिच्यासारखे निशाणबाजींत तरबेज असलेले फारसे लोक साऱ्या हिंदुस्थानांत नसावेत आणि सुमारें दोनशें पौंडाचें ओझेंहि ती सहज आपल्या खांद्यावरून उचलून नेऊं शकते या गोष्टीवर कुणीहि विश्वास ठेवला नसता. पण आनंदरावांना तसा प्रत्यक्ष अनुभवच होता.

' विजूताई, मी पूर्वी तुला पाहिलें होतें त्यापेक्षां तूं आतां अधिकच तरुण आणि टवटवीत दिसतेस नाहीं ! मी तुला सहज भेटायला आलों नाहीं. विजूताई, मला अगदीं सत्य सांग. तुझा तो नाठाळ नवरा पुन्हां कांहीं भानगडींत पडला आहे काय ?'

' कांहीं भानगडींत म्हणजे काय ?'

' हें बघ, आधींच माझें डोकें ठणकत आहे. नवरा कोणत्या प्रकारच्या भानगडींत पडतो तें तुला अगदीं बरोबर माहीत आहे. निष्कारण बतावणी करूं नकोस. मला खरोखरच अतिशय चिंता वाटूं लागली आहे. तुझा नवरा घरांत आहे काय ? गेल्या रात्रीं तो घरीं आला होता काय ? मी तुला हे प्रश्न विचारतों त्याला तसेंच महत्त्वाचें कारण आहे.'

' माझ्याकडून माहिती मिळविण्याची तुमची ही नेहमींचीच युक्ति आहे. ते घरांत नाहींत आणि गेल्या रात्रींहि मी त्यांना पाहिलेलें नाहीं. त्यांनीं कांहींतरी करमणुकीचा खेळ मांडला आहे. पण त्याचा तुमच्याशीं संबंध पोहोंचत नाहीं. '

' माझ्याशीं संबंध नाहीं काय ? त्या सुलतानाचें सिंहासन पळविण्याचा त्यानें डाव रचला आहे आणि तरीहि त्या गोष्टीचा माझ्याशीं संबंध नाहीं असें तूं म्हणतेस ?'

' तुम्ही हल्लीं अत्यंत गूढ भाषेंत बोलावयास सुरुवात केली आहे.' विजया हंसून म्हणाली.

' हें बघ विजूताई, जर तुला माझ्याबद्दल सहानुभूति वाटत असेल, जर झुंजारवर तुझें प्रेम असेल तर असली लपवाछपवी करूं नकोस. मी येथें सरकारी अधिकारी म्हणून आलों नाहीं. मला खरोखरच त्या माथेफिरू झुंजारबद्दल चिंता वाटूं लागली आहे. तुला दयाळ नांवाच्या एका इसमाची हकीकत ऐकावयाची आहे काय ?'

'भलत्याच माणसाची हकीकत ऐकण्याची मला काय गरज आहे ?'

'स्वभावाला औषध नसतें हेंच खरें !' कपाळावर आंठ्या चढवीत आनंदराव म्हणाले. 'आतां नीट कान उघडे ठेवून ऐक.'

त्यांनीं थोडक्यांत तिला आदल्या रात्रीं घडलेल्या प्रकाराबद्दल माहिती सांगितली. सुरुवातीला विजया चेष्टेनें हंसत होती पण नंतर तिची चर्या किंचित् गंभीर बनली हें आनंदरावांच्या तीक्ष्ण दृष्टींतूनसुटलें नाहीं.

'विजूताई, हा असा प्रकार आहे.' ते शेवटीं म्हणाले, 'त्या बॅगवर त्याच्या बोटांचे ठसे आहेत यांत तिळमात्रहि शंका नाहीं. एकदां झुंजारच्या नशिबानें त्याला दगा दिला होता त्यावेळीं आम्हीं त्याच्या हाताचे ठसे घेतले होते. दयाळ हाच झुंजार होता हें अगदीं सत्य आहे आणि तें तुलाहि माहीत आहे. बावटपणा करूं नकोस.

'झुंजारनें तें हिरे पळविले असा इन्स्पेक्टर सौदागरांचा तर्क आहे पण झुंजारचा कांहींतरी निराळा डाव असला पाहिजे हें मी ओळखलें आहे. मुद्याची गोष्ट ही कीं, गेल्या रात्रीं तो कांहींतरी संकटांत सांपडला आहे व तें संकट साधें नसावें. आतां तरी तूं माझ्याशीं सरळ वागणार आहेस कीं तुझें हें नाटकच पुढें चालू ठेवणार आहेस ?'

'ठीक आहे आनंदरावदादा, तुमची दीनवाणी मुद्रा पाहून मला तुमची दया येते. अलीकडे त्यांनीं महाभारत स्टोअर्समध्यें नोकरी पत्करली होती हें मला माहीत आहे. त्यांना घड्याळें विकण्यांत मोठी मौज वाटत होती आणि तें पाहून माझें आणि मावशीचें हंसून हंसून पोट दुखत होतें. ते कंबोडच्या सुलतानाच्या सिंहासनाच्या मागें होते हेंहि खरें आहे.'

'हें तूं अगदीं खुशाल हंसत कबूल करतेस ?'

'काय हरकत आहे ? जें तुम्हांलाहि समजलें आहे तें नाकबूल करण्यांत काय अर्थ आहे ? तुम्ही माझ्याकडे नीट पहा आणि सांगा, त्या जुलमी आणि पाजी सुलतानाचें तें सिंहासन पळविणें ही गोष्ट वाईट आहे काय––'

'पण विजूताई, मी पोलीस अधिकारी आहे...'

'मी तुम्हांला पोलीस अधिकारी म्हणून सांगत नाहीं. तो सुलतान कोणत्या प्रकारचा आहे हें तुम्हांला माहीत आहे ना ? तें सिंहासन विकून त्याला जे पैसे मिळतील ते तो कोणत्या प्रकारें खर्च करणार आहे ? त्या माकडाच्या हातीं तें पैशाचें कोलीत मिळाल्यानंतर तो शेंकडों सज्जन आणि निरपराधी माणसांना दुःखच देईल हें खरें ना––'

'तें सारें ठीक, पण तो मुद्याचा प्रश्न नाहीं––'

'तोच मुद्याचा प्रश्न आहे.' विजया म्हणाली, 'त्या सिंहासनाचें

महाभारत स्टोअर्समध्यें प्रदर्शन सुरू झाल्यानंतर त्यांनीं त्या सिंहासनाला लावलेले सर्व हिरे माणकें काढून त्याऐवजीं नकली कांचेचे खडे बसविण्याचें ठरविलें होतें. पन्नास लाखांचें सिंहासन म्हणून ज्याची प्रसिद्धि करण्यांत आली होती तें पांचशें रुपयांचेंहि नाहीं असें उघडकीस आल्यानंतर या जुलमी सुलतानाचें तोंड फोटो काढण्यालायक झालें नसतें काय ? त्यांची आणखी अशीहि कल्पना होती—'

'मला तुझ्या त्या आचरट नवऱ्याच्या कल्पना ऐकावयाच्या नाहींत.' आनंदराव घाईघाईनें म्हणाले, 'विजूताई, तूं मला तसलें कांहीं सांगू नकोस.'

'मी तें तुम्हांला सांगणारच नव्हतें पण तुम्हींच मला तसें करायला भाग पाडलेंत. तुम्हीं जी हकीकत सांगितलींत ती चमत्कारिक आहे. ते गेल्या रात्रीं राजबहादुरांच्या घरीं गेले होते हें स्पष्टच आहे. पण ते पुन्हा बाहेर पडले त्या वेळीं तेथले दिवे मालविण्यांत आले होते त्यांनीं आपल्या स्वभावाप्रमाणें परत येतांना त्या ड्रायव्हरबरोबर हास्यविनोद कां केला नाहीं ?'

'आतां तुझ्या लक्षांत आलें ना ?' आनंदरावांनीं विचारलें.

'आलें आणि आलें नाहीं.' ती म्हणाली, 'त्यांच्या ऐवजीं दुसरेंच कुणीतरी मोटारींत बसलें आणि त्यांना राजबहाद्दुराच्या वाड्यांत त्यांच्या इच्छेविरुद्ध अडकवून ठेवण्यांत आलें असावें असें तुम्हीं सुचवीत आहां. त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांना कुणीहि अडकवून ठेवणें शक्य आहे काय ?'

'मलाहि तें शक्य दिसत नाहीं पण झुंजार नेहमींच कांहीं मर्कटचेष्टा करीत असतो आणि तो काय करील याचा नेम नसतो.'

'तो टॅक्सी ड्रायव्हर काय म्हणाला तें मला पुन्हां एकदां सांगा.' ती म्हणाली.

आनंदरावांनीं पुन्हां तें सांगितलें आणि या खेपेला तिनें लक्षपूर्वक ऐकलें. तिच्या सुंदर कपाळावर आंठ्या पडल्या होत्या.

'होय. हें मोठें चमत्कारिक दिसतें.' ती शेवटीं म्हणाली, 'राजबहाद्दुरानें दिवे कां मालविले ? मोटारींत दुसराच माणूस बसला आहे हें ड्रायव्हरच्या लक्षांत येऊ नये या हेतूनेंच ते दिवे मालविण्यांत आले होतें. टॅक्सी मुख्य प्रवेशद्वाराच्या बाहेर पडली असतांनाच तो आंत बसलेला माणूस हळूच खालीं उतरला असावा.'

'पण हा केवळ तुझा तर्क आहे.' आनंदराव म्हणाले.

'तुमचाहि तोच तर्क आहे ना ?' तिनें विचारलें, 'लक्षाधीश

राजबहाद्दुरानें मुद्दामच त्यांना आपल्या वाड्यांत अडकावलें आणि पोलिसांना गोंधळांत पाडण्यासाठीच त्यांच्याविरुद्ध पुरावा त्या टॅक्सीत ठेवला हो गोष्ट अगदीं सरळ आहे.'

'विजूताई, तूं खरोखरच हुषार आहेस यांत मुळींच शंका नाहीं, आणि तुझा तो तर्कहि बरोबर दिसतो. पण तो बरोबर जुळून मात्र येत नाहीं. राजबहाद्दुरसारख्या लक्षाधिशानें तीस–पस्तीस हजारांचे हिरे गाटण्यासाठीं एका साध्या सेल्समनला आपल्या वाड्यांत जबरदस्तीनें कां अडकवून ठेवावें ? दयाळ हा झुंजार आहे अशी त्याला कल्पनाच असणें शक्य नाहीं.'

'कदाचित् त्यानें तें ओळखलें असेल.' विजयेनें सुचविलें.

'मला तें शक्य वाटत नाहीं.' आनंदराव म्हणाले, 'जरी राजबहाद्दुरानें दयाळ हा झुंजार आहे असें ओळखलें तरी त्यानें त्याला कां अडकवून ठेवावें ? माझ्यावर तें प्रकरण सोंपविण्यांत आलेलें नाहीं ही ईश्वराची कृपाच म्हणावयाची. पण सौदागरांना ही माहिती देणें माझें कर्तव्य ठरतें.'

'तुम्हीं तें आपलें कर्तव्य करण्यापूर्वीं मला त्यांची हॅट पहावयास मिळाली पाहिजे. शिवाय तुम्हीं सौदागरांना आणखी काय सांगणार आहांत ! सुलतानाचें सिंहासन पळविण्याचाच आमच्या स्वारीचा डाव होता हें जर त्यांच्या लक्षांत आलें नसलें तर पोलीस खात्यांत काम करण्यास ते लायक नाहींत असेंच मी म्हणेन. त्यांचा काय तर्क आहे ?'

'झुंजार ते हिरे घेऊन फरारी झाला असें त्यांचें मत आहे आणि ते त्याला पकडण्यासाठीं पोलिसांचें जाळें पसरविण्याची व्यवस्था करीत आहेत. झुंजार आतां राजबहाद्दुरांच्या वाड्यांत असावा हा विचार मात्र त्यांना अद्याप सुचलेला नाहीं.'

'आमच्या स्वारीला स्वतःबद्दल भलताच आत्मविश्वास वाटतो आणि ते एखाद्या जादुगाराप्रमाणें आपलें काम करीत असतात. पण तुम्हीं कधींतरी फसाल असें मी नेहमींच त्यांना बजावीत होतें आणि गेल्या रात्रीं तसेंच घडलें असावें. किंवा –' विजया विचार करीत थांबली.

'किंवा काय ?' आनंदरावांनीं विचारलें.

'जर ते गेल्या रात्रीं राजबहाद्दुराच्या वाड्यांतून बाहेर पडले असते आणि स्वेच्छेनेंच जर नाहींसे झाले असते तर त्यांनीं मला तसें यापूर्वींच कळविलें असतें. पण मला कांहींच समजलेलें नाहीं. जरा थांबा, मी कपडे बदलून येतें. मला त्यांची ती हॅट पहावयाची आहे.'

थोडक्याच अवकाशांत ती कपडे बदलून बाहेर आली आणि

आनंदरावांबरोबर ती इन्स्पेक्टर सौदागरांच्या ऑफिसांत गेली. आनंदरावांनीं जेव्हां त्यांची विजयेबरोबर ओळख करून दिली, तेव्हां त्यांना अतिशय आश्चर्य वाटलें.

'विजयाबाई, तुम्हीं झुंजाररावांच्या अलीकडच्या हालचालींसंबंधीं माहिती देण्यासाठी येथें आला आहांत अशी माझी समजूत आहे. जर तुमची जबानी देण्याची तयारी असेल –'

'जबानी ?' विजया हंसून म्हणाली, 'तुम्हीं त्यांचा शोध करण्यासाठीं काय उपाय योजिले आहेत, त्याबद्दल माहिती मिळविण्यासाठीं मी येथें आलें आहें. तुम्हीं राजबहाद्दुराच्या वाड्यांत चौकशीसाठीं कुणाला पाठविलें होतें काय ?'

सौदागरांना विजयेची बोलण्याची पद्धत आवडली नव्हती. ते कपाळावर आंठ्या चढवून म्हणाले, 'तेथें चौकशी करण्याची काय जरुरी आहे ? झुंजारराव तेथें गेले हें आम्हांला माहीत आहे आणि ते तेथून बाहेर पडले हेंहि आम्हांला माहीत आहे. मुंबईकडे परत येतांना वाटेंत ते नाहीसे झाले, आणि जर त्यांच्याजवळ ते हिरे सांपडले –'

'तर तुमची केस पूर्ण होईल.' विजया मध्येंच म्हणाली, 'ठीक आहे, ते तीस हजारांचे हिरे पळवून त्यांचें समाधान होईल अशी जर तुमची समजूत होणार असली तर तुम्हीं खुशाल त्यांचा शोध चालू ठेवा.'

तोंडावर चाबकाचा फटका बसावा त्याप्रमाणें विजयेचें बोलणें सौदागरांना झोंबलें होतें. त्यांनीं मदतीच्या अपेक्षनें आनंदरावांकडे पाहिलें पण ते खालीं मान घालून बसले होते.

'झुंजाररावांचा कांहीं निराळाच डाव होता असें तुम्हांला सुचवावयाचें आहे काय ?' स्वतःला सांवरून सौदागरानें विचारलें, 'त्यांच्या मनांतून तें सुलतानाचें सिंहासन पळवायचें होतें काय ?'

'कदाचित् त्यांना राजबहाद्दुराचे सोन्याचे दांत पळवायचे असतील.' विजयेनें सुचविलें. 'भलते सलते तर्क करण्यांत आपण आपला वेळ फुकट घालवीत आहों. टॅक्सीमध्यें सांपडलेली त्यांची हॅट आणि इतर वस्तु मला पहावयास मिळतील काय ?'

'खुशाल पहा.' सौदागर म्हणाले, 'ती हॅट आणि ती कातडी बॅग तुमच्या पुढ्यांतच टेबलावर आहे. आम्हीं त्या दोन्ही वस्तूंचे फोटो घेतले आहेत आणि तपासणीहि केली आहे. आतां तुम्हांला हवी तशी तपासणी करायला कांहीं हरकत नाहीं.'

विजयेनें त्या बॅगेकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. पण तिनें त्या हॅटची मात्र अगदीं कसून तपासणी केली. पण तरीहि तिचें समाधान झालें नाहीं

आणि तिने सौदागरांकडे सूक्ष्मतादर्शक काचेची मागणी केली

'इतकी कसून तपासणी करण्यासारखे त्या हॅटमध्ये काय आहे ?' आनंदरावांनीं विचारलें.

ही हॅट अगदीं अलीकडेच एका उंच माणसानें डोक्यांत घातली होती.'

'तुम्ही माझी चेष्टा करण्यासाठीं येथें आलां आहांत काय ?' सौदागरांनीं रागानें विचारलें, 'आनंदराव, तुम्ही यांना येथे कशासाठीं आणलेंत ?'

'तर मग आम्हीं जातों.' विजया म्हणाली, 'नमस्ते इन्स्पेक्टरसाहेब.'

विजया घाईघाईनें निघाली आणि तिला गांठतांना बिचाऱ्या आनंदरावांना बरीच धांवपळ करावी लागली.

'गेल्या रात्रीं ते राजबहाद्दुरांच्या वाड्यांतून बाहेर पडले नाहींत हें त्या हॅटनेंच सिद्ध केलें आहे.' विजया म्हणाली, 'दुसऱ्याच कोणत्या तरी माणसानें ती हॅट घातली होती.'

'कशावरून ?' आनंदरावांनीं विचारलें.

'हें पहा.' तिनें त्याच्यापुढे आपला हात उघडून दाखविला. त्या हातांत एक करड्या रंगाचा केस होता. 'मला जर तुम्हीं सूक्ष्मतादर्शक कांच दिली असतीत तर मला आणखी कित्येक केंस मिळाले असते.' ती म्हणाली, 'आणि त्यांचे केंस करडे नाहीत. चांगले काळेभोर आहेत. हॅट त्यांचीच आहे. पण ती दुसऱ्या कुणीतरी वापरली आहे.'

'विजूताई तूं तर कमालच केलीस.' आनंदराव म्हणाले, 'पण तूं जें कांहीं सुचवीत आहेस त्यावर कुणाचाहि विश्वास बसणार नाहीं. तुझें म्हणणें जर खरें मानलें तर लक्षाधीश राजबहाद्दुर खोटें बोलत आहेत असें मानावें लागेल. पसंतीसाठीं पाठविलेले हिरे दडपण्यासाठींच राजबहाद्दुरानें महाभारत स्टोअर्सच्या सेल्समनला आपल्या वाड्यांत जबरदस्तीनें डांबून ठेवलें आहे असा त्याचा अर्थ होतो.'

'मला आणखी एक कल्पना सुचली आहे.' विजया म्हणाली, 'त्या राजबहाद्दुरांना एखादी सुंदर, तरुण आणि अविवाहित मुलगी नाहीं ना ?'

'हा तुझा तर्क मात्र अगदीं सपशेल चुकीचा आहे.' आनंदराव म्हणाले, 'राजबहाद्दुर अविवाहित आहेत हें मला पक्कें माहीत आहे.'

'पण तो लक्षाधीश आहे. अलीकडच्या श्रीमंत लोकांनीं इंग्रजांप्रमाणें सुंदर मुलींना सेक्रेटरीचें काम देण्याची प्रथा सुरू केली आहे खात्रीनें त्या

राजबहाद्दुरांची सेक्रेटरी कुणीतरी सुंदर तरुणी असली पाहिजे जरी सौदागराना राजबहाद्दुराच्या वाड्यांत जाण्याची आवश्यकता भासली नाहीं तरी मला मात्र गेलें पाहिजे.' विजया म्हणाली.

'त्या वाड्यांत गेलें पाहिजे असें मलाहि वाटतें. पण विजूताई, निदान मला तरी तें शक्य नाहीं आनंदराव म्हणाले, 'सौदागरांच्या केस-मध्यें मी जर ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला तर त्याचा परिणाम चांगला होणार नाही. मला आतां माझ्या ऑफिसांत गेलें पाहिजे. मला आतां बरेंच काम आहे.'

विजयेनें आपल्या मोटारीचें दार उघडलें आणि आनंदरावांना आंत ढकललें, 'पेणपर्यंत फेरफटका केल्यास तुम्हांला आपलें काम कर-ण्यास अधिक उत्साह येईल.' ती म्हणाली, 'तुम्हीं जर बरोबर नसलां तर राजबहाद्दुराच्या किल्ल्यांत मला प्रवेश कसा करतां येईल ?'

बोलतां बोलतांच विजयेनें आपली मोटार भरवेगानें सुरूं केली. आनंदराव तिच्याकडे पहात उसासा सोडीत म्हणाले, 'विजूताई, तूं त्या झुंजारच्या संगतीनें फारच बिघडली आहेस.'

• • •

४

झुंजार हा विलक्षण होता. इतर कोणाहिपेक्षां तो अतिशय चपळ होता. पण तोहि एक माणूसच होता. जेव्हां एक पिस्तुलाची गोळी त्याच्या मस्तकाच्या एका बाजूला जोरानें लागली तेव्हां तोहि खालीं पडून बेशुद्ध झाला.

अगदीं पहांटेस तो शुद्धीवर आला. आणि त्यावेळींहि त्याला काय घडलें याबद्दल मुळींच कल्पना नव्हती. तो विव्हळला. बिछान्यावरच या बाजूचा त्या बाजूला झाला आणि पुन्हां झोंपला.

दुसऱ्या दिवशीं सुमारें अकरा वाजतां तो जागा झाला त्यावेळीं त्याचें डोकें थोडेसें दुखत होतें. याखेरीज त्याची प्रकृति अगदीं पूर्ववत् झाली होती. डोक्याला गुंडाळलेलें बँडेज पहातांच त्याला आदल्या रात्रीं काय घडलें तें आठवलें व नंतर तो छताकडे पहात, कांहीं वेळ विचार करीत बिछान्यावरच पडून राहिला.

नतर त्यानें आजूबाजूकडे पाहिलें. ज्याच्यावर तो झोंपला होता तो पलंग सोन्याचा होता. त्या पलंगावर अत्यंत मऊ गादी घातली होती

आणि त्या गादीवर पसरलेली चादर रेशमी होती आपल्या अंगावरहि रेशमी पायजमा आणि सदरा आहे असे त्याला दिसून आले जणू काय तें एखाद्या सम्राटाच्या लाडक्या युवराजाचेंच शयनगृह होते.

त्या पलंगाला साजेशीच ती खोली होती भिंतीवर उंची मखमली पडदे सोडलेले होते. जमिनीवर अत्यंत मौल्यवान इराणी गालिचा अंथरलेला होता. तेथले सर्व सामान [illegible] आणि [illegible] बनविलेलें होतें.

झुंजार उठून उभा राहिला आणि म्हणाला, ' या जगांत माझी खरी किंमत ओळखणारा एकतरी माणूस आहे म्हणावयाचा ! '

त्या खोलीला असलेल्या तीन खिडक्यांतून सूर्यप्रकाश आंत घुसला होता. त्या मऊ गालिच्यावरून पावलें टाकीत झुंजार त्या खिडकीकडे गेला. त्याची प्रकृति अद्याप पूर्ववत झालेली नाहीं, असा निसर्गानेंच त्याला इषारा दिला. तो चालूं लागतांच त्याच्या मस्तकांतलें रक्त इतकें वेगानें उसळलें कीं त्याला असह्य वेदना झाल्या. पण खिडकी गांठेपर्यंत त्या वेदना थांबल्या होत्या.

खिडकींतून दिसणारें बाहेरचें दृश्य अत्यंत चित्ताकर्षक होतें. बाहेर सुंदर बगीचा होता. कित्येक माळी तेथें काम करीत होते.

' तुम्हीं शुद्धीवर आलांत हें फार चांगलें झालें. '

झुंजारनें मान वळवून मागें पाहिलें. त्याचे जुने दोस्त प्रधानजी स्वतःच दार उघडून तेथें आले होते.

' मी शुद्धीवर आलों ही गोष्ट अगदीं खरी आहे प्रधानजी, पण माझ्या डोक्याची अशी अवस्था कां झाली ? तें पूर्वींपेक्षां तिप्पटीनें मोठें झालें आहे असें मला वाटतें. '

' तुम्ही एका वाईट अपघातांत सांपडला होता. '

' त्याबद्दलच मला खुलासा हवा आहे. या सर्व प्रकाराचा अर्थ काय तें तुम्हीं मला सांगाल काय ? राजबहाद्दूर आपल्या पाहुण्यांना नेहमीं अशाच प्रकारें वागवीत असतो काय ? हें खरेंखुरें शय्यागृह आहे कां हा सर्व एखाद्या नाटकांतील देखावा आहे ?'

' राजबहाद्दुरांना सुवर्ण फार प्रिय आहे. '

' पलंग कांहीं वाईट नाहीं. ' झुंजार मागें वळून म्हणाला, ' पण तुम्हांला असा माझ्यावर हल्ला करण्याची कां आवश्यकता भासली ?

' आमच्या एका पहारेकऱ्यानें चुकीनें गोळी झाडली होती. तुम्हीं आतां कांहीं वेळ विश्रांति घ्या. अद्याप तुमची प्रकृति बरी झालेली

नाहीं. तुम्हीं संध्याकाळपर्यंत शुद्धीवर येणार नाहीं अशी आमची कल्पना होती.'

'आमची म्हणजे कुणाची ?'

'डॉक्टरांची आणि...'

'डॉक्टर जितके स्वतःला समजतात तितके हुषार नसतात.' झुंजार म्हणाला, 'शुद्धीवर आलेल्या पेशंटच्या बाबतीत ते कदाचित् साधारण तर्क करूं शकतील. पण बेशुद्ध पेशंट नेहमीच त्यांना बुचकळ्यांत पाडतो जगांतली सारी संपत्ति जरी कुणी मला देऊं केली तरी मी कांहीं डॉक्टर होणार नाहीं.'

त्याचें तें बोलणें ऐकून प्रधानजी बुचकळ्यांत पडले होते. आदल्या रात्रींच्या त्या सामान्य सेल्समननें आपण असामान्य आहोंत हें सिद्ध केलें होतें.

'आपणांला कांहीं हवें असलें तर...'

'योग्य विषय काढलांत.' झुंजार म्हणाला, 'मला मोठे पाव अर्धा शेर मस्का आणि तीन कप गरम गरम कॉफी पाहिजे. डोकें जरी वेदनांनीं भरलें असलें तरी माझें पोट रिकामें आहे आणि त्याशिवाय मला आपल्या महाराजांची खास मुलाखत हवी आहे.'

'ठीक आहे साहेब, आपण जागे झालां आहांत हें मी त्यांना कळवितों.'

प्रधानजी निघून गेल्यानंतर झुंजार विचार करूं लागला. आपणांला इतक्या सन्मानानें वागविण्यात येत आहे याबद्दल तो बुचकळ्यांत पडला होता. जखम बांधण्यासाठीं तेथें डॉक्टर आला नव्हता हें त्यानें ओळखलें होतें. तें बँडेज कुणीतरी कसेंतरी गुंडाळलें होतें. आपणांला झालेली जखम विशेष गंभीर नाहीं हें त्या वाड्याच्या मालकानें ओळखलें असावें.

'मोठीच गंमत आहे.' तो स्वतःशीच म्हणाला.

तो त्या खोलीवरून पुन्हां आपली नजर फिरवीत होता तो वावटळीप्रमाणें घोषणा टाकीत राजबहाद्दूर त्या खोलींत घुसला.

'माझ्या प्रिय मित्रा! हें फार छान झालें!' तो आनंदानें म्हणाला, 'संध्याकाळपर्यंत तुम्हीं शुद्धीवर येणार नाहीं अशी माझी कल्पना होती. मी सर्व खुलासा करतों, तुम्हीं खरोखरच वज्रदेही आहांत दोन तीन आठवडे तरी तुम्हीं बिछान्यावर पडून रहाल अशी माझी कल्पना होती.'

'मी कच्च्या गुरूचा चेला नाहीं.' झुंजार हंसून म्हणाला.

'त्याबद्दल प्रश्नच नाहीं.' उत्साहानें राजबहाद्दूर म्हणाला, 'गेल्या रात्रीचा अद्भुत चमत्कार पाहून मी थक्कच झालों आहे. असल्या प्रकारचें साहस मी कित्येक वर्षांत पाहिलें नव्हतें. कल्याण तुम्हीं माझे प्राण वांचविलेत.

'खरें कीं काय ?' झुंजार म्हणाला, 'तुम्हीं अडचणींत सापडला आहां असें मला वाटलें होतें खरें.'

'मी प्राणसंकटांत सांपडलों होतों पण तुम्हीं चापल्यानें आणि साहसानें माझा प्राण वांचविलात. त्या दोघा बदमाषांनीं मला कैचींत पकडलें होतें. इतका पहारा असतांनाहि ते अचानक माझ्यापर्यंत कसे येऊन पोहोंचले हें एक आश्चर्य आहे. मूर्ख लेकाचे ! मी त्यांना चांगला मान देतों आणि त्यांच्याकडून चांगल्या सेवेची अपेक्षा करतों आणि असें असतांना काय घडलें ? ते दोन बदमाष खुद्द माझ्या बैठकीच्या खोलींत घुसले होते आणि जर तुम्हीं ऐनवेळीं तेथें आलां नसतां तर मी ठार झालों असतों. तुम्हीं त्या दोघांना एका क्षणांत कसें चीत केलेंत तें अद्यापहि समजत नाहीं.'

'त्या दोघां बदमाषांचें काय झालें ?' झुंजारनें सहज स्वरांत विचारलें, 'तुम्हीं त्यांना पोलिसांच्या स्वाधीन केलेंत काय ? आणि बरी आठवण झाली. मी येथें आलों होतों त्या कामाचें काय झालें ? जवाहीर खात्याचे बिचारे चमनलाल रात्रभर आपली छाती बडवून घेत असतील. तुम्हीं आमच्या स्टोअर्सला टेलिफोन केला आहे काय ?'

'त्याबद्दल तुम्हीं विचारच करूं नका. मी ती सर्व व्यवस्था केली आहे. पण मला तुमच्याशीं कांहीं बोलावयाचें आहे.'

राजबहाद्दुरानें आपल्या खिशांतून एक चिरूट बाहेर काढला आणि तो पेटविला. त्या एका मिनिटांत झुंजारला बराच विचार करण्याला संधि मिळाली. आदल्या रात्रीचे ते दोघे बदमाष सामान्य चोर होते असे राजबहद्दुरानें भासविलें होतें. पण ते दोघेहि खुनी होते आणि राजबहाद्दुराला ठार करण्याच्याच उद्देशानें ते आले होते याबद्दल झुंजारला मुळींच शंका नव्हती.

राजबहाद्दूर त्याच्यावर खुष झाला होता ही गोष्ट अगदीं स्पष्टच होती. त्यानें चिरूट पेटवल्यानंतर पुन्हां बोलण्यास सुरुवात केली होती. 'दयाळ, गेल्या रात्रीं तुम्हीं जें कांहीं केलें त्याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. तुम्हीं माझा प्राण वाचविलांत. ते बदमाष घाबरून माझ्यावर पिस्तुल झाडणार होते. ते दोघेहि माझ्याच प्रांतांतले होते.

'मी येथें रहावयास आल्यापासून असला प्रकार घडला नव्हता.

आणि जेव्हां तो घडला तेव्हां तुम्हीं तेथें हजर होतां हें माझें सुदैवच म्हणायचें. तुम्हीं इतके डावपेंच आणि निशाणबाजी कुठें शिकलांत ? महाभारत स्टोअर्समध्यें तशाप्रकारचें शिक्षण देण्यांत येतें अशी मला कल्पना नव्हती. तुमच्यासारखा हुशार माणूस कुणालाहि जवळ ठेवावा असें वाटेल.'

'सोन्याच्या पिंजऱ्यांत घालून ना ?' आजूबाजूकडे मुद्दामच पहात झुंजारनें विचारलें.

'ही जागा तुम्हांला आवडली ना ?' उत्साहानें राजबहाद्दुरानें विचारलें, 'ही सर्व माझीच कल्पना आहे आणि तुम्हीं अशा प्रकारचें वैभव पूर्वीं कधीं पाहिलें नसेल. पण तें जाऊं द्या. तुमचें अपूर्व साहस आणि शक्ति पाहून मी अतिशय खूष झालों आहें—'

'तर मग प्रथम माझ्या न्याहारीची व्यवस्था करा.' झुंजार मध्येंच म्हणाला.

'तुम्हांला काय हवें तें मिळेल.' राजबहाद्दूर म्हणाला, 'तुमचे नातेवाईक कोण आहेत ?'

'नातेवाईक ?' झुंजारनें आश्चर्यानें विचारलें.

'आईबाप ?'

'दोघेहि केव्हांच मेले.'

'तुमचें लग्न झालेलें आहे काय ?'

'अद्याप झालेलें नाहीं.' झुंजार म्हणाला.

'म्हणजे लग्नाचा विचार करीत आहां '

'तसेंच कांहीं म्हणतां येणार नाहीं.' झुंजार म्हणाला, 'एक मुलगी माझ्या पहाण्यांत आहे. पण अद्याप नक्की असें कांहींच ठरलेलें नाहीं.'

'छान !' राजबहाद्दूर म्हणाला, 'तुम्हीं जर तिच्याकडे दुर्लक्ष केलेंत तर ती विशेष ओरड करणार नाहीं. तुम्हांला भाऊ-बहिणी आहेत काय ?'

'नाहींत. मला कुणींच नातेवाईक नाहींत. मी नागपुराहून भटकत मुंबईंत आलों आणि महाभारत स्टोअर्समध्यें नोकरीला राहिलों. स्टोअर्स-पासून जवळच मी एका खोलींत रहातों.'

'छे, छे ! तुम्ही यापुढें येथेंच रहाणार.'

'राजबहाद्दूर, तुम्ही माझी चेष्टा तर करीत नाहीं ना ?'

'जेव्हां माझ्या स्वतःच्या प्राणाचा प्रश्न निर्माण होतो तेव्हां मी कधींच चेष्टा करीत नाहीं. गेल्या रात्रींचा तो प्रकार घडल्यानंतर मला

तुमच्यासारख्याच एका शरीरसंरक्षकाची जरूरी भासं लागली आहे '

'तुम्हीं माझी फौज पाहिलीच असेल. ती फक्त दिसण्यानच बरी आहे. पण जेव्हां प्रत्यक्ष प्रसंग येतो तेव्हा तुमच्यासारखाच माणस जवळ हवा ज्याला एका क्षणांत आपल्या बुद्धीचा आणि शक्तीचा उपयोग करतां येतो असा माणूस मला हवा आहे आणि मी तुम्हांला ती नोकरी देऊं इच्छित आहें '

'मला वाटत होतें कीं तुम्ही माझी चेष्टा करीत आहां-- '

'मुळींच नाहीं. तुम्ही ही नोकरी पत्करा आणि या वाड्यांतील वैभवाचे वाटेकरी व्हा. ह्याहि खोलीपेक्षां कित्येक शृंगारलेल्या जागा या वाड्यांत आहेत आणि त्यांतून तुम्हांला हवी ती पसंत करतां येईल. तुम्हीं रोज माझ्याबरोबरच जेवाल आणि माझ्याबरोबरच रहाल या कामाबद्दल तुम्हांला दरमहा तीन हजार रुपये मिळतील.'

'अरे बापरे !' झुंजार अभिनय करीत म्हणाला, 'ही नोकरी जर मी पत्करली तर माझें मन मला सारखें दंश करीत राहील. इतका पगार घेणें म्हणजे तुम्हांला फसविणें असेंच होईल, कारण कित्येक वर्षें कदाचित् तुमच्यावर कुणी हल्ला करणार नाहीं.'

'तें खरें आहे.' राजबहाद्दूर म्हणाला, 'पण कदाचित् पुढल्याच आठवड्यांत एखादा वेडापीर माझा जीव घेण्याचा प्रयत्न करील. मी तुम्हांला स्वखुषीनें तितका पगार देण्यास तयार आहें. माझी फक्त एकच अट आहे आणि ती म्हणजे तुम्ही मला कोणतेहि प्रश्न विचारतां कामा नये. त्याशिवाय रात्रंदिवस तुम्ही अगदीं माझ्याजवळ असलें पाहिजे या वाड्याच्या आवारांत तुम्ही कोठेंहि जाऊं शकतां. '

'म्हणजे आवाराच्या पलीकडे मला जातां येणार नाहीं असेंच ना ?'

'होय. माझ्या म्हणण्याचा तोच अर्थ आहे.'

'तीच तर मोठी पंचाईत आहे ' झुंजार म्हणाला, 'मला मित्र नाहींत. पण एकदोन ओळखीचीं माणसें आहेत. त्याशिवाय माझ्या बिऱ्हाडांतल्या सामानाचाहि प्रश्न आहे व महाभारत स्टोअर्समध्यें--'

'जर तुम्हीं ही नोकरी पत्करलीत तर इतर विचार करण्याचें कारणच नाहीं. तुमचें सामान मी येथें आणूं शकतों. पण मला वाटतें, तें आहे तेथेच राहूं देणें योग्य होईल. तुम्हांला मी नवीन वस्तु देऊं शकतों. तुम्हांला अगदीं हवें तें मिळेल. यापुढे सर्व तुमच्यावरच अवलंबून आहे.'

'महिना तीन हजार रुपये पगार! यांत विचार करण्यासारखं कांहींच नाहीं. असली नोकरी नाकारणारा माणूस मूर्खच ठरेल.'

'शाबास!' राजबहाद्दूर त्याच्याबरोबर हस्तांदोलन करीत म्हणाला, 'याच क्षणापासून तुमची नोकरी सुरू झाली. मी ताबडतोब तुमची खाण्यापिण्याची व्यवस्था करतों. जर तुम्हांला बरें वाटत असेल तर तुम्हीं कपडे बदलून नंतर खालीं या.'

राजबहाद्दूर जसा आला होता तसाच धांवपळ करीत तेथून निघून गेला. दार बंद होतांच झुंजारची चर्या बदलली. त्याच्या मुद्रेवर मिस्किल हास्य चमकूं लागलें. एक गोष्ट मात्र स्पष्ट होती. राजबहाद्दुराला त्याच्याबद्दल मुळींच संशय आला नव्हता. तो त्याला दयाळच समजत होता. तो एक सामान्य सेल्समन् आहे अशा समजुतीनेंच त्यानें त्याला तीन हजार रुपये पगाराची लालूच दाखविली होती.

'यापुढें बरीच गंमत होणार असें दिसतें!' झुंजार म्हणाला.

कारण नुकत्याच झालेल्या त्या मुलाखतींत झुंजारनें एक आश्चर्यकारक शोध लावला होता...

५

राजबहाद्दूर त्या खोलींतून बाहेर पडतांच समोरच जिन्याच्या एका पायरीवर उभा राहून प्रधानजी त्यांची वाट पहात आहे असें त्याला दिसलें. त्यानें बोटानेंच त्याला खूण केली आणि ते दोघे कांहीं न बोलतां जिन्याच्या पायऱ्या उतरून तळमजल्यावरील बैठकीच्या खोलींत गेले.

'वल्लभदास, सर्व कांहीं बरोबर जुळून आलें. मासा गळाला लागला.' राजबहाद्दूर म्हणाला.

'तशी तुमची कल्पना होतीच. पण तुम्हीं त्या माणसाला घरांत घुसविण्यांत बराच मोठा धोका पत्करीत आहां. तो कांहीं सामान्य माणूस नाहीं तो अत्यंत धूर्त इसम आहे, त्याच्यावर सारखी नजर ठेविली पाहिजे त्याचा आत्मविश्वास दांडगा दिसतो.'

'आणि म्हणूनच तो मला आवडतो. वल्लभ, कांहीं झालें तरी त्याला आपण बाहेर जाऊं देणें योग्य होणार नाहीं. येथून बाहेर पडल्यानंतर त्यानें काय केलें असतें हें तुला माहीत आहे काय? तें मी तुला सांगतों. त्यानें गेल्या रात्रीं काय घडलें तें आपल्या पत्रकाला सांगितलें असतें. भारद्वाजनें ती गोष्ट पोलिसांना कळविली असता आणि

पोलीस चौकशी करण्यासाठीं येथें यांवेत असे … किती जाहिरात झाली असती याची तुला कल्पना आहे काय

‘तुला जाहिरातबाजीची आवड आहे अशी माझी कल्पना होती.’ कुचेष्टेनें वल्लभ म्हणाला.

‘मला जाहिरात हवी पण ती अशाप्रकारची नको.’ राजबहाद्दूर जोरानें म्हणाला, ‘पोलिसांचा येथें येण्याचा मार्ग बंद करण्यासाठीं त्या दयाळला येथें ठेवणेंच भाग आहे.’

‘तरीहि पोलीस येथें येतीलच.’ वल्लभ म्हणाला, ‘आतांपर्यंत तुला दोन वेळां टेलिफोन आला होताच–’

‘यांत विशेष कांहींच नव्हतें. दयाळबद्दल त्यानें चौकशी चालविली होती. गेल्या रात्रींच्या प्रकाराची माहिती बाहेरच्या जगाला समजली असती तर भलताच घोटाळा झाला असता. पण वल्लभ, त्या दोघांची तूं योग्य व्यवस्था केली आहेस ना?’

‘होय. त्यांच्याबद्दल चिंता करण्याचें कांहीं कारण नाहीं असें मी तुम्हांला सकाळपासून अनेकदां सांगितलें आहे. त्याच्यासारख्या दोघां महापटाईत माणसांना त्या तरुणानें कसें चीत केलें तेंच मला समजत नाहीं.’

‘तें मला समजण्याची आतां कांहीं आवश्यकता नाहीं.’ राजबहाद्दूर म्हणाला, ‘त्यानें त्या दोघांना चीत केलें आणि त्याबद्दल पोलिसांनाहि कांहीं समजणार नाहीं. सुदैवानें या वाड्यापासून खाडी इतकी जवळ आहे हें फार चांगलें झालें. दयाळ त्याबद्दल मुळींच चौकशी करणार नाहीं. वल्लभ, आपण खरोखरच सुदैवी आहोंत. दयाळ अविवाहित आहे आणि त्याला साऱ्या जगांत कुणी नातेवाईकहि नाहीं. तो गेल्या रात्रीं येथून टॅक्सींतून निघून गेला. त्यानें काय केलें त्याच्याशीं मला मुळींच कर्तव्य नाहीं. पोलीस त्या डावाला बळी पडतील असें तुला वाटतें काय?’

‘पोलिसांना तें पटलेंहि आहे. या घरांत अर्धा तास घालविल्यानंतर दयाळ येथून बाहेर पडला. वाटेंत त्याचा लोभ जागृत झाला आणि तो हिरे घेऊन फरारी झाला असा पोलिसांचा तर्क आहे. ते त्याला शोधून काढण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि त्यांना दयाळ कधीं सांपडणार नाहीं.’

‘आणि त्या दयाळलाच जर पुढें संशय आला तर? आतां तो तुझा शरीरसंरक्षक बनला आहे. पण जेव्हां आपण जवळजवळ कैदीच आहोंत

असें त्याला दिसून येईल तेव्हां तो आपणाला त्रास दिल्याशिवाय रहाणार नाही. तो सामान्य माणूस नाहीं '

'त्यानें त्रास देण्यास सुरुवात केली तर त्याचा कसा बंदोबस्त करावा हें मला चांगलें माहीत आहे.' राजबहाद्दूर म्हणाला, 'शक्य तितके दिवस त्याला झुलवीत ठेवलें पाहिजे, त्याच्यावर नजर ठेवली पाहिजे. हें तुझें म्हणणें मात्र योग्य आहे. जर त्यानें या आठवड्यांत बाहेर पडण्याचा प्रयत्न केला तर काय करावयाचें तें तुला माहीत आहेच.'

'मी त्याच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करतों.' वल्लभ दाराकडे जात म्हणाला, 'त्याच्या डोक्याचें बँडेजहि पुन्हां बांधलें पाहिजे त्याचें मस्तक लोखंडाचें असलें पाहिजे. तो दोन-तीन दिवस तरी अंथरुणांत पडून राहील अशी माझी कल्पना होती. माझें नांव वल्लभाचार्य असून मी तुमचा मुख्य नोकर आहें, असें मी त्याला सांगणार आहें. त्यानें माझी चेष्टा करण्याचा प्रयत्न केला आहे. पण अर्थातच तो दोष त्याचा नसून तुझा आहे.'

वल्लभ निघून गेल्यानंतर राजबहाद्दूर आपल्या बैठकीच्या खोलींत बसून विचार करीत होता तोंच त्याच्या टेबलावरील टेलिफोनची घंटी वाजली. तो त्याचा खाजगी टेलिफोन होता आणि पाव मैलावर असलेल्या प्रवेशद्वाराजवळ पहारा करणाऱ्यानें त्याला तो केला होता.

'मालक, एक गृहस्थ एका बाईला घेऊन आले आहेत. आपण सी आय् डी सुपरिंटेंडेंट आनंदराव आहों असें ते म्हणत आहेत. म्हणून मी तुम्हांला टेलिफोन केला '

'मूर्खा, त्यांना ताबडतोब आंत सोड.' रागानें राजबहाद्दूर म्हणाला. 'सी. आय्. डी अधिकाऱ्याला तूं अडवितोस याला काय म्हणावें?'

'माफ करा मालक, पण कुणालाहि आंत सोडावयाचें नाहीं असा तुम्हींच हुकूम दिला होता.'

'तें जाऊं दे, तूं त्यांना आंत सोड.'

त्यानें रिसीव्हर खाली ठेवला आणि तेथलेंच एका घंटीचें बटन दाबलें आणि कांहीं क्षणांतच वल्लभ तेथें आला.

'चांगली बातमी नाहीं.' राजबहाद्दूर म्हणाला, 'आणखी अर्ध्या मिनिटाच्या आंत सी. आय्. डी. खात्याचे आनंदराव नांवाचे अधिकारी येथें येतील.'

वल्लभचा चेहरा बदलला. तो म्हणाला, आनंदराव, ? हे एक बडे अधिकारी आहेत. ते येथें कशासाठीं आले आहेत ?

'तें आपणाला लवकरच समजेल.' गंभीर स्वरांत राजबहाद्दूर म्हणाला, 'आनंदराव हे फार बडे अधिकारी आहेत. सी. आय्. डी. खात्याच्या सर्व लोकांत त्यांच्याबद्दल दबदबा आहे '

'मी जर त्यांची भेट घेतली नसती तर त्यांना संशय आला असता. त्यांना संशयास्पद असें कांहींच दिसणार नाही अशी तू खबरदारी घे. दयाळची चौकशी करण्यासाठींच ते येथें आले असावेत तूंच दयाळला वाडयांत घेतलेंस आणि तूंच त्याला पुन्हां बाहेर नेऊन टॅक्सींत बसविलेंस हें लक्षांत ठेव. दयाळचें पुढें काय झालें या गोष्टीशीं आपणाला मुळींच कर्तव्य नाहीं.'

त्यांचें बोलणें संपलें नाहीं तोंच एक जुनाट टॅक्सी त्याच्या पायऱ्यांसमोर उभी राहिली. विजयेनें आपली मोटार पेण गांवांतच एका ठिकाणीं उभी केली आणि तेथून एक भाडयाची मोटार घेऊन ती तेथें आली होती. तिचें तें कृत्य अर्थातच शहाणपणाचें होतें.

आनंदरावांबरोबर ती बाहेरच्या विस्तीर्ण दिवाणखान्यांतून चालत बैठकीच्या खोलींत आली होती. तेथली ती उत्कृष्ट सजावट आणि वैभव पाहून आनंदरावांच्या मनावरहि परिणाम झाला होता. कांहीं क्षणांतच राजबहाद्दूर तेथें आला.

'आनंदराव, आपण येथें आलांत याबद्दल मला अतिशय आनंद होतो.' तो म्हणाला, पण तुम्हीं कशासाठीं आलां आहांत ? जर त्या महाभारत स्टोअर्समधील माणसासंबंधीं —'

'राजबहाद्दूर, गेल्या रात्रीं काय घडलें तें कृपा करून सागा.' आनंदराव बोलण्यापूर्वींच विजया म्हणाली, 'माझे दयाळ मुळींच अप्रामाणिक नाहींत आणि ते सज्जन आहेत त्यांनींच हिऱ्यांची चोरी केली असें पोलिसांना वाटत आहे. चोरीसारखें पाप त्यांच्या हातून कधींच होणार नाहीं म्हणून मी मुद्दाम या आनंदरावांना विनंति करून त्याना घेऊनच येथें आलें.

'दयाळ फारच प्रामाणिक आहेत. त्यांनीं कधींहि आतांपर्यंत कुणाचा विश्वासघात केलेला नाहीं. कांहीं दिवसांनीं त्यांनीं लग्नापुरते पैसे सांठविले कीं आम्हीं संसार थाटणार होतों. आमचें लग्न ठरलें आहे असें म्हणूं शकत नाहीं पण माझी तशी इच्छा होती. त्यांची माझी कित्येक महिन्यांची ओळख आहे.'

'बाई जरा थांब, तुझी भलतीच समजूत झालेली दिसते.' राजबहाद्दूर म्हणाला, 'मी तुला त्या तरुणाबद्दल कांहींहि माहिती देऊं शकत नाहीं. तो फक्त अर्धा तासच येथें होता आणि सकाळीं भारद्वाज शेठजीनीं जेव्हां मला टेलिफोन केला होता, तेव्हां पोलिसांकडून मला मुळींच त्रास होणार नाहीं असें त्यांनीं मला आश्वासन दिलें होतें.'

'आम्हीं आतांहि तुम्हांला त्रास देण्यासाठीं येथें आलों नाहीं.' आनंदराव उसासा सोडीत म्हणाले, 'ही केवळ खाजगी भेट आहे. ही मुलगी माझ्या अतिशयच मागें लागली, त्यामुळें तिच्या मनाच्या समाधानासाठीं मी तिला घेऊन आलों. आज सकाळीच ती माझ्या ऑफिसांत आली आणि--'

'मी तुमच्या ऑफिसांत आलें कारण मला तेथें यावेंच लागलें.' विजया उत्तेजित स्वरांत म्हणाली, 'तुमचे ते इन्स्पेक्टर, दयाळ चोर आहे आणि तो भारद्वाज शेठजींचे हिरे घेऊन पळाला असें मला सांगूं लागला. दयाळ चोर नाहीं आणि त्याला कुणी चोर म्हटलेलें मला खपणारहि नाहीं म्हणून मला सी. आय्. डी खात्याकडे धांव घेण्यापलीकडे दुसरें गत्यंतरच नव्हतें.

'जर दयाळला ते हिरे चोरावयाचे होते तर तो ते घेऊन या राजबहाद्दुरांकडे कां आला असता? दयाळनें ते हिरे तुम्हांला विकण्याचा अगदीं मनःपूर्वक प्रयत्न केला होता ना? जर त्यानें तसा प्रयत्न केला होता तर ते हिरे पळविण्याचा त्याचा डाव होता असें कसें म्हणतां येईल—'

'जरा थांब बाई' राजबहाद्दूर दचकून मध्येंच म्हणाला, 'आतां तूं तसा उल्लेख केल्यामुळें तें मला आठवलें. दयाळनें मी हिरे घ्यावे याबद्दल मुळीच उत्सुकता दाखविली नव्हती. भारद्वाजला ऑर्डर देण्याची मला कुठून दुर्बुद्धि सुचली कुणास ठाऊक! त्यांनीं पाठविलेले हिरे मला हवे तसे नव्हते. मी ते तसेच परत करण्याचें ठरविलें. दयाळ या घरांत पुरती पंचवीस मिनिटेंहि नसावा. तो येथून परत जातांना वाटेंतच फरारी झाला हे सिद्ध झालें नाहीं काय?'

'होय साहेब. तुम्हांला निष्कारण त्रास दिला त्याबद्दल माफी असावी' आनंदराव म्हणाले, 'जर या मुलीनें मला...दयाळच्या मनांत फरारी होण्याचा विचारच नव्हता असें आम्हांला पटवून देण्याची तिनें खटपट चालवली आहे.'

'मी तिला त्याबाबत कांहींच मदत करूं शकत नाहीं याबद्दल मला वाईट वाटतें.' राजबहाद्दूर म्हणाला, 'मला तर वाटतें...दयाळनेंच

ते हिरे चांगले नाहीत असें सुरुवातीलाच मला सुचविलें. याहिपेक्षां चांगल्या मालाची मागणी करा असे तोच मला म्हणाला. हा वाडा पहाताच चांगली मोठी ऑर्डर मिळविण्याचा त्याचा तो प्रयत्न आहे असे मला वाटलें. आज पूर्वीपेक्षां उंची हिरे घेऊन येण्याचें त्यानें कबूलहि केलें होतें. '

'पहा मुली, या सर्व माहितीवरून काय सिद्ध होतें ? या वाड्यांत प्रवेश करण्यापूर्वीच तुझ्या त्या मित्राच्या मनांत मूर्खपणाचे विचार घोळूं लागले होते. राजबहाद्दूर, मुलाखतीबद्दल मी तुमचा आभारी आहें. त्या दयाळनेंच हिरे घेऊं नये असें तुम्हांला सुचविलें ही गोष्ट महत्त्वाची आहे. मला तेवढाच पुरावा हवा होता. ' आनंदराव म्हणाले.

'तुम्हांला तसें म्हणतां येणार नाहीं. ' रागानें विजया म्हणाली, 'हिरे चोरण्याचा विचार दयाळांच्या मनाला कधीं शिवलाच नव्हता. त्यांना फक्त मोठी ऑर्डर मिळवायची होती. महाभारत स्टोअर्समधील सेल्समन्‌ना कमिशन देण्यांत येतें. जास्त कमिशन मिळविण्यासाठींच दयाळ धडपडत होते. तुम्हीं तर त्यांना चोर ठरवीत आहां. ते अगदीं प्रेमळ, दयाळू आणि सज्जन आहेत. कुणातरी बदमाषानें त्यांच्यावर वाटेंत हल्ला—'

'ठीक आहे मुली ! ' आनंदराव घाईघाईनें म्हणाले, 'त्याबद्दल आपण सावकाश विचार करूं. दयाळ येथें असतांना तरी त्याच्यावर कुणी हल्ला केला नव्हता अशी तुझी खात्री पटली आहे ना ? माफ करा शेठजी, ही मुलगी अस्वस्थ झाली आहे पण तुमची ही जागा फारच सुंदर आहे. मला वाटतें एक राजवाडाहि या तुमच्या अपूर्व वाड्याची बरोबरी करूं शकणार नाहीं. '

राजबहाद्दूर खूप झाला होता. आनंदरावांची त्याला उलट मदत झाली होती. एका जुनाट वाड्याचें आपण राजप्रासादांत रूपांतर केलें याचा त्याला नेहमींच अभिमान वाटत असे. त्या मूर्ख पोरीला आनंदरावांनीं तेथें आणलें हेंहि चांगलेंच झालें होतें. त्यामुळें दयाळ विरुद्धच्या पुराव्याला अधिक बळकटी आली होती. आनंदरावांचें समाधान झाल्यानंतर त्याला पोलिसांचा त्रास होण्याचा संभव नव्हता.

आनंदरावांना खूष करण्याचें राजबहाद्दुरानें ठरविलें होतें. तो म्हणाला, 'तुम्हांला हा वाडा पहावयाचा आहे काय ?'

'मला जरी तशी उत्सुकता वाटत असली तरी तुमचा वेळ महत्त्वाचा आहे. तुम्हांला त्रास देण्याची—'

'त्यांत कसला त्रास ? ' राजबहाद्दूर तत्परतेनें उभा रहात म्हणाला, 'तुम्हीं आमचा दिवाणखाना पाहिलाच आहे. पण त्याची खरी

शोभा पहाण्यासाठीं जिन्याच्या वरच्या पायरीवर उभें राहिलें पाहिजे. चला, या. मुलीलाहि बरोबर घ्या.'

दयाळबद्दलचे विचार त्यानें आतां मनांतून काढले होते. सी. आय्. डी. खात्याचें समाधान झाल्यानंतर त्याला विचार करण्याची जरुरीच नव्हती. विजया मनांत विचार करीत होती. तो लक्षाधीश फारसा धूर्त किंवा बुद्धिमान नाहीं असें तिचें मत बनलें होतें. तो सामान्यच माणूस होता. त्याच्याजवळ खूप पैसा होता व त्याच्या आजूबाजूचा थाट त्याला साजेसाच होता.

त्या वाड्यांत सोनें, रेशीम, मलमल, संगमरवरी दगड, रंग वगैरे सर्व भरपूर प्रमाणांत होतें पण त्यांत सौंदर्य नव्हतें किंवा कलाहि नव्हती. आनंदरावांसारख्या कलात्मक दृष्टि नसलेल्यांनाहि तेथला तो भपका पाहून वीटच आला होता. तें राजबहाद्दुराच्या श्रीमंतीचें प्रदर्शन होतें. पण खुद्द राजबहाद्दूर मात्र आपण ताजमहालपेक्षांहि एक श्रेष्ठ कलाकृति निर्माण केली आहे असें समजत होता. त्यानें पाहुण्यांना खोल्यांमागून खोल्या दाखविल्या.

'मी असला देखावा सिनेमांत किंवा नाटकांतहि पाहिला नव्हता.' विजया दहा वेळां म्हणाली. ती तो अपूर्व देखावा पहातांना देहभान विसरली होती. तिला तिच्या दयाळचा विसर पडावा यांत कांहींच नवल नव्हतें. 'राजबहाद्दूर, मला हा वाडा पहाण्याची संधि मिळेल काय ? ज्यानें वाड्याची ही रचना केली तो कारागीर खरोखरच असामान्य कलावंत असला पाहिजे.'

'मीच या वाड्याची सर्व योजना आंखली.' मधेंच राजबहाद्दूर अभिमानानें म्हणाला.

'तुम्हीं ?' विजया उद्गारली, 'तर मग तुम्ही श्रीमंत आहांत त्याप्रमाणेंच कलावंतहि आहांत ! लक्ष्मी आणि सरस्वती, या दोघींनींहि तुमच्या मस्तकावर वरदहस्त ठेवलेला दिसतो ! मी या तुमच्या वाड्याबद्दल वर्तमानपत्रांत वाचलें होतें. तुम्हीं भूलोकीं प्रत्यक्ष स्वर्गच निर्माण केला आहे. तुमच्या लायब्ररीमध्यें असलेल्या सर्व पुस्तकांना सोन्याची मुखपृष्ठें आहेत असें मी ऐकलें होतें--

राजबहाद्दुरानें खूष होऊन त्यांना आपल्या खास खोलींत नेलें. विजयेचा अभिनय पाहून आनंदराव मनांतून थक्क झाले होते. राजबहाद्दुराला खूष करून त्याला संशय येऊं नये म्हणून तिचा प्रयत्न आहे हें त्यांनीं ओळखलें होतें. त्यासाठींच तिनें त्याला आपली खास खोली दाखविण्यास भाग पाडलें होतें.

त्या खोलींत असलेलीं पुस्तकांचीं कपाटें पहातांना आनंदरावांची बरीच करमणूक झाली. राजबहाद्दुराला पुस्तकापेक्षा पुस्तकावरील वेष्टनांचेंच अधिक महत्त्व होतें. त्यांना प्रत्येक पुस्तकावर चढविलेलें कव्हर दाखविण्यांत स्वारी गढली होती. त्याच खोलींत आदल्या रात्रीं झुजारनें त्या वाड्याच्या मालकाची भेट घेतली होती आणि याच खोलींत कांहीं-तरी विशेष घडलें असावें असा तिचा तर्क होता. तिच्या तीक्ष्ण नजरेंतून कांहींच सुटलें नव्हतें. तेथल्या टेबलावर पडलेले दोन ओरखडेहि तिनें पाहिले होते.

वरच्या छतालाहि एक अगदीं लहानसा डाग होता. पिस्तुलाच्या गोळीचाच तो डाग असावा असें तिला वाटलें. तो डाग आणि टेबलावरील ते ओरखडे नाहींसे करण्याचा प्रयत्न केला होता पण तो विजयेच्या दृष्टीला फसवूं शकत नव्हता. कांहींच निश्चित पुरावा नव्हता पण विजया जेव्हां त्या खोलीतून बाहेर पडली तेव्हां कांहींतरी तातडीची उपाययोजना करण्याचा तिनें निर्णय घेतला होता व त्याबद्दल आनंदरावांना कांहींच दाद लागूं न देण्याचेंहि तिनें ठरविलें होतें.

पांच मिनिटांच्या राजबहाद्दुराच्या मुलाखतींत आणखीहि एक विशिष्ट गोष्ट विजयेच्या नजरेस पडली होती व तो आनंदरावांच्याहि लक्षांत आली असावी काय? याबद्दल ती विचार करीत होती पण शेवटीं ती गोष्ट त्यांच्या ध्यानांत आली नसावी अशीच तिची खात्री झाली.

राजबहाद्दुरानें आपल्या वाड्यांतील ऐश्वर्य दाखविल्यानंतर पाहुण्यांना बाहेर उभ्या असलेल्या जुनाट टॅक्सीपर्यंत पोहोंचविलें. टॅक्सी चालूं झाल्यानंतर तो पाहुण्यांना हात हालवून सलामी देतच पुन्हां वाड्यांत शिरला. आपली खास बैठकीची खोली त्या पाहुण्यांना दाखविण्याची त्याची इच्छा नव्हती. पण त्यानें तें टाळण्याचा प्रयत्न केला असता तर त्यांना कदाचित् संशय आला असता.

'काय झालें?' तो पुन्हां बैठकीच्या खोलींत येतांच वल्लभनें विचारलें.

'कांहीं समजत नाहीं...त्यांचें समाधान झालेलें दिसलें.'

'तो आनंदराव महाधूर्त आहे. त्याच्या बावळट चेहऱ्यावरून त्याची परीक्षा करूं नकोस.' वल्लभ म्हणाला.

'तूं मी सांगितल्याप्रमाणें दयाळचा बंदोबस्त केला होतास ना?' राजबहाद्दुरानें विचारलें. 'त्यानें त्या मुलीला खिडकींतून पाहिलें तर नसेल ना?'

'नाहीं मी त्याला एका खोलींत बंदच केलें होतें. पण तूं त्या आनंदरावाला बैठकीच्या खोलींत नेण्याचा मूर्खपणाच केलास--'

'त्यांना माझीं पुस्तकें पहावयाचीं होतीं.'

'तूं आणि तुझीं पुस्तकें!' अधिऱ्या स्वरांत वल्लभ म्हणाला, 'या तुझ्या बाह्य देखाव्याच्या नाटकी हौसेमुळें तूं एखाद्या दिवशीं आम्हां सर्वांनाच संकटांत लोटशील. इतर माणसांना वाडा दाखविणें आणि त्या आनंदरावांना दाखविणें यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे.'

त्या दोघांनाहि आनंदरावाबरोबर असलेल्या नाजुक आणि खेडवळ मुलीला महत्त्व देण्याची आवश्यकता वाटली नव्हती. पण तोच त्यांचा निष्काळजीपणा होता.

● ● ●

६

त्याच दिवशीं दुपारीं दयाळच्या प्रकरणाला आणखी निराळें वळण लागलें. इन्स्पेक्टर सौदागरांना ती गोष्ट इतकी महत्त्वाची वाटली कीं, त्यांनीं ताबडतोब सी. आय्. डी. ऑफिसांत जाऊन आनंदरावांची भेट घेतली.

'ठाण्याच्या खाडीवरील पुलाच्या एका वळचणींत दडविलेला झुंजारचा कोट एका शिपायाला सांपडला आहे त्या कोटाच्या एका खिशांत नाहीसे झालेले सर्व हिरे आहेत.' सौदागर म्हणाला.

जांभई देत आनंदरावानीं विचारलें, 'त्यानें ठाण्याच्या खाडींत आत्महत्या केली असें तुम्हांला वाटतें काय?'

'पण तुम्हाला ही गोष्ट चमत्कारिक वाटत नाहीं काय?' चिडून सौदागरांनीं उलट विचारलें, 'त्यानें आत्महत्या केली असें मी म्हणत नाहीं. झुंजारच्या बाबतींत तसा तर्क करणें मूर्खपणाचें ठरेल. पण त्यानें मुद्दामच नाहींसें होण्याचें ठरविलें आहे असें यावरून सिद्ध होत नाहीं काय? प्रथम त्यानें आपली हॅट व ती रिकामी बॅग टॅक्सींत ठेवली; नंतर आपणांला कोट व हिरे ठाण्याच्या पुलावर आढळतात, याचा अर्थ काय?'

'सौदागर, झुंजारसारखा महा बुद्धिमान माणूस असल्या मूर्ख-पणाच्या गोष्टी करील हें कसें शक्य आहे? जर दयाळ हा खरोखरच एखादा सामान्य सेलसमन् असता तर या सर्व गोष्टी अगदीं बरोबर

जुळून आल्या असत्या. पण दयाळ हा झुंजार आहे आणि झुंजार या असल्या मर्कटचेष्टा करणार नाहीं.' आनंदरावहि ठांसून म्हणाले.

'तर मग तुमचें काय मत आहे ?'

'मला मतच देतां येत नाहीं' आनंदराव म्हणाले, 'मला एकच गोष्ट स्पष्ट दिसते ती ही कीं, ज्याला दयाळ हा झुंजार आहे असें माहीत नाहीं अशा माणसानें अपघातानें किंवा पूर्वयोजनेनें दयाळ ऊर्फ झुंजारला कचाटयांत पकडलें असावें. त्या माणसाला आपल्या ताब्यांत झुंजार आहे ही कल्पना नसल्यामुळेंच त्यानें टॅक्सीमध्यें त्याची हॅट व त्या पुलाच्या कांठावर त्याचा कोट ठेवण्याचा मूर्खपणा केला आहे. दयाळनें आत्महत्या केली असें भासविण्याचा त्या माणसाचा हेतु आहे सौदागर, हें प्रकरण सामान्य नाहीं.'

सौदागरांना तेथेंच सोडून, त्यांच्याबरोबर अधिक कांहीं न बोलतां, आनंदरावांनीं आपली हॅट उचलली व ते घाईघाईनें आपल्या ऑफिसांतून बाहेर पडले. ते सरळ झुंजार महालांत गेले. विजया येथेंच आहे हें समजतांच त्यांना आनंद झाला. त्यांनीं नवीन घटना सांगितली.

'मला हें कांहीं आवडत नाहीं.' ते म्हणाले, 'झुंजार साहसी व धूर्त आहे हे तुझ्या प्रमाणेंच मलाहि माहीत आहे पण मला वाटते अखेरी शेराला सव्वाशेर भेटला असावा!'

विजया हंसून म्हणाली, 'तुमचें बोलणें ऐकून मला अगदीं मनःपूर्वक आनंद झाला आहे.'

'आनंद ?' आनंदरावांनीं विचारलें.

'हाय. त्यांचा कोट ठाण्याच्या पुलावर सांपडला यावरून अद्याप ते सुरक्षित आहेत हेंच सिद्ध होतें.' ती म्हणाली, 'ज्यांनीं त्यांना आपल्या ताब्यांत घेतलें आहे त्यांची ते जिवंत नाहींत असें भासविण्याची खटपट चालू आहे. त्याअर्थी अद्याप त्यांच्या जिवाला कांहीं अपाय झालेला नाहीं, हेंच स्पष्ट होतें. जर ते जिवंत नसते तर त्यांचा कोट तुम्हांला सांपडला नसता.'

'पण विजूताई, तूं काय बोलत आहेस हें तुझ्या लक्षांत आहे ना ? ज्यांनीं त्याला ताब्यांत घेतलें आहे, हें तुझें वाक्य राजबहाद्दुरनें झुंजारला अडकवून ठेवलें आहे असेंच सुचवितें. पण मला तें शक्य वाटत नाहीं. झुंजारनें त्याला आपल्या ताब्यांत घेतलें आहे असें तूं म्हटलें असतेंस तर तें योग्य होतें! तो राजबहाद्दूर सूर्याला पकडूं पहाणारा

मारुति थोडाच आहे! म्हणून मी धांवपळ करीत येथें आलों. त्या महा ढोंग्यानें कांहींतरी चावटपणा चालविला आहे.'

'मला वेडीला वाटत होतें कीं तुम्हांला त्यांच्याबद्दल चिंता वाटत आहे.'

'झुंजारबद्दल चिंता! त्याच्या या नवीन मूर्खपणामुळें त्याचे काय हाल होणार आहेत याबद्दल मी चिंता करीत आहें. तो कंबोडचा सुलतान, दुनियेंतील पाजी माणूस आहे हें मला मान्य आहे. त्याच्या सारख्यांच्या मागें झुंजारनें लागावें हें योग्यच ठरेल. पण राजबहाद्दूर हा एक श्रीमंत आणि प्रतिष्ठित माणूस आहे. त्याच्यासारख्या माणसाला झुंजारनें त्रास देणें—'

'जरा थांबा. तुम्हीं तर सर्व खिचडी बनविली आहे.' विजया मध्येंच म्हणाली, 'प्रथम तुम्हीं म्हणालांत कीं, त्यांना कुणी शेराला सव्वाशेर भेटला असावा. आणि आतां तुम्हीं म्हणतां ते राजबहाद्दुराच्या मागें लागले आहेत. या दोन परस्परविरोधी विधानांचा मेळ कसा बसवावा तें मला सांगा.'

'बरें बुवा, मी हरलों' आनंदराव म्हणाले, 'विजूताई, खरें सांगायचें तर मी अगदीं गोंधळून गेलों आहें. झुंजारनें नवीन भानगड केली कीं, मी नेहमींच भांबावून जातों.'

'आतां मला एक गोष्ट सांगा.' विजया म्हणाली, 'तुमचें त्या राजबहाद्दुराबद्दल काय मत आहे?'

'मला त्याच्याबद्दल विशेष कांहींच सांगतां येणार नाहीं. तो एक श्रीमंत माणूस शांतपणें व आरामानें आयुष्य घालविण्यासाठीं या प्रांतांत आला आहे. पण पैशाच्या जोरावर तो झुंजारचीहि कांहीं मात्रा चालूं देणार नाहीं. झुंजारनें प्रथम त्या सिंहासनाकडेच नजर वळविली होती. पण त्याला अचानक या राजबहाद्दुराच्या वाड्यांत घुसण्याची संधि मिळतांच त्यानें आपला पूर्वींचा बेत बदलला असें माझें मत आहे.'

'तें खरेंहि असेल.' विजया म्हणाली, 'राजबहाद्दूर...तुम्हीं तें पाहिलेंत काय?'

'काय पाहिलें?' आश्चर्यानें आनंदरावांनीं विचारलें.

'तें जाऊं द्या.' विजया म्हणाली, 'मात्र आज रात्रीं मी माझी हालचाल सुरू करणार आहें हें मी तुमच्या समाधानासाठीं म्हणून सांगतें. तुमची मला बरीच मदत झाली असती. पण मी जें बेकायदेशीर कृत्य करण्याचें ठरविलें आहे त्यांत तुम्हांला खेंचणें अयोग्य होईल. तुम्हीं माझ्यासाठीं एक गोष्ट करा. आजची सबंध रात्र तुम्हीं आपल्या ऑफि-

सांत टेलिफोन घेऊन बसलें पाहिजे.'

'म्हणजे—'

'म्हणजे तुमच्या मदतीची मला कदाचित् आवश्यकता भासेल आणि तशी वेळ आली तर मी बोलवीन त्या ठिकाणीं तुम्हीं त्वरेनें निघून आलें पाहिजे.'

'असल्या गूढ गोष्टी झुंजारकडून ऐकण्याची मला संवय आहे. पण विजूताई, तूंहि आपल्या त्या नाठाळ नवऱ्याचें अनुकरण करूं लागली आहेस. एकादा हातरुमाल विकत घेण्यासारखींच बेकायदेशीर कृत्यं करणें ही सोपी गोष्ट आहे असें तुला वाटतें काय? तुझें तें बेकायदेशीर कृत्य म्हणजे—'

'तर्क करणें हें प्रश्न विचारण्याइतकेंच वाईट आहे.' विजया मध्येंच म्हणाली, 'या प्रकरणाशीं तुमचा कांहींच संबंध नाहीं. त्यामुळें मी जें कांहीं म्हटलें तें विसरून जाण्यास तुम्हांला कांहींच हरकत नाहीं. मी तुमची चेष्टा केली. जर मला कांहीं बेकायदेशीर कृत्य करावयाचें असतें तर मी तुम्हांला कसें बोलविलें असतें? ते अडचणींत सांपडले आहेत आणि त्यांना बाहेरच्या मदतीची आवश्यकता आहे असा माझा तर्क आहे. राजबहाद्दुराची संपत्ति पळविण्यासाठीं आम्हीं तुमची मदत खात्रीनें मागितली नसती.'

'माझा या प्रकरणाशीं संबंध नाहीं काय?' रागानें आनंदरावांनीं विचारलें, 'जेथें झुंजार आहे तेथें मी आहेंच. आजच सकाळीं कमिशनर-साहेबांनीं मला बोलावणें पाठविलें होतें आणि त्यांनीं झुंजारच्या प्रकरणांत लक्ष घालण्यास मला बजविलें आहे. झुंजार कांहीं भलत्याच भानगडींत गढला आहे अशी माझी खात्री पटली आहे.

'पण झुंजारला मी कसा अडविणार? आणि तूंहि मला कांहीं मदत करीत नाहींस. उलट बेकायदेशीर कृत्याबद्दल उघड बोलतेस. मार्ग मोकळा व्हावा या हेतूनेंच तूं मला रात्रभर त्या टेलिफोनजवळ बसवून ठेवणार आहेस. सकाळ उजाडतांच झुंजारनें आपली अर्धी संपत्ति पळविली असें ओरडत तो राजबहाद्दूर माझ्या ऑफिसांत येईल.'

आनंदरावांचे तें बोलणें ऐकून विजया मोठ्यानें हंसली व म्हणाली, 'तुम्हांला अगदीं जीव तोडून खरें सांगितलें तरी तें तुम्हांला खोटेंच वाटतें त्याला काय करणार?'

'तुझा तो झुंजारहि मला खरेंच फसवीत असतो. तुला ही भानगड अगदीं सुरुवातीपासूनच माहीत असली पाहिजे. माझाच उपयोग करून तूं त्या वाड्यांत पैहाणी करण्यासाठीं आज सकाळीं तेथें गेली होतीस.'

त्या वाड्यांत ठिकठिकाणीं अनेक मौल्यवान वस्तु आहेत. तुझा तो झुंजार आणि तूं दोघांनींहि ती वाडा लुटण्याचें ठरविलें आहे.'

'या तुमच्या प्रशस्तिपत्राबद्दल मी तुमची फार आभारी आहें.' विजया हसून म्हणाली, 'त्यांच्याबद्दल मला मुळींच चिंता वाटत नाहीं. मी तेथें त्या वाड्याची पहाणी करण्यासाठींच गेलें होतें. त्या राजबहाद्दूरच्या नळाच्या सोन्याच्या तोटया, त्याच्या दाराला असलेल्या रत्नांच्या मुठी आणि त्याचे सोन्याचे पलंग आणि इतर वस्तु मी आज रात्रीं पळविणार आहें.'

'येथें येण्यास माझा मूर्खपणाच झाला.' आनंदराव उठून म्हणाले, 'विजूताई, तुला मी सावधगिरीचा इषारा देत आहें. तूं जें कांहीं करण्याचें योजिलें आहेस तें कृपा करून करूं नकोस. तुला अटक करण्यांत मला आनंद होईल असें तुला वाटतें काय? पण जर तूं आपल्या त्या धाडसी नवऱ्याचें अनुकरण करूं लागलीस तर मला माझें कर्तव्य करावें लागेल.'

'तुमच्याइतका बेउपकारी माणूस साऱ्या जगांत नसेल. तुम्हीं जो सी. आय्. डी. ऑफिसांत इतका नांवलौकिक मिळविला आहे त्याचें अर्धें श्रेय आम्हां दोघांना आहे हें तुम्हीं सहज विसरतां. पुढच्या आठवड्यांत तुम्हांला आणखी बढती मिळावी अशी मी व्यवस्था करीत आहें.'

'पुढच्या आठवड्यांत मी सुपरिंटेंडेंटचा हवालदार बनलों नाहीं म्हणजे मिळविली.' आनंदराव म्हणाले आणि रागानेंच तेथून निघून गेले. पण जातांना आपण आज रात्रभर आपल्या ऑफिसांतच बसणार आहों असेंहि त्यांनीं तिला रागानेंच सांगितलें. आज रात्रीं आपण आपल्या बायकोबरोबर सिनेमा पहावयास जाणार होतों; पण झुंजारचे विचार मनांत घोळत असतांना चित्रपटाकडे आपलें लक्ष लागणार नाहीं म्हणून आपण रात्रभर ऑफिसांत काम करीत बसणार आहोंत असा त्यांनीं खुलासा केला.

आनंदराव निघून जातांच विजयेच्या चर्येवरील बेपर्वाईची छटा आणि हास्य नाहींसें झालें. ती झुंजारच्या खोलींत गेली आणि त्यानें संग्रह करून ठेवलेलीं बदमाषांचीं चित्रें पाहूं लागली. त्यावेळीं नेताजी तिच्या आसपासच घुटमळत होता.

'नेताजी, खरें म्हटलें तर आनंदरावाचें त्या राजबहाद्दुराच्या कानाकडे लक्ष जायला हवें होतें. कदाचित् सी. आय्. डी. खात्याच्या संग्रहीं हे फोटो नसतील.'

'पण बाईसाहेब, आनंदराव येथें येण्यापूर्वी मालक संकटांत सांपडले आहेत व त्यांना सोडविण्यासाठीं आपण कांहीं खटपट केली पाहिजे असें तुम्हीं म्हणाला होतां ना ?' नेताजीनें उत्सुकतेनें विचारलें.

'होय नेताजी, तुला त्यांनीं पिस्तुल कसें वापरायचें तें शिकविलें आहेच. त्याशिवाय विजेच्या तारा कशा कापावयाच्या याचेंहि शिक्षण तूं त्यांच्या हाताखालीं घेतलें आहेस. आज रात्रीं तुला त्या दोन्ही गोष्टी कराव्या लागतील.'

'मालकांना मदत करण्यासाठीं वाटेल तें करण्याची माझी तयारी आहे.' नेताजी उत्साहानें म्हणाला.

'तुझ्या मालकाला मदतीची गरज आहे याबद्दल माझी खात्री नाहीं.' विजया विचार करीत म्हणाली, 'पण त्यांनीं एकट्यानींच जिवाची मौज करावी हें मला पसंत नाहीं. आज रात्रीं आपणाला पेण येथें जावयाचें आहे.'

'तुम्हीं मला तेथल्या प्रकाशासंबंधीं सांगितलें आहे.' नेताजी म्हणाला.

'ती प्रकाशाची योजना राजबहाद्दुरानें कांहीं हेतूनेंच आंखली असावी असें मला वाटतें. एका क्षणांत वाड्यांतले आणि वाड्याच्या आवारांतील दिवे मालविण्याचीहि त्यानें व्यवस्था केली आहे. कोणत्याहि गोष्टीला तोंड देण्याची त्यानें तयारी ठेविली आहे असें दिसतें, आज रात्रीं आपणाला त्या वाड्यांत गुप्तपणें प्रवेश करावयाचा आहे.'

'ते खरोखरच संकटांत सांपडले असावेत याबद्दल मला अद्यापीहि संशय वाटत आहे. गेल्या रात्रीं खरोखरच कांहीं होऊं नये तें घडलें, कीं स्वतःच्याच कांहीं कारणाकरितां ते तेथें राहिले आहेत, तें आपणाला शोधून काढावयाचें आहे. मला कानांची चांगली परीक्षा आहे.'

'ही कानांची काय भानगड आहे ?' नेताजीनें गोंधळून विचारलें, त्या राजबहाद्दुराच्या कानाला झालें आहे तरी काय ?'

'माणसांच्या कानांची गोष्ट फार वेगळी आहे.' विजया म्हणाली, 'माणूस आपल्या नाकाचा आकार बदलूं शकतो. डोळ्यांवर निरनिराळ्या रंगाच्या कांचांचे चष्मे चढवितां येतात. दुर्जयसिंहानें आपल्या चेहऱ्यामध्यें विलक्षण फरक घडवून आणला असला तरी त्याला आपल्या कानाचा आकार बदलतां आला नाहीं. कारण तसें करणें कुणालाहि शक्य नाहीं.'

'पण बाईसाहेब, तुम्हीं राजबहाद्दुराबद्दल बोलत होतां. पण हा दुर्जयसिंह कोण ?'

'दुर्जयसिंह कोण हें तुला ठाऊक नाहीं ? कदाचित् तें नांव तूं एकलें नसशील. तो अत्यंत घातकी आणि खुनी इसम आहे. ब्रह्मदेशामध्यें त्यानें अनेक अत्याचार करून तेथल्या सरकारलाहि सळो कीं पळो करून सोडलें होतें. मला वाटतें, त्या कानांवरूनच त्यांनींहि त्याला ओळखलें असावें. पण अद्याप माझी त्याबाबत खात्री पटलेली नाहीं.'

'लक्षाधीश राजबहाद्दुर आणि कुप्रसिद्ध डाकू दुर्जयसिंह ही एकच व्यक्ति आहे ?'

'होय नेताजी, चार वर्षांपूर्वीं ब्रह्मदेशामध्यें एका दुसऱ्या टोळीनें फकलेल्या बॉम्बच्या स्फोटांत दुर्जयसिंह ठार झाला अशी माझी समजूत होती त्याच्या मोटारीवर तो बॉम्ब फेंकण्यांत आला होता. त्या मोटारीचे आणि मोटारीच्या आंत असलेल्या माणसांचे शेंकडों तुकडे उडाले होते. त्यापैकींच कांहीं तुकडे एकत्र करून दुर्जयसिंह ठार झाला असें ब्रह्मदेशाच्या पोलिसांनीं जाहीर केलें होतें.

'त्यानें पोलिसांना लांच दिली होती कीं, त्यांची तशी खरोखरच प्रामाणिक समजूत झाली होती हें समजायला कांहींच मार्ग नाहीं. पण दुर्जयसिंह जिवंत आहे यांत मुळींच शंका नाहीं. कारण त्याचे कान मला पहावयास मिळाले आहेत. राजबहाद्दुर हाच दुर्जयसिंह आहे हें एकदां नक्की ठरल्यानंतर बाकीच्या गोष्टींचा सरळ खुलासा होतो.

'दुर्जयसिंहानें ब्रह्मदेशांत आणि हिंदुस्थानांत अनेक दरोडे घालून अफाट संपत्ति एकत्र केली होती कांहीं वर्षांपूर्वीं ब्रह्मदेश हा हिंदुस्थानचाच एक भाग होता हें तुला माहीत असेलच. त्याच्यासारख्या माणसाला आपल्या चर्येत बदल करणें मुळींच कठीण नाहीं. तशा प्रकारचा माणूस आपलं नांव व रहाणी बदलूं शकतो पण त्याला आपला स्वभाव बदलणें अशक्य आहे.

'दुर्जयसिंहाला आपल्या मोठेपणाचें प्रदर्शन करण्याची हौस होती. राजबहाद्दूर निराळ्या प्रकारें तसें प्रदर्शन करीत आहे. तो माणूस घातकी असला तरी विशेष हुषार नाहीं. चार वर्षांचा अवधि निघून गेल्यानंतर त्याला आपल्या मोठेपणाचें प्रदर्शन करण्याची इच्छा दाबतां आली नाहीं.

'त्या बॉम्बस्फोटामध्यें दुर्जय आणि त्याच्या टोळींतील पांच लोक ठार झाले आणि दोघे निसटले पण त्यांना गंभीर दुखापती झाल्या होत्या असें जाहीर झालें होतें त्या दोघांपैकीं एक खुद्द दुर्जयच असावा. त्या बॉम्बस्फोटामुळेंच त्याच्या चेहऱ्यामध्यें विलक्षण फरक पडला.

'अफाट संपत्ति जवळ असल्यामुळें त्याला आपल्या चेहऱ्यावरील

अपघाताच्या सर्व खुणा नाहींशा करतां आल्या. त्याचा चेहरा बदलला पण त्याच्या कानांचा आकार मात्र पूर्वींचाच राहिला. त्यानें आतां राज-बहाद्दूर असें नांव धारण केलें आहे. तो श्रीमंत आहे यांत मुळींच शंका नाहीं.'

'पण तुम्हीं केवळ कानावरून त्याला ओळखलेंत हें मोटें नवलच म्हणावयाचें.'

'त्याचें कारण दुर्जयाचे कानच विचित्र आकाराचे आहेत नेताजी, आनंदराव समजतात त्याप्रमाणें राजबहाद्दुर हा एक मूर्ख लक्षाधीश नसून तो अत्यंत घातकी आणि खुनी दुर्जय आहे हें आपण लक्षात घेतलें पाहिजे '

'तो जर तसा इसम असला तर त्याच्या वाड्यांत शिरण्यापूर्वीं तुम्हांला खूप विचार केला पाहिजे. नेताजी म्हणाला.

'नाहीं. फारसा विचार करण्याचें कारण नाहीं. तुझ्या मालकांचा कांहींतरी डाव असावा असें मला वाटतें आणि तसें जर असेल तर त्यांना आपल्या मदतीची गरज नसणार. पण मला अधूनमधून निराळाच संशय येतो. जर त्यांनीं आपणांला टेलिफोन केला असता किंवा इतर मार्गानें कांही कळविलें असतें तर ती गोष्ट निराळी होती.

'ज्या डॉक्टरांनीं दुर्जयाच्या चेहऱ्यावर शस्त्रक्रिया करून बॉम्ब-स्फोटांत झालेल्या जखमांच्या सर्व खाणाखुणा नाहींशा केल्या ते खरोखरच अतिशय हुषार असले पाहिजेत. त्यांनीं तो एक चमत्कारच घडवून आणला आहे. स्वरूप एकदम पालटल्यामुळेंच दुर्जयाला अगदीं उघडपणें रहाण्याची कल्पना सुचली असावी.

'पण त्याबद्दल अधिक तर्क करण्याची गरज नाहीं. राजबहाद्दूर हा निरुपद्रवी पण विक्षिप्त लक्षाधीश आहे अशा कल्पनेनें त्याला जवळून पहाण्याच्या कुतूहलानें तुझे मालक गेल्या रात्रीं तेथें गेले असावेत. पण, विक्षिप्त लक्षाधिशाऐवजीं एका मानवं सैतानाबरोबर आपली गांठ होत आहे असें त्यांनीं ओळखलें असावें. नेताजी, मुद्याचा तोच प्रश्न आहे. तुझ्या मालकांनीं राजबहाद्दूर हाच दुर्जय आहे हें ओळखलें असेल काय?'

• • •

७

दयाळ ऊर्फ झुंजारला आपली पत्नी राजबहाद्दुराच्या वाड्यावर चाल करून येण्याची तयारी करीत आहे याबद्दल मुळींच कल्पना नव्हती.

तो त्या बाबतींत अगदीं मजेंत होता.

त्या दिवशीं संध्याकाळीं त्यानें राजबहाद्दुराच्या सूचनेवरून त्या वाड्याच्या आवाराची पहाणी केली होती. अंधार पडल्यानंतर वाड्याच्या बाहेरील जागेंत पहारा करणें हें त्याचें मुख्य काम होतें. राजबहाद्दूर आतां आपल्या फौजेवर विश्वास टाकावयास तयार नव्हते.

राजबहाद्दुराला महाराज या नांवानें सर्वांनीं हांक मारली पाहिजे असा तेथला दंडक होता. त्याचबरोबर जे लोक होते ते जरी त्याच्या ब्रह्मदेशांतील टोळींतील नव्हते तरी तो खरा कोण आहे हें त्यांना माहीत होतें. त्या रात्रीं आवारांत सिगारेट ओढीत फिरतांना झुंजार विचार करीत होता. आपल्या नाहींसें होण्याबद्दल पोलिसांना काय सांगण्यांत आलें असावें ? बिचाऱ्या चमनलालाचें काय झालें असावें ?

राजबहाद्दूरला त्यानें कांहीं प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला होता पण त्यामुळें त्याचा कांहींच फायदा झाला नव्हता. आपणांला त्या वाड्यांत एक प्रकारें कैदच करण्यांत आलें आहे हें त्यानें ओळखलें होतें. त्याच्या कपाळावरील जखम आतां पूर्णपणें बरी झाली होती.

हा लपंडाव असाच चालूं ठेवावा कीं त्याचा शेवट करावा याबद्दल तो विचार करीत होता. जर आपण त्या आवारांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला तर आपणांला आडविण्यांत येईल हें त्याला माहीत होतें. पण त्याबद्दल तो फारशी फिकीर करीत नव्हता. त्याच्या इच्छेविरुद्ध त्याला कुणीहि अडवूं शकत नव्हतें.

इतर गोष्टींबरोबरच त्याला विजयेची चिंता वाटत होती. त्या जुनाट टॅक्सींतून तेथें आलेल्या विजयेला आणि आनंदरावांना त्यानें खिडकींतून पाहिलें होतें. आनंदराव तेथें यावेत याबद्दल त्याला आश्चर्य वाटलें नव्हतें. पण विजया त्यांच्याबरोबर असल्यामुळें मात्र तो बराच विचारांत पडला होता.

'ती जर माझ्याबद्दल चिंता करीत असली तर तिला वेडीच म्हटलें पाहिजे !' तो कांहींसा चिडून स्वतःशींच म्हणाला, 'पण ती कांहींतरी बतावणीहि करीत होती यांत शंका नाहीं. पण तसें करण्याची तिला कां आवश्यकता भासावी ?'

राजबहाद्दूर त्या दोघां पाहुण्यांबद्दल कांहींतरी बोलेल अशी त्याची अपेक्षा होती पण तसें घडलें नव्हतें. अंधार पडण्यास सुरुवात झाली होती आणि झुंजार बाहेर पहिली फेरी मारण्यासाठीं निघाला होता. तो मुद्दामच त्या बागेंतून बाहेर पडून दूर अंतरावर असलेल्या त्या प्रवेशद्वाराजवळ गेला.

बाहेरच्या बाजूप्रमाणें आंतल्या बाजूलाहि दोन पहारेकरी उभे होते. ते दोघे त्याला दुरून पाहूनच अस्वस्थ झाले होते. तो त्या वाड्यांत नवीनच इसम होता आणि जरी राजबहादुरानें नवीन माणसाबद्दल चिंता करण्याचें कारण नाहीं असें सर्वांना सांगितलें होतें तरी तो कशाप्रकारचा इसम असावा याबद्दल ते कांहींच कल्पना करूं शकत नव्हते.

गेल्या रात्रीं जे दोघे बाहेरच्या बाजूला पहारा करीत होते तेच दोघे आज रात्रीं आंतल्या बाजूला आहेत हें झुंजारनें दुरूनच ओळखलें. आदल्या रात्रीं ज्यानें त्याला प्रश्न विचारले होते त्याच्याकडे वळून त्यानें हंसत विचारलें, 'काय सेनापतिसाहेब, आजहि आपण पहाऱ्यावर आहांतच कां? तुम्हीं कधींच विश्रांति घेत नाहीं काय?'

'मी एका तासापूर्वींच कामावर हजर झालों.' तो इसम म्हणाला, 'तुमची प्रकृति बरी आहे हें पाहून मला आनंद होतो. गेल्या रात्रींच्या त्या प्रकारानंतर आज तुम्हीं स्वतःच्या पायानं चालूं शकतां हें तुमचें सुदैवच म्हणावयाचें.'

'मी जन्मतःच सुदैवी आहें. तुम्हीं कृपा करून हें दार उघडा. मला कांहीं सिगारेटस् हव्या आहेत कोणत्या दुकानीं मी जाऊं तें सांगा.'

'दयाळ, तुम्हांला जें कांहीं हवं असेल तें मागविण्याची व्यवस्था करण्यांत येईल.' तो पहारेकरी म्हणाला.

'माझें डोकें जरी नादुरुस्त झालें असलें तरी पाय चांगले शाबूत आहेत.' झुंजार हंसून म्हणाला, 'हें नाटक असेंच चालू ठेवण्याची कांहीं आवश्यकता नाहीं.'

'हें नाटक असो वा नसो, तुम्हांला बाहेर जाऊं द्यावयाचें नाहीं असा आम्हांला हुकूम आहे. तुम्हीं माझ्यावर रागावूं नका. मी माझें कर्तव्य करीत आहें.'

झुंजार हंसला आणि त्या माणसाच्या समोरूनच दाराकडे सरकला. त्यानें दाराच्या कडीला हात लावला नाहीं तोंच त्याच्या पाठीला कांहीं कठीण वस्तु टेकविण्यांत आली. 'दयाळराव, तुम्हीं बाहेर जाऊं नका. नाहींतर मला पिस्तुल झाडावें लागेल.'

'अरेच्चा! हा काय प्रकार आहे? तुम्हीं माझी चेष्टा करीत आहां असें मला वाटत होतें.'

'नाहीं, मी चेष्टा करीत नाहीं आणि तुम्हांला आतां माझ्याबरोबर वाड्यांत आलें पाहिजे.'

झुंजारनें अगदीं योग्य बतावणी केली. पाठीला पिस्तुल टेकून त्या

पहारेकऱ्यानें जेव्हां त्याला वाड्यांतील दिवाणखान्यांत आणलें तेव्हां तो अतिशय अस्वस्थ झालेला दिसत होता. वल्लभ त्याचवेळीं जिना उतरून खालीं येत होता. आतां त्याच्या अंगावर प्रधानजीचा भरजरी पोषाख नव्हता. त्यानें आतां ऐटबाज इंग्रजी पद्धतीचा पेहराव केला होता.

'हें काय आहे?' त्यानें त्या पहारेकऱ्याला जोरानें विचारलें.

त्याला सलाम करीत तो पहारेकरी म्हणाला, 'हे दयाळ वाड्याबाहेर जाण्याचा प्रयत्न करीत होते म्हणून मी त्यांना येथें आणलें आहे.'

'ठीक आहे, त्यांना येथेंच सोडून तूं निघून जा.' वल्लभ म्हणाला.

वल्लभबरोबर राजबहाद्दुराच्या खास खोलीकडे जातांना झुंजार म्हणाला, 'हा काय प्रकार आहे तें मला समजत नाहीं. हें घर मोठेंच विचित्र दिसतें.'

'तुला समजत नाहींत अशा अनेक गोष्टी येथें आहेत आणि हें घरहि विचित्रच आहे. लवकरच तुला येथें कसें वागलें पाहिजे तें समजेल.'

बैठकीच्या खोलींत गेल्यानंतर तेथें चिरूट ओढीत बसलेल्या राजबहाद्दुराला उद्देशून वल्लभानें म्हटलें, 'या माणसानें त्रास देण्यास सुरुवात केली आहे. याला नीट समज देणें बरें असें मला वाटतें.'

वल्लभाचें बोलणें ऐकून घेतल्यानंतर राजबहाद्दूर म्हणाला, 'असें कांहींतरी घडेल असें मला वाटतच होतें आणि तें लवकरच घडलें हें चांगलें झालें.'

'पण महाराज, मी नोकरी पत्करली याचा अर्थ मी कैदी झालों असा होत नाहीं. हा काय प्रकार आहे तें मला समजतच नाहीं.'

'तुला कामावर ठेवण्यापूर्वीं मी माझ्या अटी सांगितल्या होत्या आणि त्या तूं मान्य केल्या होत्या.' राजबहाद्दूर म्हणाला, 'दयाळ, तुझा बाहेर जाण्याचा मार्ग बंद झाला आहे. तूं आतां येथेंच राहिलें पाहिजेस.'

'महिना तीन हजाराची नोकरी नाकारण्याइतका मी मूर्ख नाहीं पण —'

'दयाळ, त्याबद्दल पुन्हां चर्चा करण्याची कांहींच आवश्यकता नाहीं. पोलिसांच्या आणि वर्तमानपत्राच्या दृष्टीनें तूं आतां जिवंतच नाहींस. तुझें प्रेत कुठेंतरी समुद्रावर तरंगत असेल किंवा तें एखाद्या प्रचंड माशाच्या उदरांत गडप झालें असेल.'

'हें तुमचें बोलणें अगदींच विचित्र आहे.' झुंजार चांचरत म्हणाला.

'तसें तुला वाटतें.' हंसत राजबहाद्दुर म्हणाला, 'जगाला फसविण्याची आम्हीं मुद्दाम तशी व्यवस्था केली. घाबरूं नकोस. मी तुझा मित्रच आहें. गेल्या रात्रीं तूं माझा प्राण वांचविला आहेस आणि पुढेंहि मला तुझी गरज लागेल.'

'पण माझें प्रेत समुद्राच्या पाण्यावर तरंगत असणार असें जें तुम्हीं म्हणालांत त्याचा अर्थ काय?'

'त्याचा अर्थ समजून घेण्याची तुला काय गरज आहे? तुला जगांत कुणीहि नातेवाईक नाहींत असें तूं मला सांगितलें नाहींस काय? तुला भरपूर पगार मिळेल, खायला प्यायला मिळेल आणि राजासारखें येथें सुखांत रहातां येईल. तुझें कामहि विशेष त्रासाचें नाहीं. आणखी तुला काय हवें आहे?'

त्यानंतर राजबहाद्दुरानें दयाळला अगदीं स्पष्ट शब्दांत परिस्थितीची जाणीव करून दिली आणि तो म्हणाला, 'या आवाराच्या बाहेर पडतांच तुला पोलीस पकडतील हें लक्षांत ठेव. तूं ते हिरे घेऊन फरारी झाला आहेस अशी त्यांची समजूत आहे आणि त्यानीं तुला पकडण्यासाठीं वॉरंटहि सोडलें आहे. या सर्व अडचणीतून मार्ग काढण्यासाठीं तूं आत्महत्या केली आहेस असें भासविण्याची मी व्यवस्था केली आहे. परिस्थितीच अशी आहे कीं तुला येथून बाहेरच जातां येत नाहीं.'

एखाद्या मोंगल बादशहानें आपल्या गुलामाला रजा द्यावी त्याप्रमाणें राजबहाद्दूरनें झुंजारला बाहेर काढलें. वल्लभानें त्याला पश्चात्ताप करण्याची आणि शांत होण्याची संधि मिळावी म्हणून त्याचा हात धरूनच त्याला देण्यांत आलेल्या त्याच्या खोलीकडे नेलें.

त्या खोलीचें दार बंद होतांच झुंजारनें स्वत:शींच हंसण्यास सुरुवात केली. माहिती मिळविण्याचा त्याचा उद्देश साध्य झाला होता. सकाळीं तेथें आनंदराव कां आले होते आणि विजया कां बतावणी करीत होती हें त्याला आतां समजलें होतें.

सिगारेट पेटविल्यानंर त्याचे विचार राजबहाद्दुराकडे वळले. स्वत:ला हुशार समजणारा तो माणूस अत्यंत मूर्ख होता. त्यानें मुद्दामच तो सर्व पुरावा त्या चामड्याच्या बॅगेवरील हातांच्या ठशासहित मार्गे राहूं दिला होता. दयाळ खरा कोण हें ओळखून काढण्यास सी. आय्. डी. खात्याला एक तासहि लागला नसेल ...

अनेक गोष्टी आतां स्पष्ट झाल्या होत्या. राजबहाद्दुराला आनंदरावांनीं दयाळ हा झुंजार आहे हें कळविलें नाहीं हेंहि स्पष्टच होतें. कांहीं कारणानें आनंदरावांनीं ती गोष्ट मुद्दामच लपविली होती. त्याचें कारणहि त्याला ओळखतां येत होतें. विजयेनेंच तसें करण्यास त्यांना भाग पाडलें आणि विजया त्याला सोडविण्याचा प्रयत्न करीत होती.

'मूर्ख कुठली !' तो स्वतःशींच म्हणाला, 'माझ्यावर तिचा विश्वास नाहीं काय ? उलट तिच्या मूर्खपणामुळें घोटाळा मात्र होईल.'

त्यानें कपाळावर आंठ्या चढविल्या. तो दयाळ कां बनला होता हें आतां गुप्त राहिलें नव्हतें. कंबोडच्या सुलतानाचे सिंहासन पळविण्याचा त्याचा डाव होता हें आनंदरावांनीं अवघ्या दहा क्षणांत ओळखलें असावें अशी त्याची खात्री होती. यापुढें सावध झालेलें सी. आय्. डी. खातें त्या सिंहासनाचें डोळ्यांत तेल घालून संरक्षण करील यांत मुळींच शंका नव्हती.

पण तें सिंहासन जरी त्याच्या हातांतून निसटलें होतें तरी आतां या अकस्मात उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळेंच लूट मिळविण्याचा एक नवीन मार्ग त्याला दाखविला होता व त्यानंतर फुरसतीनें त्याला त्या सिंहासनाकडे लक्ष देणें शक्य होतें.

त्यानंतर त्यानें मुद्दामच आपण नाराज झालों आहोंत असें राजबहाद्दुराला भासविलें. राजबहाद्दुरानें त्याला आपल्या भेटीला बोलाविलें होतें.

'तरुण माणसा, असा नाराज होऊं नकोस.' राजबहाद्दूर त्याच्याकडे पाहून म्हणाला, 'आजची रात्र बरीच अंधारी आहे. तूं आतां अंगावर एक जाड कोट चढवून बाहेरच्या बागेंत पहारा कर. गेल्या रात्रीची पुन्हां पुनरावृत्ति होतां कामा नये. बाहेरचे भुरटे चोर खुशाल माझ्या बैठकीच्या खोलींत घुसतात--'

'ते भुरटे चोर नव्हते.' झुंजार म्हणाला, 'ते निर्ढावलेले खुनी होते. जर मी दहा क्षणच तेथें उशिरां आलों असतों तर तुम्हीं खचित अल्लाच्या घरीं निघून गेलां असतां.'

'तें खरें आहे आणि तें मी विसरणारहि नाहीं. तूं माझ्याशीं चांगल्याप्रकारें वाग आणि मीहि तुझ्याबरोबर चांगल्याप्रकारें वागेन.'

'तुम्हीं मालकच आहांत !' नाराजीनें झुंजार म्हणाला.

खिन्न मुद्रेनेंच झुंजार पहाऱ्यासाठीं बाहेर निघून गेला. आदल्या रात्रीं त्यानेंच पकडलेल्या त्या दोघां बदमाषांचें काय झालें असावें याचा तो विचार करीत होता. त्यांना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आलें

नाहीं हें तर अगदीं स्पष्टच होतें. राजबहाद्दूर जरी हंसत बोलत असला आणि मूर्ख असला तरी तो खुनी आहे हें त्यानें ओळखलें होतें.

ती रात्र अतिशयच अंधारी होती. पण विजयेला आणि नेताजीला तसल्या अंधारांत वावरण्याची चांगली संवय होती. विजयेनें त्या वाड्या-पासून बऱ्याच अंतरावर मोटार उभी केली होती. त्या भिंतीवर चढून विजयेनें आणि नेताजीनें पहाणी केली. त्यांना तो प्रकाशित असलेला वाडा आणि त्या वाड्याच्या दोन बुरुजांवरील विराट मशाली स्पष्ट दिसल्या.

'आवारांत तर सर्वत्र अगदीं शुकशुकाट दिसतो. आपण पलीकडच्या बाजूला उडी घ्यावयाची काय ?' नेताजीनें विचारलें.

'नाहीं नेताजी,' ती त्याच्या कानांत म्हणाली, 'जरी येथें शुकशुकाट दिसत असला तरी तेथें बरींच हत्यारबंद माणसें बसलीं असावींत असा माझा तर्क आहे. आपण वाड्यापासून शंभर यार्डांवर जाण्याच्या आधींच त्यांच्या दृष्टीस पडण्याची भीति आहे.'

'तसें जर आहे तर आपण वाड्यांत कसें जावयाचें ?'

'त्यासाठींच तर तुला हीं हत्यारें बरोबर आणण्यास मी सांगितलें आहे. तुला मी सहल करण्यासाठीं बरोबर आणलें आहे असें वाटतें कीं काय ?'

तिनें पुन्हां खालीं उडी घेतली आणि ती नेताजीला बरोबर घेऊन वाड्यापासून बऱ्याच अंतरावर असलेल्या एका लोखंडी खांबा-जवळ गेली. त्या खांबावरून विजेच्या दोन तारा वाड्याकडे नेण्यांत आल्या होत्या.

'नेताजी, त्या वाड्यावर प्रकाश पाडण्यासाठीं दुर्जयानें जी योजना आंखली आहे तिला विजेचा पुरवठा झाला नाहीं तर ती कोलमडून पडेल आणि तेंच काम तुला करावयाचें आहे. वाड्याला होणारा विजेचा पुरवठा बंद पडल्यानंतर तेथें बराच गोंधळ उडेल आणि तेवढ्या अवधींत आपणाला आपलें काम साधतां येईल.'

'म्हणून तुम्हीं हे रबरी हातमोजे आणि तारा कापण्याची कात्री मला बरोबर घ्यावयास सांगितली काय ? बाईसाहेब, तुम्हीं तर अगदीं जय्यत तयारी ठेविली होती. मी या खांबावर चढूं काय ?'

'होय. पण अगदीं जपून चढ. विजेचा धक्का लागून त्या खांबाला कायमचाच चिकटून राहूं नकोस. सकाळींच मी हा खांब पाहून ठेवला होता. तूं तें काम अशा प्रकारें कर कीं, कुठें तार कापण्यांत आली आहे हें सहजासहजीं कुणालाहि शोधून काढतां येणार नाहीं.'

'तें सर्व तुम्हीं माझ्यावर सोंपवा.' नेताजी म्हणाला.

नेताजी आतां झुंजारच्या तालमींत चांगलाच तयार झाला होता. विजेचा पुरवठा बंद पाडणें ही गोष्ट त्याला आतां पोरखेळाइतकीच सोपी वाटत होती. माकडाप्रमाणें तो त्या खांबावर चढला आणि त्यानें आपल्या कामाला सुरुवात केली.

तार तोडल्याबरोबर विजेचा पुरवठा बंद पडला असता. पण नेताजीला तसें साधें काम करावयाचें नव्हतें. तोडलेली तार खालीं लोंबत राहिली असती आणि ती शोध करणाऱ्यांच्या ताबडतोब दृष्टीस पडली असती. त्यासाठीं त्यानें प्रथम आपल्या खिशातून एक तारेचा तुकडा बाहेर काढून जेथें तार कापावयाची होती तेथेंच दोहोंबाजूला तो बेमालूमपणें सांधून टाकला व नंतर ती तार कापली. त्याबरोबर वाड्यांतील विजेचा पुरवठा बंद पडला व कापलेली तार जागच्याजागींच राहिली.

तो खालीं उतरल्यानंतर विजया म्हणाली, 'शाबास नेताजी, तूं आपलें काम अगदीं चोख बजाविलें आहेस. आतां आपण आपली पुढली कामगिरी पार पाडूं.'

धांवतच ते भिंतीकडे गेले आणि भिंतीवरून उड्या मारून ते पलीकडच्या बाजूला गेले. वाड्याच्या त्या विस्तीर्ण आवारांत आतां संपूर्ण अंधःकार पसरला होता. निरनिराळ्या दिशेनें बरेच आवाज होत होते. अचानक अंधार पडल्यामुळें राजबहाद्दुराची फौज गोंधळली होती.

ते झुडपाआड दडून रहात रहात, कानोसा घेत, हळूहळू पुढं सरकत होते. अखेरीस ते वाड्याच्या सभोंवतालीं असलेल्या बागेजवळ पोहोंचले. ती बाग ओलांडून तेथल्या हिरवळीवरून चालत वाड्यांत प्रवेश करण्याचा विजयेचा विचार होता. दूर बरेच आवाज होत होते. पण त्यांच्या जवळपास संपूर्ण शांतता होती.

ते पुढें सरकणार होते तोंच अंधारांतून कुणीतरी चित्त्याप्रमाणें त्यांच्यावर उडी घेतली. त्या दोघांचेहि हात घट्ट पकडले आणि ओळखीच्या स्वरांत कुणी तरी ओरडून म्हणाले, 'शेंदाड शिपायांनों, या बाजूला या आणि हे दोन कैदी आपल्या ताब्यांत घ्या.'

'मालक!' नेताजी दचकून म्हणाला.

'तुम्हीं तर कमालच केलीत!' विजया रागानें म्हणाली, 'होळी अद्याप दूर असतांना इतकी मोठ्यानें बोंब मारण्याची काय जरूरी होती?'

'कोण विजू!' झुंजार दचकून म्हणाला, 'आणि नेताजी, तूंहि

आहेस कां रे ? मला वाटलें होतें कीं आमच्या राजबहाद्दुराचे प्राण घेण्यासाठीं कुणीतरी दोघे बदमाष वाड्यांत शिरण्याचा प्रयत्न करीत आहेत.'

'आतां तरी आमचे हात सोडा.' विजया रागानें म्हणाली, 'आम्हीं तुम्हांला सोडवायला आलों आणि तुम्हींच आम्हांला पकडतां ! तुम्हांला सोडविण्याचा प्रयत्न करण्याची कांहींच आवश्यकता नाहीं असें आम्हांला वाटत होतें. तुम्हीं जिवंत आहांत एवढें तरी आम्हांला समजलें.'

'विजू, मी चुकून मोठ्यानें ओरडलों त्यामुळें भलताच घोटाळा झाला आहे. मला तुम्हांला आतां सोडतां येणार नाहीं. चारी बाजूनें त्या राजबहाद्दुराचे शेंदाड शिपाई इकडे धांवत येत आहेत. राजबहाद्दूर हें त्याचें खरें नांव नाहीं —'

'त्याचें खरें नांव दुर्जय आहे हें मलाहि माहीत आहे.' विजया म्हणाली, 'पण आतां पुढें काय ?'

'पुढें तुम्हांला नाटक करावें लागणार !' झुंजार म्हणाला, 'तुम्हांला जर मी सोडलें असतें तर तुम्हीं खचित त्यांच्या गोळ्यांना बळी पडला असतां.' नंतर तो आपला आवाज उंचावून म्हणाला, 'अरे चोरांनो, तुम्हीं माझ्या हातांतून सुटणार काय ? आतां आमचे शेंदाड शिपाई येथें येतील.'

कित्येक शिपाई धांपा टाकीत तेथें येऊन दाखल झाले होते आणि त्यापैकीं कित्येकांच्या हातांत टॉर्चहि होत्या.

'अरेच्चा ! दोघांपकीं एक बाई आहे —'

'काय !' झुंजार म्हणाला, 'अंधारामुळें तें मला समजलेंच नाहीं. तरीच मी मनांत म्हणत होतों कीं या दोघांपैकीं एक माणूस बायकां-प्रमाणें मला नखानें ओरबाडतो कां आणि चावतो कां ?'

'अरेच्चा !' दुसरा म्हणाला, 'हीच मुलगी सकाळीं त्या सी. आय्. डी. अधिकाऱ्याबरोबर येथें आली होती. मुंबईच्या पोलीस खात्यांत बायकाहि आहेत हें मला माहीत नव्हतें.'

विजया त्या अचानक घडलेल्या घटनांमुळें खूषच झाली होती. राजबहाद्दुरांच्या इतर शरीरसंरक्षकांना आपण दाद लागूं दिली नव्हती आणि झुंजार पहाऱ्यावर नसता तर आपण वाड्यांत सहजीं प्रवेश करूं शकलों असतों याबद्दल तिला अभिमान वाटत होता. दुर्जयानेंहि त्या-बद्दल आपल्या नवीन शरीरसंरक्षकाला शाबासकी दिली.

वाड्याच्या पायऱ्या उतरून घाईघाईनें खालीं उतरतांना तो ओरडून म्हणाला, 'मूर्खांनों, तुम्हां सर्वांची नजर चुकवून पुन्हां दोघे

बदमाष माझ्या वाड्यांत शिरत होते. फक्त दयाळच त्यांना पकडूं शकला. शाबास दयाळ, तूं आपली चाकरी अगदीं योग्य प्रकारें बजावीत आहेस.'

'पण महाराज, बदमाषांपासून आपलें संरक्षक करण्याचें काम तुम्हीं माझ्यावर सोंपविलें होतें. पण आतां मी जीं दोन माणसें पकडलीं आहेत ती बदमाष तर नाहींतच पण त्यांच्यांत एक स्त्रीहि आहे.'

'स्त्री!' दचकून दुर्जय म्हणाला, आणि त्यानें आपल्या हातांतील प्रखर टॉर्चचा प्रकाश विजयेच्या तोंडावर सोडला.

'इथें कांहींतरी भानगड दिसते!' दुर्जय झुंजार—विजयेकडे आळी-पाळीनें पहात म्हणाला, 'दयाळ, तूं या मुलीला ओळखलें नाहींस? ती आज सकाळींच येथें आली होती. तूं तिचा मित्र आहेस असें ती म्हणाली होती.'

'मी या वाड्यांत प्रवेश मिळविण्यासाठीं तसें खोटेंच सांगितलें होतें.' विजया म्हणाली, 'आतां तो फार्स चालूं ठेवण्याची कांहीं गरज नाहीं. राजबहाद्दूर, माझें नांव जयंती असें असून मी एका वर्तमान-पत्राची वार्ताहर आहें. बातमी मिळविण्यासाठीं मी तसें नाटक केलें. त्या-बद्दल तुम्हीं मला खचित दोष देणार नाहीं.'

झुंजारलाहि तिच्या हजरजबाबीपणाचें कौतुक वाटलें. तिनें अगदीं ऐन क्षणाला बेमालूम उत्तर दिलें होतें.

'तूं वार्ताहर आहेस काय?' दुर्जय म्हणाला, 'आणि हा तुझ्या-बरोबरचा माणूस कोण?'

'तो माझा ड्रायव्हर आहे. तो नेहमींच मला मदत करतो. राज-बहाद्दूर, जर तुमच्या भाडोत्री ठगांनीं मला त्रास दिला तर वर्तमान-पत्रांतून त्या गोष्टीचा इतका गाजावाजा होईल कीं, आभाळच आपल्या मस्तकावर कोसळलें असें तुम्हांला वाटेल.'

'ते आनंदराव कुठें आहेत? त्यांनाहि हें माहीत आहे काय?'

'सकाळीं या जागेंत प्रवेश मिळविण्यापुरताच मी आनंदरावांचा उपयोग केला होता. राजाबहाद्दूर, तुला प्रत्यक्ष पहाण्याचा माझा हेतु होता. तूं दुर्जय आहेस हें मला माहीत आहे. तुझा डाव संपला. आतां तूं काय करणार आहेस?'

दुर्जयाच्या तोंडून हिंस्त्रश्वापदाप्रमाणें गुरगुरणें बाहेर पडलें. विज-येचें धैर्य पाहून झुंजार अतिशय खूष झाला होता. आपण संकटांत आहों हें तिनें ओळखलें होतें. राजबहाद्दूरहि आतां माघार घेऊं शकत नाहीं हें तिनें ओळखलें होतें. झुंजारबरोबर आपला संबंध जोडण्यांत येऊं नये म्हणूनच तिनें राजबहाद्दुराला तें आव्हान दिलें होतें आणि तिच्या

शब्दप्रहारामुळें तो खरोखरच गांगरला होता.

'अरे देवा ! पण तें तुला कसें समजलें ?'

'तूं आपण दुर्जय आहों हें कबूल केलेंस याबद्दल मला आनंद होतो. मी केवळ माझा तर्क बोलून दाखविला होता, आणि माझा तर्क बरोबर होता हें तूंच मला आतां सांगितलेंस. मी येथें येण्यापूर्वी जर आनंदरावांना सूचना दिली असती तर किती बहार झाली असती ? या वेळेपावेतों सी. आय्. डी. च्या माणसांनीं या वाड्याला वेढा दिला असता. एखाद्या दिवशीं तरी अति उत्साहाच्या भरांत तुझ्या हातून घोडचूक होईल असें आमचे संपादक मला नेहमीं बजावीत होते.'

'त्यांना आंत घेऊन य.' दुर्जय जोरानें म्हणाला.

तो रागावला होता आणि घाबरलाहि होता. आपल्या बैठकीच्या खोलींत जाईपर्यंत तो बराच शांत झाला. विजयेच्या शेवटच्या वाक्या-बद्दल त्याला विचार करण्यास सवड मिळाली होती.

'बोला बाईसाहेब.' तो म्हणाला, 'तुम्हीं स्वतःला हुशार समजतां नाहीं ?'

'मी हुशार तर आहेंच. पण मी आज रात्रीचा माझा डाव जर पोलिसांना सांगितला असता तर अधिक हुशार ठरलें असतें.'

'हें पहा—' झुंजारनें चांचरत बोलण्यास सुरुवात केली.

'तू गप्प रहा !' ओरडून दुर्जय म्हणाला.

'पण मी म्हणतों—'

'वल्लभ, या माणसाचें तोंड बंद कर नाहीं तर त्यानें माझा प्राण वांचविला होता ही गोष्टहि मला विसरावी लागेल.' आणि झुंजार आपण घाबरलों असें दाखवीत मागें सरला. दुर्जय पुन्हां विजयेला उद्देशून म्हणाला, 'तूं एक धूर्त वार्ताहर आहेस, हें सर्व खरें. पण आज रात्रीं तूं येथें येण्यांत भलताच मूर्खपणा केला आहेस.'

'मला तुझ्या बोलण्याचें हंसूं येतें.' विजया म्हणाली, 'योग्य सावधगिरी बाळगिल्याशिवाय मी या उंदराच्या घरट्यांत शिरण्याचा प्रयत्न करीन असें तुला वाटतें काय ? तूं दिसतोस तसा नाहींस असें मी आनंदरावांना सांगितलें होतें म्हणूनच त्यांनीं मला आपल्याबरोबर येथें आणलें होतें. तूं दुर्जय आहेस हें त्यांनाहि माहीत आहे.'

'साफ खोटें !' रागानें दुर्जय म्हणाला. त्याचे डोळे आतां लाल गुंजेप्रमाणें दिसत होते. 'तूं मला फसविण्याचा प्रयत्न करतेस. तूं आनंदरावांना कांहींहि सांगितलें नाहींस. पोलिसांच्या मदतीशिवाय जगाला

थक्क करून सोडणारी माहिती मिळविण्याचा तूं प्रयत्न केलास. मी खरा कोण आहें हें जर आनंदरावांनीं ओळखलें असतें तर त्यांची फौज कित्येक तासांपूर्वीच येथे येऊन थडकली असती.'

विजयेनें हळूंच उसासा सोडला. विजेचा प्रवाह बंद पडल्यामुळें आतां तेथें मेणबत्त्या पेटविण्यांत आल्या होत्या. त्या अंधुक प्रकाशांत तिनें आपला खालचा ओंठ दांतानें घट्ट आंवळला आहे असें दुर्जयानें पाहिलें. पण दुसऱ्याच क्षणीं ती चेष्टेनें हंसली.

'कदाचित् आनंदरावांबद्दल तुझा तर्क बरोबरहि असेल. पण मी कुठें गेलें आहें हें माझ्या संपादकांना माहीत आहे.'

'तें सुद्धां खोटें आहे! तूं येथें आलीस हें बाहेरच्या कुणालाहि माहीत नाहीं. तूं आतां चांगली सांपळ्यांत सांपडली आहेस!'

त्यानें विजेचा पुरवठा बंद झाल्याबद्दल एक विचकट शिवी हांसडली व नंतर त्यानें तुटलेली तार ताबडतोब शोधून काढण्याबद्दल हुकूम सोडले. त्याबरोबरच त्यानें एक बंद मोटार आणण्यासाठीं आपल्या एका हस्तकाला सांगितलें.

'तूं आतां काय करणार आहेस? तुझ्या एखाद्या डोंगरांतील गुप्त गुहेंत मला कोंडून ठेवणार आहेस? तसले प्रकार या मुंबई प्रांतांत चालत नाहींत.'

'मी तुझें काय करणार आहे तें जेव्हां तूं पहाशील तेव्हां तुला आश्चर्य वाटेल. वल्लभ, आपली तिजोरीची खोली उघड.'

वल्लभनें आश्चर्यानें दुर्जयाकडे पाहिलें व नंतर तेथल्या टेबला-खालींच असलेली एक गुप्त कळ त्यानें दाबली. त्याबरोबर तें सबंध टेबलच बाजूला सरकलें. आणि त्या ठिकाणीं खालीं गेलेल्या कित्येक दगडी पायऱ्या दिसल्या.

'राजबहाद्दूर, तुमच्या मनांत तरी काय आहे?' वल्लभानें विचारलें.

'तें तुलाहि लवकरच दिसेल.' दुर्जय म्हणाला, 'चला बाईसाहेब, उतरा खालीं आणि तूंहि तिच्या पाठीमागून उतर. नाहींतर मी तुम्हां दोघांवरहि पिस्तुलाच्या गोळ्यांचा वर्षाव करीन.' त्यानें शेवटचें वाक्य नेताजीला उद्देशून म्हटलें होतें.

'पण महाराज, तुम्हीं—' झुंजारनें घाबरलेल्या स्वरांत बोलण्यास सुरुवात केली.

'तुला मी तुझें तोंड गप्प ठेवण्यास सांगितलें होतें ना!' दुर्जय ओरडून म्हणाला.

'होय महाराज, पण---' झुंजार घाबरून मागें सरत म्हणाला.

'दयाळ, तुम्हीं या भानगडींत पडूं नका.' विजया म्हणाली, 'आणि त्याला महाराज म्हणूं नका. त्याचें नांव दुर्जय असून त्याच्या इतका महा नीच माणूस साऱ्या दुनियेंत आढळणार नाहीं.'

ती बोलत असतांना तिनें एकच हेतुपूर्वक नेत्रकटाक्ष त्याच्याकडे फेंकला होता. मला आणि नेताजीला येथून बाहेर काढण्यासाठीं आतां तुम्हींच तुमची करामत दाखवा असेंच तिनें त्या नेत्रकटाक्षानें त्याला सुचविलें होतें. झुंजार जरी वरकरणीं घाबरलेला दिसत होता तरी मनांतून तो विजयेवर एकदम खूष होता तिनें ऐनप्रसंगीं दाखविलेल्या असामान्य धैर्याबद्दल त्याला अभिमान वाटला होता--

त्यावेळीं विजयेनें किंवा नताजीनें आपल्या सुटकेसाठीं धडपड करणें म्हणजे आत्महत्त्याच करण्यासारखें होतें. त्या दोघांनीं मुळींच प्रतिकार केला नाहीं याबद्दल झुंजारला आनंदच वाटत होता. दुर्जय हा खुनी होता आणि त्यावेळीं तरी त्याच्या इतका भयंकर माणूस दुसरा कुणीहि नव्हता. तो जिवावर उदार झाला होता. गेल्या रात्रींच्या प्रकारामुळेंच त्या अतिहुशार असलेल्या मुलीचें लक्ष त्याच्याकडे वेधलें होतें. पण त्याचें रहस्य तिला आणि तिच्या ड्रायव्हरलाच फक्त माहीत होतें.

विजयेच्या आणि नेताजीच्या पाठीला पिस्तुल टेकूनच त्यांना त्या पायऱ्यांवरून खालीं नेण्यांत आलें. एरव्हीं त्या ठिकाणीं विजेच्या दिव्याचा प्रकाश असता पण आतां वल्लभाच्या हातांतील टॉर्चखेरीज दुसरें प्रकाशाचें साधन नव्हतें.

त्या पायऱ्यांच्या खालीं एक सिमेंट कॉंक्रीटची लहानशी चौकोनी खोली होती. त्या खोलीची समोरची भिंत प्रचंड पोलादी दारानें व्यापिली होती. दुर्जयानें पुढें होऊन ती प्रचंड तिजोरी उघडली. आंत कित्येक खण होते. पण तेथें दोन माणसांना ठेवण्याइतकी खचित जागा होती.

'राजबहाद्दूर, जें करायचें असेल तें नीट विचार करून करा.' वल्लभ म्हणाला.

'मी काय करीत आहें तें मला चांगलें समजतें.' दुर्जय म्हणाला, 'या तिजोरींत मुळींच हवा जाणें शक्य नाहीं. या तिजोरींत त्या दोघांना कोंबलें की वीस मिनिटांच्या आंत त्या दोघांचे प्राण निघून जातील. त्यांचीं प्रेतें येथून नेण्यासाठीं बंद मोटारीची व्यवस्था केली जाईल. जवळच्या चिरनारच्या जंगलांत त्यांचीं प्रेतें टाकून दिल्यास तीं कित्येक महिने कुणाच्याहि दृष्टीस पडणार नाहींत.'

त्यानें विजयेला आणि नेताजीला त्या तिजोरींत ढकललें आणि दार बंद केलें. त्याच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला होता. तो आणि वल्लभ पायऱ्या चढूं लागले तेव्हां वरच्या पायरीवर झुंजार उभा असलेला दिसला.

'हें पहा!' तो उत्तेजित स्वरांत म्हणाला, 'तुम्हीं आतां जें म्हणालांत तें खरें नाहीं ना? त्या मुलीला तुम्हीं कोंडून खरोखरच ठार करणार नाहीं ना? महाराज, ह्या मुलीला घाबरविण्यासाठीं तुम्हीं तसें बोललांत ना?

त्याच्यावर डोळे वटारीत दुर्जय म्हणाला, 'दयाळ, तूं फार चांगला माणूस आहेस. माझ्या फार उपयोगी पडतोस. पण प्रत्येक गोष्टींत नाक खुपसण्याची तुझी ही संवय फार वाईट आहे.'

'म्हणजे? खून होत असतांनाहि मी अगदीं शांत उभें राहून तो पहावा असें तुमचें म्हणणें आहे? नाहीं, ते कधींहि शक्य नाहीं. मी येथून बाहेर पडणार आणि पोलिसांना माहिती देणार, खुनाचा भागीदार होण्याची माझी इच्छा नाहीं--'

'इतका संतापूं नकोस.' वल्लभ त्याच्या बरगडीमधें आपलें पिस्तुल खुपसून म्हणाला, 'तूं असा मूर्खपणा कधींतरी करशील अशी माझी कल्पना होतीच. राजबहाद्दूर, या मूर्खाचें काय करावयाचें? आपण जर वेळींच सावध झालों नाहीं तर हा आपणांला पुढें अधिक त्रास देईल.'

'त्याला खोलींत बंद करून ठेव.' दुर्जय रागानें म्हणाला, 'कांहीं वेळानें त्याचें मस्तक आपोआपच ठिकाणावर येईल. त्याची आपणांला गरज आहे. हातांतलें प्रकरण संपल्यानंतर आपण त्याच्याकडे लक्ष देऊं.'

'हें तुमचें बोलणें मला पसंत नाहीं.' झुंजार अधिऱ्या स्वरांत म्हणाला आणि त्यानें अतिशय त्वरेनें दोन गोष्टी केल्या.

अतिशय चपळाईनें तो वळला आणि त्याचें वल्लभाच्या हातांतलें पिस्तुल काढून घेतलें. आणि त्याचवेळीं आपल्या डाव्या हाताचा जोराचा ठोसा वल्लभाच्या थोबाडावर असा मारला कीं, दोन तीन कोलांटया खाऊन तो समोरच्या भिंतीवर आपटला आणि बेशुद्ध झाला.

'दुर्जय, मला हें पूर्वीं करतां आलें नाहीं. कारण त्यावेळीं तुझे कांहीं ठग जवळपास होते.' झुंजार त्या बैठकीच्या खोलीचें दार बंद करीत म्हणाला, 'आपली ही खाजगी भानगड आहे. ती इतरांच्या कानांवर जाला कशाला? जर जगायचें असलें तर तुझ्या हातांतील

'पिस्तुल खालीं टाक.'

दुर्जयाला सुरुवातीपासूनच हालचाल करण्याची संधीच मिळाली नव्हती. आपल्या आज्ञाधारक सेवकामध्यें अर्ध्या क्षणांत इतका फरक पडलेला पाहून तो भांबावला होता. आणि त्याला कांहीं विचार सुचण्यापूर्वींच एक प्रकारच्या मानवी बॉम्बनें त्याच्या पुढ्यांतील टेबलावर अचानक उडी घेतली होती. दुर्जयानें प्रयत्न केला असता तरी त्याला आपल्या हातांतील पिस्तुलाचा उपयोग करतां आला नसता. कारण त्याला तितका वेळच मिळाला नसता.

झुंजारचें सारें तंत्रच विलक्षण होतें. त्यानें टेबलावर उडी घेतांना आपले दोन्हीं पाय पुढें केले होते. ते बरोबर दुर्जयाच्या मोठ्या पोटांत खुपसले होते. दुर्जय बसलेल्या खुर्चीसहित खालीं आदळला होता आणि त्याच्या पोटावर उभें राहून झुंजारनें हसत त्याच्या हातांतील पिस्तुल काढून घेतलें होतें.

'आतां मजा आला !' झुंजार समाधानानें म्हणाला.

● ● ●

८

वीस वर्षांपूर्वीं दुर्जयाच्या पोटावर तशा दोन लाथा बसल्या असत्या तरी तो लागलीच हंसत उभा राहिला असता. पण आज मात्र त्याला तें झेपण्यासारखें नव्हतें. आज त्याचें पोट सुटलें होतें, चरबी वाढलेली होती, तो माजलेल्या बोकडाप्रमाणें दिसत होता. पण त्याच्या अंगांत बोकडाइतकीहि चिकाटी नव्हती त्यामुळें त्याच्या सुंदर खुर्चीच्या मोडतोडींत तो पडला असतांना आजूबाजूच्या दुनियेचा त्याला विसर पडला होता.

एका मिनिटांतच झुंजारनें त्याची अधिक दुर्दशा केली. तेथल्या रेशमी पडद्यांचीच दोरी सोडून त्यानें त्याला दुसऱ्या एका खुर्चीला जखडलें होतें. आणि दुर्जय शुद्धीवर आला तेव्हां त्याला आपण शरीराची कोणतीहि हालचाल करण्यास असमर्थ आहों असें आढळून आलें. त्याच्या तोंडांत बोळा नव्हता. पण त्या बैठकीच्या खोलीचें दार असें होतें कीं तो ओरडला तरी त्याचा आवाज त्याच्या हस्तकांपर्यंत पोहोंचला नसता.

वल्लभ अजून झोंपलेलाच होता. झुंजारनें त्याचेहि हातपाय बांधले होते. तें काम आटोपून झुंजार उभा रहात होता तोंच आपल्या मागील

मालकाच्या तोंडावाटें रानटी जनावराप्रमाणें कांहीं विचित्र आवाज बाहेर पडूं लागले आहेत असें त्याला आढळून आलें.

'मूर्खा दयाळा, हें तूं काय करीत आहेस?' बऱ्याच मेहनतीनें दुर्जयानें त्या वाक्याची जुळणी केली.

'माझ्या एका मैत्रिणीचे प्राण घेण्याचा तुझा प्रयत्न हाणून पाडीत आहें. त्याशिवाय कित्येक गोष्टी करावयाच्या आहेत.' झुंजार हंसून म्हणाला, 'तुला किती वेळ मोकळा सोडला तर अधिक गमत होईल याचा मी कालपासून विचार करीत होतों. मला सर्व गोष्टी माझ्या पद्धतीनेंच करणें आवडतें. पण तूं भलत्याच गोष्टी करूं लागलास त्यामुळें मलाहि थोडी घाई करावी लागली.'

'बोल, तुला हवें तितकें बोल.' दुर्जय म्हणाला, 'दयाळ, तुला खात्रीनें वेड लागलें आहे. हें तूं मांडलें आहेस तरी काय? आणि तूं आतां असा कां दिसतोस?'

तो आतां डोळे ताणून झुंजारकडे पहात होता. पूर्वीच्या साध्या दयाळमध्यें आतां भलताच फरक पडला होता.

'तूं मला समजत होतास तो माणूस मी नव्हे!' झुंजार हंसून म्हणाला, 'आणि दयाळ हें माझें नांवहि नाहीं.'

'तर मग तूं आहेस तरी कोण?' आश्चर्यानें दुर्जयानें विचारलें.

'आपली एकमेकांबरोबर ओळख पटविण्यापूर्वी कांहीं गोष्टींकडे ताबडतोब लक्ष देणें अगत्याचें आहे.' झुंजार म्हणाला, 'त्या माझ्या मैत्रिणीला तूं आपल्या तिजोरीच्या खोलींत बंद करून ठेवलें आहेस तिला व तिच्या मदतनिसाला बाहेर काढणें ही पहिली गोष्ट आहे. तेव्हां तिजोरीचें कुलूप उघडण्याचा शब्द मला सांग.'

'मसणांत जा!' रागानें दुर्जय म्हणाला.

'तुला त्या जागेची आठवण व्हावी हें स्वाभाविक आहे. कारण आतां तूं त्याच वाटेवर आहेस.' झुंजार म्हणाला, 'जर तूं बोलावयास तयार नसलास तर निराळ्या मार्गानें तुझ्याकडून मला ती माहिती मिळविली पाहिजे. तूं किती बुद्धिमान आहेस त्याचा अंदाज करण्याइतका मला तुझा सहवास लाभला आहे. तिजोरी उघडण्यासाठीं तूं कोणत्या शब्दाची योजना केली असावीस तें ओळखणें फारसें कठीण नाहीं.'

'तुला ती तिजोरी या जन्मांत उघडतां येणार नाहीं.' दुर्जय ओरडून म्हणाला, 'थांब! माझीं माणसें येथें आल्यानंतर तुझी काय दुर्दशा होते ती पहा! वल्लभानें मला सावध करण्याचा प्रयत्न केला होता. मी तुला जिवंत ठेवलें हीच माझी चूक झाली.'

'आतां कसें शहाण्यासारखें बोललास.' झुंजारनें त्याला दुजोरा देत म्हटलें.

दुर्जयाला शारीरिक त्रास देऊन त्याला तो शब्द सांगण्यास भाग पाडावें काय याबद्दल तो विचार करीत होता. पण त्यानें तसें न करण्याचा निर्णय घेतला. दुर्जयांत शक्ति नसली तरी तो कमालीचा हट्टी होता. त्याला बोलके करण्यांत कितीतरी महत्त्वाचा वेळ वायां गेला असता तो धांवत पायऱ्याकडे गेला तेव्हां दुर्जयानें आईची मांडी सोडल्यापासून शिकलेल्या शिव्या देण्यास सुरुवात केली !

'तसें नको.' झुंजार म्हणाला, 'मी काय करतों हें तुला दिसलें पाहिजे.'

त्यानें खुर्चीसहित दुर्जयाला उचललें आणि ती खुर्ची तळघराच्या वरच्या पायरीवर ठेवली. नंतर त्यानें धांवत खालीं उतरून तिजोरीची पहाणी केली. साऱ्या जगांत अशी तिजोरी नव्हती कीं, जी झुंजार उघडूं शकला नसता. त्यानें तिजोरीच्या दाराला कान लावला. आंतून अस्पष्ट आवाज होत होते. वरच्या पायरीवर आसनावर बसलेला दुर्जय त्याच्याकडे तुच्छतेनें पहात होता.

'ही तिजोरी मी दहा मिनिटांत उघडूं शकेन.' झुंजार त्याला म्हणाला, 'पण तितका त्रास कां घ्यावा? तुझ्यासारखा स्वतःच्या वैभवाचें खुलें प्रदर्शन मांडणारा माणूस स्वतःच्या नांवाचाच तिजोरी उघडण्यासाठीं उपयोग करणार अशी माझी खात्री आहे. प्रथम आपण राजबहाद्दूर हा शब्द जुळवून पाहूं या.'

त्यानें तिजोरीवरील 'डायल' फिरविली पण दार उघडलें नाहीं.

'माणसाचा पहिलाच प्रयत्न यशस्वी होतो असें नाहीं.' झुंजार हंसून म्हणाला, 'राजबहाद्दूर हा शब्द नाहीं तर तो खात्रीनें दुर्जय असला पाहिजे.' पायरीवर बसलेला दुर्जय दचकला व त्याबरोबर झुंजार मोठ्यानें हंसला. त्याला हवी ती माहिती मिळाली होती. दुर्जयसिंह' हा शब्द फिरवतांच तिजोरीचें दार उघडलें गेलें व विजया आणि नेताजी बाहेर पडले. अशुद्ध हवेचा त्यांच्यावर परिणाम होण्यास नुकतीच सुरुवात झाली होती.

'थोडा उशीर झाला.' झुंजार हंसून विजयेला म्हणाला, 'तिजोरी उघडण्यापूर्वी कांहीं गोष्टी करणें आवश्यक होतें. पण आतां सर्व ठीक आहे. या पायरीवर बसलेल्या माणसाला तूं ओळखतेसच. हा ब्रह्मदेश व हिंदुस्थान या दोन देशांच्या सरहद्दीवर दरोडे घालणारा प्रख्यात डाकू दुर्जयसिंह. दुसऱ्याचें नांव वल्लभ असें आहे. पण त्याचें खरें नांव प्राण-

वल्लभ असें आहे. त्याच्यासारख्या खुनी माणसाला अर्थातच इतकें सुंदर नांव शोभत नाहीं.'

'प्राणवल्लभ!' विजया विचार करीत म्हणाली, 'ज्या सैतानानें अगदीं निर्दयपणें दोन वर्षांपूर्वी एका लहान अर्भकाचा खून केला, तोच ना? छान जोडी जमली होती म्हणावयाची!'

'विजू, आतां या धेनुवल्लभाचा दुर्जयाबरोबरच अवतार संपणार आहे.'

'विजू!' डोळे ताणीत दुर्जयसिंह म्हणाला, 'तर मग तूं तो झुंजार असला पाहिजेस. वल्लभ, आपण या मूर्खाचें नांव ऐकलें होतें—'

'तो मूर्ख नाहीं.' वल्लभ विव्हळत म्हणाला, 'तो जिवत बॉंब आहे आणि आपणांला आतांपर्यंत त्याचा संशयहि आला नव्हता. शाबास राज-बहाद्दूर! तूं झुंजारलाच तुझा शरीरसंरक्षक बनवून मोठी कमालच केलीस.'

'होय. तुझ्या या निर्बुद्ध जोडीदारानें मोठी गंमतच केली यांत शंका नाहीं.' झुंजार हंसत म्हणाला, 'आणि विशेष म्हणजे मी या वाड्याकडे यावयास निघालों तेव्हां तुमच्याबद्दल मला मुळींच संशय नव्हता. पिस्तुलाचे दोन बार ऐकतांच मला राहवलें नाहीं व मी आंत शिरलों. त्या दोघां बदमाषांना तुम्हीं ठार केलें असणारच. दुर्जय, तुझ्या लांब कानामुळें मला तुझी ओळख पटली. तुझा चेहरा तुला अगदीं बेमालूम बदलतां आला पण तुला आपले कान आंखूड करतां आले नाहींत.

'मी तुला कानांवरून ओळखलें इतकेंच नव्हे तर माझ्या बायकोनेंहि तें ओळखलें. मी येथें आलों व पिस्तुलाची गोळी माझ्या मस्तकाला चाटून गेली त्यामुळें मी पूर्वी आंखलेली योजना फुकट गेली आणि मला दुसरी-कडे नजर वळविणें भागच पडलें. लूट म्हणजे लूटच. त्यांतून माझ्या त्या पूर्वीच्या योजनेपेक्षां तुझे पैसे पळविणें अधिक न्याय्य आणि सोपें आहे.'

'हा तुझा डाव आहे काय? तर मग तूं एक सामान्य चोर आहेस.' दुर्जय म्हणाला.

'मी सामान्य नाहीं हें आनंदरावांनीं मान्य केलें आहे. विजूनें या वाड्यांत प्रवेश मिळविण्यास तीं आनंदरावांचा फार चांगला उपयोग करून घेतला यांत मात्र शंका नाहीं—'

'आतां माझ्या लक्षांत आलें' दुर्जय म्हणाला, 'तुम्हीं ही योजनाच ठरविली होती. एकानें बाहेर व दुसऱ्यानें आंत रहावयाचें असें तुम्हीं पूर्वीच ठरविलें होतें.'

'नाहीं. मी केवळ हा वाडा पहाण्याच्या कुतूहलानें येथें आलों. माझ्या मनांतून जर बाहेर पडावयाचें असतें तर तुझे शेंदाड शिपाई मला प्रतिबंध करूं शकले नसते विजूला चिंता वाटूं लागल्यामुळें ती येथें आली. बायकोला नवऱ्याची चिंता वाटणें स्वाभाविकच आहे. पण विजू, इथला मुख्य मालक हा पाजी प्राणवल्लभच आहे. हा दुर्जय केवळ खजिनदार आहे.'

'मध्यप्रांतांत रहाणें या प्राणवल्लभाला अशक्य झाल्यामुळें तो येथें पळून आला. श्रीमंत आईबापांच्या एकुलत्या एका लहान अर्भकांना पळविणें हा याचा मुख्य धंदा. तुला ती प्रतापशेठ घुलियाची हकीकत आठवतें ना ? त्यांच्या सात वर्षांच्या मुलाला परत मिळविण्यापूर्वी त्याचा शोध करणाऱ्या तिघांचे खून झाले, प्रतापशेठची बायको वेडी झाली व मुलगा परत मिळविण्यासाठीं शेठजींना पंधरा लक्ष रुपये खर्च करावे लागले.

'ती छत्रपतीचीच गोष्ट घे. पुन्हां पूर्वीचाच डाव खेळण्याचें ठरवून या प्राणवल्लभानें त्याच्या आजारी मुलीला पळविलें. छत्रपतीनें या पाजी माणसाला पैसे देण्याचें नाकारून ते पोलिसांकडे गेले. त्यामुळें उशीर झाला व ती आजारी मुलगी औषधपाण्यावांचून तडफडत मरण पावली. तिचें प्रेत याच्याच खड्ड्यांत पुरण्यांत आलें होतें.'

बोलत असतांना झुंजार प्राणवल्लभाकडे रोखून पहात होता व त्यामुळें त्या बदमाषाच्या सर्वांगांतून घामाच्या धारा वहात होत्या. झुंजार पुढें बोलतच होता.

'वल्लभ, तूं त्या लहान मुलीचा खून केलास ! तुला छत्रपतीनें एक दमडीहि दिली नाहीं म्हणून तूं त्याचा निर्दयपणें सूड उगविलास ! छत्रपतीच्या विमानें तयार करण्याच्या कारखान्याचें एका वर्षानंतर दिवाळें निघालें. तेव्हांहि तुला आनंदाच्या उकळ्या फुटल्या असतील. जर तुला मध्यप्रांताच्या पोलिसांच्या स्वाधीन केलें तर त्यांना खचित आनंद होईल.'

'तें सर्व खरें ! पण आपण आपला वेळ फुकटच घालवीत नाहीं काय ?' विजयेनें विचारलें, 'या ठिकाणीं दुर्जयाचे अनेक हस्तक आहेत ही गोष्ट तुमच्या लक्षांत आहे ना ?'

'तुझें म्हणणें बरोबर आहे. तुम्हीं हीं दोन पिस्तुलें घ्या आणि येथून बाहेर पडा.' झुंजार म्हणाला, 'मी या दोघांची योग्य व्यवस्था करतों.'

तो आपणाला पोलिसांची मदत आणण्यासाठींच बाहेर जावयास सांगत आहे हें विजयेनें ओळखलें. त्यामुळें ती कांहींच बोलली नाहीं. तिनें

मान डोलाविली व ती नेताजीसह तेथून बाहेर पडली. अद्याप विजेचा प्रवाह सुरू झाला नव्हता त्यामुळें तेथें अंधारच होता. विजया आणि नेताजी छायेप्रमाणें त्या अंधारांत मिसळून चालत होते. लवकरच भिंती-वरून उड्या मारून ते पलीकडच्या बाजूला गेले. कांहीं मिनिटांतच विजया मोटारीनें पेणला निघाली.

'मला कांहीं हें आवडत नाहीं.' नेताजी म्हणाला.

'काय आवडत नाहीं?' विजयेनें मोटारीचा वेग वाढवीत विचारलें, 'तूं ती सर्व गंमत पाहून खूष झाला असशील अशी माझी कल्पना होती.'

'मला बाकीचें सर्व आवडलें.' नेताजी म्हणाला, 'पण मालकांना त्या वाड्यांत एकटेच सोडून आपण बाहेर आलों हें कांहीं योग्य झालें नाहीं.'

'ते तेथें फारवेळ एकटेच रहाणार नाहींत.' विजया हंसून म्हणाली, 'आपण येथें कशासाठीं आलों आहोंत? माझी खात्री आहे कीं या वाड्याच्या आसपासच आनंदरावांचीं बरींच माणसें दबा धरून बसलीं असावींत. पोलीस तेथें जाईपर्यंत त्यांना त्यांचीं कांहीं कामें उरकतां येतील.'

विजयेला जवळच्याच एका बंगल्यांत टेलिफोन आढळला. कनेक्शन मिळतांच आनंदरावांचा आवाज ऐकूं आला.

'होय विजूताई. मी ऑफिसांतच बसलों आहें. काय बातमी आहे?'

'खूप मोठी बातमी आहे.' विजया हंसून म्हणाली, 'तुम्हीं शक्य तितकीं माणसें राजबहाद्दुराच्या वाड्यांत पाठविण्याची ताबडतोब व्यवस्था करा.'

'ती व्यवस्था मी पूर्वींच केली आहे. वायरलेस लावलेल्या आमच्या कित्येक मोटारी आसपास दबा धरून आहेत. मी त्यांना येथूनच कांहीं क्षणांतच सूचना देऊं शकतों. पण त्यांनी तेथें गेल्यानंतर काय करावयाचें तें सांग.'

'आपण सकाळीं वाड्यांत गेलों होतों तेव्हां तुम्हीं त्या राजबहा-द्दुराचे कान पाहिले होते काय?'

'मला त्याचे कान पहाण्याचें काय कारण होतें?' रागानें आनंद-रावांनीं विचारलें.

'कारण ते कान उत्तर हिंदुस्थानी सुप्रसिद्ध डाकू दुर्जयसिंह याचे आहेत.' विजया म्हणाली, 'दुर्जयसिंहाला पकडण्याची सुवर्णसंधि

तुम्हांला मिळत आहे.'

'काय म्हणतेस?' आनंदरावांनीं आश्चर्यानें विचारलें, 'राजबहाद्दूर हा दुर्जय आहे? पण तो तर चार वर्षांपूर्वी मरण पावला--'

'मी तुम्हांला असली खोटी गोष्ट सांगेन असें तुम्हांला वाटतें काय? राजबहाद्दूर हाच दुर्जय आहे इतकेंच नव्हे तर त्याचा उजवा हात म्हणजे मध्यप्रांतांतील महापाजी प्राणवल्लभ आहे. त्या दोघांनाहि पकडण्याची तुम्हांला संधि मिळत आहे. ती जर तुम्हीं साधलीत तर तुमच्या नांवलौकिकांत किती भर पडेल याची तुम्हींच कल्पना करा.'

इकडे विजया व नेताजी बाहेर पडतांच झुंजारनें पुन्हां दाराला आंतून कडी घातली होती. दुर्जयाचे कांहीं हस्तक तपासासाठीं तेथें आलेच होते. झुंजारनें त्यांना दुर्जयाप्रमाणें हुबेहूब आवाज काढून तेथून निघून जाण्यास सांगितलें.

'दुर्जय आतां आपण मुख्य विषयाकडे वळूं या.' तो हंसत म्हणाला, 'तूं राजबहाद्दूर या नांवानें पाण्यासारख्या पैसा खर्च करीत आहेस बरेच पैसे तूं बँकांतून शेअर्समधून गुंतविले असलेस तरी ऐनवेळीं उपयोगी पडावी म्हणून कांहीं रोकड जवळ बाळगिली असशीलच--'

'तुला पैसे हवे आहेत काय? मी या घरांत बरेच पैसे ठेवण्याइतका मूर्ख नाहीं--'

'अस्सें! तूं ते बाहेर कुठेंतरी ठेवले आहेस तर?' झुंजारनें विचारलें, 'जर तूं त्या ठिकाणाची मला माहिती सांगितलीस तर तुझा आणि माझा बराच त्रास वाचेल.'

दुर्जय तें ऐकून दचकला हें पाहून झुंजारचें समाधान झालें. त्या सांपळ्यांत सांपडलेल्या बदमाषानें मान हालवूनच झुंजारला नकार दिला.

'तूं न बोलण्याचें ठरविलेंस हें फारच वाईट आहे.' झुंजार म्हणाला, 'मी तुला आतां तुझ्या त्या तिजोरींतच कोंडून ठेवणार आहें. तूं विचार बदलून दारावर हातपाय आपटूं लागलास कीं मी तुला बाहेर काढीन.'

याच वेळीं एक मुद्याची गोष्ट झुंजारच्या लक्षांत आली. क्षणभरच दुर्जयाच्या चर्येवर लबाडीचें स्मित झळकलें होतें. पण तें झुंजारला स्पष्ट दिसलें होतें आणि त्यावरून ज्या तिजोरींत विजयेला व नेताजीला कोंडण्यांत आलें होतें, तेथें गुदमरून मरण्याची दुर्जयाला भीति वाटत नाहीं हें त्यानें ओळखलें होतें.

'आतां घाबरलास नाहीं काय?' झुंजार मुद्दामच म्हणाला,

' तुझी युक्ति आतां तुझ्यावरच उलटली आहे. '

' मी तुझ्या धमक्यांना मुळींच घाबरत नाहीं. ' दुर्जय म्हणाला. जणुं काय तो स्वतःला त्या तिजोरींत कोंडून घेण्यास उतावळा झाला होता असें दिसत होतें.

' भलताच हट्ट धरूं नकोस. ' झुंजार म्हणाला, ' तुला एकदां तिजोरीत कोंडल्यानंतर तुझी काय अवस्था होईल याची तुला कल्पनाहि नाहीं. '

' तुला जें कांहीं करायचें असेल तें कर. ' दुर्जय म्हणाला.

पण झुंजारला विशेष घाई नव्हती. तिजोरींत कोंडल्यानंतर प्राण कसे कासावीस होतील याचें त्यानें अगदीं रसभरीत वर्णन केलें व नंतर तो म्हणाला, दुर्जय, आतां तरी तूं मला तुझ्या संपत्तीचें गुप्त ठिकाण सांगशील काय ?'

या खेपेला दुर्जयानें त्याला उत्तरच दिलें नाहीं. तो नुसता उद्दाम-पणें त्याच्याकडे पहातच राहिला. त्या तिजोरींत स्वतःला कोंडून घेण्याची दुर्जयाची इच्छा आहे हें आतां सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट झालें होतें. त्या तिजोरींत कांहीं नसणार अशीहि झुंजारची खात्री होती. विजया आणि नेताजी सुमारें आठ मिनिटें त्या तिजोरींत होतीं. त्यांनीं तेथें पळविण्या सारखे जें कांहीं होतें तें अर्थातच काढून घेतलें होतें आणि तें ओळखण्या-इतका दुर्जयहि धूर्त होता.

असें असतांनाहि दुर्जयानें त्या तिजोरींत शिरण्यासाठीं इतकें अधीर कां व्हावें ? त्याचें एकच कारण असणें शक्य होतें आणि तें जेव्हां झुंजारच्या लक्षांत आलें तेव्हां त्याला मनापासून हंसूं आलें.

' तूं बोलत नाहींस तेव्हां मला ठरविल्याप्रमाणें वागलेंच पाहिजे. ' झुंजार म्हणाला, ' खरें म्हणशील तर मला तसें करणें मनापासून आवडत नाहीं. मी अहिंसावादी आहें. पण मी येथें जों आलों तो रिकाम्या हातानें परतण्यासाठीं नाहीं. '

झुंजारनें दुर्जयाच्या हातांपायांच्या दोऱ्या सोडल्या व नंतर आपलें पिस्तुल त्याच्या पाठीला टेकलें. दुसऱ्या खुर्चीवर बसलेला प्राणवल्लभ तो सर्व प्रकार पहात होता. त्याच्या चर्येवरून त्याला जर दुर्जयाऐवजीं तिजोरींत कोंडण्यांत आलें असतें तर तें त्याला अगदीं मनापासून आव-डलें असतें असें दिसत होतें.

झुंजारनें दुर्जयाच्या पाठीला पिस्तुल टेकून त्याला त्या दगडी पायऱ्यावरून तळघरांत नेलें. त्याला वाटणारा आनंद त्याच्या डोळयांवरून

स्पष्ट होत होता. दोघेहि मनांतून निरनिराळ्या कारणांमुळें आनंदले होते. आणि दोघांनाहि आपल्या मनांतील विचार दुसऱ्याला समजूं नयेत असें वाटत होतें.

झुंजारनें त्या अवाढव्य तिजोरीचें दार उघडलें. आणि तो म्हणाला, 'माझी खात्री आहे कीं दहा मिनिटांत तूं वठणीवर येशील.'

झुंजार त्याला तिजोरींत ढकलीत होता त्याच वेळीं वर बरीच गडबड चालली असावी हें आवाजावरून झुंजारनें ओळखलें. त्याच वेळीं बाहेरच्या खोलींतून बावरलेल्या प्राणवल्लभाचा आवाज ऐकूं आला.

'दुर्जय, पोलीस आले आहेत !'

'छान !' झुंजार हंसून म्हणाला, 'अगदीं वेळेवर मदत आली म्हणायची.'

झुंजारनें दुर्जयाला तिजोरींत लोटलें आणि दार बंद केलें. त्याच-वेळीं वर पिस्तुलांचे आणि दार फोडण्याचे आवाज ऐकूं येत होते. झुंजार तिजोरीच्या दाराला कान लावून उभा होता. त्याला वरच्या पायरीवर उभा असलेला पोलीस इन्स्पेक्टर दिसला.

'झुंजारराव, तुम्हीं आंत आहांत ना ? आतां कांहीं चिंता करूं नका. आम्हीं सर्व पाहून घेतों. तुम्हीं वर या.' तो अधिकारी म्हणाला.

'मी जरा घाईंत आहें.' झुंजार हंसून म्हणाला, आणि त्यानें तिजोरीचें दार उघडून तोहि आंत गेला.

तिजोरींत शिरतांच तो मनःपूर्वक हंसला. त्याचें गणित बरोबर होतें. दुर्जयानें त्या तिजोरीच्या पाठीमागल्या भागांत असलेलें एक लहानसें गुप्त दार उघडलें होतें आणि तो त्या दारांतून आंत शिरत होता. त्याचा फक्त एक पायच आतां त्या तिजोरींत होता.

झुंजारनें तिजोरींत शिरतांच आपली टॉर्च पेटविली होती. आणि त्या प्रकाशांत त्याला तें दृश्य स्पष्ट दिसलें होतें. कांहीं क्षणाचाच जर अवधि झाला असता तर दुर्जय फरारी झाला असता. झुंजारनें त्याचा पाय ओढूनच त्याला तिजोरींतून बाहेर खेचलें तेव्हां तो मोठ्यानें किंचाळला.

'दुर्जय, तुला तुझ्या चर्येवर कांहींच लपवितां येत नाहीं. तुझ्यासारख्या पाजी माणसानें येथून बाहेर पडण्यासाठीं एखादा गुप्त मार्ग तयार करून ठेवला असावा हें ओळखणें मुळींच कठीण नव्हतें. आणि फरारी होतांना तूं रिकाम्या हातीं पळ काढणार नाहींस हेंहि तितकेंच स्पष्ट आहे.'

सांपळ्यांत सांपडलेल्या जनावराप्रमाणें दुर्जयाची स्थिति झाली होती. झुंजारच्या पोलादी पंजांतून आपला पाय सोडविण्यासाठीं तो

धडपडत होता, धांपा टाकीत होता, शिव्या देत होता.

तिजोरीच्या दाराच्या फटीला तोंड लावून झुंजार जोरानें ओरडला, ' इन्स्पेक्टरसाहेब, तुम्हांला माझा आवाज ऐकूं येतो काय ?'

' होय. ' अगदीं खोल आणि अस्पष्ट उत्तर ऐकूं आलें.

' या तिजोरींत मी अडकलों आहें. ' झुंजार म्हणाला, ' आणि ती आंतून उघडतां येत नाहीं, तिजोरी उघडण्याचा सांकेतिक शब्द दुर्जयसिंह असा आहे. '

झुंजारनें बोलत असतांनाच दुर्जयाला तिजोरीच्या दुसऱ्या कोंपऱ्यांत जोरानें फेंकलें व नंतर तो त्या गुप्त दारांतून बाहेर पडला आणि त्यानें तें बंद करून पुन्हां उघडलें जाणार नाहीं अशी व्यवस्था केली.

जेव्हां इन्स्पेक्टरांनीं तिजोरीचें दार उघडलें तेव्हां दुर्जय नखानें तिजोरीची एक भिंत ओरबडत आहे असें त्यांना दिसून आलें आणि झुंजार तेथें नाहीं हें पाहून त्यांना अतिशय आश्चर्य वाटलें.

' हें काय ?' इन्स्पेक्टर म्हणाले. त्या बिचाऱ्यांना तेथल्या गुप्त दाराची मुळींच माहिती नव्हती. ' मला वाटलें—'

' तुम्हांला जें वाटलें तें तसेंच राहूं द्या. ' पाठीमागून विजयेचा आवाज ऐकूं आला ' तेथें दुर्जय आहे त्याला अटक करा. '

तेथें बराच गोंधळ उडाला होता. पोलीस आणि विजया वाड्यांत एकाच वेळीं पोहोंचले होते. इन्स्पेक्टर विशेष चलाख नव्हते. आनंदराव तेथें नाहींत याबद्दल विजयेला वाईट वाटलें. पण मुंबईहून पेणपर्यंत विमानें नव्हतीं आणि अगदीं जलद गतीच्या मोटारीनेंहि तेथें येण्यास आनंदरावांना आणखी बराच वेळ लागणार होता.

दुर्जयानें त्या परिस्थितीचा शक्य तितका फायदा घेण्याचा प्रयत्न केला. तो मोठ्यानें ओरडला, संतापला आणि आपण लक्षाधीश राजबहाद्दूर आहोंत असें त्यानें त्या सरळस्वभावी स्थानिक अधिकाऱ्यांना सांगितलें.

ते इन्स्पेक्टर त्याच्या त्या नाटकानें फसलेहि असते. पण त्यांच्याबरोबर असलेले आनंदरावांचे खास मदतनीस कच्चे नव्हते. शिवाय त्यांना आनंदरावांनीं वायरलेसवरून स्पष्ट सूचना दिल्या होत्या. लक्षाधीश राजबहाद्दुराला अटक करावी असा त्यांना हुकूम देण्यांत आला होता आणि त्याप्रमाणें त्यांनीं त्याला अटक केली.

' मूर्खांनो, तुम्हांला याबद्दल पश्चात्ताप करावा लागेल. ' संतापानें ओरडून दुर्जय म्हणाला, ' तुम्हां सर्वांना वेड लागलें आहे काय ? तो हरामखोर झुंजार केव्हांच तुमच्या हातून निसटला आणि अगदीं या

म्हणाला तो माझी चोरी करीत असणार.'

त्याचा तो तर्क चुकीचा नव्हता. झुंजार त्यावेळीं त्या गुप्त वाटेनें दुसऱ्या टोंकाला असलेल्या खाडीच्या कांठावर पोहोंचला होता आणि तेथें नांगरण्यांत आलेल्या मोटारबोटीवर चढलाहि होता.

'मी समजत होतों तेवढा दुर्जय मूर्ख नाहीं तर!' तो स्वत:शींच म्हणाला, 'त्यानें हा गुप्त मार्ग कमालीच्या चातुर्यानें तयार केला होता आणि फरारी होण्यासाठीं ही वेगवान मोटारबोटहि तयार करून ठेवली होती.'

त्या मोटारबोटीवर पेट्रोलचा आणि खाद्यपेयांचा भरपूर सांठा होता आणि ती अतिशय वेगवानहि होती. जेव्हां त्या मोटारबोटीमध्यें दडवून ठेवलेल्या पोलादी पेटींतील नोटांचीं बंडलें झुंजारनें पाहिलीं तेव्हां त्याला अतिशय आनंद झाला पण आश्चर्य वाटलें नाहीं. फरारी होण्याची आवश्यकताच निर्माण झाली तर कोणत्याहि परदेशीं जाऊन कित्येक वर्षें सुखासमाधानानें राहतां येईल एवढी रोकड रक्कम त्या पेटींत दुर्जयानें तयार ठेविली होती.

ती मोटारबोट त्यानें मुद्दामच निराळ्या नांवानें विकत घेतली होती आणि त्यामुळें ती जरी नाहींशी झाली असती तरी पोलिसांना त्या बोटीशीं दुर्जयाचा संबंध जोडतां आला नसता.

विजया आणि नेताजी दमूनभागून पण आनंदानें त्या रात्रीं बऱ्याच उशिरां झुंजारमहालाकडे परतलीं तेव्हां झुंजार एका आरामखुर्चीवर वर्तमानपत्र वाचीत बसला आहे असें त्यांना आढळून आलें.

'लढाईवरून फौज परतली तर?' तो त्या दोघांकडे पहात म्हणाला, 'पण तुमच्या अंगावर कुठें जखमा झालेल्या दिसत नाहींत.'

'मालक, तुम्हीं आहां तरी कोण?' आश्चर्यानें नेताजीनें विचारलें.

'तूं मला हा प्रश्न नेहमींच विचारतोस.' झुंजार हंसत म्हणाला, 'चला, मी तुमच्यासाठीं कॉफी तयार करून ठेवली आहे.'

तीं दोघें त्याच्याबरोबर जेव्हां आंतल्या खोलींत गेलीं तेव्हां तेथल्या एका टेबलावर बरींच नोटांचीं बंडलें रचून ठेवलेलीं त्यांच्या दृष्टीस पडलीं.

विजयेनें जेव्हां प्रश्नार्थक मुद्रेनें त्याच्याकडे पाहिलें, तेव्हां झुंजार म्हणाला, 'ही लढाईतील लूट आहे. दुर्जयाला या रक्कमेची गरज नसल्यामुळें मी ती येथें आणली आहे. कंबोडच्या सुलतानाच्या सिंहासनाला आपणाला मुकावें लागलें तरी आपला जवळजवळ तितकाच फायदा झाला आहे. पण विजू, तुझ्या चर्येवरून तूं कांहींतरी वाईट

बातमी आणली आहेस असें दिसतें.'

'बातमी तितकीशी वाईट नाहीं.' विजया त्रासिक स्वरांत म्हणाली 'जर आनंदराव तेथें असते तर त्या प्राणवल्लभाला पळून जाण्याची संधि मिळाली नसती.'

'हें वाईट झालें.' झुंजार म्हणाला, 'त्याला मी चांगला खुर्चीवर बांधून ठेवला असतांना तो पोलिसांच्या हातून निसटेल अशी माझी कल्पना नव्हती. खरें म्हणशील तर तो दुर्जयापेक्षांहि घातकी आहे.'

'तो आपणांला त्रास देईल असें तुम्हांला वाटतें काय ?'

'नाहीं. पण आपणांलाच त्याला त्रास द्यावा लागेल. एकाच झुंजींत हें प्रकरण समाप्त झालें अशी माझी कल्पना होती. पण आतां आपणांला 'दुसरी झुंज,' द्यावी लागणार.'

कांहीं वेळानें आनंदराव तेथें आले. त्यांच्या चर्येवर संशय, आनंद वगैरे अनेक विकारांच्या छटा दिसत होत्या. ते म्हणाले, 'झुंजार, दुर्जयाला तूं ओळखलेंस आणि त्याच्याबद्दल आम्हांला माहिती दिलीस म्हणून मी तुझे आभार मानीत आहें. प्राणवल्लभ निसटला आहे. पण त्याला पकडण्याची मी व्यवस्था केली आहे. आतां तूं त्या सिंहासनाच्या मागें लागणार आहेस काय ?'

'घाबरूं नका.' झुंजार हंसून म्हणाला, 'तें सिंहासन महाभारत स्टोअर्समध्यें असेपर्यंत मी त्याला हात लावणार नाहीं.'

'म्हणजे नंतर तूं त्या सिंहासनाच्यामागें लागणार आहेस असा ह्या बोलण्याचा अर्थ होतो. आपले सुमारें पस्तीस लक्ष रुपये पळविले असें तो दुर्जय तुझ्या नांवानें ओरडत आहे.'

'आणि तुमच्या त्या सौदागरांना वाटत होतें कीं, मी पस्तीस हजारांच्या हिऱ्यांच्या मागें आहें !' झुंजार हंसत म्हणाला.

त्यानंतर दोन दिवसांनीं प्राणवल्लभाचा पत्ता लागत नाहीं असें आनंदरावांनीं झुंजारला कळविलें. झुंजारलाहि तें प्रकरण समाप्तच झालें असें वाटलें. पण...पण त्याला खरोखरच 'दुसरी झुंज' द्यावी लागणार होती....

● ● ●

९

किशोर पर्वतेनें आपल्या भरदार शरीरयष्टीवर चढविलेल्या भपकेबाज पोषाखावरून नजर फिरविली व नंतर जवळ हंसत पण अदबीनें उभ्या असलेल्या मुकुंदकडे पाहिलें.

'मुकुंद, सर्व अगदीं व्यवस्थित आहे ना ?'

'होय साहेब, या तुमच्या पेहरावांत कुणालाहि दोष काढतां येणार नाहीं.'

मुकुंदाच्या हातांतील आपली हॅट घेत किशोर म्हणाला, 'जर तूं माझ्याजवळ नसतास तर माझे काय हाल झाले असते कुणाला ठाऊक ? मी आतां पहांटेपर्यंत परतणार नाहीं. तूं आपल्या घरावर चांगलें लक्ष ठेव.'

'होय साहेब.' अदबीनें मुकुंद म्हणाला, आणि एका टॅक्सींत बसून किशोर बाहेर निघून गेला.

मालक निघून जातांच नोकराच्या चर्येंत एकदम फरक पडला. मुकुंद हा सडपातळ, मध्यम उंचीचा आणि मध्यम वयाचा माणूस होता. किशोरकडे नोकरीला राहून त्याला अवघे तीनच आठवडे झाले होते. पण तेवढ्याच अवधींत त्यानें आपल्या मालकाची मर्जी संपादन केली होती. मालक निघून जातांच मुकुंदाच्या चर्येवरील लीनता नष्ट झाली आणि लबाडी केल्याप्रमाणें त्याची मुद्रा दिसूं लागली.

त्यानें खुशाल मालकाचाच एक चिरूट शिलगावला व नंतर टेलिफोनचा नंबर फिरविला. त्याला लागलीच कनेक्शन मिळालें. 'कोण, बापू ?' त्यानें विचारलें.

'होय.' त्याला लागलीच उत्तर मिळालें.

'मार्ग मोकळा आहे.' मुकुंद म्हणाला.

'तर मग पांच मिनिटांतच मी तेथें येतों.' बापू म्हणाला.

आणखी कांहीं न बोलतां मुकुंदानें रिसीव्हर खालीं ठेवला आणि तो चिरूट ओढीत मालकाच्या खास खुर्चीवर बसला. मुकुंद हा एका टोळीचा खास बातम्या मिळविणारा हेर होता. श्रीमंत आणि अविवाहित लोकांच्या घरांत नोकरी मिळवून व तेथली माहिती मिळवून मोक्याच्या वेळीं तो आपल्या साथीदारांना चोरी करण्यासाठी मालकाच्या घरांत घुसवीत असे.

कांहीं वेळानें दारावरील घंटी वाजली. मुकुंदानें दार उघडतांच बाह्यतः सभ्य दिसणारे दोघे इसम आंत आले. त्यांच्यापैकीं एक इसम शरीरानें बराच धिप्पाड होता आणि त्याचा पोषाख दुसऱ्यापेक्षां अधिक भपकेबाज होता. त्या माणसाचें नांव अबाजीराव असें होतें. तो अत्यंत घातकी इसम असून बदमाषांच्या टोळ्यांचा प्रमुख होता. दुसऱ्या इसमाचें नांव बापू असें असून तो सडपातळ पण अतिशय काटक होता.

आणि त्याच्या हातांत एक चामड्याची लहानशी बॅग होती.

'दगडू, या खेपेला कांहींतरी चांगला फायदा होईल अशी आशा आहे.' आपल्या सोनेरी चष्म्यांतून तेथल्या जागेवर नजर फिरवीत अंबाजीराव म्हणाला, 'तीन आठवडे आम्हीं वाट पहात होतों, तेव्हां केव्हांतरी खास फायदा व्हावा अशी माझी अपेक्षा आहे.'

'कांहीं चिंता करूं नका. या खेपेला कांहींतरी खास तुमच्या हातीं लागणारच.' दगडू ऊर्फ मुकुंद म्हणाला, 'येथें रहाणारा माणूस कांहीं काम करीत नाहीं. साऱ्या मुंबईंत कुणी त्याच्या ओळखीचेंहि नाहीं आणि त्याच्याजवळ भरपूर पैसा आहे. त्याची तिजोरी चांगली भरलेली आहे.'

'मला ती पाहू दे.' बापू म्हणाला, 'मला उघडतां येणार नाहीं अशी तिजोरी मी अद्याप पाहिलेली नाहीं.' आणि बापूनें आपल्या जवळची बॅग उघडून तिजोरी उघडण्याचीं हत्यारें मोठ्या अभिमानानें बाहेर काढलीं.

किशोर स्टेडियमवर बॉक्सिंग पहाण्यासाठीं गेला होता. पण त्याला लवकरच कंटाळा आला. बॉक्सिंग पहाण्याऐवजीं तो आपल्या शेजारीं बसलेल्या एका तरुणीकडे पहाण्यांतच गढला होता. ती तरुणी बरीच सुंदर होती आणि ती बरीच धीट आणि स्वतंत्र बाण्याची असावी हें ती बॉक्सिंगसारखा पुरुषी खेळ कुणालाहि बरोबर न घेतां एकटीच पहावयास आली होती, यावरून उघड होत होतें.

तिलाहि त्या बॉक्सिंगबद्दल विशेष कांहीं वाटत असावें असें दिसत नव्हतें. तिनें सुंदर पेहराव धारण केला होता आणि तिच्या गळ्यांत एक तेजस्वी हिऱ्यांचा हार होता. तो हार अत्यंत सुंदर आणि मौल्यवान आहे हें किशोरनें पहिल्या दृष्टिक्षेपांतच ओळखलें होतें.

त्या मुष्टियुद्धाची चौथी फेरी संपतांच ती तरुणी उठली आणि म्हणाली, 'माफ करा,'

किशोरनें उठून तिला जावयास जागा करून दिली आणि तो म्हणाला, 'तुम्हांला बसण्याचा कंटाळा आला यांत मुळींच नवल नाहीं. मला वाटतें, ते दोघेहि लढवय्ये पुढच्याच फेरीमध्यें एकमेकांच्या गळ्यांत गळा घालून झोंपीं जातील.'

ती त्याच्याकडे पाहून हसली आणि तेथून निघून गेली.

'टॅक्सी बोलवूं काय ?' बाहेरच्या चौकीदारानें विचारलें.

'नको,' ती तरुणी म्हणाली, 'माझी स्वतःची मोटार आहे.'

ती बाजूच्या गल्लींत असलेल्या आपल्या छोट्या मोटारीकडे जात होती. ती रात्र अंधारी होती आणि त्या गल्लींत दुसरें कुणीच नव्हतें. ती

आपल्या मोटारींत बसण्यापूर्वींच अंधारांत दडून राहिलेले दोन बदमाष धांवतच पुढें गेले. दोघांच्याहि पायांत रबरी बट होते. एकानें त्या तरुणीचे पाठीमागून दोन्ही हात पकडले आणि त्याचवेळीं दुसऱ्यानें तिच्या गळ्यांतील हार खेंचला. एका क्षणांत त्यांनीं आपली शिकार साधली होती.

त्या तरुणीच्या तोंडांतून कांहीं शब्द बाहेर फुटण्यापूर्वींच तेथल्या अंधारांतून तिसरा एक माणूस बाहेर पडला आणि त्यानें तिच्या गळ्यांतून हार खेंचणाऱ्याला चापल्यानें एकच ठोसा लगावला. तो माणूस जोरानें खालीं आदळला. आणि त्याच्या हातांतील हिऱ्यांचा हार बराच दूर अंतरावर जाऊन पडला. त्या हिऱ्यांतून आजूबाजूला सहस्र तेजस्वी किरणें पडलीं होतीं.

ती तरुणी आश्चर्यानें तो प्रकार पहातच राहिली. ते दोघे बदमाष त्या तरुणानें केलेल्या अचानक हल्ल्यामुळें भांबावले होते. पण आतां त्या दुसऱ्या बदमाषानें एक सुरा हातांत घेऊन त्या तरुणावर चाल केली होती.

'अग आई ग !' ती तरुणी म्हणाली.

पण तो तरुण सावध होता. त्याच्या हातांत अचानक पिस्तुल कसें आलें तें कुणालाच समजलें नाहीं. सायलेन्सर लावलेल्या पिस्तुलाचा अस्पष्ट आवाज झाला आणि त्याच वेळीं त्या बदमाषाचीं कांहीं बोटें आणि सुरा जमिनीवर गळून पडला.

किशोरनें जमिनीवर पडलेला हिऱ्यांचा हार उचलला. ते दोघे बदमाष तेथून फरारी झाले होते. अवघ्या अर्ध्या मिनिटांत तो सारा प्रकार घडला होता आणि त्यामुळें इतर कुणाच्याहि तो लक्षांत आला नव्हता.

'घ्या, हा तुमचा हार घ्या.' किशोर त्या तरुणीला म्हणाला, 'कंटाळून मीहि तुमच्या मागोमाग बाहेर पडलों आणि त्यामुळें हा प्रकार मला पहावयास मिळाला.'

'मी तुमची फार आभारी आहें.' त्याच्या हातांतील हार घेत व त्याच्याकडे आश्चर्यानें आणि आदरानें पाहात ती तरुणी म्हणाली.

'तें सर्व ठीक आहे.' किशोर म्हणाला, 'पण बाईसाहेब, भलत्याच वेळीं भलते दागिने अंगावर घालून एकटेंच बाहेर फिरणें हा माझ्यामतें मूर्खपणाच आहे.'

किशोरनें तिला तसें सांगितलें आणि तो झरझर पावलें टाकीत तेथून निघाला.

'जरा थांबा मला तुमचे आभार--'

तिनें तें वाक्य पूर्ण केलें नाहीं. कारण तें पूर्ण करण्यांत कांहीं अर्थच नव्हता. तिला ऐनवेळीं सहाय्य करणारा तो तरुण अंधारांत अदृश्य झाला होता. तसलें विलक्षण साहस तिला पूर्वीं कधींहि पाहावयास मिळालें नव्हतें. त्या तरुणानें दोघां बदमाषांना एका क्षणांत चीत केलें होतें आणि त्याला त्या प्रकाराचें यत्किंचितहि महत्त्व वाटलें नव्हतें.

किशोर झरझर पावलें टाकीत चालला होता आणि ती तरुणी कोण असावी याबद्दल विचार करीत होता. ती तरुणी त्याला आकर्षक वाटली होती हें अगदीं सत्य होतें.

त्याचवेळीं त्याच्या घरांत बापू त्याची तिजोरी उघडण्याची खटपट करीत होता आणि अंबाजीराव व दगडू ऊर्फ मुकुंद उत्सुकतेनें बापूकडे पहात उभे होते.

'बापू, घाई कर.' मुकुंद म्हणाला, 'मला त्या किशोरची भीति वाटते कारण तो बावळट इसम नाहीं. त्याच्यांत बरीच शक्ति असावी अशी माझी खात्री आहे.'

'तुला त्याची माहिती आहे काय ?'

'विशेष नाहीं. तो मध्यप्रांताचा रहिवासी आहे. जगांत आपणांला कुणीहि नातेवाईक नाहींत असें त्यानेंच मला एकदां सांगितलें आहे. बाहेर गांवाहूनच कुणीतरी त्याला भरपूर पैसे पाठवीत असते आणि माझी खात्री आहे कीं ही त्याची तिजोरी पैशानें अगदीं भरलेली असावी.'

'तूं चिंता करूं नकोस.' बापू काम करीत म्हणाला, 'पांच मिनिटांतच तिजोरी रिकामी होईल.'

'हा किशोर पर्वते म्हणजे एक गूढ आहे. ही एवढी मोठी जागा भाड्यानें घेऊन तो एकटाच येथें रहातो आणि कांहींच उद्योग करीत नाहीं.' मुकुंद म्हणाला.

'आणि त्याला कुणीतरी पोस्टानें पैसे पाठवीत असतें ?' अंबाजीनें विचारलें.

'होय. अगदीं घड्याळाप्रमाणें, नियमीतपणें रजिस्टर पोस्टानें नोटांनीं भरलेले लिफाफे त्याला मिळतात आणि ते पैसे तो बँकेंत कधींच ठेवीत नाहीं. तो ते सर्व या तिजोरींतच ठेवीत असतो. हा किशोर खरो-खरच रहस्यमय माणूस आहे.'

'असें ना ?' अंबाजी म्हणाला, 'आपणांला त्याचे पैसे मिळाले म्हणजे झालें. बऱ्याच दिवसांत आपणांला भरपूर पैसे मिळालेले नाहींत. तिजोरी उघडली कीं, पैशांची सारखी वांटणी करायची आणि येथून

निघून जायचें. दगडू, तुला कुठेंहि बाहेरगांवीं जातां येईल.'

आणखी आठ मिनिटांनीं बापूनें तिजोरी उघडली तेव्हां मुकुंदनें सांगितलें होतें तितके पैसे त्या तिजोरींत नाहींत असें आढळून आलें.

आंतल्या नोटांच्या पुडक्यांकडे पहात अंबाजी निराशनें म्हणाला, 'दगडू, ही रक्कम चार पांच हजारापेक्षां जास्त नाहीं आणि एवढ्या रकमेला आपल्या दृष्टीनें कांहींच महत्त्व नाहीं.'

दगडू ऊर्फ मुकुंद डोकें खाजवीत म्हणाला, 'मलासुद्धां नवल वाटतें. तिजोरींत बरेच पैसे असावेत अशी माझी कल्पना होती. तुम्हीं दोघे माझ्याकडे असें कां पहातां ? मी कांहीं तिजोरीतले पैसे पूर्वींच काढून घेतलेले नाहींत.'

त्या तिजोरींत एक लोखंडी पेटी होती. अंबाजीच्या सूचनेवरून बापूनें ती पेटी उघडली. आंत बरेच कागद होते. कांहीं पत्रें, बँकबुक आणि मोटारीचें लायसन्स होतें. अंबाजीनें त्या कागदांची लक्षपूर्वक तपासणी केली. पत्रें प्राणवल्लभ नांवाच्या इसमाला लिहिलेलीं होतीं. मोटारीचें लायसन्स प्राणवल्लभाचें होतें आणि बँक बुकावरहि त्याचेंच नांव होतें.

'अंबाजी, काय झालें ?' बापूनें दचकून विचारलें.

अंबाजीची चर्या उतरली होती. त्याचें धिप्पाड शरीर किंचित् कांपत होतें आणि तो घाबरलेला दिसत होता. 'अरे देवा!' तो म्हणाला, 'आपण एका ज्वालामुखीच्या तोंडावर उभे आहोंत!'

'या तुमच्या बोलण्याचा अर्थ काय ?' बापूनें विचारलें.

'हा किशोर पर्वते म्हणजे सुप्रसिद्ध प्राणवल्लभ आहे' अंबाजी म्हणाला, 'आपण आतां काय केलें आहे हें तुम्हांला माहीत आहे काय? मध्यप्रांतांतील एका घातकी, खुनी इसमाची तिजोरी आपण जबरदस्तीनें उघडली आहे.'

तें ऐकतांच तेथें भयाण शांतता पसरली. मुकुंद आणि बापू या दोघांनाहि जणुं काय अर्धांगवायूचेच झटके आले होते. प्राणवल्लभाचें नांव ऐकतांच यांच्या मुख्य पुढाऱ्याची भंबेरी उडाली होती तर त्या बिचाऱ्यांची दुर्दशा होणें साहजिकच होतें. जेव्हां त्या दोघांचे नाहींसे झालेले आवाज परत आले तेव्हां मुकुंदनें एक लहानशी किंकाळी फोडली. तो अतिशय लुच्चा होता पण त्याच्यांत मुळींच धैर्य नव्हतें.

'प्राणवल्लभ! अरे बापरे!' दगडू ऊर्फ मुकुंद म्हणाला, 'त्याचें कांहींतरी रहस्य असलें पाहिजे असें मी तुम्हांला सांगतच होतों. तो कांहींच

उद्योग कां करीत नाही तें आतां माझ्या लक्षांत आलें. तो या ठिकाणी दडी मारून बसला आहे. कांहीं आठवड्यापूर्वी पोलिसांनीं दुर्जयसिंहाला पकडलें त्यावेळी हाहि पकडला जाणार होता. पण तो अगदीं ऐनवेळीं येथून फरारी झाला—'

'मर्जी, तुझी वटवट पुरे झाली.' आतां भानावर आलेला अंबाजी रागानें म्हणाला, 'बापू आणि मीसुद्धां वर्तमानपत्रें वाचतों. पण प्राणवल्लभाची माहिती करून घेण्यासाठीं आम्हांला वर्तमानपत्रेंहि वाचण्याची गरज नाहीं. मला प्राणवल्लभाची कित्येक वर्षांपासून माहिती आहे.'

'या मूर्ख दगडूनें आपल्याला या अडचणींत पाडलें.' बापू म्हणाला.

'माझा काय अपराध?' दगडू म्हणाला, 'हा किशोर प्राणवल्लभच आहे हें मला कसें समजावें? त्याच्याकडे खूप पैसे आहेत असें मला दिसून येतांच मी नेहमींप्रमाणे तुम्हांला बातमी दिली. आतां त्याच्या सर्व वस्तु तिजोरींत ठेवूं या आणि आपण तेथून पळ काढूं या. तो प्राणवल्लभ म्हणजे साक्षात् मृत्यु आहे!'

'तो धूर्त आहे आणि अतिशय श्रीमंतहि आहे.' अंबाजी विचार करीत म्हणाला, 'मध्यप्रांत सोडण्यापूर्वी त्यानें सुमारें पन्नास लक्ष रुपये गोळा केले होते असें म्हणतात. तो खुनी आहे यांतहि शंका नाहीं.'

'तर मग आपण येथें थांबायचें कशाला?' घाईघाईनें आपलें सामान बॅगेंत भरीत बापू म्हणाला, 'आपण येथून तावडतोब बाहेर पडलें पाहिजे. दगडू, तूं पण आपल्या सामानाची बांधाबांध कर.'

'बांधाबांध करायला थांबणार आहे कोण लेकाचा!' दगडू म्हणाला. मी ज्याचें जेवण तयार करीत आहें, ज्याच्या कपड्याला इस्तरी करीत आहें तो प्राणवल्लभ आहे असें जर मला समजतें तर माझी केव्हांच हृदयक्रिया बंद पडली असती. ही तिजोरी उघडण्यांत आली आहे असे जर त्याला समजलें तर सर्वांपेक्षां मलाच अधिक धोका आहे. माझा काका पुण्याला रहातो. मी आतां मध्यरात्रीची गाडी बोरीबंदरला जाऊन पकडणार आहें.'

'थांबा' अंबाजी सावकाश म्हणाला, 'खूप पैसे मिळविण्याची ही संधि आयतीच आपणांकडे चालून आली आहे, अर्थातच आपण त्याचे ते पैसे पुन्हां तिजोरींत ठेवले पाहिजेत. एकाच धंद्यांतील माणसांनीं एकमेकाची चोरी करतां कामा नये. पण आपण येथून पळ काढतां कामा नये.'

'म्हणजे ?' बापूनें घाबरून विचारलें, 'प्राणवल्लभ परत येई-पर्यंत इथेंच थांबायचें ? अंबाजी, तुला वेड लागलें आहे काय ?'

'घाबरूं नका.' धूर्त अंबाजी म्हणाला, 'या जागेंत प्राणवल्लभ किशोर ववेते हें नांव घेऊन रहात आहे तें कां ?'

'त्याचें कारण मीच तुम्हांला सांगतों, कारण त्याला पोलिसांची भीति वाटते. तो धूर्त आहे यांत शंका नाहीं. या प्रांतांतून पळ काढण्या-ऐवजीं तो खुद्द या मुंबई शहराच्या मध्यभागीं खुशाल रहात आहे. तो शूर आहे पण त्याच्यापासून आपणाला भीति नाहीं. उलट त्यानें आपणा-लाच घाबरलें पाहिजे.'

'अंबाजी, तुला खात्रीनें वेड लागलें आहे. प्राणवल्लभ अतिशय भयंकर आहे.' दगडू म्हणाला.

'मी शेठ नागरदासाच्या मुलीबद्दल विचार करीत आहें.' अंबाजी म्हणाला.

प्रथम त्याच्या दोघां साथीदारांना त्याच्या बोलण्याचा अर्थ समजला नाहीं बऱ्याच वेळानें त्यांच्या लक्षांत आलें आणि ते दोघे अधि-कच घाबरले. बापू दिवसा रजेडी रेडिओ दुरुस्त करण्याचें काम करीत असे एक दोन आठवड्य पूर्वी बापूच्या दुकानांतल्या पाठीमागल्या खोलीत त्यांचीं बैठक भरली असतांना पळवापळवी करण्याबद्दल त्यांनीं कांही खल केला होता. पण त्यावेळीं आपणांला तो प्रकार झेपणार नाहीं असें अंबाजीनेंहि आपलें मत दिलें होतें.

शेठ नागरदास हे मुंबईतील एका प्रसिद्ध मराठी दैनिकाचे गुज-राथी मालक होते. त्या पत्राचें नांव 'लोकहित' असें होतें. पेण यथील दुर्जयसिंहाची ती भानगड झ त्यानंतर शेठ नागरदासांनीं आपल्या वर्त-मानपत्रांतून पोलिसांवर कडक टीका करण्यास सुरुवात केली होती आणि त्यामुळे पोलिसहि मुंबईतील बदमाषांच्या अगदीं हात धुवून मागें लागले होते आणि त्यामुळेंच सर्व बदमाष शेठ नागरदासांचा आत्यंतिक तिर-स्कार करूं लागले होते.

या शेठ नागरदासांची एकुलती एक मुलगी सुरेखा हिला पळविलें म्हणजे नागरदासाची चांगली खोडकी जिरेल असें त्यानें बोलून दाखविलें. सुरेखा हि वाटेल त्यावेळीं कुणालाहि बरोबर न घेतां फिरत असते अशी बातमी त्यानें मिळविली होती.

सुरेखाला पळवून तिच्या मुक्ततेसाठीं तीस लाखांची खंडणी मागा-वयाची असेंहि त्यानें ठरविलें होतें. पण जरी अंबाजीनें ती योजना सुच-विली होती तरी यशाच्या बाबतींत तो साशंकच होता आणि बापू व

दगडू या दोघांनींहि तसें करणें अत्यंत धोक्याचें आहे असें स्पष्ट शब्दांत त्याला बजाविलें होतें व तसल्या भानगडींत पडण्याची आपली इच्छा नाहीं असें स्पष्ट शब्दांत सांगितलें आणि अद्यापीहि त्यांचें तेंच मत होतें.

'अंबाजी, तुला खात्रीनें वेड लागलें आहे.' बापू म्हणाला 'मला तूं वाटेल ती तिजोरी उघडण्यास सांग पण मी कांहीं त्या भानगडींत पडणार नाही.'

'माझेंहि तेंच मत आहे.' दगडू म्हणाला, 'प्राणवल्लभ पकडला गेल्यानंतर मी वाटल्यास आणखी एखाद्या श्रीमंताला गांठेन.'

'प्राणवल्लभ पकडला जावा अशी आपली इच्छाच नाहीं.' अंबाजी म्हणाला, 'मूर्खांनों, तुम्हांला अक्कल आहे तरी काय? पळापळी करण्यांत हा प्राणवल्लभ अतिशय मुरलेला आहे. तो जर आपणाला सामील झाला तर नागरदासाची पोरगी आपणाला खात्रीनें पळवितां येईल.'

'आतां तुझा डाव माझ्या लक्षांत आला.' बापू म्हणाला, 'तुझें म्हणणें त्या प्राणवल्लभानें नाकारलें तर?'

'तें नाकारण्याची त्याची हिंमत होणार नाहीं. तो आपल्या मुठींत सांपडला आहे. या कागदपत्रांवरून मी त्याची अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतों. नंतर येथले दिवे मालवून आपण त्याची वाट पहात बसूं. तो येथें येतांच आपण प्रथम त्याचें पिस्तुल काढून घेऊं व नंतर त्याच्याबरोबर बोलण्याचें काम मी करीन.'

प्रथम त्याचे दोघेहि जोडीदार त्याला साथ देण्यास मुळींच तयार नव्हते पण अंबाजीनें त्या दोघांना समजूत घातली आणि त्या खोलींतील दिवा मालविला. कांहीं क्षणानंतर किशोर तेथें आला तेव्हां त्यास्या अंधारामुळें आपल्या खोलींत कांहीं मोकळे वाघ खेळत आहेत असें त्याला वाटलें त्याच्यावर हल्ला करण्यांत येऊन त्याला खालीं पाडण्यांत आलें आणि त्याचें पिस्तुल काढून घेण्यांत आलें.

कांहीं वेळानें जेव्हां तेथला दिवा लावण्यांत आला तेव्हां किशोरनें त्या तिघांना पाहिलें. त्या तिघांत त्याचा नोकरहि होता आणि एका धिप्पाड माणसानें त्याच्यावर त्याचेंच पिस्तुल रोखलें होतें.

'मुकुंद, हे तुझेच मित्र वाटतें?' किशोरनें किंचित् हंसत विचारलें.

दगडूला कांहीं उत्तर देतां आलें नाहीं. त्यावेळीं त्याच्यांत आणि एखाद्या प्रेतांत कांहींच फरक नव्हता. किशोरनें त्यानंतर अंबाजी आणि बापू ह्यांच्याकडे पाहिलें आणि ते दोघेहि पहाण्यालायक इसम आहेत असें लागलीच त्याचें मत बनलें.

'मी मध्येंच येऊन तुमच्या आनंदाचा विरस केलेला दिसतो.'

किशोर म्हणाला, ' पहा, अवेळीं परत आलें म्हणजे हें असें होतें. माणसानें ऐनवेळीं आपला बेत कधींहि बदलूं नये. माझ्या तिजोरीबरोबर खेळण्यास तुमचा बराच वेळ गेला असेल ?'

' तूं मोठा शूर आहेस नाहीं ?' अंबाजीनें त्याच्याकडे रोखून पहात विचारलें, ' प्राणवल्लभ, यापुढें आणखी लपंडाव खेळण्यांत कांहीं अर्थ नाहीं. '

किशोर पर्वते पर्वताप्रमाणें निश्चल उभा राहिला कांहीं वेळानें म्हणाला, ' तें मधांचें वाक्य पुन्हा बोल पाहूं. '

' तूं मघाशींच तें वाक्य अगदीं स्पष्ट ऐकलें आहेस. ' अंबाजी हंसून म्हणाला, ' मी तुला प्राणवल्लभ या तुझ्या खऱ्या नांवानें हांक मारली. तूं भयंकर इसम आहेस हें आम्हांला माहीत असल्यामुळें तूं कांहीं भलत्याच मूर्खपणा करण्यापूर्वीच आम्हीं तुझें पिस्तुल काढून घेतलें. आम्हीं तुझे शत्रु नाहीं. '

' तुम्ही माझे मित्र आहांत काय ?' शांतपणें किशोरनें विचारलें, ' सुरटया चोरांनों, गैरहजेरींत तुम्हीं माझी तिजोरी उघडलीत — '

' पण आम्हीं तुझ्या एका पैलाहि स्पर्श केलेला नाहीं ' अंबाजी म्हणाला, ' आम्हीं चोरी करण्यासाठीं येथें आलों होतों हें मी कबूल करतो. पण त्यावेळीं तूं खरा कोण आहेस हें आम्हांला माहीत नव्हतें. तूं आमचा दोस्तीचा हात झिडकारणार नाहींस ना ?'

' तें इतर बऱ्याच गोष्टींवर अवलंबून राहील. ' किशोर आपल्या अंगांतील कोट काढून तो संवयीप्रमाणें अदबीनें पुढें झालेल्या दगडूच्या हातीं देत म्हणाला, ' मुकुंद, तूं मात्र माझी बरीच निराशा केली आहेस ! तूं माझ्या खिशांतील सुटे पैसे चोरशील आणि माझ्या गैरहजेरींत माझें बरेच चिरूट ओढशील अशी फक्त माझी कल्पना होती. पण तुझ्या दोन भामटया मित्रांना तूं घरांत घुसविशील असें मात्र मला कधींच वाटलें नव्हतें. '

साहेब, तुम्हीं खरे कोण आहांत हें मला माहीत नव्हतें. ' दगडू अदबीनें म्हणाला, ' देवाची शपथ घेऊन सांगतों जर तुम्हीं कोण हें मला समजलें असतें तर मी असें केलें नसतें. तुम्हीं कुणीतरी साधे गृहस्थ आहांत अशी माझी कल्पना होती. '

' जाऊं दे, चुका सर्वांच्याच हातून होतात. ' किशोर म्हणाला, ' आणि तुम्हीं तिघांनीं तर मोठीच घोडचूक केली आहे. पण आतां तुम्हीं येथें थांबलां आहांत कशाला ? घाबरूं नका, मी कांहीं पोलिसांना बोलविणार नाहीं. '

'आम्हांला ती भीति वाटत नाहीं.' अंबाजी म्हणाला, 'मला तुझ्याबरोबर धंद्यासंबंधीं बोलावयाचें आहे आणि त्याचा मोबदला म्हणून आम्हीं तुझें रहस्य बाहेर फोडणार नाहीं.'

'पुढें बोला.' किशोर म्हणाला, 'मुळींच लाजूं नका.'

'तूंच प्राणवल्लभ असून पेण येथील त्या प्रकारानंतर या ठिकाणीं किशोर पर्वते या नांवानें रहात आहेस ही गोष्ट सी. आय्. डी. खात्याला समजावी अशी तुझी खात्रीनें इच्छा नसेल.' अंबाजी त्याच्याकडे रोंखून पहात म्हणाला, 'टेलिफोनवरून आम्हीं एक शब्द उच्चारतांच कांहीं क्षणांतच पोलिसांची फौज येथें येऊन थडकेल हेंहि तुझ्या लक्षांत असेलच?'

'पण मी आतां रजेवर आहें.' किशोर मान हलवीत म्हणाला, 'आणि तुमच्यासारख्या मूर्खांबरोबर मी कधींच सहकार्य करणें शक्य नाहीं. मी फार मोठ्या भानगडींत पडत असतों.'

'आम्हीं तुला मोठ्याच भानगडीबद्दल सांगणार आहोंत.' अंबाजी म्हणाला, 'प्रथम हा फोटो पहा आणि तुला काय वाटतें तें सांग.'

अंबाजीनें दिलेला फोटो किशोरनें लक्षपूर्वक पाहिला. अर्घ्या तासापूर्वीं स्टेडियमबाहेर त्यानें ज्या तरुणीची संकटांतून मुक्तता केली होती तिचाच तो फोटो होता.

'फार सुंदर मुलगी आहे.' तो म्हणाला, 'पण ही आहे कोण?'

'तिचें नांव सुरेखा. ती शेट नागरदासांची एकुलती एक मुलगी आहे. तूं वर्तमानपत्रें वाचीत नाहींस काय?' 'कोणती? मराठी वर्तमानपत्रें?' मराठी वर्तमानपत्रांत परस्परांतील भांडणाशिवाय दुसरें कांहींच नसतें. मी ती कधींच वाचत नाहीं.'

'तसें जरी असलें तरी शेठ नागरदासांच्या 'लोकहित' पत्रामध्यें ची गुन्ह्याबद्दल सध्यां चर्चा करण्यांत येत आहे ती तूं वाचलीच असशील? त्या वर्तमानपत्रांतील लेखनामुळेंच आमच्यासारख्यांची बरीच कुचंबणा होत आहे. म्हणून त्या नागरदासाला चांगला धडा शिकविण्यासाठीं त्याची मुलगी पळवायची आणि त्याच्याकडून बरीच खंडणी वसूल करण्याची असें मी ठरविलें आहे. नागरदास लक्षाधीश आहे आणि त्याची ती स्वतंत्र बाण्याची मुलगी वेळींअवेळीं एकटीच भटकत असते. तिला पळविणें अगदींच सोपें आहे.'

'असें काय?' तिरस्कारानें किशोरनें विचारलें, 'तुम्हीं पूर्वीं कधीं कुणाला पळविलें आहे काय?'

'नाहीं. पण......'

'मूर्खांनों, जो धंदा तुम्हीं पूर्वी केला नाहीं, त्या भानगडींत पडतां कशाला ? माझें ऐका, सर्व प्रकारामध्यें हा पळवापळवीचा प्रकार अधिक धोक्याचा आहे.'

'हें तूं आम्हांला सांगण्याची जरुरी नाहीं तें आम्हांला माहीत आहे व म्हणूनच आम्हीं आतांपर्यंत या भानगडींत पडलों नव्हतों. तूं यांतला तज्ञ असल्यामुळें तुझ्या मदतीनें हा बार उडविण्याचें आम्हीं ठरविलें आहे. तुला अर्धा वांटा मिळेल आणि राहिलेल्या अर्ध्या हिश्श्यांचे आम्हीं तीन भाग करूं.'

'हें तुमचें म्हणणें कांहीं वाईट नाहीं.' विचार करीत किशोर म्हणाला, 'पण प्रश्न असा आहे कीं, नवीन भानगडीत पडण्याची माझी इच्छा नाहीं. मध्यप्रांताची गोष्ट वेगळी होती. या प्रांतांतील परिस्थिति अगदीं भिन्न आहे. तेव्हां तुम्हीं मला या भानगडींत ओढूं नये.'

'तुला या भानगडींत पडावें लागेल.' अंबाजी म्हणाला, 'तूं आम्हांला मघांपासून अनेकदां भुरटे चोर म्हणालास माझ्या हातांत तुर्अव सायलेन्सर बसविलेलें पिस्तुल आहे तुला ठार करायला मला एक क्षणहि लागणार नाहीं आणि तुझ्या मृत्यूबद्दल पोलीसहि आंसवें ढाळणार नाहीत.

किशोर अगदीं मनःपूर्वक हंसला 'तुम्हीं मला खरोखर आवडूं लागला आहांत !' तो म्हणाला, 'तें पिस्तुल खालीं कर. मी तुमच्या बरोबर सहकार्य करण्यास तयार आहें'

'आमचा विश्वासघात करूं नकोस.' अंबाजीनें त्याला बजाविलें.

'तुम्हांला माझ्याबद्दल इतकी माहिती असतांना मी तुमचा विश्वासघात करीन कसा ? तुम्हीं आतां जा. मला नीट विचार केला पाहिजे. उद्यां आपण अधिक खुलासेवार चर्चा करूं.'

अखेरीस अंबाजीनें पिस्तुल खालीं केलें. जरी तो उलटया काळजाचा बदमाष होता तरी किशोरपुढें आपण अगदीं लहान मुलाप्रमाणें आहों असें त्याला वाटत होतें. किशोरचें व्यक्तिमत्वच तितकें प्रभावी होतें. त्यानें त्यांना बाहेर घालविलें व तेहि निमूटपणें त्याचा निरोप घेऊन तेथून निघून गेले.

किशोरनेंच त्यांच्यासाठीं दार उघडलें. त्याची दृष्टि आणि कर्णेन्द्रिय तीक्ष्ण होतें पण अंधारांत दडून राहिलेली तरुणी त्यालाहि दिसली नाहीं.

• • •

१०

शेठ नागरदासांची लाडकी लेक सुरेखा ही सामान्य तरुणी नव्हती. तिला साहसाची अतिशय आवड होती. म्हणूनच ती साहसाचा शोध करीत वेळीं अवेळीं वाटेल त्या ठिकाणीं भटकत असे. अगदीं लहानपणापासून ती स्वतंत्रवृत्तीची होती आणि भित्री नव्हती. अलीकडच्या तरुणांना ती नेभळट असें विशेषण लावीत असे.

आज रात्रीं तिच्या मनाचें बरेंच समाधान झालें होतें. तिनें किशोरसारखा चपळ आणि शूर तरुण यापूर्वीं कधींहि पाहिला नव्हता. त्यानें तिला उपकारबद्ध केलें होतें आणि तिला आभार मानण्याचीहि संधि न देतां तो निघून गेला होता. त्यानें तिचें नांवहि विचारलें नव्हतें किंवा स्वतःची ओळख करून देण्यासहि तो थांबला नव्हता.

दुसऱ्या कोणत्याहि तरुणानें त्या परिस्थितीचा फायदा घेऊन तिच्याशीं लघळपणा करण्याचा प्रयत्न केला असता. पण उलट त्यानें तिला दागिने घालून रात्रीच्या वेळीं फिरण्याबद्दल एक व्याख्यानच ऐकविलें होतें व नंतर तो तिला तेथेंच सोडून निघून गेला होता. त्याचा तो थंडपणा पाहून मात्र ती अतिशय गरम झाली होती!

सुरेखाला तो आपला मोठा अपमान झाला असें वाटलें होतें आणि अपमान गिळून स्वस्थ बसणारी ती तरुणी नव्हती. तिनें त्याचा पाठलाग सुरू केला. तरुणीला शोभण्यासारखी तिची ती वागणूक नव्हती. पण ती सामान्य तरुणी नव्हती. गेलीं पांच वर्षें ती सतत भटकत असतांना तिला गुंगवून सोडणारा माणूस प्रथमच त्या रात्रीं तिला भेटला होता आणि त्याला तेवढ्यावरच सोडून देण्यास ती तयार नव्हती.

तिनें त्याचा पाठलाग केला. रात्रीची वेळ असल्यामुळें निर्मनुष्य रस्त्यावरून पायींच पाठलाग करणें योग्य झालें नसतें. त्यामुळें ती आपल्या छोट्या मोटारींतून पाठलाग करीत होती आणि पायींच सावकाश चालणाऱ्या किशोरला ती आपल्या पाठीमागून येत आहे ह्याची मुळींच कल्पना नव्हती.

तो जेव्हां एक भव्य इमारतींत शिरला तेव्हां रात्रीच्या वेळीं त्याच्या जागेंत शिरणें योग्य होणार नाहीं असें तिला वाटलें. पण तिनें तो कोणत्या जागेंत रहातो तें बरोबर पाहून ठेवण्याचें ठरविलें होतें. त्यामुळें किशोर जेव्हां जिन्याच्या पायऱ्या चढत होता तेव्हां ती त्याच्यापासून फार दूर नव्हती.

तिनें दार उघडून त्याला आंत जातांना पाहिलें आणि त्याच्या

दारावरील नंबर पहाण्यासाठीं ती पुढें झाली. तेथील रम्य वातावरण पाहून तिची प्रथम थोडी निराशाच झाली होती. पण नंतर तो तरुण गुप्तहेर खात्यांतीलच असावा असें तिला वाटलें.

पण लगेच तिच्या मनांत शंका निर्माण झाली. गुप्तहेर खात्यांतील लोक सायलेन्सर लावलेलें पिस्तुल वापरीत असतील काय? अनेक साहसकथा वाचून तशाप्रकारच्या पिस्तुलाचा उपयोग करणारे लोक बदमाषच असतात असा तिचा ग्रह झाला होता. शेवटीं तिनें निर्णय घेतला होता. सरळ त्याच्या दारावरील घंटी वाजवून त्याच्या जागेंत शिरावयाचें आणि तो कोण आहे हें त्यालाच विचारावयाचें....

पण ती जेव्हां दाराजवळ गेली तेव्हां आंत आणखी कुणीतरी आहे असें आवाजावरून तिला वाटलें. त्या तरुणाला अशा अवेळीं भेटावयास येणारे ते लोक निघून जाईपर्यंत तेथें थांबणें आवश्यक होतें. ती कितीहि साहसी असली तरी इतर लोकांसमोर त्या अपरिचित तरुणाची भेट घेण्याची तिची तयारी नव्हती. कारण ती रात्रीची वेळ होती.

त्या विचारानें ती तेथल्या जिन्याच्या आडोशाला अंधारांत उभी राहिली. बऱ्याच वेळानें त्या तरुणाच्या खोलीचें दार उघडलें आणि तिघे इसम बाहेर पडले. त्यापैकीं दोघे सभ्य इसम दिसत होते आणि तिसरा नोकरवर्गीतील दिसत होता.

'मुकुंद, तूंहि आपल्या मित्रांबरोबर निघून जा.' सुरेखानें लांबूनच त्या तरुणाचा आवाज ओळखला. 'आज जें कांहीं घडलें त्यानंतर तूं माझ्या जवळपास असावास असें मला वाटत नाहीं. तुम्हीं तिघे उद्यां दुपारीं बरोबर तीन वाजतां येथें या.'

'मग आपलें ठरलें.' अंबाजी म्हणाला, 'पण आमचा विश्वासघात करण्याचा प्रयत्न करूं नकोस. कारण तूं आमच्या पक्का तावडींत सांपडला आहेस.'

'मित्रा, तेंच तेंच पुन्हां पुन्हां बोलण्याची तुझी संवय अतिशय वाईट आहे.' किशोर म्हणाला, 'ती संवय सोडण्याचा प्रयत्न कर. जरा एक क्षणभर थांब, त्या नागरदासाच्या पोरीचा फोटो माझ्याजवळ देऊन ठेव. मला त्या फोटोचा अभ्यास करावयाचा आहे.'

अंधारांत दडून बसलेली सुरेखा दचकली. मोठ्या परिश्रमानें तिनें आपलें तोंड घट्ट आंवळून धरलें, नाहींतर तिच्या मुखावाटें आश्चर्योद्‌गार निघाला असता. नागरदासाची पोर! ते चौघे आतांपर्यंत आपल्याबद्दलच चर्चा करीत असावेत काय? ती गोष्ट तिला इतकी अशक्य वाटली कीं, आपण जणुं स्वप्नांतच आहोंत असें तिला वाटूं लागलें.

तिनें दुरूनच, अंबाजीनें त्या तरुणाला दिलेला फोटो पाहिला. आंतल्या दिव्याचा स्वच्छ प्रकाश बाहेर पडला होता. त्या प्रकाशांत तिला किशोरच्या हातांतील तो फोटोहि चुटपुटता दिसला आणि तो फोटो आपलाच आहे हें तिनें ओळखलें.

ती खरोखरच ांबावली होती. तिनें जें थोडेसें संभाषण ऐकलें होतें त्यावरून, तीं सभ्य दिसणारीं माणसें सभ्य नाहींत हें तिच्या लक्षांत आलें होतें. आणि त्यामुळें तिची एक निराळीच कल्पना झाली. स्टेडियमच्या समोर घडलेला तो प्रकार त्या तरुणानें हेतुपूर्वकच घडवून आणला असावा असें तिला वाटलें आणि आपणाला त्याचा पाठलाग करण्याची आणि त्याच्या दाराबाहेर दडून रहाण्याची सुबुद्धि सुचली याबद्दल ईश्वराचे आभार मानीत आणि त्या लबाड तरुणाला शिव्या देत ती तेथून निघून गेली.

किशोरचें दार बंद झाल्यावर त्यानें सिगारेट पेटविली आणि हातांतील फोटोकडे पहात तो म्हणाला, ' ताई, तुझी ही बरीच भानगड दिसते. तूं सुंदर आहेस यांत मुळींच शंका नाीं. पण माझी बायको तुझ्यापेक्षांहि सुंदर आहे. मी तुझ्यामागें लागलों आहें असा जर तिला संशय आला तर ती विजू मला फाडून खाईल. '

किशोर पवते अंबाजी समजत होता त्याप्रमाणें प्राणवल्लभ नव्हता. आणि आजूबाजूचे लोक समजत होते त्याप्रमाणें तो किशोर पर्वतेहि नव्हता. तो ' दुसरी झुंज ' देण्यासाठीं पुन्हां झुंजार–महाल सोडून बाहेर पडलेला झुंजार होता.

त्यानें तसें करण्याचें कारणहि अगदीं सोपें होतें. प्राणवल्लभ आपणांला त्रास देण्याचा प्रयत्न करील काय ? असा प्रश्न जेव्हां विजयेनें त्याला विचारला होता तेव्हां तो हंसला होता. पण प्राणवल्लभाला त्यानें बरोबर ओळखलें नव्हतें.

पेणची ती भानगड झाल्यानंतर दोनच दिवसांनीं झुंजार पेस्साहेबांकडून मिळविलेल्या आपल्या झुंजार स्पेशल मोटारींतून मरीन ड्राईव्हवरून चौपाटीकडे जात असतांना एका बाजूच्या इमारतींतून त्याच्यावर दोन गोळ्या झाडण्यांत आल्या होत्या. त्यांपैकीं एका गोळीनें त्याच्या समोरच्या कांचेचें नुकसान केलें होतें आणि दुसरीनें त्याच्या नवीन हॅटला एक छिद्र पाडलें होतें.

हा प्रकार अंधार पडण्याच्या सुमारास झाला होता आणि रस्त्यावर बरीच रहदारी असतांनाहि कुणाच्या लक्षांत आला नव्हता. बाजूच्या

प्रचंड चार मजली इमारतीमध्यें त्यावेळीं शोध करण्यापासून कांहींच फायदा झाला नसता.

त्यानंतर दोन दिवसांनीं विजया आणि झुंजार आगगाडीनें सहज दादर स्टेशनापर्यंत जाण्यासाठीं बोरीबंदरवर गले असतांना स्टेशनांत उभी रहाण्यासाठीं येणाऱ्या धांवत्या गाडीपुढेंच कुणीतरी पाठीमागून झुंजारला ढकललें होतें. त्यावेळीं एखाद्या सर्कशींतहि पहावयास मिळणार नाहीं अशा प्रकारची तारेवरील कसरत त्या प्लॉटफॉर्मवर केल्यामुळेंच झुंजारचा प्राण वांचला होता. स्टेशनावरील अफाट गर्दीत त्याला ढकलणारा माणूस नेमका शोधून काढणें अशक्य होतें.

'या गोष्टी हंसण्यावारी नेण्यांत कांहींच अर्थ नाहीं.' विजया म्हणाली, 'कुणीतरी तुमचा कांटा काढण्याचा प्रयत्न करीत आहे आणि तो प्राणवल्लभच असला पाहिजे असा माझा तर्क आहे.'

'खुद्द प्राणवल्लभ तसा प्रयत्न करीत असेल असें मला वाटत नाहीं.' झुंजार म्हणाला, 'आज सकाळींच मी आनंदरावांना भेटलों होतों. प्राणवल्लभ मुंबईंतच कुठेंतरी दडी मारून बसला आहे असें त्यांनीं मला सांगितलें. पण पोलिसांच्या भीतीमुळें तो स्वतः उघडपणें बाहेर पडणार नाहीं. माझ्यावर रायफल झाडण्यासाठीं व मला गाडीखालीं ढकलून देण्यासाठीं त्यानें खूप पैसे खर्च करून भाडोत्री गुंडांची नेमणूक केली असावी. हा प्रकार असाच पुढेंहि चालू राहिला तर मलाहि माझें डोकें फिरवावें लागेल.'

'डोकें फिरविण्यासाठीं तुमचें डोकें तुमच्या मानेवर राहिलें तरच ना ?' विजयेनें विचारलें, 'प्राणवल्लभनें स्वतः किंवा त्याच्या हस्तकांकरवीं तुमचा कांटा काढण्याचे आतांपर्यन्त दोन प्रयत्न केले व ते केवळ तुमच्या सुदैवामुळेंच फसले. तिसऱ्या खेपेला त्यांना यश येणार नाहीं कशावरून ?

आणि याच संभाषणामुळें झुंजारला किशोर पर्वते बनावें लागलें. किशोर पर्वते हा मध्यप्रांताचा रहिवासी होता. तो मुंबईंत येतांच सी. आय्. डी. ऑफिसांत गेला होता व त्यानें केवळ सुरक्षिततेच्या दृष्टीनेंच आपण किशोर पर्वते हें नांव धारण केलें आहे असें सांगितलें होतें. किशोरनें सांगितलेली हकीकत मोठी विलक्षण आणि गंमतीची होती.

त्याचें खरें नांव प्राणवल्लभ आचार्य असें होतें. आणि त्यामुळेंच त्याला अनेक प्रकारचा त्रास भोगावा लागत होता. मध्यप्रांतांतील शिवणीच्या जंगलांतील एका खेड्यांत रहाणारा तो तरुण होता. त्याच्या बापाची कित्येक दिवस ओसाड पडलेली एक कोळशाची खाण होती.

एकाएकीं त्या खाणींतून उत्कृष्ट प्रकारचा कोळसा विपुल प्रमाणांत मिळूं लागला व त्यामुळें तो सामान्य तरुण कांहीं दिवसांतच श्रीमंत आणि प्रसिद्ध माणूस बनला.

पण जोंपर्यंत तो सामान्य, खेडवळ आणि गरीब तरुण होता तोंपर्यंत तो आनंदानें रहात होता. पैसा व त्याबरोबर प्रसिद्धि मिळतांच त्याच्या आयुष्यांतील सारा आनंद नष्ट झाला होता आणि त्याचें कारण म्हणजे त्याचें नांव प्राणवल्लभ आचार्य हें होतें. तें नांव मध्यप्रांतांतील एका नामांकित डाकूचें होतें. खरें पाहिल्यास या वल्लभाचा या प्राणवल्लभाशीं नामसादृश्याखेरीज दुसरा कांहींच संबंध नव्हता.

प्राणवल्लभ आचार्य पैसे हातांत खेळूं लागतांच जबलपूर येथें चार दिवस जिवाची चैन करण्यासाठीं गेला. जेव्हां त्यानं आपलं नांव सांगितलं तेव्हां हॉटेल मॅनेजर तें ऐकतांच थरथर कापूं लागला होता. तो आपल्या खोलींत गेला नाही तोंच तेथें पोलीस येऊन थडकले. त्यानंतर त्याला उलट सुलट प्रश्न विचारण्यांत आले. पोलीस ठाण्यापर्यंत त्याची धिंड काढण्यांत आली. जेव्हां तो निराळाच प्राणवल्लभच आहे असें सिद्ध झाले तेव्हां त्याला त्या हॉटेलांत रहाण्याची परवानगी देण्यांत आली, पण तरीहि लोक आणि पोलीस त्याच्याकडे संशयानें पहातच होते.

त्यानंतर नागपुरांतहि तोच प्रकार अधिक मोठ्या प्रमाणावर घडला. त्यामुळें प्राणवल्लभानें एका नामांकित वकिलाचा सल्ला घेण्याचा शहाणपणा केला. वकिलानें त्यानें कायदेशीर दुसरें नांव धारण करावें असा सल्ला दिला. प्राणवल्लभाला तें आवडलें नाहीं. कारण त्याच्या आईनें त्याचें तें नांव मोठ्या प्रेमानें ठेवलें होतें. शेवटीं तडजोड म्हणून त्यानें तात्पुरतें किशोर पर्वते हें नांव धारण करण्याचें व कांहीं दिवस दूर मुंबईंत रहाण्याचें कबूल केलें.

आपण मुंबईंत राहिल्यास आपल्या गैरहजेरींत पोलीस डाकू प्राणवल्लभाचा बंदोबस्त करतील व पुन्हां आपल्याला उघडपणें मध्यप्रांतांत आनंदानें रहातां येईल अशी त्याची कल्पना होती. पण माणूस कल्पना करतो एक आणि घडतें भलतेंच! ज्या दिवशीं त्यानें मुंबईंत पाऊल ठेवलें त्याच दिवशीं त्याला पेण येथें झालेल्या दुर्जयाच्या भानगडीची हकीकत वर्तमानपत्रांत वाचावयास मिळाली, व ज्याला तो घाबरत होता तो डाकू प्राणवल्लभ खुद्द मुंबईंतच कुठेंतरी आहे हें जेव्हां त्याला समजलें तेव्हां त्याची काय स्थिति झाली असावी याची कल्पनाच करणें बरें.

त्यामुळें त्याला सरळ सी. आय्. डी. ऑफिसांत जावें लागलें.

त्याची हकीकत अधिकाऱ्यांनीं सहानुभूतीनें ऐकली व त्याला किशोर पर्वते या नांवानेंच मुंबईंत रहाण्याचा सल्ला दिला. डाकू प्राणवल्लभ सर्व मार्ग बंद केल्यामळें मुंबईंतच दडून बसला आहे. पण त्याच्याजवळ पैसा नसल्यामुळें त्याला कधीं ना कधीं बाहेर पडावें लागेलच व त्यावेळीं त्याला पकडण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं असें अधिकाऱ्यांनीं किशोरला सांगितलें.

दुसऱ्याच दिवशीं आनंदरावांनीं एक गंमत म्हणून ती हकीगत झुंजारला सांगितली. त्यावेळीं त्यांच्या बोलण्याकडे आपलें फारसें लक्ष नाहीं असें झुंजारनें भासविलें, पण घरीं परततांच त्यानें विजयेला आपली नवीन योजना सांगितली.

'विजू, या किशोरचा आपणांला चांगला उपयोग करून घेता येईल. जरी सी. आय्. डी. अधिकाऱ्यांनीं त्याला आश्वासन दिलें असलें तरी तो अस्वस्थ असणार तेव्हां त्याला हॉटेल सोडून भाड्याची जागा घ्यावयास सांगून कुठेंतरी दूर पाठविलें तर मोठी गंमत होईल.'

त्याला जर कुठें दूर पाठवावयाचें असेल तर त्यानें भाड्यानें जागा घेण्यांत काय अर्थ आहे?' विजयेनें गोंधळून विचारलें.

'कारण त्या भाड्याच्या जागेंत मीच किशोर पर्वते म्हणून राहीन.' झुंजार हंसून म्हणाला, 'तो उंचीनें व शरीरयष्टीनें माझ्याचसारखा आहे, हें खुद्द आनंदरावानींच मला सांगितलें आहे. मुंबईंत त्याच्या ओळखीचें कुणीहि नाहीं किंवा त्याला कुणी नातेवाईकहि नाहींत. त्यामुळें तोतया किशोर बनणें अगदींच सोपें आहे.'

'तें खरें.' विजया विचार करीत म्हणाली, 'त्यामुळें तुम्हांला आरामानें रहातां येईल व प्राणवल्लभाकडून तुम्हांला त्रासहि होणार नाहीं.'

झुंजार हंसून म्हणाला, 'तुझें म्हणणें अगदीं बरोबर आहे. पण माझी कल्पना कांहीं वेगळीच आहे—'

झुंजारनें लागलीच किशोरची भेट घेतली आणि त्याला आपली ओळख करून दिली. त्याची योजना किशोरनें प्रथम निरुत्साहानेंच ऐकली. पण झुंजारचें व्यक्तिमत्व प्रभावी होतें. त्यानें किशोरला डाकू प्राणवल्लभला पकडून त्याचा त्रास कायमचा दूर करण्याचें आश्वासन देतांच किशोर मद्रास येथें कांहीं दिवस निघून जाण्यास तयार झाला.

मध्यप्रांतांतील आपल्या खाणीच्या मॅनेजरकडून अधूनमधून रजिस्टर्ड पोस्टानें आपले पैसे येत रहातील असें त्यानें झुंजारला सांगितलें

होतें. किशोरनें घेतलेल्या भाड्याच्या जागेंत एक तिजोरी ठेवून त्या तिजोरींत त्याचे सर्व पैसे व इतर कागदपत्र व्यवस्थित ठेवण्याचें झुंजारनें कबूल केलें. त्यानंतर सर्व कांहीं सुरळीत जमून आलें.

किशोरनें मुंबई सोडली व झुंजार किशोर पर्वते बनून त्या भाड्याच्या जागेंत राहूं लागला. पहिल्याच दिवशीं त्यानें एक नोकर ठेवला होता. पण दोन आठवड्यांतच अचानक ही नवीन भानगड निर्माण झाली होती व त्यामुळें झुंजारला विचार करण्यास बरेंच खाद्य मिळालें होतें. तो टबलावर ठेवलेल्या सुरेखाच्या फोटोकडे पहात विचार करीत होता.

अंबाजीच्या टोळीचा तो क्षणांत धुव्वा उडवूं शकत होता. पण त्याला विजयेबरोबर चर्चा करण्याची आवश्यकता वाटली. तो कांहीं वेळानें बाहेर आला व जवळच असलेल्या झुंजार–महालांत गेला. विजयेनें ती नवीन भानगड ऐकली.

'मला त्या अंबाजीची किंवा त्याच्या साथीदारांची चिंता वाटत नाहीं.' विजया म्हणाली, 'मला त्या नागरदासाच्या पोरीची चिंता वाटते. आज रात्रींच तुमची आणि तिची भेट झाली होती. तुम्हीं तिला संकटांतून वांचविलेंत. तिचा हार पळविणाऱ्यांचा आणि त्या अंबाजीचा कांहीं संबंध असेल काय ?'

'नाहीं. मला तसें वाटत नाहीं.'

'तुम्हीं भाग्यवान आहांत.' विजया म्हणाली, 'सुंदर तरुणी-बरोबर तुमचा हमखास संबंध येतो.'

'हें बघ विजू, ती सुंदर आहे असें दिसतांच मी खालीं मान घालून तेथून निघून गेलों !'

'होय. पण तुम्हीं तिचा एक फोटो मिळविला आहे. मी तिला पाहिली आहे. तिला जर संधि मिळाली तर ती तुम्हांला लागलीच तिच्या ताटाखालचें मांजर बनवील––'

'विजू, नशीब म्हणतात तें हेंच. जिला मी संकटांतून वाचविलें त्याच सुरेखाला पळविण्याचा अंबाजीनें डाव रचला आहे. प्राणवल्लभाचा एकहि फोटो अद्याप वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेला नाहीं. म्हणूनच ते बदमाष फसले मीच प्राणवल्लभ अशी त्यांची समजूत आहे. त्यामुळेंच त्यांनीं मला आपली ती योजना सांगितली. विजू, या नवीन घटनेचा मी चांगला उपयोग करून घेण्याचें ठरविलें आहे.'

'तो कसा काय ?' विजयेनें विचारलें.

झुंजार हंसून म्हणाला, 'आपण खरोखरच त्या नागरदासाच्या

सुरेखाला पळविलें पाहिजे. विजू, पुढें फार गंमत होणार आहे....'

० ० ०

११

'गंमत तर खरीच!' विजया त्याच्याकडे टक लावून पहात म्हणाली. 'सुरेखासारख्या सुंदर तरुणीला पळविण्याच्या कामीं मी तुम्हांला मदत करीन अशी जर तुमची कल्पना असली तर प्रथम एखाद्या तज्ञ डॉक्टराकडून तुमचें डोकें तपासून घ्या.'

'अंबाजी आणि त्याचे साथीदार यांनीं विस्तवाशीं खेळ मांडला आहे. व त्यामुळें त्यांना चांगला धडा शिकविला पाहिजे.' झुंजार म्हणाला, 'त्यांना तो गुन्हा करण्याचा प्रयत्न करूं द्यावयाचा व अगदीं ऐनवेळीं त्यांच्यावर झडप घालायची. त्या अंबाजीला चांगला दीर्घकाल तुरुंगांत पाठविला पाहिजे. त्याला पहातांच मला त्याचा तिरस्कार वाटूं लागला आहे. असला पळवापळवीचा धंदा अत्यंत नीचपणाचा तसाच धोक्याचा आहे हें मुंबईंतल्या इतर बदमाषांनाहि शिकविलें पाहिजे.'

'अगदीं ऐनवेळीं सुरेखाची सुटका करून तिला दिपवून सोडावयाचें हाच तुमचा खरा हेतु आहे ना?' विजयेनें विचारलें.

'विजू, मी तिचा अगदीं उघडपणें अपमान केला आहे हें तुला किती वेळां सांगावयाचें? तिची सुटका करण्याचें काम मी तुझ्यावरच सोंपवितों. मग तर झालें ना?'

'माझ्यावर? तुम्हीं काय करण्याचें योजिलें आहे त्याची तुम्हांला पूर्ण कल्पना आहे ना? तुम्हांला तिला खरोखरच पळवावें लागेल. कारण नुसतें नाटक करून अंबाजीला शिक्षा होणार नाहीं.'

'तिला खरोखरच पळवायचें आहे.' झुंजार म्हणाला, 'त्या दडी मारून बसलेल्या प्राणवल्लभाला शक्य तितक्या लवकर बाहेर काढलें पाहिज. त्याबद्दल माझ्या कांहीं कल्पना आहेत. पण मी त्या तुला सांगत नाहीं. उद्यां दुपारीं तीन वाजतां अंबाजीची टोळी मला भेटणार आहे. ते मलाच प्राणवल्लभ समजत असल्यामुळें त्यांना चकित करून सोडील अशी योजना आपणांला आंखली पाहिजे.'

'तुम्हीं ही बातमी वाचलीत काय?' विजया 'संध्याकाळ'मध्यें प्रसिद्ध झालेली एक बातमी त्याला दाखवीत म्हणाली, 'संध्याकाळीं मलबार हिलवरील आपल्या बंगल्यांत आपल्या मुलाच्या चोविसाव्या वाढदिवसानिमित्त नागरदास एक थाटाची मेजवानी देणार आहेत, त्यावेळीं

ती सुरेखाहि तेथें असणार व ती लहान बहीण असल्यामुळें तिच्यापेक्षां लोक तिच्या भावाकडेच अधिक लक्ष पुरविणार--'

'सुरेखा जर जवळपास असली तर तिच्या भावाकडे कुणी ढुंकूनहि पहाणार नाहीं.' झुंजार म्हणाला, 'पण तिला बंगल्यांतून पळवायची कशी तें मला सांग. तो चमत्कार कसा घडवून आणावयाचा?'

'तिची शैला नांवाची चुलत बहीण माझ्या ओळखीची आहे तिच्या-मार्फत मी आपणांसाठीं त्या मेजवानीचें आमंत्रण मिळवूं शकतें.'

'ठीक आहे. पण मला त्या मेजवानीला किशोर पर्वते या नांवानेंच हजर राहिलें पाहिजे. त्या बंगल्याच्या मागेंपुढें बाग असणारच! माझी व तिची ओळख झालेलीच आहे. मी तिला बागेंतील अगदीं एकांतांतल्या कोंपऱ्यांत घेऊन जाईन--'

'नाहीं, तसें चालायचें नाहीं.' विजया ठांसून म्हणाली, 'तुम्हीं दुपारीं त्या टोळीला भेटाल तेव्हां त्यांना दहा वाजण्याच्या सुमारास तेथें एक बंद मोटार तयार ठेवण्यास सांगा. त्याचप्रमाणें आनंदरावांनाहि त्यावेळीं जवळपास दबा धरून बसण्यास सांगा. तुमच्या त्या बदमाष मित्रांनीं सुरेखाला जबरदस्तीनें त्या मोटारींत घातलें कीं, आपलें काम झालें. तुम्ही त्यांत प्रत्यक्ष भाग घेतलात तर त्यांच्याबरोबर तुम्हींहि गुन्हे-गार ठराल व ती सुरेखाच तुम्हांला तुरुंगाचा रस्ता दाखवील.'

'तें खरें. पण आपल्याला अधिक तपशीलवार योजना आंखली पाहिजे.' झुंजार म्हणाला, 'अंबाजीला त्या पोरीला घेऊन किती दूर जाऊं द्यायचें व आनंदरावांना कधीं इषारा करावयाचा तें आपण ठरविलें पाहिज. आनंदरावांना यांत ओढणें योग्य होईल काय?'

'त्यांच्यासारखा कुणीतरी अधिकारी जवळपास असल्याशिवाय अंबाजीच्या टोळीनें गुन्हा केला हें तुम्हांला कसें सिद्ध करतां येईल? जर त्या मुलीला खरोखरच धोका नसला तर हें नाटक त्यांनीं नागरदासकडे पैशाची मागणी करीपर्यंत चालू ठेवावें असें माझें मत आहे.'

त्यानंतर त्या दोघांनीं बरीच चर्चा करून ती सर्व योजना तयार केली. झुंजार तेथून बाहेर पडला त्यावेळीं बरीच रात्र झाली होती. पण सरळ बिऱ्हाडीं न जातां त्यानें एकदोन अड्ड्यांना भेट दिली व निष्का-ळजीपणानें बोलून त्यानें कांहीं अफवा पसरविण्याची व्यवस्था केली.

दुसऱ्या दिवशीं तीन वाजायला दहा मिनिटें असतांनाच पाहुण्यांच्या स्वागताची त्यानें जय्यत तयारी केली होती. सकाळपासून त्याचें व विजयेचें दोन वेळां टेलिफोनवरून बोलणें झालें होतें व तें समाधानकारकच होतें. तिनें त्या रात्रीच्या मेजवानीच्या शैलाकडून प्रवेशपत्रिका मिळ-

विल्या होत्या. तिनें आनंदरावांनाहि टेलिफोन करून त्यांच्याबरोबर मुलाखतीची वेळ ठरविली होती. अगदीं शेवटपर्यंत आनंदरावांना बातमी द्यावयाची नाहीं असें त्या दोघांचें ठरलें होतें.

'हे लेकाचे वेळेवर आले म्हणजे झाले!' तीन वाजायला एक मिनिट असतांना झुंजार स्वतःशींच म्हणाला.

त्या तिघांपैकीं दोघे अगदीं वेळेवर तेथें आले. बरोबर तीनच्या ठोक्याला दारावरील घंटी वाजली. झुंजारनें दार उघडतांच अंबाजी व बापूची जोडी आंत आली.

'या, अगदीं वेळेवर आलांत.' झुंजार हंसून त्यांचें स्वागत करीत म्हणाला, 'पण आमचा मुकुंदा दिसत नाहीं?'

'त्याला आम्हीं बाहेर मोटारींत बसविलें आहे.' अंबाजी म्हणाला, "आम्हीं त्याच्याबरोबर येथें आलों आहोंत हें पहाणाऱ्याला संशयास्पद वाटलें असतें.'

'तुमचें म्हणणें बरोबर आहे.' झुंजार विचार केल्यासारखें भासवीत म्हणाला, 'बोला, तुम्हांला कोणतें पेय हवें?'

'आम्हीं पेय घेण्यासाठीं येथें आलों नाहीं.' अंबाजी म्हणाला, "प्राणवल्लभ, आपण आपल्या कामासंबंधींच बोलूं. जर तूं कांहीं योजना आंखली नसलीस—'

'माझी योजना तयार आहे. ती पोरगी आपल्या ताब्यांतच आहे असें समजायला हरकत नाहीं.' झुंजार हंसून म्हणाला, 'सर्व ठरलें आहे. आज रात्रींच तिला पळवायची.'

'आज रात्रीं?' आश्चर्यानें अंबाजी म्हणाला.

'कां? फार घाई करूं नये असें तुझें म्हणणें आहे काय?' झुंजारनें विचारलें.

'नाहीं. पण मी त्याचा नुसता विचारहि केला नव्हता—'

'मी जेव्हां एखादी कामगिरी हातीं घेतों तेव्हां ती अगदीं झटपट उरकून टाकतों. आज रात्रीं नागरदास आपल्या बंगल्यांत एक थाटाची मेजवानी देणार आहे. ती पोरगी तेथें असणारच व मीहि तेथें असणार. ही पहा माझी आमंत्रण-पत्रिका. ती मी कशी मिळविली तें विचारूं नका. तें आमचें 'ट्रेड सीक्रेट' आहे.'

अंबाजी व बापू त्या भपकेबाज आमंत्रणपत्रिकेकडे पहातच राहिले. तें आमंत्रण किशोर पर्वतेला देण्यांत आलें होतें. त्यांनीं जेव्हां आपल्या माना आश्चर्यानें वर केल्या तेव्हां झुंजार टेबलावर एक नकाशा पसरीत होता.

'हा नकाशा तुम्हीं नीट ठेवा. हा नागरदासाच्या बागेचा नकाशा आहे. ही खूण पाहिलीत काय? या ठिकाणीं एक दार आहे. हें दार बागेच्या एका टोंकाला असून तेथें असलेल्या झुडुपामुळें तें बंगल्याच्या कोणत्याहि भागांतून दिसणें शक्य नाहीं. बागेच्या सभोंवतालीं भिंत आहे. भिंतीपलीकडील रस्त्यावर तुम्ही एक बंद खिडक्यांची मोटार तयार ठेवा. बरोबर दहा वाजतां तुम्हीं तेथें हजर असलें पाहिजे. मी शिटी वाजविली कीं तुम्हीं तें दार उघडून आंतल्या बागेंत यावयाचें' झुंजारनें त्यांना शिटीचेंहि प्रात्यक्षिक करून दाखविलें.

'तें दार आंतून बंद असेल तर?' बापूनें विचारलें.

'तूं अगदींच अडाणी दिसतोस.' झुंजार म्हणाला, 'तें दार उघडें ठेवणें माझेंच काम नाहीं काय? मी त्या पोरीला घेऊन त्या दाराजवळच असणार. काय घडतें आहे हें तिच्या लक्षांत येण्यापूर्वी तुम्हीं तिला मोटारींत घालून पसार होऊं शकाल.'

'आणि तूं तेथें तिला घेऊन आला नाहींस तर?'

'हें पहा मूर्खा, मी या प्रकरणाचा सूत्रधार नाहीं काय?' कठोर स्वरांत झुंजार म्हणाला, 'तुम्हीं तुमचें काम करा, मी माझें करतों. मी अशा प्रकारें माझी योजना आंखली आहे कीं, आपली मुलगी नाहींशी झाली आहे हें नागरदासाला निदान तीन तास तरी समजणार नाहीं आणि तेवढ्या अवधींत आपण तिला एखाद्या सुरक्षित ठिकाणीं नेऊं.'

'ठीक आहे.' अंबाजी घाईघाईनें म्हणाला, 'तुझी योजना अगदीं सोपी दिसते. मला वाटलें होतें तितकें हें पळवापळवीचें काम कठीण नाहीं. पण, त्या मुलीला मोटारींत घातल्यानंतर पुढें काय?'

'पुढें काय करावयाचें तेंहि मी ठरविलें आहे. अगदीं दूर कित्येक मैलांवर असलेल्या एका जुनाट घरांत तिला कैद करून ठेवावयाचें आहे. पुढील सर्व तुम्हीं माझ्यावर सोंपवा. तिला तिच्या बंगल्यांतून बाहेर काढणें ही नुसती सुरुवात आहे पण एक गोष्ट लक्षांत ठेवा, त्या मुलीला जरासुद्धां त्रास होतां कामा नये.'

'प्राणवल्लभ, निदान या कामापुरता तरी तूं आमचा पुढारी आहेस. तूं सांगशील त्याप्रमाणें करूं. मला तो नकाशा पुन्हां एकदां पाहूं दे.'

त्यानंतर बराच वेळ चर्चा केल्यानंतर बापू आणि अंबाजी निघून गेले. त्यानंतर पांच मिनिटांनीं झुंजार बाहेर पडला. पण त्याच वेळीं एक छोटी मोटार त्याच्या पुढ्यांतच येऊन राहिली.

'अहो महाराज, नमस्ते!' त्या मोटारींतून ओळखीचा स्वर निघाला. 'इतक्या लवकर आपली पुन्हां भेट झाली हा विलक्षण योगायोगच

म्हणावयाचा.'

झुंजारनें मनांतून तिला शिव्याच हांसडल्या. पण वरकरणीं हंसत त्यानें तिला नमस्कार केला. सुरेखा एकटीच मोटार चालवीत होती आणि दिवसाच्या प्रकाशांत ती अधिकच सुंदर दिसत होती. ती जरी हंसत होती तरी तिच्या नेत्रांतील कठोरतेची छाया त्याच्या तीक्ष्ण दृष्टीला स्पष्ट दिसली. त्यावेळचें तिचें आगमन अनेक प्रकारें अनिष्ट होतें.

आदल्या रात्रीं सुरेखानें बराच विचार केला होता. आणि शेवटीं तिनें निर्णय घेतला होता कीं आदल्या रात्रीं ज्यानें आपणांला सोडविलें तो बदमाष असावा. त्याच्या खोलींतून तिनें अंबाजीला व दुसऱ्या दोघांना बाहेर पडतांना पाहिलें होतें, त्यांचें कांहीं बोलणें तिनें ऐकलें होतें आणि अंबाजीनें त्या तरुणाला आपला फोटो दिला तेंहि पाहिलें होतें.

कांहीं वाईट हेतूनें आपली ओळख करून घेण्यासाठींच त्या तरुणानें आपल्या साथीदाराकडून तिचा हिऱ्याचा हार पळविण्याचें नाटक केलें व नंतर आपण तिची त्या संकटांतून सुटका करीत आहों असें भासविलें, असा तिचा ग्रह झाला होता आणि त्याबद्दल अर्थातच तिला कुणीहि दोष देऊं शकला नसता.

त्यानंतर सकाळींच निमंत्रित पाहुण्यांची यादी जेव्हां तिनें पाहिली तेव्हां किशोर पर्वतेचें नांव पाहून तिला आश्चर्य वाटलें आणि रागहि आला. तें आमंत्रण त्यानें अगदीं उशिरां कुणातरी एका बाईच्या मध्यस्तीनें मिळविलें होतें. आपल्याशींच संबध असलेल्या कोणत्याहि भानगडींत तो तरुण गढला असावा असा तिनें साहजिकच तर्क केला आणि त्यासंबंधीं स्वतःच तपासणी करण्याचें तिनें ठरविलें.

त्यासाठींच ती त्या किशोरची भेट घेऊन त्याला खास समज देण्याच्या हेतूनें तेथें आली होती. तिची मोटार तेथें पोहोंचली तेव्हां आदल्या रात्रींचा तो सभ्य चोर फिरावयास बाहेर पडत असतांना तिला दिसला होता आणि तिनें त्याच्या पुढयातच आपली मोटार थांबविली.

'तुम्हीं मलाच भेटायला आलां होतां कीं काय ?' झुंजारनें कुतूहलानें विचारलें.

'होय, मी तुमच्याच मुलाखतीसाठीं आलें होतें.' ती म्हणाली.

'पण तुम्हांला माझी ही —'

'जागा कशी सांपडली असेंच ना ?' तिनें विचारलें, 'ती बरीच मोठी हकीकत आहे. पण ठरल्याप्रमाणें तुमची तीन वाजतां त्या तिघां दोस्तांबरोबर मुलाखत झाली कीं नाहीं ? मला वाटलें कीं तुम्हांला थोडा वेळ द्यावा —'

'हें पहा, तुमची कांहींतरी गैरसमजूत झाली आहे.' झुंजारनें मनःपूर्वक बोलण्यास सुरवात केली.

'अगदीं बरोबर.' ती मध्येंच म्हणाली, 'कित्येक बाबतींत माझी गैरसमजूत झाली होती. आतां तुम्हीं कुठें बाहेर निघालां आहांत काय? फिरायलाच निघालां असाल तर मोटारींत बसा. म्हणजे तुमचें फिरणेंहि होईल आणि माझें बोलणेंहि होईल.'

आजूबाजूचे लोक आपणांकडे पहात आहेत हें लक्षांत घेऊन झुंजार तिच्याशेजारीं बसला आणि त्याच्या शांत मुद्रेकडे एक नेत्रकटाक्ष फेंकून सुरेखानें आपली मोटार सुरू केली.

कांहीं वेळानें ती म्हणाली, 'खरें पाहिलें तर तुम्हींच बोलायला सुरुवात करायची होती. हें पहा, मला तुमची मुळींच भीति वाटत नाहीं.'

'माझी भीति! —'

'गेल्या रात्रीं माझा परिचय करून घेण्यासाठीं तुम्हीं फार नामी युक्ति योजिली होती. तुमच्या त्या भाडोत्री ठगांनीं माझा हार पळविण्याचें चांगलें नाटक वठविलें आणि तुम्हींहि आपण आपल्या पिस्तुलाचा उपयोग केला असें मला मोठ्या चातुर्यानें भासविलेंत.'

'ही तुमची अगदीं चुकीची समजूत आहे.' झुंजार म्हणाला, 'तुम्हीं विश्वास ठेवा अगर ठेवूं नका. मी त्यांना आतांपर्यंत माझ्या आयुष्यांतहि पाहिलें नव्हतें.'

'पुरें झालें किशोर पर्वते.' ती ठसक्यांतच म्हणाली.

'तुम्हांला माझें नांवहि माहीत आहे? मी तुम्हांला माझी कधीं ओळख करून दिली?'

'सभ्य चोरा, ही तुझी लबाडी मला फसवूं शकत नाहीं. मी जरी एक स्त्री असलें तरी मूर्ख नाहीं. माझे कान फार तिखट आहेत आणि माझे डोळेहि चांगले आहेत.'

'या तुमच्या डोळ्यांबद्दल मी तुम्हांला कधींतरी सांगणारच होतों.' झुंजार म्हणाला, 'तुमचे डोळे फारच सुंदर आहेत!'

'हें पहा, जर तुम्हांला माझी सूचना मानायची असली तर आज रात्रीं तुम्हीं तुमच्या आमंत्रणपत्रिकेचा उपयोग करूं नका. जर तुम्हीं आज रात्रीं आमच्या बंगल्यांत चोरी करण्याची योजना आंखली तर आपला बेत बदलला आहे असें तुम्हीं तुमच्या त्या तिघां मित्रांना सांगा.'

'तुम्ही रात्रीं-बेरात्रींहि भटकत असतां हें यावरून सिद्ध होतें.' झुंजार म्हणाला, 'पण तुमचें डोकें थोडेंसें भ्रमिष्ट आहे असें मी नम्रपणें सुचवूं इच्छितों. तुमच्या वडिलांच्या घरांत मी चोरी करणार आहें हें

अगदींच अशक्य आहे. तुम्हीं माझ्याबद्दल भलतीच कल्पना केलेली दिसते.'

'नाहीं, मी तुमच्याबद्दल अगदीं योग्य कल्पना केली आहे. मला पोलिसांकडे जातां आलें असतें. पण तुम्हांला आपलें वर्तन सुधारण्याची प्रथम एक संधि द्यावी असें मी ठरविलें. मला इतकेंच सांगावयाचें होतें. आतां तुम्हांला मोटारींतून कुठें नेऊन सोडूं तें सांगा.'

झुंजारला तिच्याशीं बरेंच बोलावयाचें होतें. त्या तरुणीची जर आपण कांहीं समजूत घातली नाहीं तर आपली त्या रात्रींची योजना ढांसळून पडेल अशी त्याची कल्पना होती. झुंजार तिला काय सांगावें आणि कसें सांगावें याबद्दल विचार करीत असतांना तेथें आजूबाजूस आणखीहि गोष्टी घडत होत्या. सुरेखा त्याला मोटारींत बसविल्यानंतर कुठें दूर घेऊन गेली नव्हती. ती मोटारीनें तो रहात होता त्या इमारतीला सारखी प्रदक्षिणा घालीत होती.

अंबाजी आणि बापू त्या इमारतींतून बाहेर पडल्यानंतर ज्या-ठिकाणी त्यांनीं आपली मोटार उभी केली होती तेथें गेले. मोटार अंबा-जीची होती आणि मोटारींत बसलेला दगडू ऊर्फ मुकुंद त्यांची वाटच पहात होता.

अंबाजी मोटार चालविण्याच्या जागेवर बसतांच दगडूनें भीत भीत विचारलें, 'सर्व ठीक आहे ना?'

'अर्थातच ठीक आहे.' अंबाजी म्हणाला, 'आज रात्रीं बार उडवायचा आहे.'

'आज रात्रीं! अरे बापरे! इतक्या लवकर?' दगडूनें अस्वस्थ होऊन विचारलें, 'तो प्राणवल्लभ आपला वेळ मुळींच फुकट घालवीत नाहीं. त्यानें सर्व तयारी केली काय?'

'पूर्ण तयारी केली आहे.' पाठीमागल्या जागेंत बसलेला बापू म्हणाला, 'तो अतिशय हुशार माणूस आहे.'

'मला कांहीं हें आवडत नाहीं.' दगडू म्हणाला, 'आपला कांहीं तो धंदा नाहीं. जर कुठें कांहीं बिघडलें तर आपली मोठी पंचाईत होईल. तो प्राणवल्लभ आपणांला फसविणार नाहीं कशावरून? त्याला आपण जबरदस्तीनें या प्रकरणांत ओढलें आहे आणि त्याला तें खचित आवड-णार नाहीं.'

'गप्प बैस.' बापूनें त्याला दम दिला.

त्याचवेळीं रस्त्यावरून जाणाऱ्या एका जाडजूड इसमानें अंबाजीला मोटार थांबविण्याची खूण केली आणि अंबाजीनें ती थांबविली.

'याच भागांत तूं कुठेंतरी सांपडशील अशी माझी कल्पना होती.' तो इसम अंबाजीला म्हणाला, 'तुला पाहून मला अतिशय आनंद झाला.'

त्या माणसानें बोलतांना आपली मान त्या मोटारींत घुसविली होती. त्याच्या चर्येवर जखमांच्या अनेक खुणा होत्या. त्यामुळें त्याचा चेहरा अतिशय भेसूर दिसत होता.

'पिसाळ, तूं मला अशाप्रकारें थांबविणें खचित योग्य नाहीं.' अंबाजी म्हणाला, 'आपण दोघेच असतों तर गोष्ट निराळी होती. पण असल्या उघड्या रस्त्यावर—'

'मरो तो रस्ता!' पिसाळ तिरस्कारानें म्हणाला, 'अंबाजी, तुला फसविण्यांत येत आहे. ज्या माणसाबरोबर तूं काम करीत आहेस तो इसम प्राणवल्लभ नाहीं असें मला नुकतेंच समजलें आहे. प्राणवल्लभाला मी भेटल्याला अद्याप एक तास झाला नाहीं आणि त्यानेंच तूं येथें तीन वाजतां मला सांपडशील असें सांगितलें होतें. त्याला तें कसें समजलें कुणास ठाऊक?'

'पिसाळ, तुला वेड लागलें आहे. या भलत्याच कल्पना तुझ्या डोक्यांत कुणी शिरविल्या? प्राणवल्लभाबद्दल तुला कुणी माहिती दिली?'

अंबाजी मनांतून अतिशय संतापला होता. बापू किंवा दगडू या दोघांपैकीं कुणीतरी त्याच्या त्या नवीन भानगडीबद्दल बाहेर बातमी फोडली होती. पिसाळ हा मुळींच बुद्धिमान नाहीं हें अंबाजीला माहीत होतें. पिसाळच्या शरिरांत राक्षसी शक्ति होती. पण त्याचें डोकें जवळ-जवळ रिकामेंच होतें.

'जर तुला कांहीं बोलायचें असलें तर मोटारींत बसून बोल.' अंबाजी म्हणाला, आणि पिसाळ मोटारींत बसल्यानंतर त्यानें ती हळूहळू चालविण्यास सुरुवात केली. 'पिसाळ, तूं मूर्खाप्रमाणें बरळत आहेस.'

'मी बरळत नाहीं.' रागानें पिसाळ म्हणाला, 'स्वतःला किशोर पर्वते म्हणविणाऱ्या माणसाबरोबर जर तूं कांहीं करण्याचें ठरविलें असलेंस तर तें करूं नकोस, असें प्राणवल्लभानेंच तुला सांगितलें आहे. तुला त्यानें ताबडतोब भेटायला बोलाविलें आहे.'

'तुझ्याच समजुतीचा कांहीं घोटाळा दिसतो.' अंबाजी म्हणाला, 'मी पांच मिनिटांपूर्वी खुद्द प्राणवल्लभाबरोबरच बोलत होतों. मी त्याच्या-बरोबर कांहीं काम करीत आहें असें तुला कुणी सांगितलें?'

'प्राणवल्लभाची आणि तुझी भेट होणें शक्य नाहीं.' जोरानें पिसाळ म्हणाला, 'त्याला तुझ्याबद्दल कशी माहिती मिळाली हें ईश्वराला ठाऊक! अंबाजी, तो किशोर तुला फसवीत आहे आणि त्यामुळें प्राणवल्लभ अतिशय संतापला आहे. प्राणवल्लभाला मी ओळखत नाहीं असें तुला वाटतें काय? मी पेणमध्यें त्याच्याबरोबर नव्हतों काय? मी दुर्जयाचा एक पहारेकरी होतों. जेव्हां दुर्जयाला अटक करण्यांत आली, तेव्हां मीच प्राणवल्लभाला पळून जाण्यास मदत केली. आणि तेव्हांपासून आम्हीं रोज एकमेकांना भेटत असतों.'

पिसाळ अगदीं मनःपूर्वक व शिरा ताणून बोलत होता. पण अंबाजी अगदीं बर्फाप्रमाणें थंडगार होता. पण जरी पिसाळची पूर्वीची हकीकत त्याला खरी वाटली नव्हती, तरी त्या शेवटच्या बोलण्यावर मात्र त्याला विश्वास ठेवावा लागला. गेल्या एक दोन वर्षांत त्याची आणि पिसाळची भेट झाली नव्हती. आणि पिसाळ काय करीत असावा याबद्दल अंबाजी अनेकवेळां विचार करीत असे.

पिसाळ जर खरोखरच पेणच्या वाड्यांत पहारेकऱ्याचें काम करीत होता तर त्याची आणि प्राणवल्लभाची चांगली ओळख असणें शक्य होतें. आणि तसें जर असलें तर त्याचें म्हणणें सत्यच असलें पाहिजे असें अखेरीस त्याला पटलें.

'पण जर तो किशोर पर्वते प्राणवल्लभ नाहीं तर तो आहे तरी कोण?' अंबाजीनें विचार करीत विचारलें, 'आणि मला हा हुकूम सोडणारा तुझा प्राणवल्लभ कोण? मी तुझ्या प्राणवल्लभाला कधींच पाहिलें नाहीं.'

'तो सांगेल त्याप्रमाणें वागण्यांतच तुझें हित आहे.' पिसाळ म्हणाला, 'सध्यां जरी तो दडी मारून बसला असला तरी त्याचें शत्रुत्व पत्करणें योग्य होणार नाहीं. त्यानें तुला भेटीला बोलाविलें आहे, तेव्हां तूं त्याला भेटावेंस हें उत्तम. तो कुठें आहे हें मला माहीत आहे. मी तुला त्याच्याकडे घेऊन जातों.'

'तूं अंबाजीला खुशाल घेऊन जा. पण मी कांहीं येणार नाहीं.' दगडू घाबरून म्हणाला, 'अंबाजी, मोटार उभी कर. सुरुवातीपासूनच या प्रकरणांत पडणें धोक्याचें आहे असें मला वाटतच होतें. माझा एक काका पुण्याला आहे.'

'मरो तुझा काका!' अंबाजी त्याच्याकडे रागानें पहात म्हणाला, 'तुम्हां दोघांपैकींच कुणीतरी आपलें थोबाड उघडलें आहे. आपला डाव फक्त आपणा तिघांनाच माहीत होता आणि ज्याअर्थी मी त्याबद्दल कुणा-

लाहि सांगितलें नाहीं त्याअर्थी तुमच्यापैकींच कुणीतरी ती बातमी बाहेर फोडली असावी.'

'आम्हीं कुणालाहि सांगितलें नाहीं.' बापूनें ठांसून सांगितलें, 'निदान मी तरी बोललों नाहीं आणि आम्हीं दोघें रात्रीपासून एकत्रच आहोंत.'

'मीहि बोललों नाहीं.' दगडू म्हणाला.

'तुम्हीं दोघेहि लुच्चे आहांत आणि दगडू, तूं तर सुरुवातीपासूनच घाबरला होतास. जर तुमच्यापैकीं कुणी बोललें नाहीं तर या पिसाळच्या प्राणवल्लभाला ती माहिती कशी समजली ?'

'देवाशपथ मी कुणाला सांगितलें नाहीं !' घाबरून दगडू म्हणाला, 'हा प्रकार काय आहे तें मला समजतच नाहीं.'

'थोड्याच वेळांत समजेल.' अंबाजी म्हणाला, 'मी लवकरच प्राणवल्लभाला भेटणार आहें. पण त्यापूर्वी मला आणखी एक काम करावयाचें आहे.'

त्यानें पुन: आपली मोटार मागें वळविली आणि तो किशोर पर्वतेच्या घराकडे निघाला आणि सुरेखा आपल्या मोटारीनें त्या इमारतीभोंवतीं प्रदक्षिणा घालीत असल्यामुळेंच तेथें पोहोंचतांच सुरेखा मोटार चालवीत आहे आणि स्वत:ला प्राणवल्लभ म्हणविणारा माणूस तिच्या शेजारींच बसला आहे असें दृश्य अंबाजीला पहावयास मिळालें आणि तो अनावर संतापला.

'अरेच्चा !' तो म्हणाला.

त्या दृश्याचा एकच अर्थ होता. त्या तोतया प्राणवल्लभानें रात्रींची ती योजना केवळ अंबाजीचा विश्वासघात करण्यासाठींच आंखली होती. नाहींतर ज्या मुलीला पळवून नेण्याचें ठरविलें होतें तिच्याबरोबरच तो नामधारी प्राणवल्लभ फिरतांना कसा आढळला असता ?

'पहा.' घाबरून दगडू म्हणाला, 'ती नागरदासाची पोरगीच आहे ना ? आणि तो खुशाल तिला टेकून बसला आहे. खात्रीनें तो सी. आय्. डी. खात्याचा माणूस आहे. अंबाजी, आपणांला ताबडतोब मुंबईहून पळ काढला पाहिजे.'

'आणि या हरामखोराला असेंच सोडून द्यावयाचें काय ?' दांतओंठ खात अंबाजी म्हणाला, 'हीं दोघें एकत्र आपल्या नजरेस पडलीं हें आपलें सुदैवच म्हणावयाचें. ज्यानें मला फसविण्याचा डाव रचला होता त्याला मी तसाच सोडून देणार नाहीं.'

'अंबाजी, कांहीं भलतेंच करूं नकोस—' पिसाळनें बोलावयास

सुरुवात केली.

'तूं मुळींच बोलूं नकोस.' अंबाजीनें दरडावलें. 'त्यांनीं एकमेकांचा निरोप घेण्यापूर्वीच मी त्या दोघांनाहि पकडणार आहे. त्या दोघांनाहि आपल्याबद्दलची इतकी माहिती झाली आहे कीं, त्यांना मोकळें सोडल्यास आपला घात होईल.'

त्याचें तें बोलणें ऐकून दगडू थरथर कांपूं लागला होता. अंबाजीचे डोळे आतां भयंकर दिसत होते. त्यानें आतां सुरेखाच्या मोटारीचा पाठलाग करण्यास सुरुवात केली होती. त्या घराला प्रदक्षणा घालून कंटाळलेल्या सुरेखानें आपली मोटार आतां कुलाब्याकडे वळविली होती.

'तुम्हीं आतांच मला म्हणालांत कीं, तुम्हांला माझ्याशीं कांहीं बोलावयाचें आहे आणि त्यासाठीं आपण ताजमहाल हॉटेलांत चहा घ्यावयास जाऊं. पण मी बदमाषांना कधींच ताजमहाल हॉटेलांत नेत नाहीं.'

'तुम्हीं मला न्यावें असें मी सुचविलें नाहीं.' झुंजार म्हणाला, 'मीं तुम्हांला तेथें नेतों. शिवाय मी बदमाष नाहीं. निदान तुम्हीं समजतां तसा बदमाष तरी खासच नाहीं.'

'तुम्हांला जें कांहीं बोलावयाचें असेल तें या मोटारींतच बोला.' एका अडोशाच्या जागीं मोटार उभी करीत सुरेखा म्हणाली, 'किशोर पर्वते हें तुमचें खरें नांव असेल असेंहि मला वाटत नाहीं.'

झुंजार कांहीं बोलण्यापूर्वीच तिच्या मोटारीमागें आणखी एक मोटार उभी राहिली आहे असें त्याला वाटलें. आणि मागें मान वळवितांच त्या मोटारींतून खालीं उतरणारा अंबाजीहि त्याला दिसला. सुरेखानें त्यावेळीं मागें पाहिलें आणि तिनेंहि अंबाजीला ओळखलें.

'तुम्हीं तुमच्या मित्रांना बरोबर आणलें आहे हें मला माहीत नव्हतें.' ती टोचून म्हणाली, 'सुरुवातीपासूनच ते आपला पाठलाग करीत आहेत काय?'

'मला माहीत नाहीं. पण तसें दिसतें खरें. ही कांहीं चांगली गोष्ट नाहीं.'

झुंजारनें आपलें बोलणें थांबविलें आणि तो संकटाला तोंड देण्यास तयार झाला. त्याच्या कल्पनेप्रमाणें अंबाजी वागला नाहीं. तो पिसाळसहित सुरेखाच्या मोटारीच्या पाठीमागल्या भागांत बसला.

'पर्वते, तुम्हीं कृपा करून तुमच्या मित्रांना माझ्या मोटारींतून खालीं उतरावयास सांगा. मला असला चावटपणा मुळींच खपायचा नाहीं.' सुरेखा रागानें म्हणाली.

आणि त्याच क्षणीं झुंजारनें अंबाजीच्या हातांतलें पिस्तुल पाहिलें आणि तो तें झाडण्यास मुळींच कचरणार नाहीं हें त्याच्या मुद्रेवरून ओळखलें.

'बाईसाहेब, मोटार चालू करा.' अंबाजी हळूंच पण कठोर स्वरांत म्हणाला, 'माझ्या कोटाच्या खिशांतून मी तुमच्या मानेवर पिस्तुल रोखलें आहे. मी सांगेन त्याप्रमाणें जर तुम्हीं वागलां नाहीं तर जागच्या जागीं ठार व्हाल.'

सुरेखा जरी शूर होती तरी तिचा चेहरा उतरला आणि तिनें तिरस्कारानें झुंजाराकडे पाहिलें.

'माझाच तर्क बरोबर होता तर?' ती म्हणाली, 'माझ्या कल्पनपेक्षांहि तुम्हीं अधिक दुष्ट आहांत.'

'बाईसाहेब, ही बतावणी पुरे झाली.' अंबाजी म्हणाला, 'या पाजी माणसाशीं आपला कांहींहि संबंध नाहीं असें भासविण्याचा तुम्हीं जो प्रयत्न चालविला आहे तो अगदीं व्यर्थ आहे. मला तुम्हां दोघांची चांगली माहिती आहे. मुकाट्यानें मोटार सुरूं करा. जर ओरडलांत किंवा रस्त्यांतील शिपायांचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलांत तर प्राणास मुकाल.'

त्याचा आवाज इतका जहरी होता कीं, सुरेखाहि कचरली आणि तिनें झुंजारकडे पाहिलें. तोहि गोंधळला होता. जर तो एकटाच असता तर त्यानें त्या बदमाषाच्या पिस्तुलाची मुळींच पर्वा केली नसती. पण अंबाजीनें सुरेखाच्या मानेवर पिस्तुल रोखलें होतें आणि संतापाच्या भरांत तो खून करण्यास कचरणार नाहीं असें स्पष्ट दिसत होते.

'सुरेखाबाई, जर तो माणूस तुम्हांला मोटार सुरू करावयास सांगत आहे तर ती सुरू करा.' तो हळूंच म्हणाला, 'जर तुमच्या सुंदर मानेची पिस्तुलाच्या गोळीनें दुर्दशा केली तर तें मला आवडणार नाहीं. तो म्हणतो तसें करा, पुढचें पहातां येईल.'

सुरेखा क्षणभरच घोटाळली, पण तिनें लागलीच मोटार सुरूं केली.

• • •

१२

साडेतीन वाजण्याच्या सुमारास विजयेची छोटी मोटार किशोर पर्वतेच्या इमारतीजवळ पोहोंचली. रात्रीच्या कार्यक्रमाबद्दलची अखेरची

चर्चा करण्यासाठीं ती तेथें आली होती. ती कांहींशी अधीर झाली होती. त्या दुसऱ्या सुंदर तरुणीबरोबर गांठ होती आणि त्यामुळें ती तशी अधीर होणें स्वाभाविक होतें.

पूर्वींच्या अनुभवावरुन, आपल्या नवऱ्यामध्यें जरी अतिशय शक्ति असली आणि जरी तो निश्चयी स्वभावाचा असला तरी सुंदर स्त्रियांच्या बाबतींत त्याचा तो निश्चय डळमळूं लागतो आणि त्याच्या शक्तीचा क्वचित् दुरुपयोगहि होतो हें विजयेला माहीत होतें आणि या खेपेला जिच्याबरोबर गांठ पडली होती ती सुरेखा अतिशय सुंदर होती.

यामुळेंच झुंजार–महालांत आपला नवरा आपल्याबरोबर चर्चा करण्यासाठीं येण्याची वाट न पहातां ती अंबाजीबरोबरच्या त्याच्या ठरलेल्या मुलाखतीच्या वेळेनंतर अर्ध्या तासानेंच त्याच्या पुढील कार्यक्रमाची विचारपूस करण्यासाठीं स्वतःच त्या तात्पुरत्या बिऱ्हाडीं गेली होती. पण झुंजार तेथें नव्हता.

तिनें तळमजल्यावर रहाणाऱ्या पहारेकऱ्याजवळ चौकशी केली तेव्हां तो म्हणाला, ' ते दहा मिनिटांपूर्वींच बाहेर गेले. '

' ते एकटेच बाहेर गेले काय ? ' तिनें विचारलें.

' ते येथून बाहेर पडले तेव्हां एकटेच होते. '

' पण नंतर त्यांना कुणीतरी भेटलें आणि ते त्याच्याबरोबर निघून गेले असेंच ना ? ते कुठें निघून गेले हें तूं सांगशील काय ? '

' किशोरशेठ कुठें जातात तें मला थोडेच सांगतात ? ' तो पहारेकरी हंसून म्हणाला, ' ते बाहेर पडले आणि एका मोटारींत बसले. त्या मोटारींत एक तरुण बाई बसली होती. तिच्याबरोबर ते निघून गेले. '

' अस्सें काय ? ' विजया म्हणाली, ' त्या तरुण बाईबद्दल मला आणखी माहिती सांगा. '

तिला अतिशय उत्सुकता वाटत आहे असें पाहून तो पहारेकरी उत्साहानें म्हणाला, ' ती तरुणी फारच सुंदर होती. ती जवळजवळ तुमच्याइतकी सुंदर होती. '

विजयेच्या मस्तकांत सैतानाचा संचार झाला. ती सुंदर तरुणी दुसरी कोणी नसून सुरेखाच असली पाहिजे अशी तिची खात्री पटली. तिच्याबरोबरच झुंजार तिच्याच मोटारींतून निघून गेला होता. प्रथम राग आणि मत्सर या दोन भावनांनीं विजयेला घेरलें व नंतर तिला त्या बातमीचें नवल वाटूं लागलें. ज्या मुलीला त्याच रात्रीं पळविण्याचा झुंजारनें कट रचला होता ती भर दुपारीं त्याच्याबरोबर आपल्या मोटारींतून फिरत होती याचा अर्थ काय ?

एकाएकीं तिच्या मनांत एक विचार आला आणि तिनें विचारलें, ' आज दुपारीं पर्वतेंना आणखी कुणी भेटावयास आलें होतें काय ?'

' होय बाईसाहेब, दोन सभ्य गृहस्थ आले होते. त्यांपैकीं एक अतिशय धिप्पाड होता. ते सुमारें पधरा मिनिटें तेथें होते. '

' दोघेच आले होते ?' तिनें विचारलें.

' होय बाईसाहेब, पण त्यांच्याबद्दलची एक गंमत मला आतां आठवली. येथून ते दोघे निघून गेले तेव्हां ते अतिशय खुषींत दिसत होते. पण मी पुन्हां त्यांना पाहिलें—'

' तूं त्यांना पुन्हां कधीं पाहिलेंस ?' तिनें लागलीच विचारलें.

' किशोरशेट त्या बाईबरोबर निघून गेले तेव्हांच. ' पहारेकरी म्हणाला, ' ती तरुण बाई जणुं काय तिच्या मनाचा निश्चय न झाल्यामुळें आपल्या मोटारीनें या इमारतीभोंवतीं सारख्या प्रदक्षिणा घालीत होती. त्यानंतर ती त्या दोघांची मोटार तेथें परत आली. ती मोटार बरीच मोठी होती. आणि विशेष आश्चर्य म्हणजे मोटारीच्या आंतल्या भागांत किशोरशेठचा नोकर मुकुंद बसला होता. तो त्या दोघांबरोबर काय करीत होता कुणास ठाऊक !'

विजयेनें झटपट विचार केला. मुकुंद हा भुरट्या टोळीचा ' खबऱ्या ' होता, हें तिला माहीत होतें. तो त्या पहारेकऱ्याच्या आणि इमारतींत रहाणाऱ्या इतर लोकांच्या माहितीचा असल्यामुळें त्या दुसऱ्या दोघांनीं त्याला दूर उभ्या केलेल्या आपल्या मोटारींत बसविलें असावें हें तिनें तर्कानें ओळखलें.

' त्या मुकुंदाची आणि त्या दोघांची बरीच मैत्री असावी असें दिसत होतें. ' एका सुंदर स्त्रीबरोबर बोलण्याची संधि मिळाल्यामुळें खूष झालेला पहारेकरी पुढें म्हणाला, ' ते दोघे येथून बाहेर पडले तेव्हां जणुं स्वर्ग हातीं आल्याचा त्यांना आनंद झालेला दिसला हें तुम्हांला मीं मघां सांगितलेंच. पण जेव्हां मी त्यांना मोटारींत बसलेलें पाहिलें तेव्हां तो धिप्पाड माणूस अतिशय संतापलेला आणि मुकुंद अतिशय घाबरलेला दिसत होता. त्यांना कांहींतरी अत्यंत अप्रिय बातमी समजली असावी असें त्यांचे चेहरे दिसत होते. '

विजयेनें पुनः विचार केला. आतां तिला भीति वाटूं लागली होती. कांहीं तरी घोटाळा झाला होता—बराच घोटाळा झाला होता आणि त्याचें कारण बहुधा सुरेखाच असावी असें दिसत होतें. झुंजारच्या नव्या दोस्तांना अचानक तो सुरेखाच्या मोटारींत तिच्या बरोबर [illegible]

वागतांना दिसतांच धक्का बसला होता किंवा आशाच प्रकारचें कांहींतरी घडलें होतें.

' जेव्हां त्या सुंदर तरुणीनें आपली मोटार दूर नेली तेव्हां त्या दुसऱ्या मोटारीनें तिचा पाठलाग केला काय ?'

' असें दिसलें खरें. ' तो पहारेकरी म्हणाला.

विजया आतां अंबाजीबद्दल विचार करीत होती. त्याला कांहीं-तरी अप्रिय बातमी समजली होती आणि तो अतिशय संतापला होता. झुंजारनें त्या सकाळींच अंबाजीबद्दल माहिती मिळविली होती तेव्हां अंबाजी हा शक्तिमान आणि घातकी इसम असून तो नेहमीं जवळ पिस्तुल बाळगितो असें त्याला समजलें होतें.

विजयेनें त्या पहारेकऱ्याच्या हातांत दोन रुपये ठेवले आणि ती म्हणाली, ' मला पवंतेंना कांहीं खास कामाकरितां भेटावयाचें होतें. तुला त्या दोन मोटारींबद्दल कांहीं विशेष माहिती सांगतां येईल काय ?'

' त्या बाईची मोटार लहानशीच पण फारच सुंदर आणि वेगवान होती ' तो पहारेकरी म्हणाला, ' हजार मोटारींतून ती सहज शोधून काढतां येईल. मोटारीचा रंग पोपटी असून चाकांना चांदीचा रंग दिलेला आहे. '

' आणि दुसरी मोटार ?' विजयेनें उत्सुकतेनें विचारलें.

' मी त्या मोटारीकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. ' तो पहारेकरी खेदानें म्हणाला, ' दिसण्यांत साधीच पण बरीच मोठी आणि गडद निळ्या रंगाची ती मोटार होती. ती डॉज किंवा हूंबर जातीची असावी. '

' शाबास ! तूं बराच हुशार आहेस आणि तुला आपल्या डोळ्यां-चाहि योग्य उपयोग करतां येतो. ' ती म्हणाली.

आपला ओंठ दातांनीं घट्ट आंवळीतच विजया मोटारींत बसली. ती आतां अस्वस्थ झाली होती. झुंजार कोणत्याहि संकटांतून स्वतःची सोडवणूक करण्यास समर्थ आहे असा आत्मविश्वास तिला वाटत होता. पण एक सुंदर तरुणी त्याच्याबरोबर असल्यामुळें त्याच्या बुद्धीवर थोडासा गंज चढण्याची तिला शक्यता वाटली आणि संतापलेला, पिस्तुल

जवळ बाळगलेला अंबाजी आपल्या साथीदारासह त्याच्या मागें लागला होता.

"मी जर घरीं जाऊन त्यांच्या टेलिफोनची वाट पहात बसलें तर कदाचित् बराच महत्त्वाचा वेळ फुकट जाईल. आणि जर त्यांनीं टेलिफोनच केला नाहीं तर ? कांहीं तरी घोटाळा झाला आहे हें आतां उघडच आहे. ताबडतोब कांहींतरी इलाज केला पाहिजे. पण करावें तरी काय ?"

एकाएकीं तिनें निश्चय केला आणि ती सरळ सी. आय्. डी. ऑफिसाकडे गेली. तिला पाहून आनंदरावांना आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, 'विजूताई, तूं बरीच लवकर आली आहेस. पांच वाजतां आपण भेटणार असें तूं मला कळविलें होतेंस.'

'होय, पण मध्येंच कांहींतरी घोटाळा झालेला दिसतो.' विजया घाईघाईनें म्हणाली, 'मी आतां तुम्हांला सर्वच हकीकत सांगतें. ती आतां तुम्हीं लक्षपूर्वक ऐका आणि मध्येंच भलते सलते प्रश्न विचारूं नका आणि शंका काढूं नका. त्या मुलीचें संरक्षण करण्याच्या उद्देशानेंच त्यांनीं तिला पळविण्याचें ठरविलें होतें आणि त्यामुळेंच मला अतिशय चिंता वाटूं लागली आहे. एकाद्या सुंदर मुलीचें संरक्षण करण्याची कामगिरी त्यांनीं स्वीकारली कीं नेहमींच माझ्या काळजांत धडकी भरते.'

'विजूताई, तूं हें सांगतेस तरी काय ?' आनंदराव म्हणाले. 'झुंजारनें कोणत्या सुंदर मुलीला घेऊन पळ काढला आहे ? नगरदासाच्या आज रात्रींच्या मेजवानीच्या वेळीं तुला माझी कांहीं मदत हवी आहे असें तूं मला टेलिफोनवर न सांगितलें होतेंस ना ?'

'होय, तेंच तर मी तुम्हांला सांगत आहें. शेठ नगरदासांची मुलगी सुरेखा हिला पळविण्यांत आलें आहे.'

'काय म्हणालीस ?' आनंदरावांनीं दचकून विचारलें.

'होय. पण तिला ठरलेल्या वेळेपूर्वींच पळविण्यांत आलें आहे.'

आनंदरावांनीं आपलें डोकें दोन्ही हातांनीं घट्ट आवळलें आणि ते म्हणाले, 'विजूताई, मला समजेल असें तरी बोल.'

'ठीक आहे.' ती म्हणाली, 'आतां अगदीं शांत बसा आणि ऐका.

मी तुम्हांला अगदीं सुरुवातीपासूनची हकीकत सांगतें.'

पण ती हकीकत ऐकतांना शांत बसणें आनंदरावांना शक्य झालें नाहीं. ते सारखे चुळबूळ करीत होते आणि त्यांच्या तोंडावाटें निरनिराळ्या प्रकारचे आवाज होत होते. जेव्हां तिनें आपली सर्व हकीकत सांगितली तेव्हां नुकत्याच लग्न झालेल्या आणि बायकोसह स्वतंत्र बिन्हाड थाटणाऱ्या आईलवेड्या माणसाला आपली सासू, मेहुण्या आणि मेहुणी येणार आहेत अशी बातमी समजतांच जसा त्याचा चेहरा झाला असता, अगदीं हुबेहूब तसाच, आनंदरावांचा चेहरा बनला होता!

'विजूताई, ही काय तुमची नवीन भानगड आहे?' अगदीं थकलेल्या स्वरांत आनंदराव म्हणाले, 'त्या किशोर पर्वतेचें खरें नांव प्राणवल्लभ आचार्य असें असून त्यामुळें होणाऱ्या त्रासाला कंटाळून तो मुंबईस रहावयास आला आहे, हें मला माहीत आहे. खरेंच मी त्याच्याबद्दलची माहिती झुंजारला सांगितली. मला कुठून तें त्याला सांगण्याची अवदसा आठवली! झुंजारच किशोर पर्वते बनला होता?'

'गेलीं दहा मिनिटें तुम्हांला मी जें सांगितलें तें सारेंच फुकट गेलें म्हणावयाचें!' विजया फणकाऱ्यानें म्हणाली, 'खऱ्या प्राणवल्लभाला गांठण्यासाठींच त्यांनीं तें नाटक केलें. त्यांनीं इतक्या मेहनतीनें त्याला दुर्जयाच्या वाड्यांत खुर्चीला बांधून ठेवलें असतांनाहि तुम्ही निष्काळजीपणानें त्याला निसटूं दिलेत.'

'ती स्थानिक पोलिसांची चूक होती. मी त्यावेळीं तेथें हजर नव्हतों.' आनंदराव म्हणाले, 'पण आतां त्या जुन्या गोष्टींची उजळणी कशाला? तुझा तो झुंजार पुन्हां त्या प्राणवल्लभाच्या मागें लागला आहे तर?'

'प्राणवल्लभच त्यांच्या मागें लागल्यामुळें त्यांना या भानगडींत पडावें लागलें. पण मुख्य गोष्ट अशी आहे कीं त्यांच्या योजनेंत कुठेंतरी बिघाड झाला आहे. अचानक भेटलेल्या अंबाजीच्या टोळीचा आपणांला उपयोग करतां येईल असें त्यांना वाटलें. कारण अंबाजी त्यांना खरा प्राणवल्लभच समजत होता.

'आज संध्याकाळीं सुरेखाला पळवायचें, तुम्हांला त्या बदमाषांच्या

मागें रहावयास सांगावयाचें आणि अगदीं ऐनवेळीं पुराव्यासहित त्यांना पकडावयाचें अशी त्यांची योजना होती. पण अंबाजीला संशय आल्या-मुळें त्यानें तिला ठरलेल्या वेळेपूर्वींच पळविलें आहे असें दिसतें. तुम्ही सर्व ठाण्यांना टेलिफोन करून तिची मोटार शोधून काढण्याची व्यवस्था करणार नाहीं काय?'

'मी प्रयत्न करून पहातों.' आनंदराव रिसीव्हर उचलीत म्हणाले, 'तिच्या मोटारीचें तूं वर्णन करूं शकशील काय?'

विजयेनें त्यांना माहिती दिली आणि आनंदरावांनीं टेलि-फोन करण्यास सुरुवात केली. आपण आनंदरावांकडे येण्यांत चूक तर केली नाहीं ना, असें आतां विजयेला वाटूं लागलें. पोलीस सुरेखाच्या मोटारीचा शोध करीपर्यंत बराच वेळ निघून जाण्याचा संभव होता आणि तेवढ्या अवधीतच अनेक गोष्टी घडण्याचा धोकाहि होता.

टेलिफोन केल्यानंतर आनंदराव म्हणाले, 'आतां आपणांला वाट पहात बसावें लागेल. त्या अंबाजीला मी ओळखतों. तो एक लफंगा इसम असला तरी असल्या पळवापळवीच्या भानगडींत तो पडणें शक्य नाहीं. तो नेहमीं आपल्याजवळ पिस्तुलहि बाळगतो अशी आमची समजत आहे. पण आम्हांला तें कधीच त्याच्याजवळ सापडलेलें नाहीं.'

'पण प्रत्येक नियमाला कांहीतरी अपवाद असतोच.' विजया म्हणाली, 'अंबाजी यांनाच प्राणवल्लभ समजला. म्हणूनच त्यानें सुरेखाला पळविण्याचें कारस्थान रचलें. आणि नंतर त्याला त्यांचा संशय आल्या-मुळें त्या टोळीनें सुरेखाबरोबरच त्यांनाहि जबरदस्तीनें नेलें.'

'भर दिवसाउजेडीं झुंजारसारख्या एका आग्यावेताळाला पळवून नेणें सोपें आहे असें तुला वाटतें काय?' आनंदरावांनीं विचारलें.

'तसें घडणें वरकरणीं तरी अशक्य दिसतें खरें.' विजया म्हणाली, 'व म्हणूनच तुम्हांला सर्व गोष्टी सांगितल्याबद्दल मला आतां पश्चा-त्तापहि वाटूं लागला आहे. ते खुशाल मजेंत असतील आणि निष्कारण मध्यें लुडबूड केल्याबद्दल मला ते दोष देतील.'

'तुझें म्हणणें अगदी बरोबर आहे.' पण त्याच वेळीं टेलिफोनची घंटी वाजल्यामुळें आनंदरावांनीं रिसीव्हर कानाला लावला आणि ते

आपल्या पुढ्यांतील कोऱ्या कागदावर कांहीं टांचण करूं लागले.

कांहीं वेळानें रिसीव्हर खालीं ठेवून त्यांनीं समाधानानें विजयेकड पाहिलें. ते म्हणाले, 'सुरेखाची मोटार सांताक्रूझच्या नाक्यावर पहारा करणाऱ्या आमच्या शिपायानें पाहिली आहे. सुरेखाच ती मोटार चालवीत होती. एक इसम तिच्या बाजूला बसला होता आणि पाठीमागल्या छोट्या जागेंत आणखीहि दोन इसम बसले होते. दोघेहि इसम धिप्पाड होते आणि तो खात्रीनें अंबाजीच असला पाहिजे.'

'ते तिला जबरदस्तीनें मोटार चालविण्यास भाग पाडीत आहेत असें दिसतें.' विजया चिंतायुक्त स्वरांत म्हणाली, 'पण त्या तुमच्या शिपायाचें त्याच मोटारीकडे इतकें लक्ष वेधण्याचें कारण काय?'

'तूं मला हा प्रश्न विचारशील असें मला वाटतच होतें. एकतर ती मोटार भपकेबाज होती आणि ती चालविणारी पोरगी फारच सुंदर होती. शिपाई तरुण होता आणि रहदारीच्या अडथळ्यामुळें त्याच्या-जवळ ती मोटार थांबली होती. त्यामुळें त्याला ती लक्षपूर्वक पहातां आली. पण आणखी एक गोष्ट आहे.'

'कोणती?'

'ज्या ठिकाणीं ती मोटार उभी होती त्याच ठिकाणीं कांहीं नांवाचीं कार्डें रस्त्यावर पडलेलीं त्या शिपायाला आढळलीं. त्यांपकीं प्रत्येक कार्ड किशोर पर्वतेचें होतें. एकावर 'मदत करा' अशीं अक्षरें होतीं तर दुसऱ्या कार्डावर 'घोडबंदर' असा शब्द लिहिलेला होता.'

'छान!' विजया आनंदानें म्हणाली, 'मी तुमच्याकडे आलें या बद्दल मला आतां आनंदच होतो. माझा तर्क बरोबर होता. त्या अंबा-जीनें आपल्या कोटाआडून खात्रीनें सुरेखावर पिस्तुल रोखलें असावें. आणि तिला जबरदस्तीनें त्यानें मोटार चालविण्यास भाग पाडलें असावें. त्यानें तिचा खून करण्याची धमकी दिली असावी. त्यामुळें यांनींच त्या नाक्यावर मोटार उभी राहातांच हळूंच त्या नांवांचीं कार्डें खालीं टाकलीं आणि आनंदराव, आपण घोडबंदरकडेच गेलें पाहिजे.'

'तुझें म्हणणें बरोबर दिसतें.' आनंदराव म्हणाले, 'चल, मी तुझ्याबरोबर यावयास तयार आहें.'

विजयेसह ऑफिसांतून बाहेर पडल्यानंतर बऱ्याच वेळानें आपण घाईनें आणि कायद्याविरुद्ध वागत आहों असें आनंदरावांना वाटलें. त्यांनीं एक उसासा सोडला आणि आपला पाईप पेटविला.

'विजूताई, तूं दिवसेंदिवस झुंजारसारखीच बनूं लागलीस.' ते म्हणाले, 'त्या पाजी माणसानें यापूर्वी मला कित्येक गोष्टी करण्यास भाग पाडलें आहे व त्याबद्दल मला नंतर पश्चात्ताप करावा लागला होता. आतां तूंहि तोच कित्ता गिरवीत आहेस. तू मला कोणत्या खड्डयांत नेऊन घालणार आहेस कुणास ठाऊक ?'

विजया नुसती हंसली. कारण तिचें सारें लक्ष मोटार चालविण्याकडे होतें आणि ती अस्वस्थ झाली होती. थोडया वेळांत ते सांताक्रूझ येथें पोहोंचले, तेथल्या नाक्यावर मोटार थांबून आनंदरावांनीं चौकशी केली. किशोर पर्वते नांवाचीं कार्डे ज्या शिपायाला मिळालीं होतीं त्याला गांठतांना कांहीं वेळ निघून गेला. सुरेखाच्या मोटारीबद्दल त्यांना आणखी कांहीं बातमी मिळाली नाहीं.

'तीं कार्डें अगदीं नवीन असल्यामुळें माझें लक्ष गेलें.' शिपाई म्हणाला.

'तूं बरीच हुषारी दाखविलीस.' आनंदराव म्हणाले, 'पण तूं त्या मोटारींतील माणसांना लक्षपूर्वक पाहिलें आहेस काय ?'

'ती तरुण बाई मोटार चालवीत होती. तिच्या शेजारीं एक ऐटबाज तरुण बसला होता. आणि पाठीमागल्या छोटया जागेंत दोन भपकेबाज पोशाख केलेले इसम बसलेले होते. ते सर्व बडे लोक असावेत असें दिसलें.'

त्यानंतर एक मिनिटानें विजयेनें मोटार सुरू केली. सुरेखाच्या मोटारीमागून येत असलेली ती दुसरी निळी मोटार त्या शिपायानें पाहिली नव्हती आणि त्यांत कांहीं आश्चर्य नव्हतें. तशा शेंकडों मोटारी त्या रस्त्यावरून जात येत होत्या.

विजया घोडबंदरकडे निघाली होती. आतां संध्याकाळ झाली होती. आकाशांत मेघांची दाटी झालेली होती. पण पाऊस पडत नव्हता. एकंदरींत आजूबाजूचें सर्व वातावरण खिन्न आणि भकास असें दिसत

होतें. एकाएकीं एका गल्लीच्या तोंडाजवळ विजयेनें ब्रेक लावून मोटार थांबविली आणि खालीं उडी घेतली. तेथल्या गवतावर किशोर पर्वतेच्या नांवाचें एक कार्ड पडलें होतें.

मोटार पुन्हां सुरू करीत विजया म्हणाली, 'अधूनमधून ते हीं कार्डें रस्त्यावर टाकीत असावेत. या कार्डावर कांहीं लिहिलेलें नाहीं. पण आपण योग्य मार्गानेंच चाललों आहोंत यांत शंका नाहीं, आणि आपल्या मुक्कामाचें ठिकाणहि जवळपास असलें पाहिजे.'

● ● ●

१३

अर्ध्या तासापूर्वींच सुरेखानें आपली भपकेबाज मोटार त्याच अरुंद गल्लींतून पुढें नेली होती. मुक्कामाचें ठिकाण अगदीं जवळ जवळ आलें आहे असें अंबाजीच्या बोलण्यावरून तिनें ओळखलें होतें. अंबाजीनें अद्याप आपल्या कोटाच्या खिशांतून तिच्या मानेवर पिस्तुल रोखलेलेंच होतें.

मुंबई सोडल्यानतर दोन तीन वेळां अंबाजीवर अचानक तुटून पड-ण्याचा धाडशी विचार झुंजारच्या मनांत आला होता. अंबाजी जरी म्हणत असला तरी खून करण्याची त्याची हिंमत होणार नाहीं असें त्याला वाटत होतें पण जर त्यानें पिस्तुल झाडलें तर सुरेखा प्राणाला मुकेल अशी भीति त्याला प्रत्येक वेळीं वाटे आणि तो स्वस्थ बसत असे.

अंबाजी पुढें वांकून त्याच्या कानांत अधूनमधून म्हणतच होता, 'याद राख किशोर, जरा गडबड केलीस तर ही तुझी मैत्रीण जागच्या जागीं ठार होईल!'

इकडे सुरेखा मात्र त्याहि परिस्थितींत बरीच खूष झाली होती. तिला अतिशय विचित्र असा अनुभव घेण्याची ती संधि मिळाली होती. आणि तिच्या साहसी वृत्तीला तो सारा प्रकार आवडण्यासारखाच होता आणि त्यामुळें आपल्या मानेवर पिस्तुल रोखण्यांत आलें आहे अशी जाणीव असतांनाहि ती चातुर्यानें आणि नेहमीच्याच सफाईनें मोटार चालवीत होती.

ती अगदीं गप्प बसली होती. तिच्या मनांत वादळ निर्माण झालें

होतें. त्या टोळीच्या सभासदांचें कांहीं कारणावरून आपसांत भांडण झालें असावें अशी तिची कल्पना होती. कारण तसें जर नसतें तर त्या दुसऱ्या दोघांनीं किशोर पर्वतेला तिच्याप्रमाणेंच वागविलें नसतें.

कांहीं जिवावर उदार झालेले बदमाष आपणाला पळविण्याचा प्रयत्न करीत आहेत हें लक्षांत येतांच साहसकथांमध्यें वाचलेले तशा प्रकारचे प्रसंग तिला आठवले. पण सत्य आणि साहित्य यांत तिला बराच फरक दिसला. तिनें वाचलेल्या बहुतेक साहसकथांतील तिच्याप्रमाणें संकटांत सांपडलेल्या तरुणींनीं कांहीं ना कांहीं युक्तीनें आपली त्या प्रसंगांतून मुक्तता करून घेतली होती. तिला मात्र खूप विचार करूनहि त्या संकटांतून कसें निसटून जावें तें मुळींच समजत नव्हतें.

झुंजार अगदीं शांत आणि आपल्याच विचारांत गर्क झाला होता. अंबाजीनें कांहीं तरी हेतूनेंच आपणाला व सुरेखाला कुठेंतरी नेण्याचें ठरविलें आहे हें त्यानें अगदीं सुरुवातीलाच ओळखलें होतें.

अर्थात् अंबाजीनें त्यासंबंधीं पूर्वीं कांहींच ठरविलें नसावें हें उघडच होतें. त्याला अचानक कांहींतरी आश्चर्यजनक बातमी समजली असावी. त्याच्या शेजारींच बसलेला तो पिसाळ नांवाचा माणूस अधून-मधून सूचना देत होता आणि तो अनेक जखमांच्या खुणा असलेला विद्रूप चेहरा आपण पूर्वीं कुठेंतरी पाहिला असावा असें झुंजारला वाटत होतें.

आपण पिसाळला कुठें पाहिलें हे त्याच्या लक्षांत येत नव्हतें. पिसाळचीहि आपल्याप्रमाणेंच स्थिति झाली असावी असा त्याचा तर्क होता. अधूनमधून पिसाळहि त्याच्याकडे रोखून पहात होता आणि आपण झुंजारला कधीं आणि कुठें पाहिलें याबद्दल तोहि विचार करीत होता.

अनेक वेळां वाटेंत ठिकठिकाणीं तीं नांवाचीं कार्डें हळूंच फेंकतांना झुंजारला मनांतून हंसूं येत होतें. कारण तसें करण्यानें कांहीं फायदा होईल असें त्याला वाटत नव्हतें. त्या गल्लीच्या दुसऱ्या तोंडाजवळ असलेल्या एका बंगल्यासमोर जेव्हां ती मोटार उभी करण्यास अंबाजीनें सुरेखाला सांगितलें, तेव्हां झुंजारनें हळूंच आणखी एक नांवाचें कार्ड खालीं टाकलें.

त्या ठिकाणीं ओळीनें आणखी कित्येक बंगले होते. पण अद्याप त्यांचें बांधकाम पूर्ण झालेलें नव्हतें. एखाद्या हाऊसिंग सोसायटीतर्फे ते बंगले बांधण्यांत येत असावेत असें दिसत होतें आणि त्यांपैकीं फक्त ज्या बंगल्यासमोर ती मोटार उभी राहिली होती तेथेंच कुणीतरी रहात असावें असें दिसत होतें. कारण फक्त त्याच बंगल्याच्या खिडक्यांवर पडदे सोडलेले होते.

पाठीमागून आलेली ती दुसरी मोटारहि तेथें थांबली आणि ती मोटार चालविणारा बापू आणि त्याच्या शेजारीं थरथर कापत बसलेला दगडू हे दोघेहि खालीं उतरले.

'माझी खात्री आहे कीं अंबाजी, तं या सर्वांना येथें आणलेंस हें प्राणवल्लभाला आवडणार नाहीं.' अस्वस्थ पिसाळ म्हणाला आणि त्याच वेळीं झुंजारच्या चर्येवर हास्य चमकलें. पण तें कुणाच्याहि नजरेस पडलें नाहीं. 'त्यानें फक्त तिलाच घेऊन येण्यास सांगितलें होतें ही इतकी मंडळी तुझ्याबरोबर आहे हें त्याला खचित आवडणार नाहीं.'

'त्याला कांहीं इलाज नव्हता' बेपर्वाईनें अंबाजी म्हणाला. नंतर तो रागानेंच झुंजारकडे वळला 'कांहीं गडबड न करतां मोटारींतून खालीं उतर आणि बाईसाहेब तुम्हीहि त्याचप्रमाणें करा. माझ्याजवळ भरलेलें पिस्तुल आहे हे विसरूं नका.'

'अगदीं सिनेमातल्या दरोडेखोरांप्रमाणेंच तुम्हींहि वागत आहां.' त्याच्याकडे तिरस्कारानें पहात सुरेखा म्हणाली, 'हातांत पिस्तुल घेतलें कीं, तुम्हांला रेड्याचें बळ चढतें, एरव्हीं तुमची शेपटी खालींच असते. फक्त एकच गोष्ट मला समजत नाहीं--'

'ती समजून घेण्याची घाई करूं नकोस.' झुंजार हळूंच म्हणाला.

सुरेखाचें धैर्य पाहून त्यालाहि आनंद झाला होता. ती घाबरली नव्हती, ओरडली नव्हती किंवा बेशुद्ध झाली नव्हती. जणुं काय आपणांला पळविण्यांत येत आहे ही अगदींच सामान्य गोष्ट आहे अशा तिरस्कारयुक्त बेपर्वाईनें ती शांतपणें उभी होती.

'तें समोरचें घर तुझें अगदीं आवडतें आहे अशाप्रकारें चाल.' अंबाजीनें हुकूम सोडला, 'मी तुझ्यापाठीमागें आहेंच.'

'प्राणवल्लभ काय म्हणेल कुणास ठाऊक!' पुन्हां पिसाळ म्हणाला, 'जेव्हां तो या मु ीला पाहील...'

'त्यांना येथें रस्त्यावरच ठवायचें काय?' अंबाजीनें रागानेंच विचारलें, 'या बंगल्याला मागील दार असेलच. तूं पुढें होऊन आम्हांला मार्ग दाखव, नंतर प्राणवल्लभला भेटून त्याला माझा निरोप सांग. या पाहुण्यांची त्यांच्याबरोबर ओळख करून देण्यापूर्वी मला एकट्यालाच त्याच्याशीं कांहीं बोलावयाचें आहे. बापू, तूं त्या दोन्ही मोटारी रस्त्या-वरून हलव. पाठीमागें बरीच मोकळी जागा आहे आणि खूप झाडें आहेत असें दिसतें. तेथेंच त्या दोन्ही मोटारी नेऊन ठेंव.'

'तें काम या दगडोबालाच करूं दे.' बापू म्हणाला, 'तो दुसरें कांहींच करण्याच्या लायकीचा नाही. तुला माझ्या मदतीची कदाचित् जरुरी भासेल.'

ते तिघेहि बदमाष बरेच अस्वस्थ झालेले आहेत असें झुंजारनें ओळखलें होतें. त्यांना त्यासंबंधीं पूर्वी कांहींच सूचना मिळाल्या नसाव्यात आणि पुढें काय घटना घडतील याबद्दल त्यांना कल्पना नसावी असें दिसत होतें.

त्यावेळीं त्या सर्व बदमाषांना चारी मुंड्या चीत करतां आलें असतें. एकेका ठोशांतच त्यानें त्यांना पाणी पाजलें असतें. पण त्यानें मुद्दामच तो मोह आवरला. जर सुरेखा भित्री असती तर त्यानें केलेंच असतें. पण ती शूर होती. तें सर्व सहन करण्याइतकी चिवट होती. त्यामुळें घाई करण्याची मुळीच गरज नव्हती. त्यामुळें तो शांतपणें त्या गुंडांच्या बरो-बर बंगल्याकडे जाऊं लागला.

पिसाळ मार्गदर्शन करीत होता. त्यांना मागल्या बाजूला उभें रहावयास सांगून पिसाळ पुढल्या दारानें बंगल्यांत गेला. कांहीं वेळानें त्यानें त्यांच्यासाठी मागलें दार उघडलें. यावेळीं पिसाळ अधिकच अस्वस्थ दिसत होता.

'तो अतिशय संतापला आहे.' ते सर्व आंत जातांच पिसाळ म्हणाला, 'अंबाजी, तुला तो ताबडतोब भेटणार आहे.'

अंबाजी कांहींच बोलला नाहीं. त्या सर्वांनीं आतां स्वयंपाकगृहांत

प्रवेश केला होता. बापूनें दार बंद केलें होतें. तेथें अबाजीच्या हुकुमा-वरून झुंजारची झडती घेण्यांत आली. त्याच्या खिशांतलें पिस्तुल काढून घेतल्यानंतर अंबाजीला समाधान वाटलें. त्यानें तें पिस्तुल पिसाळाच्या हातीं दिलें. पिसाळनें दाखविलेल्या मार्गानें अंबाजी आंत गेला.

तो त्या बंगल्याच्या मुख्य दिवाणखान्याकडे जात असतांनाच त्यानें मोटारीच्या इंजिनाचा आवाज ऐकला. दगडू मोटारी रस्त्यावरून हल-विण्याचें काम करीत होता. अंबाजी दिवाणखान्यांत पोहोंचला, तेव्हां तो चांगल्याप्रकारें सजविला आहे असें त्याला दिसून आलें. फक्त त्या दिवाण-खान्यांत न शोभणारी एकच गोष्ट होती व ती म्हणजे प्राणवल्लभ. त्याची दाढी वाढली होती. कपडे चुरगळलेले होते. कित्येक दिवसांत त्याला झोंप मिळाली नसावी असें त्याच्या भकास चेहऱ्यावरून दिसत होतें.

'हें तूं काय मांडलें आहेस ?' त्यानें कठोर स्वरांत अंबाजीला विचारलें.

पण अंबाजीला त्या पोलिसांना घाबरून पळ काढणाऱ्या प्राण-वल्लभाची मुळींच भीति वाटली नाहीं. तो हंसला. 'माझ्या मित्रा, शांत हो' तो म्हणाला, 'माझें नांव अबाजी. आपली पूर्वीं कधीं भेट झालेली नाहीं. तूं प्राणवल्लभ आहेस व माझी भेट घेण्याची तुझी इच्छा आहे असें मला पिसाळनें सांगितलें. थोडासा गैरसमजुतीचा प्रकार घडला आहे–'

'गैरसमजूत काय ?' मध्येंच प्राणवल्लभानें डोळे वटारीत विचारलें. 'पण त्यासंबंधीं आपण नंतर बोलूं. प्रथम माझ्या घरांत अनोळखी माणसांना घेऊन येण्याचा तुला काय अधिकार होता तें सांग. शिवाय तुला माझ्या नांवानें नागरदासाची पोर पळविण्याचा काय हक्क होता ?'

'थोडी गैरसमजूत झाली आहे असें मी तुला प्रथमच सांगितलें आहे.' अंबाजी हसून म्हणाला, 'आम्हीं किशोर पर्वते नांवाच्या एका माणसाची चोरी करण्याचें ठरविलें होतें. त्याच्याजवळच्या कागदपत्रांची आम्हीं पहाणी केली तेव्हां त्याचें नांव प्राणवल्लभ आचार्य आहे असें आम्हांला आढळून आलें. आम्हीं तुझा फोटो पाहिला नव्हता. तूं दडी मारून बसला आहेस हें आम्हांला माहीत होतें. त्यामुळें किशोरच प्राण-वल्लभ असावा अशी आमची समजून झाली.'

'तुझें म्हणणें बरोबर दिसतें.' त्रासिक स्वरांत प्राणवल्लभ म्हणाला, 'किशोरचेंहि नांव प्राणवल्लभच आहे. त्याचें व माझें एकच नांव असल्यामुळें त्याला मध्यप्रांत बराच त्रास झाला. व तो निराळें नांव धारण करून मुंबईंत रहात आहे हें मला माहीत आहे. पण नागरदासाची मुलगी पळविण्याचें कारस्थान तूं त्याच्या सहकार्यानें कां रचिलेंस?'

'आम्हांला वाटलें कीं आम्हीं खऱ्या प्राणवल्लभाला भेटत आहोंत. तूं तसल्या कामाचा तज्ञ असल्यामुळें आम्ही तो डाव रचला. तो किशोरहि बराच धूर्त दिसतो. त्यानें आज रात्रींच्या नागरदासाच्या मेजवानीचें आमंत्रण मिळवून ती पोरगी पळविण्याची अगदीं अचूक योजना आंखली होती.'

'तो किशोर हुषार असला पाहिजे, यांत शंका नाहीं.' विचार करीत प्राणवल्लभ म्हणाला, 'त्यानें तुम्हांला चांगलेंच बनविलें. गेल्या रात्रीं प्राणवल्लभ हा अंबाजी व बापू या जोडीला हाताशीं धरून कुणालातरी पळविण्याचें कारस्थान रचीत आहे अशी बातमी मला मिळाली. त्यामुळेंच मी पिसाळला तुला येथें घेऊन यावयास सांगितलें.'

'पण तुला ती बातमी कशी समजली? आमच्यापैकीं तर कुणीच त्यासंबंधीं बोललें नव्हतें.' अंबाजीनें विचारलें.

'त्यासंबंधीं आपण नंतर विचार करूं. तूं एकंदर चार माणसांना येथें आणलें आहेस याचा अर्थ काय?'

'त्या चौघांत दोघे माझे साथीदार आहेत. शिवाय मी किशोर व नागरदासाची पोरगी यांनाहि बरोबर आणलें आहे. त्या दोघांना एकाच मोटारींतून फिरतांना मी पाहिलें व किशोर विश्वासघात करण्याच्या प्रयत्नांत आहे अशा कल्पनेनें मी त्यांना बरोबर घेतलें. पण तुला त्याबद्दल मुळींच चिंता करण्याचें–'

'तसें तुला वाटतें!' रागानें प्राणवल्लभ म्हणाला, 'सारे मुंबईचे पोलीस शोध करीत असतील!'

'नाहीं. ती मुळींच भीति नाहीं. ती पोरगी स्वतंत्र बाण्याची असून तिला एकटेंच भटकण्याची संवय आहे. ती नाहींशी झाली आहे हें आज रात्रींपर्यंत कुणाच्याहि लक्षांत येणार नाहीं.'

'तिला येथें आणणें हा मूर्खपणा होता–'

'नाहीं. ती शहाणपणाचीच गोष्ट आहे. किशोरनें मेजवानीचें आमंत्रण मिळविलेंच आहे. आपण त्यालाच पैशाची मागणी करण्यासाठीं नागरदासाकडे पाठवूं. नागरदासानें आपल्या मुलीसाठीं दहा लाखांची खंडणी दिली पाहिजे असें आम्ही ठरविलें आहे. तुला पैसा नको काय?'

'मी कोणत्या परिस्थितीत आहें याची तुला कल्पना नाहीं काय?' रागानें प्राणवल्लभानें विचारलें, 'या बंगल्यांत मी स्वतःला गाडून घेतलें आहे. हा बंगला रिकामा आहे अशी आजुबाजूच्या लोकांची समजूत आहे. मी एका वर्षांपूर्वींच हा बंगला विकत घेतला होता–'

प्राणवल्लभ विचार करीत होता. त्याचा राग मावळला होता. त्या बंगल्यांत तो अगदीं सुरक्षित होता. पण त्याचा खाद्यपदार्थांचा सांठा संपत आला होता. त्याला रात्रीखेरीज बाहेर पडतां येत नव्हतें. तो फक्त तेवढ्या भागांतच पाय मोकळे करण्यासाठीं बाहेर पडत असे. पिसाळ त्याला बाहेरच्या बातम्या सांगत होता. पण मुख्य प्रश्न हा होता की त्याच्याजवळ पैसे नव्हते. पेणच्या वाड्यांतून त्याला घाईघाईनें पळ काढावा लागला होता.

आतां अचानक त्याला पैसा मिळविण्याची संधि मिळाली होती. त्याला प्रथम आवडलें नसलें तरी सुरेखा नागरदास त्या घरांत होती. पुढली सर्व योजनाहि तयार होती, त्यांतूनहि कांहीं भानगड झाली तर अंबाजी व त्याचे साथीदार यांना बळी देतां आलें असतें. नगरदासासारख्या माणसाला दहा लक्ष रुपये देणें मुळीच कठीण नव्हतें.

'ठीक आहे.' तो कांहीं वेळानें म्हणाला, 'त्या किशोरला येथें घेऊन ये मला त्याला पहावयाचें आहे. त्या पोरीलाहि येथें आण.' अंबाजीनें तेथला दिवा लावण्याचा प्रयत्न केला तेव्हां प्राणवल्लभ म्हणाला, 'मूर्खा, दिवा लावूं नकोस. लोकांच्या दृष्टीनें हा बंगला रिकामा आहे.'

संध्याकाळची वेळ असल्यामुळें त्या बंगल्यांत बराच अंधार पसरला

होता. अंबाजीनें कैद्यांना आंत आणलें. तेव्हां फक्त त्यांच्या आकृति दिसत होत्या. त्यांच्या मागोमाग पिसाळ, बापू व दगडूहि होते. दगडू आपलें काम संपवून तेथें आला होता.

प्राणवल्लभ उठून सुरेखाजवळ गेला व तिला न्याहाळून पाहिल्यानंतर तो म्हणाला, 'ताईसाहेब, तुम्हांला चिंता करण्याचें मुळींच कारण नाहीं. येथें तुम्हांला कुणीच त्रास देणार नाहीं. तुम्हांला त्या कोचावर बसायलाहि हरकत नाहीं. गडबड करूं नका म्हणजे झालें.'

'तुम्ही फारच दयाळू आहांत !' सुरेखा म्हणाली.

प्राणवल्लभानें तिच्याकडे दुर्लक्ष करून दुसऱ्या कैद्याकडे नजर वळविली. 'तुझें आणि माझें नांव एकच असल्यामुळें तुला या संकटांत सांपडावें लागलें. जर तूं शहाणपणानें वागशील — अरे बापरे !'

प्राणवल्लभ आश्चर्यानें किंचाळला. जवळून त्याला आतां कैद्याचा चेहरा स्पष्ट दिसला होता. तो कांहीं क्षण पहातच राहिला. 'झुंजार !' तो घोगऱ्या स्वरांत उद्गारला.

'काय म्हणालास ?' अंबाजीहि दचकून म्हणाला.

'मूर्खा ! यानें तुला चांगलेंच चकविलें !' प्राणवल्लभ संतापानें म्हणाला, 'हा झुंजार आहे हें तुम्हांला समजलें नाहीं ? आपण स्फोटक बॉम्ब गोळयानेंच चेंडूफळीचा खेळ खेळत आहों हें तुमच्या लक्षांत आलें नाहीं ?'

अंबाजीच्या चेहऱ्यावर प्रेतकळा आली होती. बापू कासावीस झाला होता व दगडूला फेंफरें आलें होतें.

'झुंजार ! मी त्याच्याबद्दल ऐकलें आहे !' आवंढे गिळत अंबाजी म्हणाला. 'पण याचें नांव तर किशोर पर्वते आहे — '

'गप्प बैस मूर्खा !' अधिकच चिडून प्राणवल्लभ म्हणाला. मी या झुंजारला ओळखत नाहीं काय ? यानेंच दुर्जयाच्या वाडयांत शिरून आमची दुर्दशा केली नव्हती काय ? आतां लक्षांत आलें, मी लवकरच कुणाला तरी पळविणार आहें अशा अफवा या पाजी माणसानेंच पसरविल्या होत्या — '

'अगदीं बरोबर ओळखलेंस !' झुंजार हंसून म्हणाला' 'तुला या

उंदराच्या बिळांतून बाहेर काढण्यासाठींच मी त्या अफवा पसरविल्या होत्या. त्यांचा इतक्या तावडतोब परिणाम होईल अशी माझी कल्पना नव्हती. मी फार खूष झालों आहें.'

'त्याच्यापासून दूर उभे रहा व त्याच्यावर तुमचीं पिस्तुलें रोखून धरा.' प्राणवल्लभनें हुकूम सोडला. 'त्याच्याकडे क्षणभरहि दुर्लक्ष करूं नका. तो काय करील याचा नेम नाहीं.'

त्याच्या साथीदारांनी त्याचा हुकूम अमलांत आणल्यानंतर झुंजार हंसून म्हणाला, 'तुम्हांला माझी इतकी दहशत वाटत असेल अशी मला कल्पना नव्हती. प्राणवल्लभ, तूं मुळीच चिंता करूं नकोस. त्यांनीं माझें पिस्तुल काढून घेतलें आहे.'

'झुंजार, या खेपेला मात्र तुझा डाव धुळीला मिळाला आहे. मला पकडण्यासाठीं तूं हा डाव रचला होतास. पण त्यांत तूंच अडकला आहेस!' प्राणवल्लभ समाधानानें म्हणाला.

'होय, तसें दिसतें खरें!' झुंजार सुरेखाकडे पहात हंसत म्हणाला, 'सुंदरी, तूंहि विचारांत पडली असशील. पण या भामट्यांचा समाचार घेतल्यानंतर मी सर्व खुलासा करीन.'

'ऐका, त्याचें बोलणें ऐका!' दगडू थरथरत्या स्वरांत म्हणाला. जणुं काय तो आपल्या स्वतःच्याच घरांत आहे! अरे देवा! मी इतके दिवस त्याच्याजवळ राहिलों आणि तो झुंजार आहे हें मला समजलेंच नाहीं. जर मला तें समजतें तर मी केव्हांच हृदयक्रिया बंद पडून खलास झालों असतों.'

'गप्प बैस मूर्खा!' प्राणवल्लभ संतापानें ओरडला. 'झुंजार, तूं माझ्यासाठींच किशोर पर्वते बनला होतास तर! पिसाळ, तूं याची बरोबर झडती घेतली आहेस ना?'

'होय मालक.' पिसाळ लागलीच म्हणाला.

तें सर्व संभाषण सुरेखा आश्चर्यानें ऐकत होती. आपण ज्याला सभ्य चोर समजत होतों, तो प्रसिद्ध झुंजार आहे हें समजतांच तिला परमावधीचें आश्चर्य वाटलें. तिला बरेंच समाधान वाटलें होतें. कारण आतां बऱ्याच गोष्टींचा उलगडा झाला होता. पण तिला थोडी चिंताहि

वाटत होती. झुंजार इतक्या बदमाषांना कसें चीत करणार तें तिला समजत नव्हतें.

झुंजार आपल्या तावडींत सांपडला या कल्पनेनें प्राणवल्लभ खुषींत होता. तो शक्य तितकें दूर उभें राहून झुंजारवर पिस्तुल रोखून म्हणाला, 'ऐक झुंजार, मी तुला कांही हुकूम करणार आहें, आणि ते तुला पाळावे लागतील. आतां तूं सुरेखाला पळविण्याच्या कटांत चांगलाच अडकला आहेस. आतां तूं आमच्या वतीनें नागरदासाला भेट व वीस लाख खंडणी दिली तरच त्याच्या मुलीची सुटका होईल असें त्याला सांग.'

'वीस लाख रुपये कीं कवड्या ?' झुंजारनें विचारलें.

'रुपये' मान हलवीत प्राणवल्लभ म्हणाला, 'जर तूं कांहीं दगा करण्याचा प्रयत्न केलास तर नागरदासाच्या या मुलीला लागलीच ठार करण्यात येईल.'

'जरा थांब प्राणवल्लभ.' अंबाजी घाईघाईनें म्हणाला, 'तूं त्या भयंकर माणसाला मोकळा सोडणार आहेस ? तुला वेड तर लागलें नाहीं ना ?'

'मलाहि ती कल्पना विशेष पसंत नाहीं.' प्राणवल्लभ म्हणाला, 'पण नागरदासाकडे दुसऱ्या कुणाला पाठवणार ? त्यानें त्या मेजवानीचें आमंत्रणहि मिळविलें आहे. तो हुषार आहे –'

'आतां माझी स्तुति पुरे झाली. मला प्रथम एक सिगारेट ओढावयास द्या.' झुंजार म्हणाला.

'झुंजार, तुला मी मोकळा सोडणार आहें. पण सुरेखाच्या मोटारींतून परत जातांना एक गोष्ट सतत तुझ्या नजरेसमोर राहू दे. तूं दगलबाजी करण्याचा प्रयत्न केलास तर या सुरेखाला तात्काळ ठार करण्यांत येईल. तूं तुझा जीव नेहमीच धोक्यांत घालण्यास तयार असतोस हें मला माहीत आहे. पण जिला तूं थोड्या वेळापूर्वीच 'सुंदरी' म्हणालास ती जिवंत रहावी असें तुला वाटत असेलच.'

त्यानें ती अजब युक्ति शोधून काढल्याबद्दल झुंजारनें मनांतून त्या लुच्चाची तारीफच केली. पण बाकीचे पिसाळ, बापू व दगडू त्या कल्पनेनें घाबरले होते व अंबाजीहि त्याबद्दल साशंकच होता.

' प्राणवल्लभ, प्रथम नीट विचार केला पाहिजे. ' अंबाजीनें बोलण्यास सुरुवात केली.

' मला खरोखरच तुमची कींव येते. ' तिरस्कारानें त्याच्याकडे पहात प्राणवल्लभ म्हणाला, ' मी त्या मुलीला येथेंच ठेवणार आहें अशी तुमची कल्पना आहे काय ? झुंजारला जर तिचे प्राण वांचवावयाचे असतील तर तो आपण सांगूं त्याप्रमाणें वागेल. तो तिच्या मोटारींत बसून निघून गेला कीं आपणहि येथून दुसरीकडे निघून जाऊं. आज रात्रीं दहा वाजतां मी नागरदासच्या बंगल्यांतच झुंजारला टेलिफोन करीन. सर्व ठीक असलें तर आपण त्यांच्याबरोबर पुढील व्यवहार करूं. '

' मुकुंद, मला सिगारेट दे. ' सहज स्वरांत झुंजार म्हणाला.

' होय साहेब. ' मुकुंद ऊर्फ दगडू आदबीनें म्हणाला. पण लागलीच आठवण होऊन तो म्हणाला, ' अरेच्चा ! मी यांच्या घरांतच आहें असें मला क्षणभर वाटलें होतें. '

' त्याला एक सिगारेट दे. ' प्राणवल्लभ अधिऱ्या स्वरांत म्हणाला, ' पण त्याच्यावर नीट नजर ठेव. पिसाळ, तूं त्याची सिगारेट पेटव. '

' एका क्षुल्लक सिगारेटसाठीं तुमची ही किती धांवपळ ! ' झुंजार चेष्टेनें म्हणाला.

झुंजारनें सर्वांवरून नजर फिरविली. सुरेखा अगदीं शांत होती. दगडूनें जेव्हां आपल्या थरथरत्या हातानें एक सिगारेट त्याच्या तोंडांत दिली तेव्हां आपण वाघाच्या जबड्यांत हात घालीत आहों असें त्या भित्र्याला वाटत होतें. त्याचवेळीं रस्त्यावरून जाणाऱ्या एका मोटारीचा आवाज झुंजारनें ऐकला. पिसाळनें लायटर पेटविला. झुंजारनें सिगारेटचा एक जोराचा झुरका मारला.

' प्राणवल्लभ, तुझा विजय झाला आहे. ' तो खेदानें म्हणाला.

प्रथमच त्याच्या आवाजांतील खेळकरपणा नाहींसा झाला होता. सुरेखा त्याच्याकडे निराशेनें पहात होती. प्राणवल्लभाच्या डोळ्यांवाटें विजयी आनंद ओसंडत होता. झुंजारला हातांत सिगारेट पकडणेंहि शक्य होत नव्हतें. अखेरीस ती त्याच्या ओठांतून खालीं पडलीसुद्धां.

'मला असें झालें आहे तरी काय ?' झुंजार वैतागानें म्हणाला, आणि सिगारेट उचलण्यासाठीं खालीं वांकला.

पण त्यानें सिगारेट उचलली नाहीं. त्यानें ज्या गालिच्यावर प्राणवल्लभ उभा होता तोच जोरानें ओढला. अतिशय सावध असलेला प्राणवल्लभ जोरानें खालीं आपटला व त्याच्या हातांतील उडालेलें पिस्तुल क्रिकेटच्या मैदानावरील उत्कृष्ट क्षेत्ररक्षकाच्या शिताफीनें झुंजारनें झेललें. अगदीं निमिषार्धांत तो प्रकार घडून आला होता.

'आतां मजा आली !' तो तें पिस्तुल इतर बदमाषांवर रोखून हंसून म्हणाला.

० ० ०

१४

झुंजारनें एक मिनिटापूर्वी आवाज ऐकला होता तो विजयेच्या मोटारीचाच होता. तो आवाज झुंजारनें ओळखला नसावा. निदान त्यानें तसें मुळीच दर्शविलें नव्हतें.

'आपल्या मुक्कामाचें ठिकाण आलें.' विजया म्हणाली.

तिनें त्या बंगल्याच्या फाटकाजवळ गवतावर पडलेलें तें नांवाचें कार्ड पाहिलें होतें पण मोटार लागलीच उभी केली नव्हती.

'मुक्कामाचें ठिकाण !' आजूबाजूला पहात आनंदराव म्हणाले, 'येथें तर कुणीच रहात नाहीं.'

'येथें रहात नाहीं. आपणाला हवा असलेला बंगला मागें आहे. तुम्हीं त्या बंगल्याच्या फाटकाबाहेर पडलेलें तें कार्ड पाहिलें नाहीं काय ? थांबा, मी खात्री करतें.'

ती पायींच त्या फाटकाजवळ गली व तिनें तें कार्ड उचललें. तिचा तर्क बरोबर होता. त्या बंगल्याच्या बाजूलाच असलेल्या एका लहानशा गल्लींत त्या मोटारीच्या खुणाहि दिसल्या व तिनें तसें आनंदरावांना सांगितलें.

'झुंजार खरोखरच धूर्त आहे.' आनंदराव म्हणाले. ते विजयेसह

एका झुडपाआड उभे होते. 'याच ठिकाणीं त्या सुरेखाला तिची मोटार थांबवावयास त्यांनी सांगितलें असावें व बाहेर पडतांना सुरेखनें हें काहें खालीं टाकण्याची संधि साधली असावी तिनें. आतां जवळच्या पोलीस ठाण्यावरून माणसें बोलाविलीं पाहिजेत---'

'तितकी आपणांला सवड नाहीं.' विजया मध्येंच म्हणाली, 'आपण ताबडतोब हालचाल केली पाहिजे. तो अंबाजी धोकेबाज आहे असें तुम्हींच मला सांगितलें आहे इतरांजवळहि पिस्तुलें असतील. समोरून हल्ला चढविणें धोक्याचें ठरेल.'

'कुणाला ? तूं तर त्या अंबाजीचा विचार करीत आहेस. त्या मुलीची तुला आठवणहि होत नाहीं.' आनंदराव म्हणाले.

'होय. मी त्यांचाच विचार करीत आहें. बदमाषांना संशय आला तर येथून फरारी होण्यापूर्वी ते त्यांना ठार करण्यास मुळींच कचरणार नाहींत म्हणून आपणांला अतिशय सावधगिरी बाळगिली पाहिजे.' विजया म्हणाली.

'मला मात्र हें मुळींच आवडत नाहीं.' आनंदराव म्हणाले, 'तूं जरी हुषार असलीस तरी सर्व जबाबदारी जवळजवळ माझ्या एकट्यावरच पडते. त्या बदमाषांना मी एकट्यानेंच पकडण्याचा प्रयत्न करणें अगदीच मूर्खपणाचें आहे. शिवाय माझ्याजवळ हत्यारहि नाहीं.'

'पण तुमच्या डोक्यावर ती जबाबदारी लादली आहे कुणी ?' विजयनें विचारलें.

'नाही विजूताई, तुला मी एकटीला येथें जाऊं देणार नाहीं.' आनंदराव घाईघाईनें म्हणाले.

ते विजयेच्या मागोमाग चालूं लागले. तिला बंगल्याच्या मागील दारीं जावयाचें होतें. तेथें पोहोंचल्यानंतर पाठीमागच्या मोकळ्या जागेंत उभ्या करण्यांत आलेल्या त्या मोटारी त्यांना दिसल्या.

'हा सर्व पुरावा येथें आहे.' आनंदराव त्या मोटारीकडे बोट दाखवीत म्हणाले, 'मी बाहेर पडतांना कुणाला कांहींच सूचना न देण्याचा मूर्खपणा केला. खरें म्हणशील तर तूं मला माझ्या ऑफिसांतून जवळजवळ पळवूनच आणलेंस. जर मी कांहीं व्यवस्था केली असती तर सर्व

पुराव्यानिशीं सर्वांनाच एका दमांत पकडतां आलें असतें.'

'आजीबाईसारखी कुरकूर करूं नका.' विजया म्हणाली.

आणि बंगल्यांत त्यावेळीं मोठी गंमत उडाली होती. झुंजारनें त्या छोटया गालिच्याच्या अगदीं मध्यभागीं प्राणवल्लभ उभा आहे हें पाहिलें होतें व गालिच्याखालीं अगदीं गुळगुळीत दगडी फरसबंदी आहे हेंहि बुटांचा चाळा करून ओळखलें होतें. त्यामुळें त्यानें तो गालिचा ओढतांच प्राणवल्लभानें सर्कशींतल्या विदुषकाप्रमाणें कोलांटी घेतली होती.

झुंजार आणि इतर बदमाष हातांत पिस्तुलें घेऊनच उभे होते. पण झुंजारच्या सुंदर चर्येवर कमालीचा आत्मविश्वास झळकत होता तर इतरांना अविश्वासाच्या रोगानें पछाडलें होतें.

'तुम्हीं मुकाटयानें पिस्तुल खालीं टाका.' झुंजार म्हणाला, 'मी उत्कृष्ट निशाणबाज आहें. पाहिजे तर या सुरेखाला विचारा.'

पिसाळला झुंजारचा लौकिक माहीत होता. त्यानें आपल्या हातांतलें झुंजारचें सायलेन्सर लावलेलें पिस्तुल, जणूं काय जळजळीत निखारा आहे असें समजून खालीं सोडलें. अंबाजी क्षणभर घुटमळला पण नंतर त्यानेंहि तो शहाणपणाचा मार्ग स्वीकारला.

'आतां तुम्हीं सर्व मागें सरकून त्या भिंतीबरोबर ओळीनें उभे रहा.' झुंजार म्हणाला, 'आणि सुरेखाताई, तुम्हीं ती जमिनीवर पडलेलीं पिस्तुलें उचलाल काय?'

सुरेखानें तत्परतेनें तीं दोन पिस्तुलें उचललीं. तिच्या शरिरांत आतां उत्साह संचारला होता. कांहीं क्षणातच झुंजारनें सर्व पारडें फिरविलें होतें हें पाहून तिला आश्चर्य वाटलें होतें व आनंदहि झाला होता.

प्राणवल्लभ इतकें होईपर्यंत उठून उभा राहिला होता. तो इतका जोरानें श्वासोच्छ्वास करीत होता कीं, तो आवाज सर्वांनाच स्पष्ट ऐकूं येत होता.

'प्राणवल्लभ, खिशांत हात घालण्याचा मूर्खपणा करूं नकोस! अगदीं शांत उभा रहा.' झुंजारनें त्याला समज दिली.

'झुंजार, तूं आमच्या हातून निसटला अशी जर तुझी कल्पना असली तर ती चुकीची आहे; तूं एकटा आहेस; आम्हीं पांचजण आहोंत.,

'मान्य आहे.' झुंजार म्हणाला, 'पण पिस्तुल फक्त माझ्याच हातांत आहे आणि मला तुझ्या खिशांतलें तें दुसरेंहि पिस्तुल हवें आहे. कारण तुझ्या हाताचीं बोटें सारखीं वळवळत आहेत.'

प्राणवल्लभानें एक शिवी हांसडली आणि आपल्या खिशांतून दुसरें पिस्तुल बाहेर काढलें. 'सांभाळ प्राणवल्लभ.' झुंजारनें त्याला इषारा दिला, 'एक तरुणी येथें असतांना तिच्या समक्ष रक्तपात करण्याची माझी इच्छा नाहीं.

'मी हें पिस्तुल उलटें पकडलें आहे.' प्राणवल्लभ रागानें म्हणाला, 'माझी इतक्यांतच मरायची इच्छा नाहीं.'

त्यानें तें पिस्तुल जमिनीवर फेकलें. पण तें जमिनीवर पडलें नाहीं. झुंजार उभा होता त्याच्या डोक्यावर एक कांचेचें झुंबर लटकत होतें. पिस्तुलाचा जोराचा फटका त्या झुंबऱ्यावर बसला आणि त्याबरोबर तें फुटून कांचांचे असंख्य तुकडे फवाऱ्याप्रमाणें त्याच्या अंगावर पडले. प्राणवल्लभ असें कांहींतरी करील अशी झुंजारची कल्पना होती. त्यानें आपलें पिस्तुलहि झाडलें होतें. पण वरून तोंडावर कोसळणाऱ्या कांचेच्या तुकड्यांमुळें त्याची ती गोळी प्राणवल्लभाच्या खांद्याला चाटून भिंतींत घुसली होती.

आणि त्याच नाटयपूर्ण क्षणाला प्राणवल्लभानें झुंजारच्या अंगावर त्वेषानें उडी घेऊन त्याचे पाय पकडले होते आणि त्याबरोबरच अंबाजीला आणि बापूला ओरडून मदत करण्यास सांगितलें. पिसाळ एखाद्या दगडी पुतळ्याप्रमाणें भांबावला होता आणि दगडू तर बेशुद्धच झाला होता.

झुंजारनें त्वेषानें त्याच्याबरोबर लढण्यास सुरुवात केली होती. पण प्राणवल्लभ त्याच्या दोन्हीं पायांना घोरपडीप्रमाणें चिकटला होता आणि त्याच्या दोन्ही हातांना अंबाजी आणि बापू अगदीं जळवाप्रमाणें झोंबले होते.

'पिसाळ, त्या पोरीला पकड!' धापा टाकीत प्राणवल्लभ म्हणाला. कोणत्या क्षणीं झुंजार आपल्या पकडींतून सुटेल याचा नेम नव्हता.

पिसाळ भानावर आला आणि त्यानें सुरेखाला पकडलें. त्या आडदांडानें त्या सुंदर तरुणीची मान आवळण्यास सुरुवात करताच झुंजारनें

आपली धडपड थांबविली. त्याला आतां उभें करण्यांत आलें होतें आणि त्याचे दोन्ही हात मागें खेंचून घट्ट पकडण्यांत आले होते. त्याच्या कपाळावरून रक्त वहात होतें. वरून कोंसळणाऱ्या कांचेच्या एका धारदार तुकड्यानें त्याच्या कपाळावर जखम केली होती. त्या बदमाषांबरोबर झटापट करतांना त्या जखमेंतून वहाणारें रक्त त्याच्या डोळ्यांत शिरलें नसतें तर त्यानें त्याहि परिस्थितींत आपल्या प्रतिस्पर्ध्यांना चीत केलें असतें.

'बोला झुंजार महाराज, आतां कसें काय वाटतें ?' एक पिस्तुल ताब्यांत घऊन तें त्याच्या बरगडींत खुपशीत त्वेषानें प्राणवल्लभ म्हणाला. 'आतां बोलण्यासारखें फारसें उरलेलें नाहीं. अंधार पसरला आहे. आम्हांला येथून गेलें पाहिजे.'

'पण त्यांना जखम झाली आहे.' सुरेखा म्हणाली.

'सुरेखाताई, ती जखम अगदीं क्षुल्लक आहे.' झुंजार म्हणाला.

'पण कदाचित् आणखीहि मोठी जखम होण्याचा संभव आहेच.' प्राणवल्लभ म्हणाला, 'झुंजार, मी तुला मघा सांगितल्याप्रमाणें कर. तुला मी आतां बाहेर नेऊन या पोरीच्या मोटारींत बसविणार आहें. त्यानंतर पुढें काय करावयाचें तें तुला माहीत आहेच; पिसाळ, त्या पोरीला नीट सांभाळ; नाहींतर ती कांहीं गडबड करण्यास सुरुवात करील.'

'तुम्ही सर्व पिस्तुलें घेऊन उभे असतांना मी कसली गडबड करणार ? बाबांचे पैसे वांचविण्यासाठीं जीव देण्याची माझी तयारी नाहीं. शिवाय अद्याप कित्येक गोष्टी घडून येतील. दोन मिनिटांपूर्वीं झुंजाररावानें तुम्हां सर्वांचाच जवळ जवळ पराभव केला होता.'

झुंजारला तिच्याबद्दल अधिकच आदर वाटला. तिची धीर गंभीर शांत वृत्ति व समयसूचकता पाहून तो खूष झाला होता. तो त्यासंबंधीं कांहीं बोलणारहि होता. पण त्याचवेळीं त्याला तेथून खेंचूनच मागील दारानें बाहेर नेण्यांत आलें. प्राणवल्लभाला आपलें काम उरकण्याची अतिशय घाई झाली होती.

बाहेर अतिशय अंधार होता. झुंजारला यावेळीं मुळींच संधि देण्यांत आली नव्हती. त्याचा एक हात अंबाजीनें तर दुसरा हात बापूनें पकडला होता. पाठीला पिस्तुल टेकून प्राणवल्लभ चालत होता. पण त्यावेळीं धडपड करण्याचीहि कांहीं आवश्यकता नव्हती कारण ते त्याला आतां सोडून देणार होते.

एरव्हीं तशा परिस्थितींत तो खुषींतच असता. पण आपण एका दिशेनें जाणार आणि दुसऱ्या दिशेने ते बदमाष सुरेखाला कुठेंतरी अज्ञात ठिकाणीं नेणार या विचारानें तो अस्वस्थ झाला होता.

विजया आणि आनंदराव आतां त्या मोटारीजवळ असलेल्या एका झुडपाआड दडून राहिले होते. पाठीमागलें दार अचानक उघडलें गेल्यामुळें त्यांना तसें करावें लागलें होतें.

'ते मोटारीकडेच येणार असें दिसतें.' आनंदराव म्हणाले, 'पण माझा एकट्याचा त्या इतक्या बदमाषांपुढें काय निभाव लागणार?'

'तोंड बंद करा आणि कान उघडा.' विजयेने त्यांना सल्ला दिला. पायरीवर उभे असलेले बदमाष मोठ्यानें बोलत होते.

'प्राणवल्लभ, तुझें हें करणें मला मुळींच पसंत नाहीं.' अंबाजी म्हणाला, 'झुंजारला येथून जाऊं देणें हा शुद्ध वेडेपणा आहे.'

'मी ज्या मार्गानें त्याला जाऊं देतों तो मार्ग खचित वेडेपणाचा नाहीं.' अधिऱ्या स्वरांत प्राणवल्लभ म्हणाला, 'झुंजार, काय करावयाचें तें तुला माहीत आहेच. तूं त्या पोरीची मोटार घेऊन तिच्या बापाची भेट घे. वीस लक्ष रुपये खंडणी न दिल्यास सुरेखा पुन्हां कधींहि दृष्टीस पडणार नाहीं असें त्या थेरड्याला सांग.'

'आम्हीं त्या पोरीला घेऊन दुसऱ्या मोटारीनें निराळ्याच मार्गानें जाणार आहोंत. या क्षणाला ती सुरेखा नाहींशी होणार आहे. तूं दहा वाजतां अगदीं तयारींत रहा. कारण बरोबर दहा वाजतां मी तुला नगरदासांच्या बंगल्यांत टेलिफोन करीन. त्यावेळीं मला तूं योग्य उत्तर दिलें पाहिजेस.'

झुंजारनें कितीहि डोकें लढविलें तरी त्याची प्राणवल्लभानें योजि-लेल्या फांसांतून मुक्तता व्हावयाची नाहीं, हे आतां अंबाजीलाहि कबूल करावें लागलें. जर त्यानें दगा करण्याचा प्रयत्न केला तर सुरेखा आपल्या प्राणाला मुकणार होती.

'ऐकलेंत ना ?' विजया आनंदरावांच्या कानाला तोंड लावून म्हणाली, 'अगदीं माझ्या मनासारखेंच घडून येत आहे. चला माझ्याबरोबर.'

अगदीं छायेप्रमाणें विजया आनंदरावांना घेऊन मोठ्या दाट निळ्या रंगाच्या मोटारीजवळ गेली. झुंजारला सुरेखाची मोटार देण्यांत येणार होती आणि त्यापूर्वीं त्या निळ्या मोटारींतूनच ते बदमाष सुरे-खाला कोणत्यातरी अज्ञात ठिकाणीं घेऊन जाणार होते.

तिनें मोटारीच्या पाठीमागें असलेल्या सामानाच्या पेटीचें झांकण उघडलें. तिच्या कल्पनेप्रमाणेंच त्या पेटींत ऐनवेळीं प्रसंगीं उपयोगी पड-ण्यासाठीं ठेवलेलें टायर चढविलेलें चाक होतें. तिच्या सूचनेप्रमाणें आनंदरावांनीं तें चाक उचलून बाजूच्या झुडपांत फेकलें.

'विजूताई, तूं करणार आहेस तरी काय ?' त्यांनीं विचारलें.

'या मोटारींतून नगरदासांच्या मुलीला कोणत्यातरी गुप्त ठिकाणीं नेण्यांत येणार आहे. त्यामुळें मीहि या सामानाच्या पेटींतून त्यांच्याबरो-बरच प्रवास करण्याचें ठरविलें आहे. तुम्हीं आमच्या साहेबांच्या पाठी-मागून नगरदासांच्या बंगल्यांत जा आणि तेथेंच माझ्या टेलिफोनची वाट पहात रहा.'

'विजताई, तुला वेड लागलें आहे. त्या बदमाषांबरोबर मी तुला जाऊं देईन असें तुला वाटतें तरी कसें ?'

'मला थांबविण्याचा प्रयत्न तर करून पहा !' विजया म्हणाली, 'आधीं तुमची हॅट माझ्याजवळ द्या.'

'माझी हॅट ? आणि ती कशासाठीं ?'

पण त्यांनीं आपली हॅट तिच्या हातांत दिलीच होती. विजया लाग-लीच त्या पेटींत दडून बसली आणि झांकण बंद होऊन गुदमरण्याची पाळी येऊं नये या विचारानें तिनें आनंदरावांच्या हॅटचें टोंक त्या झांकणाच्या फटींत अडकाविलें.

आनंदरावांचा नाइलाज झाला होता. त्यांना मोठ्यानें बोलतांहि येत नव्हतें किंवा तिला जबरदस्तीनें खेचूनहि काढतां येत नव्हतें. शिवाय ते बदमाष आतां अगदीं जवळहि आले होते. एकदां त्यांच्या मनांत विचार आला होता कीं, आपण पुढें होऊन त्या बदमाषांना अडविण्याचा प्रयत्न करावा. पण विजयेची युक्ति धोक्याची असली तरी अधिक चांगली आहे हें त्यांनाहि पटलें होतें. त्यामुळें त्यांनीं तेथल्या झुडपांत दडी मारली.

आपल्या जागेवरूनच त्यांनीं झुंजारला सुरेखाच्या मोटारींतून तेथून निघून जातांना पाहिलें. प्राणवल्लभानें झुंजारला दिलेली अखेरची धमकीहि त्यांनीं स्पष्ट ऐकली. जर ठरल्याप्रमाणें घडलें नाहीं तर सुरेखा कुणाच्याहि दृष्टीस पडणें शक्य नाहीं असें प्राणवल्लभानें त्याला बजाविलें होतें.

झुंजार तेथून निघून गेल्यानंतर बदमाषांची बरीच धांदल उडाली होती. प्राणवल्लभ स्वत: मोटार चालविण्यास बसला होता. सुरेखाला मोटारीच्या आंतल्या भागांत बसविण्यांत आलें होतें. तिच्या एका बाजूला अंबाजी आणि दुसऱ्या बाजूला पिसाळ बसला होता. बापू आणि दगडू समोरच्या भागांत प्राणवल्लभाच्या शेजारीं बसले होते.

ती मोटार चालू झाली. ती रस्त्यावर पोहोंचल्यानंतर आनंदराव आपल्या तंद्रींतून जागे झाले आणि त्यांनीं विजयेनें दूर उभ्या केलेल्या मोटारीकडे धांव घेतली.

त्या दिवशीं हवा अगदीं थंड सुटली असतांनाहि आनंदराव घामाघूम झाले होते. आणि झुंजार–विजयेच्या नादीं लागून नेहमींच भलत्याच भानगडींत आपण कां पडतो, असा प्रश्न ते आपल्या मनाला विचारीत होते. पण त्याच वेळीं ती जोडी अतिशय हुशार आहे आणि त्यांची आपणाला मदतच होते हेंहि त्यांच्या मनाला पटत होतें. दडी मारून बसलेला प्राणवल्लभ कदाचित् आपणाला कधींच सांपडला नसता, पण झुंजारनें त्याला उघडयावर आणलें आहे हें त्यांना मान्य करावें लागतच होतें आणि विजयेनेंहि त्याला त्या कामांत सहाय्य करण्यासाठीं बरीच मेहनत घेतली होती हेंहि अगदीं उघड होतें.

'काय पण जोडी जमली आहे !' मोटार सुरूं करतांना आनंदराव म्हणाले.

त्यांनीं भरवेगानें मोटार सुरूं केली. अंधेरीजवळच सुरेखाची मोटार अडविण्यांत आली होती. ती मोटार दिसेल त्या ठिकाणीं अडवावी असा आनंदरावांनींच हुकूम सोडला होता.

'या आनंदराव, अगदीं वेळेवरच आलांत.' झुंजार शांतपणें म्हणाला, 'या तुमच्या मंडळींना मी एक सभ्य गृहस्थ आहे हें तुम्हींच सांगा.'

'मला पाहून तुला आश्चर्य वाटलें नाहीं ?'

'मी कांहीं बहिरा नाहीं.' झुंजार म्हणाला, 'मी विजयेच्या मोटारीचा आवाज ओळखला होता आणि तुम्हीं दोघे जवळपासच आहांत हें माझ्या लक्षांत आलें होतें. पण विजू तुमच्या बरोबर दिसत नाहीं. तेव्हां तुमची बातमी मला सांगा.'

'ती मी तुला एका मिनिटांत सांगतों. पण ती ऐकून तुला आनंद होईल असें वाटत नाहीं.' आनंदराव म्हणाले. नंतर तेथल्या पोलीस अधिकाऱ्याला ते म्हणाले, 'तुम्हीं ही सुरेखाची मोटार ताब्यांत घ्या. झुंजार माझ्या मोटारींत बसेल, आम्हीं ताबडतोब मुंबईला जात आहोंत.'

विजयेची मोटार चालविण्यास झुंजारच बसला आणि आनंदरावांनीं त्याच्या बाजूलाच बसून त्याला विजयाबद्दलची माहिती सांगितली पण ती ऐकून त्यांच्या कल्पनेप्रमाणें झुंजार गंभीर न होता उलट हंसूं लागला.

'छान झालें !' तो म्हणाला, 'माझेंच काम तिनें पुढें चालू केलें आहे. नांवाच्या कार्डाचा अर्थ लक्षांत घेऊन इतक्या लवकर तिनें बदमाषांचें ठिकाण शोधून काढलें ही सुद्धां तिची कमालच म्हणायची.'

'पण तुला त्या पोरीची चिंता वाटत नाहीं ?'

'कोणत्या पोरीची ?' झुंजारनें विचारलें, 'एकंदर दोन पोरी आहेत.'

'मी विजूताईबद्दल बोलत आहे.' आनंदराव गुरगुरले, 'तिच्या बरोबर असलेले बदमाष खुनी आहेत. विशेषतः तो प्राणवल्लभ महाघातकी इसम आहे.'

'पण एक गोष्ट तुम्हीं लक्षांत घेत नाहीं.' झुंजार म्हणाला, 'ती त्याच्या बरोबर आहे हें त्या बदमाषांना माहीत नाहीं. आपण नागरदासांच्या वाड्यांत जाऊन तिच्या टेलिफोनची वाट पाहूं.मला विजूची आणि त्या सुरेखाचीहि चिंता वाटत नाहीं.'

जरी झुंजार असें बोलत होता तरी मनांत तो विजयेबद्दल चिंताच करीत होता. तिनें हातीं घेतलेली कामगिरी सामान्य नव्हती. जर कांहीं घोटाळा झाला, जर त्या बदमाषांनीं तिच्या एखाद्या केंसालाहि धक्का लावला....

० ० ०

१५

सुरेखा धीट आणि चाणाक्ष तरुणी होती यांत मुळींच शंका नव्हती. जर त्या मोटारींत बापू आणि दगडू हे दोघे बसते तर तिनें रस्त्यावरील माणसांचें आपणाकडे लक्ष वेधून घेण्याचा खात्रीनें प्रयत्न केला असता. पण अंबाजी कोणत्या प्रकारचा माणूस आहे हें तिनें ओळखलें होतें आणि त्यामुळें ती मुळींच हालचाल न करतां स्वस्थ बसली होती.

शूर झुंजारचाहि पराभव झाला आणि आतां ती पूर्णपणें त्या बदमाषांच्या तावडींत सांपडली होती. आयुष्य मिळमिळीत नसावें, त्यांत गडबड मारामारी, धांवपळ असलीच पाहिजे असें ती आपलें मत वारंवार आपल्या मित्रमंडळींना बोलून दाखवीत असे. पण आतां एकामागून एक इतके जळजळीत प्रकार तिला प्रत्यक्ष अनुभवावयास मिळाले होते कीं आपली हौस आतां अगदीं पूर्णपणें भागली आहे असें तिला वाटत होतें.

आणि त्या रस्त्यावर फारशी रहदारीहि नव्हती. जर तिनें बाहेरच्या कुणाचें आपणाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असता तर त्यापासून विशेष फायदा झाला नसता. रहदारीचे रस्ते टाळूनच प्राणवल्लभ मोटार चालवीत होता आणि तो त्यांना घेऊन कुठें चालला आहे हें अंबाजीलाहि माहीत नव्हतें.

मोटार ओबडधोबाड मार्गावरून चालली होती आणि त्यामुळें आंत बसलेल्यांना सारखे हिसके बसत होते आणि ते मोटारीच्या पाठीमागल्या पेटींत दडून बसलेल्या विजयेला अधिक जाणवत होते. अखेरीस ती मोटार एके ठिकाणीं उभी राहिली. आणि तिला प्राणवल्लभाचा आवाज एकूं आला.

प्रवासाला सुरुवात झाल्यापासुन त्या मोटारीच्या एखाद्याहि टायरनें दगा देऊं नये याबद्दल ती सारखी परमेश्वराचा धांवा करीत होती. कारण तसें जर घडलें असतें तर त्या बदमाषांना पाठीमागली ती सामानाची पेटी उघडावी लागली असती. पण तसें घडलें नव्हतें.

तिनें कुठलीतरी दारें उघडण्याचा व बंद होण्याचा आवाज ऐकला व नंतर शांतता पसरली. त्यानंतर एक क्षणभरच वाट पाहून विजयेनें हळूंच त्या पेटीचें दार उघडलें आणि बाहेर उडी घेतली. कांहीं वेळ तिला आपल्या पायांचा उपयोगच करतां येईना. त्या अरुंद जागेंत शरीराची घडी करून बसावें लागण्यामुळें तिचे दोन्ही पाय अवघडले होते.

पायांची पुन्हां हालचाल सुरू होण्यास आणखी एक दोन मिनिटें लागलीं. नंतर तिनें मोटारीकडे पाहिलें. आंत कुणींच नव्हतें. तिनें आजूबाजूला नजर फेंकण्यास सुरुवात केली. ती अगदीं एकांतांतली जागा होती. आजूबाजूला घरें नव्हतीं, रस्त्या नव्हता, अगदीं भयाण शांतता पसरली होती. त्या मोटारींतील बदमाष सुरेखाला घेऊन कोणत्या दिशेनें निघून गेले हें समजण्यास कांहीं मार्ग नव्हता.

तिनें ती सामानाची पेटी तपासली. त्या पेटींत तिला एक लहानशी टॉर्च सांपडतांच बरेंच समाधान वाटलें. तिनें ती टॉर्च पेटविली. सभोंवतालीं बरेंच गवत वाढलेलें होतें. एक लहानशीच पायवाट तेथें होती आणि पावसानें भिजलेल्या त्या वाटेवर बुटाचे ठसे उमटले होते.

ती त्या वाटेनें जाऊं लागली. तिच्या कल्पनेपेक्षांहि ते बदमाष जवळच होते. ती झपाट्यानें चालत असल्यामुळें तिनें त्यांना थोड्याच अवकाशांत गांठलें होतें. पण अंधारामुळें तिच्या तें लक्षांत आलें नव्हतें. त्यामुळें एकाएकीं आवाज ऐकून ती दचकून उभी राहिली.

'कोण आहे ?' कुणीतरी म्हणालें.

एका झाडाची वाटेंत पडलेली सुकलेली फांदी तिचा पाय पडून मोडली होती. तो आवाज कुणीतरी ऐकला होता.

'तुमच्यापैकीं एकानें मागें जाऊन पहा.' प्राणवल्लभाचा हुकमी आवाज तिनें ऐकला. 'तुमच्यापैकीं कुणाजवळहि टॉर्च नाहीं काय ?'

'माझ्याजवळ आहे.' बापू म्हणाला.

त्या परिस्थितींत एकच गोष्ट शक्य होती आणि तीच विजयेनें केली. पाऊलवाट सोडून ती बाजूच्या वाढलेल्या गवतांत शिरली आणि दबा धरून बसली. हातांत टॉर्च घेऊन त्या पाऊलवाटेवरून जाणाऱ्या आणि परतणाऱ्या बापूला तिनें पाहिलें. शोध करून तो परत गेला होता.

'कुणींच नाहीं.' बापूचाआवाज तिनें ऐकला, 'एखादें मांजर, उंदीर किंवा मुंगूस असावें.'

'ठीक आहे, पुढें चला.' प्राणवल्लभाचा आवाज ऐकूं आला.

आणि यानंतर विजयेनें अगदीं जपून पाठलाग करण्यास सुरुवात केली. यापुढें उतरण होती. पायाखालची जमीन अधिकच ओलसर होती. गारा वारा सुटला होता आणि जवळच समुद्राच्या लाटांचा आवाज होत होता.

'सुरेखा, तूं या वाटेनें ये.' प्राणवल्लभ म्हणाला, 'चिंता करण्याचें कांहीं कारण नाहीं. तूं येथें अगदीं आरामांत राहशील. पण फळीवरून चालतांना सांभाळ. ती फार रुंद नाहीं.'

'तिला बोटीवर ठेवायचें?' अंबाजीनें विचारलें.

'होय. या ठिकाणीं आजूबाजूला बरीच झाडी आहे. त्यामुळें ही छोटी मोटारबोट दुरून कुणालाहि दिसणें शक्य नाहीं.'

'ही तुझी आहे काय ?' अंबाजीनें विचारलें.

'नाहीं. पण ही भलतीच चौकशी तुला हवी कशाला ?'

कांहीं वेळानें ते सर्व बदमाष सुरेखासह त्या मोटारबोटीवर चढले. ती मोटारबोट मुंबईंतील एका हौशी श्रीमंताची होती. दुर्जय हा लक्षाधीश राजबहाद्दूर आहे अशा कल्पनेनें तो इसम एकदां पेगच्या वाड्यांत दोन दिवस राहिला होता. आणि त्यावेळीं घोडबंदर जवळ आपली एक मोटारबोट नांगरलेली आहे असें त्यानें सांगितलें होतें.

प्राणवल्लभानें कांदीवली जवळील त्या बंगल्यांत रहावयास आल्यानंतर एके रात्रीं तेथें येऊन ती मोटारबोट पाहून ठेविली होती. तसाच प्रसंग आला तर फरारी होण्याचें एक साधन या दृष्टीनेंच त्यानें ती पहाणी केली होती आणि आज रात्रीं अगदीं ऐनवेळीं ती मोटारबोट त्याच्या उपयोगी पडली होती. मोटारबोटीचा श्रीमंत मालक फक्त नाताळामध्यें त्या बोटींतून सहल करीत असतो हें त्याला माहीत होतें आणि नाताळ तर नुकताच मागें पडला होता.

विजयेनें ती मोटारबोट शक्य तितकें जवळ जाऊन पाहिली. आणि ती मागें फिरली. त्या ठिकाणीं जवळपास टेलिफोन मिळणें शक्य नव्हतें. विजया पुन्हां त्या मोटारीपर्यंत आली व नंतर हातांतील टॉर्चचा उपयोग करीत तिनें मोटारीच्या टायरच्या खुणांवरून बऱ्याच मेहनतीनें मुख्य रस्ता शोधून काढला.

आतां ती त्या रस्त्यावरून धांवत सुटली होती. रस्ता साधारणच होता आणि तेथें प्रकाशाची सोय नव्हती. अधूनमधून हातांतील टॉर्चचा उपयोग करीत विजया सारखी पळत सुटली. बऱ्याच वेळानें तिला रस्त्यावरील म्युनिसिपालिटीच्या दिव्याचा प्रकाश दिसला आणि तिला समाधान वाटलें.

त्या दिव्याजवळ जातांच तेथून खऱ्या रहदारीच्या रस्त्याला सुरवात होते असें तिला आढळून आलें. त्या रस्त्याच्या दोहों बाजूला छोटीं घरें होतीं आणि प्रत्येक घराच्यासमोर लहानगी बागहि होती. अखेरीस तिला एका घरांतून बाहेर पडणारा एक वृद्ध माणूस दिसला.

ती धांवतच त्याच्याजवळ गेली आणि तिनें त्याला विचारलें, 'येथें जवळपास टेलिफोनची व्यवस्था आहे काय ?'

'होय.' तो वृद्ध म्हणाला, 'येथून दहा मिनिटें सरळ पुढें चालत गेलांत की तुमच्या डाव्या हाताला पोस्ट ऑफिस लागेल. तेथून रात्रंदिवस टेलिफोन करण्याची व्यवस्था आहे.'

तिनें त्या वृद्धाचे आभार मानले आणि ती पुन्हां धांवत सुटली. रात्र जरी फार झालेली नव्हती तरी दाट अंधार पसरलेला होता आणि हवा थंड व पावसाळी असल्यामुळें त्या उपनगरांत रहाणारे रहिवासी

दारें बंद करून आपापल्या घरांत बसले होते. त्यामुळें रस्त्यावर अगदीं शुकशुकाट होता.

अखेरीस तिला तें पोस्ट ऑफिस मिळालें. तेथल्या डिरेक्टरीमधून तिनें शेठ नागरदासाचा टेलिफोन नंबर मिळविला. नंबर फिरवून कनेक्शन मिळतांच ती म्हणाली, ' नागरदासांचाच बंगला ना? मला—'

' शाबास विजू !' दुसऱ्या टोंकाकडून ओळखीचा आवाज ऐकूं आला, ' आणखी एक तास तरी तुझ्या टेलिफोनची वाट पहात बसावें लागेल अशी माझी कल्पना होती.'

' तुमचा आवाज ऐकून मला अतिशय आनंद झाला. आनंदराव तेथें आहेत ना ?'

' होय. पण विजू, तूं ठीक आहेस ना ?'

' होय, बरी आहें, फक्त पांचशें ठिकाणीं मार बसला आहे. !

' काय म्हणतेस ? म्हणजे—'

' तें आतां राहूं द्या. ' विजया म्हणाली, ' मोटारीच्या पाठीमागल्या पेटींत बसून प्रवास करणें किती आरामाचें असतें याची कल्पना तुम्हांला आहेच ! पण आतां माझी हकीकत लक्षपूर्वक ऐका.'

' विजू, खरें सांगायचें तर तुझा आवाज ऐकून मला इतकें समाधान वाटत आहे कीं, दुसरें कांहीं ऐकण्याचीच माझी इच्छा नाहीं. पण नागरदासांना आपल्या मुलीबद्दल अतिशय चिंता वाटत आहे. त्यामुळें तुझी हकीकत ऐकून घेण्यास मी तयार आहें.'

झुंजार यावेळीं शेठ नागरदासांच्या दिवाणखान्यांत होता. टेलिफोनची घंटी वाजली त्यावेळीं तो नागरदासांबरोबरच बोलत होता. ' लोकहित ' या मराठी दैनिकाचा तो लक्षाधीश गुजराथी मालक आपली मुलगी परत मिळविण्यासाठीं बदमाषांना ते मागतील तितकी रक्कम देण्यास तयार झाला होता.

आतांपर्यंत त्याच्या बायकोला मात्र सुरेखाबद्दल कांहींच कळविण्यांत आलें नव्हतें. ती मेजवानीसाठीं आलेल्या अनेक पाहुण्यांमध्यें मिसळून हास्यविनोद करीत होती. लहरी सुरेखा आपल्या एखाद्या मैत्रिणीकडे गेली असावी अशी तिची कल्पना होती.

' मी कुठून टेलिफोन करीत आहें हें मला बरोबर सांगतां येणार नाहीं. तुम्हीं टेलिफोन एक्स्चेंजकडून ती माहिती मिळवूं शकाल. ' विजया म्हणाली, ' ती माहिती मिळवितांच तुम्ही सरळ येथें निघून या.'

' जरा थांब. ' झुंजार म्हणाला, ' त्या सुंदर सुरेखाची काय बातमी आहे ? तिला त्यांनीं कुठें ठेविली आहे ?'

'तुम्हांला कल्पनाहि येणार नाहीं अशा एका ठिकाणीं. मला तें ठिकाण बरोबर सांगतां येणार नाहीं. पण -- '

झुंजारनें रिसीव्हरमधून एक विशिष्ट प्रकारचा आवाज - व त्यानंतर निरनिराळ्या प्रकारचे कित्येक आवाज ऐकले. प्रथम कुणीतरी जोरानें फटका मारावा तसा आवाज झाला होता. नंतर विजयेच्या मुखावाटें निघालेला आश्चर्योद्गार, विव्हळणें, धडपडणें, खालीं पडणें वगैरे आवाज त्यानें ऐकले व त्याच वेळीं रिसीव्हरमधून खट्ट असा आवाज होऊन टेलिफोन बंद पडला होता.

'विजू !' झुंजार मोठ्यानें म्हणाला.

'काय झालें ?' बाजूला बसलेल्या आनंदरावांनीं घाबरून विचारलें.

'ती बोलत असतांनाच कुणीतरी तिला आपलें बोलणें अचानक बंद करण्यास भाग पाडलें आहे.' झुंजार गंभीरपणें म्हणाला, 'जर त्या सैतानांनीं तिच्या केंसाला हात लावला तर... आनंदराव, आधीं हा टेलिफोन उचला आणि ती कुठून बोलत होती तें शोधून काढा. क्षणाचाहि विलंब होतां कामा नये.'

विजयेप्रमाणेंच टेलिफोनचा शोध करीत मोटारीनें तेथें आलेल्या प्राणवल्लभानें अगदीं ऐनवेळीं विजयेला गांठलें होतें. तिनें अद्याप महत्त्वाची बातमी सांगितलेली नाहीं हें लक्षांत येतांच त्यानें आपल्या पिस्तुलाच्या दस्त्यानें तिच्या मस्तकावर जोराचा प्रहार केला होता आणि त्याबरोबर विव्हळत धडपडत विजया खालीं पडून बेशुद्ध झाली होती.

'मला मदत कर.' जोरानें प्राणवल्लभ म्हणाला.

त्याच्याबरोबर असलेला बापू थरथर कांपत होता. पण त्यानें लागलीच प्राणवल्लभाची आज्ञा मान्य केली. त्या दोघांनीं तिला उचलून बाहेर उभ्या असलेल्या मोटारींत ठेविली आणि ते दुसऱ्याच क्षणीं तेथून पसार झाले. पोस्ट ऑफिस बंद होतें. बाहेरच्या ओटीवर तो सार्वजनिक टेलिफोन बसविलेला होता. विजयेवरील तो नाट्यपूर्ण हल्ला तीस सेकंदांपेक्षांहि कमी अवधींत झाला होता आणि तो इतर कुणाच्याहि दृष्टीस पडला नव्हता.

'प्राणवल्लभ, तुम्हांला खात्रीनें वेड लागलें आहे.' बापू म्हणाला, 'तुम्हीं त्या तरुणीला जखमी केलें आहे - ती बेशुद्ध झाली आहे. असें तुम्हीं कां केलेंत?'

प्राणवल्लभ, घाबरला होता आणि संतापला होता. 'मी तसें कां केले तें तुला सांगतों.' तो म्हणाला, 'मी त्या तरुणीला जखमी कां केलें? मूर्खा, तिला तूं ओळखलें नाहींस काय ? ती झुंजार इतकीच धाडसी

असलेली त्याची बायको विजया आहे.'

'अरे बापरे !' बापू घाबरून म्हणाला,

'आणि त्यामुळेंच मला तिच्या मस्तकावर प्रहार करावा लागला. ती आपल्या हातीं सांपडली हें आपलें सुदैवच म्हणावयाचें.'

प्राणवल्लभ वेगानें मोटार चालवीत होता. घाबरलेला बापू त्याला म्हणाला, 'तरीहि तें मला आवडत नाहीं. एका स्त्रीवर हात टाकणें अगदींच नीचपणाचें आहे. मी माझ्या साऱ्या आयुष्यांत कधीं तसें केलें नाहीं.'

'पण ही सामान्य स्त्री नाहीं. ती झुंजारची मदतनीस आहे आणि जवळजवळ त्याच्याइतकीच धूर्त आहे. मूर्खा, मला तुझ्याकडून शहाणपणा शिकावयाचा नाहीं. तिला बेशुद्ध करण्याखेरीज दुसरा मार्गच नव्हता.'

ते पुन्हां रानांतल्या ठिकाणीं आले व तेथून त्यांनीं विजयेला उचलून त्या मोटारबोटीवर नेलें. प्राणवल्लभाची हकीकत ऐकून अंबाजीहि अस्वस्थ झाला. विजयेच्या कपाळावर रक्त पाहून सुरेखाहि घाबरली. त्या बदमाषांच्या निर्दयपणाचा तो पुरावाच होता.'

'तुम्हीं तिला ठार केलें कीं काय ?' सुरेखानें विचारलें.

'थोडेसें रक्त पाहून इतकें घाबरण्याची जरूर नाहीं.' प्राणवल्लभ म्हणाला, 'ती लवकरच शुद्धीवर येईल.'

'या प्रकरणाला लवकरच फांटे फुटूं लागले आहेत आणि तें कांहीं चांगलें नाहीं.' मध्येंच अंबाजी म्हणाला, 'झुंजारची बायको माझ्याच मोटारीच्या सामानाच्या पेटींत दडून बसून होती, ही गोष्ट मला मोठी सूचक वाटते. ही जागा तुझ्या त्या बंगल्यापेक्षां अधिक सुरक्षित नाहीं, आणि तिच्या मस्तकावर फटका मारून तिला येथें आणणें तर अतिशय मूर्खपणाचें होतें.'

'तुम्हीं सर्वच भेकड आहांत.' तुच्छतेनें प्राणवल्लभ म्हणाला, 'तिनें कांहीं संदेश पाठविण्यापूर्वीच मी तिला पकडलें आहे आणि मला तर वाटतें, जें झालें तें चांगलेंच झालें. झुंजारची बायकोच आपल्या ताब्यांत असल्यानंतर आपणाला त्रास देण्याची त्याची हिंमत होणार नाहीं.'

'मला तर वाटतें, झुंजार येथें यावयासहि निघाला असेल !' बापू उत्तेजित स्वरांत म्हणाला.

'झुंजार मूर्ख आहे अशी तुझी कल्पना आहे काय ?' अंबाजीनें प्राणवल्लभाला विचारलें, 'त्याची बायको त्याला टेलिफोन करीत होती.

एक्स्चेंजमध्यें तपास करून त्याला ती कुठून टेलिफोन करीत होती हे सहज शोधून काढतां येईल.'

'तें त्याला शोधून काढतां येईल हें मलाहि मान्य आहे. पण त्यामुळें त्याचा काय फायदा होणार आहे? तो फार तर त्या पोस्ट ऑफिसापर्यंत येईल. आपण कुठें आहोंत हें त्याला कसें समजणार? मध्यरात्रींपर्यंत आपण आपल्या या कामांतून मोकळेंहि होऊं. नागरदास आपल्या मुलीसाठीं पैसे देण्यास खात्रीनें तयार होईल.'

'तुमचें म्हणणें बरोबर आहे.' पिसाळ म्हणाला, 'आपण त्याची बायकोच पळविली आहे हें झुंजारला समजतांच तो मुळींच गडबड करणार नाहीं. पण एकाच गोष्टीची मला चिंता वाटते. आणि ती म्हणजे कांहीं तासांच्या आंतच हा सर्व भाग पोलिसांनीं गजबजून जाईल.'

'तुझें म्हणणें बरोबर आहे. पण तोंपर्यंत आपण दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं निघून जाऊं.'

'तुला एखादी गुप्त जागा माहीत आहे काय?' अंबाजीनें विचारलें.

'होय. शिवाय ही मोटारबोट असल्यामुळें आपणाला सारा समुद्र मोकळा आहे. कुठेंहि जातां येईल. याहिपेक्षां एक मोठी वेगवान मोटारबोट येथून शंभर यार्डांवर नांगरलेली आहे, आणि तीहि याच मालकाची आहे.'

'ही तुझी योजना बरी आहे.' अंबाजी समाधानानें म्हणाला.

'तर मग अंबाजी, तूं व पिसाळ माझ्याबरोबर चला. त्या दुसऱ्या मोटारबोटीवर जाऊं. हा पिसाळ मोटारबोट चालविण्यांत हुशार आहे.'

नंतर तो त्या दुसऱ्यांकडे वळून म्हणाला, 'तुम्हीं दोघे या दोघींवर नजर ठेवा, जर झुंजारची बायको शुद्धीवर येण्याचीं चिन्हें दिसलीं तर तिचे हातपाय बांधून ठेवा.'

'तुम्हीं येथून जाण्यापूर्वीच या दोघींना नीट बांधून ठेवा.' बापू म्हणाला, 'म्हणजे आम्हांला पहारा करणें सोपें जाईल. झुंजारच्या बायकोच्या बाबतीत कोणताहि धोका पत्करण्याची माझी तयारी नाही.'

'जर तुमच्यांत माणुसकी असती तर तुम्हीं तिच्या जखमेकडे प्रथम लक्ष पुरविलें असतें.' सुरेखा रागानें म्हणाली. पण तिलाहि एका खुर्चीला बांधण्यांत आलें होतें.

त्या दोघींची योग्य व्यवस्था केल्यानंतर प्राणवल्लभ, अंबाजी आणि पिसाळ निघून गेले. सुरेखाच्या बोलण्याचा दगडूवर कांहींसा परिणाम झाला होता त्यानें थंड पाण्यानें विजयेच्या मस्तकावर झालेली जखम धुतली आणि ती एका फडक्यानें बांधूनहि टाकली.

'दगडू, तुझेंच म्हणणें बरोबर होतें. आपण या भानगडींत पडण्यांत

मूर्खपणाच केला होता. प्राणवल्लभाला कसलीहि चिंता नाहीं. कारण तो फरारी आहे. मला कोणतीहि तिजोरी उघडावयास सांगितली असती तर मी वाटेल तितकी मेहनत घेतली. पण स्त्रियांवर हात टाकण्याचें काम माझ्या बापानें केलें नव्हतें आणि मीहि केलें नाहीं.'

'आपण येथून फरारी होऊंया काय ?' दगडूनें उत्सुकतेनें विचारलें.

'मलाहि तसेंच वाटतें. पण आपल्याला अंबाजीचा विश्वासघात करावयाचा नाहीं. तोहि या भानगडींत गुंतला आहे आणि आपण इतकीं वर्षें त्याच्याबरोबर काम करीत आहोंत, त्याला असें सोडून जाणें योग्य होणार नाहीं. दगडू, आपल्याला येथें राहिलें पाहिजे.'

बापूनें जरी अगदीं तडफदार भाषण केलें होतें तरी तो घाबरला होता. आणि दगडूबद्दल तर बोलण्याची सोयच नव्हती त्या दोघांचे चेहरे पाहून खुर्चीला बांधलेली सुरेखा मोठमोठ्यानें हंसूं लागली. त्यांना तिचा राग आला नाहीं. ते उलट अधिकच घाबरले !

१६

संतापलेल्या क्रूर वाघाप्रमाणें शेठ नागरदासांच्या दिवाणखान्यांत झुंजार फेऱ्या घालीत होता. एका हातानें डोकें घट्ट दाबून आणि दुसऱ्या हातानें रिसीव्हर कानाला लावून आनंदराव गंभीर मुद्रेनें उभे होते. कारण त्यांची आवडती विजूताई संकटांत सांपडलेली होती.

दिवाणखान्यांतील वातावरण अगदीं तप्त झालेलें होतें. वृद्ध शेठ नागरदास गंभीर मुद्रेनें तेथें बसले होते. ज्याच्या वाढदिवसाचा त्या रात्रीं समारंभ होता तो त्यांचा मोठा मुलगा दीपकहि तेथें हजर होता आणि त्याला सुरेखाबद्दल माहिती देण्यांत आली होती.

विजूताईनें बोरिवली येथील एका लहानशा पोस्ट ऑफिसांत असलेल्या सार्वजनिक टेलिफोनवरून त्याच्याबरोबर बोलणें केलें होतें. 'तें पोस्ट ऑफिस आपणाला शोधून काढतां येईल पण त्यामुळें काय फायदा होणार आहे ?' आनंदरावांनीं विचारलें.

'प्रथम आपणाला ते पोस्ट ऑफिस शोधून काढलें पाहिजे. पुढें काय करावयाचें तें आपण तेथें गेल्यावर ठरवूं. चला आनंदराव, आपणाला अ तां मुळींच वेळ गमवितां येणार नाहीं.' झुंजार म्हणाला.

'मी पण तुमच्याबरोबर येतों.' दीपक म्हणाला, 'जर कुणी माझ्या बहिणीला अपाय केला असला तर मी त्याचा गळा दाबीन —'

'गळा दाबण्याचें काम माझें आहे.' झुंजार म्हणाला, 'दीपक, तुम्हांला माझ्याबरोबर येतां येणार नाहीं.'

'पण माझी बहीण –'

'सध्यां मी तुमच्या आईचा विचार करीत आहें.' झुंजार म्हणाला 'तिला आम्हीं अद्याप कळविलेलें नाहीं. तुम्हीहि जर मेजवानी सोडून बाहेर गेलां तर तिला संशय येईल आणि ती घाबरून जाईल. तुमच्या बहिणीबद्दल मुळींच चिंता करू नका. मेजवानीचा कार्यक्रम चालू राहूं द्या. त्या कार्यक्रमाला चांगला रंग भरण्यापूर्वीच मी सुरेखाला घेऊन येतों.'

झुंजारचें तें बोलणें ऐकून वृद्ध नागरदासांनाहि बरेंच समाधान वाटलेलें दिसलें. ते म्हणाले, 'झुंजारराव, तुमच्यावर माझा विश्वास आहे. सुरेखा संकटांत सांपडली याला तिचाच मर्खपणा कारणीभूत आहे.'

'नाहीं नागरदास, या प्रकरणांत खरा मूर्खपणा प्राणवल्लभानें आणि त्याला साथ करणाऱ्या अंबाजीनें केला आहे. सुरेखाला मुळींच दोष देऊं नका. ती ज्या अडचणींत सांपडली आहे त्याची जबाबदारी माझ्याबरच आहे आणि मीच तिला सोडविलें पाहिजे. मी एक तासांत तिला घेऊन येतों. चला आनंदराव.' त्या बाप – लेकाला आणखी कांहीं विचारण्याची संधि न देतां ते दोघे धांवतच तेथून निघून गेले.

मोटारींत बसल्यानंतर झुंजार म्हणाला, 'आनंदराव, मला त्या सुरेखापेक्षांहि विजूबद्दल अधिकच चिंता वाटत आहे. तेव्हां, तुम्हीं मोटारींत व्यवस्थित बसा. कारण आज मी ही मोटार किती वेगवान आहे तें तुम्हांला दाखविणार आहें.'

'पण झुंजार, या धांवपळीचा काय उपयोग होणार आहे ? विजूताईला कुठें नेण्यांत आलें आहे हें आपणाला माहीत नाही. शिवाय आपण दोघेच त्या टोळीचें काय करूं शकणार आहोंत ? आपणाला आणखी मदतीची गरज आहे.'

'त्यासाठींच आपण प्रथम आतां झुंजार–महालांत जाणार आहोंत. जर तुम्हांला एखादा शिकारी कुत्रा मिळाला तर आपलें बरेंच काम होणार आहे.'

'तुला वेड लागलें आहे काय ?' आनंदरावांनीं विचारलें, 'मी धनंजय आहें, असें तुला वाटतें काय ? धनंजयांप्रमाणें वाघ्याला घेऊन–'

'मी तुमची चेष्टा केली नाहीं.' झुंजार गंभीरपणें म्हणाला, 'तुम्ही शिकारी कुत्रा मिळवूं शकाल कीं नाहीं तें मला सांगा.'

'मिळेल. पण त्यासाठीं आपणाला सी आय्. डी. ऑफिसांत जावें लागेल.'

'छान ! आपण प्रथम झुंजार–महालांत जाऊं. मला विजूचा एखादा रुमाल नाहीं तर दुसरी कांहींतरी वस्तु बरोबर घेतली पाहिजे.'